# १

# १९ व्या शतकाच्या उंबरठयावरील अमेरिका

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टये

१.१ प्रस्तावना

१.२ राजकीय घडामोडी

१.३ आर्थिक परिवर्तन

१.४ समारोप

१.५ प्रश्न

१.६ संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी समजतील

- अमेरिकेची राजकीय आर्थिक आणि औद्योगिक प्रगती अभ्यासणे.
- शेती पद्धतीमधील बदलाचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना

१९व्या शतकाची अखेरची दशके आणि २० व्या शतकाच्या पहिल्या दशकामध्ये अमेरिकेचे एका औद्योगिक, नागरी राष्ट्रात परिवर्तन झाले, या नव्या राष्ट्राची महत्त्वाकांक्षा साम्राज्य स्थापनेची होती. एका ग्रामीण प्रजासत्ताकाचे एका नागरी राज्यात परिवर्तन झाले, सीमा पुसट झाल्या, प्रचंड कारखाने आणि पोलादाच्या गिरण्या आणि पूर्व - पश्चिम किनाऱ्यांना जोडणारे रेल्वेमार्ग ( रेल्वेमार्गांना अमेरिकेत रेलरोड असे नाव आहे) बांधले गेले, छोटया जमीनधारणांची जागा आता प्रचंड मोठया जमीनधारणेच्या पद्धतीने घेतली तर छोटया शेतीच्या गावांची जागा सतत वाढत्या लोकसंखेच्या प्रचंड मोठया औद्योगिक शहरांनी घेतली. अनेक वैज्ञानिक शोधामुळे औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली, परिणामी अमेरिकेला सतत वाढत्या प्रमाणात कच्च्या मालाची गरज भासू लागली; ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न म्हणूनच अमेरिकेने वसाहतींचा शोध सुरु केला. सतत आणि अखंड होणारा कच्च्या मालाचा पुरवठा आणि औद्योगिक मालासाठी तेवढयाच निकडीने लागणाऱ्या बाजारपेठा आणि त्याचबरोबर रणनीतिविषयक गरजांमुळेच एक जागतिक सत्ता होण्याच्या दिशेने अमेरिकेची वाटचाल सुरु झाली.

## १.२ राजकीय घडामोडी

२० या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेतील राजकारण फारसे सुयोग्य नव्हते. रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅटिक हे दोन्ही राजकीय पक्ष अमेरिकन जनतेसमोर स्पष्ट राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम ठेऊ शकले नाहीत. याची दोन कारणे होती. १) स्थानिक, राजकारणावर नियंत्रण असणारे राजकीय नेते कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर ठाम भूमिका घेऊ शकले नाहीत. अमेरिकन जनता आपल्यापासून दूरावेल अशी भीती त्यांना वाटत असे, २) दोन्ही राजकीय पक्ष शिस्तीचे पालन करत नसत.

### १.२.१. १९८८ ची निवडणूक आणि बेंजामिन हॅरिसन :

रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार बेंजामिन हॅरिसन यांनी १८८८ ची राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जिंकली. त्यावेळेस अमेरिकन काँग्रेस (पार्लमेंट), मध्ये रिपब्लिकन पक्षाचे बहुमत असल्याने त्यांना आपल्याला हवे ते कायदे काँग्रेसकडून विनासायास पारित करून घेता आले. अमेरिकन काँग्रेसवर त्यांचे पक्के नियंत्रण असल्याने ते *झार रीडफ* या नावाने ओळखले जात असत. तथापि त्यांच्या पक्क्या नियंत्रणाखालीच काँग्रेसने तीन वादग्रस्त कायदे १८८९ च्या उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात पारित केले होते. १) कायदा मक्तेदारीविषयीचा होता, तर २) चांदीच्या संदर्भातील होता, तर ३) कायदा जकातकर प्रणाली संबंधीचा होता. नागरी सेवा आणि निवृत्तीवेतन या संबंधीचे दोन अन्य कायदेही काँग्रेसने पारित केले होते.

**१. शेरमन अँटि - ट्रस्ट अॅक्ट :**

जुलै, १८९० मध्ये पारित झालेल्या या कायद्यान्वये विविध राज्यांदरम्यानच्या आणि परदेशांशी चालणाऱ्या व्यापारात अडथळे निर्माण करणारी सर्व मक्तेदारी रद्द करण्यात आली. औद्योगिक मक्तेदारी नष्ट करण्यासाठी या कायद्याचा प्रभावी वापर मात्र १० वर्षानंतरच करता आला होता. या कायद्यातील तरतुदींच्या आधाराने केंद्र सरकारने १८९४ मध्ये रेल्वे कामगारांच्या संपाला मनाई करणारा हुकूम जारी केला; १८९५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या मनाई हुकूमाला मान्यता दिली होते. शेरमन कायद्याने मक्तेदारीला आळा बसेल अशी आशा ज्यांना वाटत होती, त्यांची मात्र निराशा झाली. इंटर स्टेट कॉमर्स अॅक्ट हा कायदा पारित केल्यानंतरच ३ वर्षांनीच शेरमन अँटी - ट्रस्ट कायदा पारित झाला होता. महाकाय औद्योगिक कंपन्यांचे नियंत्रण करण्यासाठी आता अमेरिकन जनता राज्य सरकारांच्या ऐवजी केंद्र सरकारवर विसंबून राहू लागली होती ही गोष्ट त्यावरून स्पष्ट होते.

**२. चांदीविषयक समस्या :**

अँटी - ट्रस्ट कायदा पारित केल्यानंतर दोन आठवड्यातच अमेरिकन काँग्रेसने शेरमन सिल्व्हर पर्चेस अॅक्ट हा कायदा केला होता. या कायद्यानुसार अमेरिकन अर्थमंत्र्याला दर महा १,३०,००० किलो चांदी बाजारभावाने खरेदी करण्याचा अधिकार होता. या कायद्याने पूर्वीचा ब्लँड - अलिसन अॅक्ट हा कायदा रद्द झाल्याने सरकारला पूर्वीपेक्षा दरमहा ५० टक्क्यापेक्षा जास्त चांदी खरेदी करता येणार होती. चांदीच्या घसरत्या भावाने खाणींच्या मालकांचे नुकसान होत असल्याने, त्यांनी सरकारवर दबाव आणल्याने काँग्रेसला हा कायदा करावा लागला, शेतकरीवर्गाला देखील १८९० मध्ये त्यांच्या शेतमालाला कमी

भाव मिळू लागल्याने चांदीची किंमत वाढल्यास त्यांचा फायदा होणार असल्याने त्यांनीही सरकारवर असा कायदा करण्यासाठी दबाव आणला होता.

### ३. मॅककिनले जकातकर प्रणाली :

ऑक्टोबर, १८९० मध्ये मॅककिन्ले जकातकर प्रणाली अंमलात आणली गेली, त्यानुसार काही प्रकारचा शेतमाल संरक्षित सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आल्याने शेतकरी वर्ग आनंदित झाला होता. काही प्रकारचा शेतमाल, विशेषतः साखर जकातकर मुक्त करण्यात आली होती, आणि देशांतर्गत उसाच्या शेतकऱ्याच्या होणाऱ्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी त्यांना साखरेच्या एक पाउंडामागे दोन सेंटचे अनुदान देण्यात येणार होते. जकातकर आकारणीच्या प्रमाणात वाढ हे या प्रणालीचे वैशिष्टय होते, त्यापैकी अनेक वस्तू ग्राहकोपयोगी आणि दैनंदिनी उपयोगाच्या होत्या. म्हणूनच, ही जकातकर प्रणाली पारित करणाऱ्या कायद्याने शेतकऱ्यांच्या असंतोषात भर पडली तसेच काँग्रेसच्या निवडणूकीमध्ये हा कायदा वादाचा एक विषय झाला होता.

### ४. मुलकी सेवा :

मुलकी सेवेचे सर्व नियम डावलून राष्ट्राध्यक्ष हॅरिसन यांनी सेवेमध्ये आपल्या समर्थकांचा भरणा केला होता. तथापि, त्यांनी थिऑडॉर रुझवेल्ट यांनी नागरी सेवा आयोगावर केलेली नियुक्ती त्यांना निश्चितच श्रेयकारक होती. रूझवेल्ट यांनी सरकारी सेवेमधील सर्व स्तरावरील नेमणुक गुणानुसार केल्या असल्या तरी या नेमणूकांना राष्ट्राध्यक्षांची संमती मिळाली नव्हती.

### ५. निवृत्तीवेतनविषयक कायदे :

१८८९ मध्ये काँग्रेसने डिपेंडंट्स पेन्शन अॅक्ट या कायदा पारित केला. कायद्यानुसार केंद्र सरकारच्या सैन्यातील जखमी झालेल्या किंवा मानसिक आघात झालेल्या सर्व निवृत्त सैनिकांना निवृत्तीवेतन देण्यात येऊ लागले. या जखमा किंवा मानसिक आघात कोठे झाला असला तरी असे वेतन दिले जाणार होते. या कायद्यान्वये निवृत्त सैनिकांच्या विधवा आणि मुलांनाही वाढीव दराने भत्ता दिला जाणार होता.

## १.२.२. १८९२ ची निवडणूक आणि क्लिव्हलँड :

डेमॉक्रॅटिक पक्षाचे उमेदवार ग्रोव्हर क्लिव्हलँड यांनी १८९२ ची राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक जिंकली. मार्च १८९३ मध्ये त्यांचा दुसरा कार्यकाल सुरु झाला तेव्हा देश आर्थिक संकटाच्या उंबरठयावर उभा होता. मिसिसिपी नदीच्या पश्चिमेची राज्ये ६ वर्षे आर्थिक मंदीच्या तडाख्यात सापडली होती, मॅककिन्ले जकातकर प्रणाली अंमलात आल्याने परदेशांची चालणारा व्यापार कमी झाला होता आणि खाजगी कर्जाचे अतिशय वाढलेले प्रमाण काळजी करण्यासारखे होते. राष्ट्राध्यक्ष मॅककिन्ले यांनी अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न करण्याऐवजी केंद्र सरकार कर्जबाजारी होणार नाही यावरच आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते. सरकारी खजिन्यातून कागदी आणि रौप्य चलनाऐवजी नेहमी सुवर्ण डॉलर दिले जातील यावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. सरकारी खजिन्याला

सरकारची सुवर्णविषयक जबाबदारी पार पाडता यावी यासाठी १००,०००,००० डॉलरचा राखीव साठा ठेवण्याची आवश्यकता होती.

२१ एप्रिल, १८९३ रोजी सुवर्णाचा साठा त्यापेक्षा कमी झाल्याने त्याचा मानसिक परिणाम दूरगामी झाला होता. लोकांनी आपली सर्व शिल्लक आणि गुंतवणूक सोन्यामध्ये बदलून घेण्याची एकच घाई; बँका आणि आर्थिक व्यवहारांचे मध्यस्थ किंवा आडते अडचणीत सापडले आणि काही आर्थिक संस्थांचे दिवाळे निघाले. वास्तुंच्या किमती घसरल्या आणि रोजगाराच्या संधी कमी झाल्या. सर्व देश गंभीर आर्थिक मंदीच्या तडाख्यात सापडला; ही आर्थिक मंदी पुढील ३ वर्षेपर्यंत टिकून होती.

जकातकर प्रणाली मधील करांचे प्रमाण कमी करण्याची क्लिव्हलँड यांची इच्छा असली तरी डॅमॉक्रॅटिक पक्षाच्या सिनेट सभासदांच्या विरोधामुळे त्यांना तसे करता आले नाही. हाऊस ऑफ रिप्रेझेन्टिव्ह्ज या कनिष्ट सभागृहाने त्यांच्या इच्छेनुसार जकातकरांचे प्रमाण कमी करणारे एक विधेयक मंजूर केले असले तरी सिनेटमध्ये त्या विधेयकामध्ये एवढे बदल आणि दुरुस्त्या करण्यात आल्या होत्या की या दुरुस्त केलेल्या विधेयकाचे मूळ विधेयकाशी काहीच साम्य उरले नाही. काही वस्तुवरील जकातकर मॅककिन्ले जकातकर प्रणालीतील दरांपेक्षा वाढवले होते. अखेरिस, ऑगस्ट १८९४ मध्ये हे विधेयक पारित झाले असले तरी राष्ट्राध्यक्ष क्लिव्हलँड यांनी त्यास आपली संमती देण्याचे नाकारल्याने त्यांच्या संमतीशिवायच त्या विधेयकाचे कायद्यामध्ये रुपांतर झाले. या कायद्यातील एक तरतुद आयकर आकारणीच्या संबंधातील होती. मात्र १८९५ मधील एका निवाड्यानुसार सर्वोच्च न्यालयाने ही तरतुद घटनाबाह्य ठरवली होती.

### १.२.३. १८९६ ची निवडणूक आणि मॅककिन्ले :

१८९० च्या दशकाच्या सुरुवातीच्या आर्थिक मंदीमुळे जहाल विचारसरणीला विशेष चालना मिळाली, देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये काही मूलभूत दोष असल्याची सर्वसामान्य जनतेची धारणा झाली. परिणामी १८९६ ची राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक 'सुवर्ण विरुद्ध रौप्य' या मुद्यावर लढवली गेली. या निवडणूकीमध्ये रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार मॅककिन्ले यांनी डेमॉक्रॅटिक पक्षाचे उमेदवार विल्यम जेनिंग्ज ब्रायन यांचा पराभव केला. मॅककिन्ले यांचा विजय भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि तिची यंत्रणा यांच्या बाजूने कौल असल्याचा सर्वसाधारण समज होता.

४ मार्च, १८९७ रोजी मॅककिन्ले यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे आपल्या हाती घेतली तेव्हा देशातील आर्थिक मंदी समाप्त होऊन आर्थिक सुबत्ता परत येऊ घातली होती. लवकरच त्यांनी जकातकर प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी काँग्रेसचे खास अधिवेशन भरवले. या अधिवेशनामध्ये काँग्रेसने डिंग्ले टॅरिफ ॲक्ट हा जकातकर प्रणालीविषयक कायदा पारित केला, या कायद्यातील तरतुदीनुसार जकातकर मुक्त वस्तुंच्या सूचीमधील अनेक वस्तु वगळण्यात आल्या आणि अन्य वस्तुंवरील जकातकरांचे प्रमाण वाढवण्यात आले. अशा रीतीने उद्योगपतींना परकीय स्पर्धेपासून वाचवण्यात आले; परिणामी त्यांना देशांतर्गत बाजारातील आपल्या मालाच्या किमती वाढवणे शक्य झाले.

१८९६ मधील राष्ट्रध्यक्षपदाच्या निवडणूकीमध्ये रिपब्लिकन पक्षाची प्रमुख मागणी सुवर्णमानक कायम ठेवण्याची असली तरी मार्च १९०० मध्येच काँग्रेसला गोल्ड स्टँडर्ड अॅक्ट हा कायदा पारित करता आला होता. या कायद्यातील तरतुदीनुसार सरकारी खजिन्यामध्ये १५०,०००,०० डॉलर किमतीचा सोन्याचा साठा नेहमी राखीव ठेवण्याची तरतुद होती आणि असा साठा कायम ठेवता यावा यासाठी आवश्यक असल्यास सरकारी कर्जरोखे बाजारात विकण्याची अनुमती सरकारला देण्यात आली होती. १९०० मध्ये अशी तरतुद करणे एक प्रकारे अपकर्ष बिंदू होता कारण त्या वेळेस सोन्याचा पुरेसा पुरवठा करण्याच्या प्रश्नाला व्यवहारात काहीच महत्त्व उरले नव्हते. १८९३ पासून अमेरिकेतील सोन्याच्या उत्पादनाचे प्रमाण वाढत गेले. १८८१ ते १८९३ या काळात सोन्याचे दरवर्षी जेवढे उत्पादन होत असे, त्यापेक्षा दुप्पट सोन्याचे उत्पादन दरवर्षी अमेरिकेत होऊ लागले. परिणामी, १९३० च्या दशकातील आर्थिक महामंदी आली तो पर्यंत चलनातील सोन्याच्या प्रमाणाचा प्रश्न उद्भवला नाही.

राष्ट्राध्यक्ष मॅकंकिन्ले यांनी राष्ट्रध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅटिक पक्षांनी त्यांचे नेहमीच राजकारण सुरु केले. थिऑडॉर रूझवेल्ट यांच्या कारकिर्दीमध्ये पॉप्युलिस्ट चळवळीने केलेल्या मागणीनुसार सुधारणा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले होते.

## १.३ आर्थिक परिवर्तन

यादवी युद्धापासून ते पहिल्या महायुद्धापर्यंत अमेरिकेचा झपाट्याने विकास झाला. या काळामध्ये अमेरिकेत शेतीविषयक आणि औद्योगिक क्रांती झाली; तिच्या अनुषंगाने झालेले आर्थिक परिवर्तन या काळाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. यादवी युद्धाच्या पूर्वी उत्पादन क्षमता आणि कौशल्य या बाबतीत अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स या देशांच्या मागे होती. १९१४ पर्यंत अमेरिकेची उत्पादन क्षमता जगभरातील सर्व देशांच्या एकूण उत्पादन क्षमतेपेक्षा अधिक होती. तंत्रविज्ञाच्या क्षेत्रामध्ये जर्मनी वगळता अन्य कोणताही देश तिची बरोबरी करू शकत नव्हता.

**१. शेतीविषयक क्रांती :**

औद्योगिक प्रगती भरपूर झाली असली तरी शेती हा अमेरिकेचा मूलभूत व्यवसाय होता. यादवी युद्धानंतर औद्योगिक क्रांतीबरोबर देशात शेतीविषयक क्रांतीची सुरुवात झाली होती. मानवी श्रमशक्तीच्या ऐवजी यंत्रांच्या सहाय्याने शेतीची कामे करणे आणि फक्त उपजीविके पुरते शेतमालाचे उत्पादन करण्याऐवजी आता शेतमालाचे व्यापारी उत्पादन होऊ लागले. १८६० ते १९१० या काळात अमेरिकेतील शेताची संख्या २०,००,००० पासून ६०,००,००० पर्यंत, म्हणजे तिपटीने वाढली होती, तर माशागतीखालचे क्षेत्र १ कोटी ६० लाख हेक्टर पासून ३ कोटी ५२ लाख हेक्टर पर्यंत, म्हणजे दुपटीने वाढले होते.

१८६० ते १८८० या काळात गहु, मका, आणि कापुस या सारख्या मूलभूत पीकांचे उत्पादन पूर्वीपेक्षा अनेक पटीने वाढले होते. त्याच काळामध्ये अमेरिकेची लोकसंख्या दुपटीने वाढली होती; त्यापैकी बहुसंख्य लोक वाढत्या शहरांत केंद्रित झाली होती. अमेरिकन कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना पुरेल येवढे अन्न धान्य, कापुस, गायीचे

आणि डुकरांचे मांस यांचे उत्पादन अमेरिकन शेतकरी करत असे, तसेच सर्वांना पुरेल येवढी लोकरही पैदा करत असे, एवढेच नव्हे तर त्यांचे अतिरिक्त उत्पादनही करत असे. या असामान्य कामगिरीची अनेक कारणे होती. एक म्हणजे पश्चिमेच्या दिशेने अमेरिकेचा विस्तार झाला होता. दुसरे म्हणजे मशागतीची सर्व कामे आता यंत्रांच्या सहाय्याने होऊ लागली. १८०० मधील सर्वसाधारण अमेरिकेन शेतकरी खुरप्याच्या सहाय्याने दररोज २० टक्के हेक्टर क्षेत्रातील गव्हाची खुरपणी करत असे. १८३० मधील शेतकरी यंत्रांच्या सहाय्याने दररोज ८० टक्के हेक्टर क्षेत्रातील गव्हाची खुरपणी करू लागला. जमिनीच्या मशागतीसाठी लागणारी सर्व प्रकारची यंत्रे निर्माण होऊ लागली, तसेच पेरणी, पीकांची कापणी, टरफले किंवा साले काढणे, गवत वाळवणे, अंडी उबवणे आणि इतर अनेक प्रकारच्या कामासाठी आवश्यक ती लहान मोठी यंत्रे तयार करण्यात आली.

अमेरिकेमध्ये यंत्रांच्या उपयोगाबरोबरच शेतीविषयक क्रांतीमध्ये विज्ञानाचाही उपयोग झाला होता. १८६२ च्या मॉरिल लँड ग्रांट कॉलेज ॲक्ट या कायद्यानुसार प्रत्येक राज्याला शेतकी आणि औद्योगिक महाविद्यालये स्थापन करण्यासाठी सार्वजनिक जमीन देण्यात येऊ लागली. या महाविद्यालयामध्ये शेतकीचे शिक्षण दिले जाणार होते, तसेच तेथे वैज्ञानिक शेतीचे संशोधन केंद्रे देखील निर्माण करण्यात येणार होती. नंतर काँग्रेसने तेथे शेतीची प्रयोगकेंद्रे स्थापन करण्यासाठी अनुदान दिले आणि शेतीविषयक संशोधनासाठी शेतकी खात्याला थेट पैसे उपलब्ध करून दिले. २० व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेत सर्वत्र वैज्ञानिकांनी विविध प्रकारच्या शेतीविषयक समस्यांवर संशोधन सुरु केले. केंद्र सरकारच्या या धोरणामुळे अमेरिकन शेतकऱ्यांना शेतमालाचे जादा उत्पादन करणे शक्य झाले असले तरी त्यामुळे शेतमालाचे भाव घसरल्याने त्यांनाच फार मोठया संकटाला तोंड द्यावे लागले ही त्यामधील नशिबाचा भाग होता. यापैकी एक वैज्ञानिक मार्क कार्लसन यांनी शेतकी खात्यातर्फे रशियाचा दौरा केला. तेथे त्यांना हिवाळ्याला किंवा आवर्षणाला दाद न देणारी गव्हाची एक जात आढळली. त्यांनी गव्हाचे हे वाण अमेरिकेत नेले आणि आता अमेरिकेतील गव्हाच्या एकूण उत्पादनापैकी निम्मा गहू या प्रकारचा असतो. मारियन डॉरसेट या एका अन्य वैज्ञानिकाने डुकरांना होणाऱ्या कॉलाऱ्यावर गुणकारी औषध शोधून काढले. जॉर्ज मॉल्हर या वैज्ञानिकाने जनावरांच्या तोंडाला आणि खुरांना होणारा लाळ्या रोगावर औषध शोधून काढले. उत्तर आफ्रिकेमधून एका संशोधकाने काफ्फी जातीचे कणिस अमेरिकेत नेले तर दुसऱ्या एका संशोधकाने पिवळी फुले येणाऱ्या अल्फाल्फाचा एक प्रकार तुर्कस्थानमधून अमेरिकेला नेला. कॅलिफोनियामधील ल्युथर बरबँक या वैज्ञानिकाने भाज्या आणि फळांच्या अनेक जाती विकसित केल्या. विस्कॉन्सिन राज्यातील स्टिफन बॅबकॉक यांनी दुधातील स्निग्धांश निश्चित करणारे उपकरण शोधून काढले. अलाबामा राज्यातील टस्केगी संस्थेतील जॉर्ज वॉशिंग्टन कार्वर या कृष्णवर्णिय विज्ञानिकाने शेंगदाणे, रताळी आणि सोयाबिनचे विविध उपयोग शोधून काढले होते.

### २. औद्योगिक क्रांती :

अमेरिकेच्या औद्योगिक विकासातील दोन वैशिष्टये स्पष्ट दिसतात. एक, अमेरिकन उद्योगांनी वस्तुंचे मोठया प्रमाणावर उत्पादन करण्याचे तंत्र अवलंबले होते आणि त्यासाठी त्यांनी महाकाय उद्योगसंस्था विकसित केल्या होत्या. दुसरे, अमेरिकेतील उद्योगांच्या वाढीबरोबरच अमेरिकेची लोकसंख्याही वाढत गेली, (अमेरिकेची लोकसंख्या ३ कोटीपासून

१० कोटीपर्यंत वाढली), समग्र देशामध्ये रेल्वेमार्गाचे जाळे स्थापन झाले आणि अमेरिकेच्या पश्चिम प्रदेशात लोकांनी वसाहती केल्या. १८६५ मध्ये अब्राहाम लिंकन यांचा मृत्यू झाला, त्यानंतर २५ वर्षातच अमेरिका जगातील पहिले उत्पादक राष्ट्र झाले होते. अशा रितीने इंग्लंडने जी प्रगती १०० वर्षात केली होती तीच प्रगती अमेरिकेने त्यापेक्षा जवळपास निम्म्या काळात केली होती.

अमेरिकेची झपाटयाने झालेले औद्योगिक वाढ ६ घटकांमुळे शक्य झाली. हे घटक पुढील प्रमाणे होते.

- रशियाचा अपवाद वगळता अमेरिकेमध्ये विविध प्रकारच्या कच्च्या मालाचे प्रचंड मोठे साठे उपलब्ध आहेत;
- अमेरिकेमध्ये कच्च्या मालाचे पक्क्या मालामध्ये रुपांतर करण्यासाठी अनेक वैज्ञानिक शोध लावण्यात आले तसेच तंत्रविज्ञान विकसित करण्यात आले;
- वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असलेली पुरेशी रेल्वे आणि जलवहातुक व्यवस्था विकसित करण्यात आली;
- अमेरिकन उत्पादनांसाठी देशांतर्गत आणि परदेशांतील बाजार पेठ सतत विस्तारत गेली.
- स्थालांतरितांमुळे उद्योगांना पुरेसे मनुष्यबळ सतत उपलब्ध होत गेले;
- राज्याराज्यातील मालाच्या वहातुकीसाठी जकातकर प्रणालीचा अभाव होता, परकीय स्पर्धेपासून सरकारने अमेरिकन उद्योगांचे रक्षण केले आणि अमेरिकन सरकारने उद्योगांना नेहमीच अनुदान देऊन मदत केली.

एकटया दुकट्याच्या मालकीच्या उद्योगांची जागा आता महाकाय औद्योगिक संस्थांनी घेतली होती. या काळातील औद्योगिक विकासाचे हे एक अन्य वैशिष्टय होते. १९ व्या शतकाच्या अखेरिस अमेरिकेतील एकूण औद्योगिक उत्पादनापैकी ३/४ उत्पादन या महाकाय औद्योगिक संस्था करत असत. तेल, पोलाद, तांबे, शिसे, साखर आणि कोळसा इत्यादींचे उत्पादन या महाकाय कंपन्या करत असत. याचा एक परिणाम असा झाला की या वस्तुंचे उत्पादन करणाऱ्या लहान लहान संस्था आता या महाकाय संस्थांच्या नियंत्रणाखाली आल्या. बाजारपेठेवर या महाकाय संस्थांचे पूर्ण नियंत्रण असे आणि त्या आपल्या मर्जीनुसार आपल्या मालाच्या किंमती निश्चित करत असत. थोडक्यात एक अशी नवी आर्थिक व्यवस्था निर्माण झाली की ज्या व्यवस्थेमध्ये स्पर्धा अजिबातच नाहिशी झाली होती. १९ व्या शतकाच्या अखेरिस उद्योगपती एकत्र येत असत आणि आपली साधन संपत्ती एकत्र करून वस्तुंच्या किंमती कमी करण्याची स्पर्धा पूर्णपणे टाळत असत कारण असे केल्याने त्यांना कमालीचा फायदा होत असे. एका अन्य कारणानेही स्पर्धा कमी झाली. उत्पादनाच्या नव्या पद्धतीमध्ये फार मोठया प्रमाणावर भांडलाची गुंतवणुक करणे आवश्यक असे. परिणामी, काही मर्यादित महाकाय उद्योग संस्थांना ते शक्य होत असे. उत्पादनाच्या एका क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या औद्योगिक संस्था मर्यादित असल्याने त्यांना त्यांच्या



munotes.in

उत्पादनाची किंमत निश्चित करणे सहज शक्य होत असे. त्यामुळे कोणत्याही सार्वजनिक अधिकाऱ्याला किंवा संस्थेला अशा उद्योगांवर स्पर्धा सक्तीने लादता येत नसे. अशा महाकाय संस्थांशी स्पर्धा करण्याचा एकमेव मार्ग त्यांच्यापेक्षा अधिक मोठया महाकाय संस्था स्थापन करणे हाच होता. परंतु, हे शक्य नसे कारण गुंतवणुकदार आपला पैसा नव्या उपक्रमामध्ये  गुंतवण्यास तयार नसत कारण दीर्घ मुदतीमध्ये आपल्या गुंतवणुकीवर किफायतशीर लाभ होईलच अशी त्यांना खात्री वाटत नव्हती.

एखाद्या उद्योगाचा विस्तार आणि ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया  असे. यादवी युद्धानंतरच्या काळात युद्ध विषयक गरजांमुळे उत्पादनाच्या प्रक्रियेला विशेष चालना मिळाली, लोखंड, वाफ आणि विद्युतशक्तीवर आधारित आर्थिक प्रक्रिया विज्ञान आणि नव्या शोधांच्या मार्गाने झपाटयाने पुढे जाऊ लागली. १८६० च्या पूर्वी फक्त ३६,००० पेटंट्सना, पुढील ३० वर्षामध्ये ४,४०,००० पेटंट्सना मान्यता मिळाली होती तर २० व्या शतकाच्या पहिल्या चतुर्थकामध्ये दहा लाखावर पेटंट्सना मान्यता मिळाली होती. काही उद्योगांच्या विस्ताराच्या त्रोटक माहितीवरून आपल्याला औद्योगिक विकासाची कल्पना येऊ शकेल.

### १.३.१ पोलाद :

चढत्या जकातकरांच्या  संरक्षणामुळे लोखंड आणि पोलाद या राष्ट्राच्या मूलभूत उद्योगाची झपाटयाने प्रगती होत गेली. पोलादाचे उत्पादन विशेष महत्त्वाचे असे कारण अन्य सर्व उद्योग पोलादावरच अवलंबुन असतात. देशात सर्वत्र रेल्वेमार्गाचे जाळे पसरल्याने रूळ, रेल्वे इंजिन, डबे आणि अन्य उपकरणांच्या उत्पादनासाठी पोलादाची मागणी सतत वाढतच गेली. मिशिगन राज्य आणि मिनिसोटा राज्यातील सुपिरियर सरोवराच्या मुखाशी असलेल्या मेसाबी श्रेणीमधील लोह मृतिका यासाठी विशेष उपयोगी ठरली. आपले ज्ञान आणि उत्पादनाची क्षमता यांच्या सहाय्याने पोलादाच्या कारखान्यांनी पोलादाच्या तारा, नळ्या, पत्रे आणि रचनेचे विविध भागांचे उत्पादन करण्यास सुरुवात केली. पोलादाच्या उत्पादनामध्ये अँड्रु कार्नेगी यांनी विशेष महत्त्वाची कामगिरी पार पाडली. जन्माने स्कॉटिश असलेले कार्नेगी वयाच्या १२ व्या वर्षी अमेरिकेत आले. सुरुवातीला त्यांनी सुत गिरणीमध्ये बॉबिन सेवकाची नोकरी पत्करली. त्यानंतर त्यांनी पेनसिल्व्हेनिया रेल्वेच्या तार खात्यात नोकरी केली. वयाच्या ३० व्या वर्षापर्यंत त्यांनी अतिशय धूर्तपणे आणि दूरदृष्टीने काही गुंतवणुक केली होती. १८६५ पर्यंत त्यांची सर्व गुंतवणुक पोलादाच्या औद्योगातच केंद्रित झाली होती. काही वर्षातच त्यांनी लोखंडी पूल, रेल्वेचे रूळ आणि इंजिने उत्पादन करणाऱ्या कंपन्या संघटित केल्या होत्या किंवा त्यांचे भागभांडवल विकत घेतले होते. १० वर्षांनी त्यांनी पेन्सिल्व्हेनिया राज्यातील मोन्घेला नदीकाठी देशातील सर्वात मोठा पोलादाचा कारखाना स्थापन केला. हा पोलादाचा कारखाना आणि इतर अनेक उद्योगांच्या सहाय्याने त्यांनी रेल्वेमार्ग आणि जहाज कंपन्यांच्याकडून अनेक सवलती मिळवल्या होत्या. या पूर्वी अमेरिकेच्या औद्योगिक वाढीमध्ये अशा प्रकारची वाढ कधीच झाली नव्हती.

१८९० च्या दशकात नव्या कंपन्यांनी त्यांच्या मक्तेदारीला आव्हान दिले. स्पर्धेने संतापलेल्या कार्नेगी यांनी प्रथम त्यांच्यापेक्षाही मोठी कंपनी स्थापना करण्याचा प्रयत्न केला होता. नंतर मात्र या सर्व कंपन्यांनी एकत्र येऊन एक अतिमोठी कंपनी स्थापन

करण्यासाठी त्यांचे मन वळवण्यात आले. या नव्या कंपनीमध्ये देशातील सर्व महत्त्वाच्या लोखंड आणि पोलाद निर्माण करणाऱ्या सर्व कंपन्या सामील झाल्या.

सर्व कंपन्या एकत्र आल्याने १९०१ मध्ये द युनायटेड स्टेट्स स्टील कॉर्पोरेशन ही महाकाय कंपनी स्थापन झाली. या कंपनीच्या स्थापनेवरून गेल्या ३० वर्षात जी प्रक्रिया कार्यरत होती तिची कल्पना येते; या प्रक्रियेनुसार स्वतंत्र कंपन्या एकत्र येऊन एक केंद्रिय कंपनी स्थापना करत असत. यादवी युद्धामध्ये सुरु झालेली ही प्रक्रिया १८७० च्या दशकानंतर विशेष जोमदार झाली कारण त्यावेळेस अतिरिक्त उत्पादनामुळे पोलादाच्या किंमती कमी होऊन नफ्याचे प्रमाण कमी होण्याची भीती त्या कंपन्यांना वाटत होती. उत्पादन आणि पणन या दोन्हीवर नियंत्रण ठेवल्यास आपल्या स्पर्धक कंपन्यांना एकाच महाकाय कंपनीमध्ये सामील होणे भाग पडेल याची जाणीव त्यांना झाली. त्यामधूनच महाकाय कॉर्पोरेशन किंवा ट्रस्ट ही कल्पना पुढे आली.

### १.३.२. तेल :

या काळात कच्च्या तेलाचे उत्पादन आणि त्याचे शुद्धीकरण करण्याचा नवा उद्योग निर्माण झाला. सुरुवातीला घरगुती दिवाबत्तीसाठी तेल वापरले जात असल्याने या क्षेत्रामध्ये अनेक लहान कंपन्या कार्यरत होत्या. १८६२ मध्ये जॉन डी. रॉकेफेलर यांनी या क्षेत्रात प्रवेश केल्यावर मात्र त्याचे स्वरूप पूर्णतः पालटले. त्यांनी कच्च्या तेलाच्या उत्पादनाचे काम अन्य कंपन्यांवर सोपवले आणि स्वतः कच्च्या तेलाच्या शुद्धीकरणावर आपले लक्ष केंद्रित केले. तेल शुद्धीकरणामध्ये त्यांनी अतिशय कार्यक्षम तंत्रांचा वापर केला, या क्षेत्रातील कुशल तंत्रज्ञांशी संधान बांधून त्यांनी बुद्धीवंतांची एक प्रकारची मक्तेदारी स्थापन केली. सुरुवातीला शुद्ध तेलाच्या किंमतींमध्ये प्रचंड कपात करून त्यांनी आपल्या सर्व स्पर्धकांना नामोहरम केले.

१८७० मध्ये रॉकेफेलर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी द स्टँडर्ड ऑइल कंपनी, ओहायो, या कंपनीची स्थापना केली. ओहायो राज्याच्या क्लिव्हलँड परिसरामध्ये या कंपनीची मक्तेदारी स्थापन झाली. यथावकाश त्यांनी देशाच्या अन्य भागातील तेल शुद्धीकरण करणाऱ्या कंपन्यांशी संगनमत केले. १८८० च्या दशकामध्ये त्यांच्या समुहातील कंपन्या अमेरिकेतील तेल व्यवसायाच्या ९० टक्के भाग नियंत्रित करत असत. नंतरच्या काळात या समुहाने रेल्वे, अन्य सार्वजनिक सोयी आणि उद्योगांवर आपली मालकी प्रस्थापित केली.

### १.३.३ वीज निर्मिती :

प्रकाश, उर्जा आणि संपर्क यासाठी केला जाणारा वीजेचा वापर ही या काळातील विशेष महत्त्वाची घटना होती. प्रकाशासाठी वीजेचा वापर १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून होत असला तरी १८७९ मध्ये थॉमस अल्वा एडिसन यांनी वीजेच्या दिव्याचा (बल्ब) शोध लावल्यावर प्रकाशासाठी वीजेचा वापर सर्वदूर होऊ लागला. १८८२ मध्ये स्थापना झालेली एडिसन इलेक्ट्रिक कंपनी न्युयॉर्क शहराला वीजेचा पुरवठा करू लागली. १८८७ मध्ये रिचमंड शहरात वीजेवर चालणारी पहिली ट्राम सुरु झाली; सार्वजनिक परिवहनासाठी तिचा वापर होत असे. टेलिफोन आणि टेलेग्राफ या अन्य संपर्क माध्यमांसाठी देखील वीज वापरली जात असे. वीजेची बहुतेक उपकरणे एडिसन इलेक्ट्रिक कंपनी तयार करत असे;

१८९२ मध्ये तिचा विस्तार होऊन जनरल इलेक्ट्रिक आणि वेस्टिंगहाऊस इलेक्ट्रिक या कंपन्यांची स्थापना झाली.

### १.३.४ रेल्वे :

रेलरोडचे (अमेरिकेतील रेल्वे रेलरोड या नावाने ओळखली जाते) महत्त्व या काळात वाढतच गेले. अमेरिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यांना रेल्वेने जोडण्यात आले. १८८४ पर्यंत दोन्ही किनाऱ्यांना जोडणारे चार रेल्वे मार्ग कार्यरत होते. रेल्वे मुळे अमेरिकन शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल पूर्व किनाऱ्यावरील शहरांत नेता आला, पशुधन शिकागोला नेता आले आणि जनावरांचे गोठवलेले मांस न्युयॉर्क आणि फिलाडेल्फिया शहरात नेणे शक्य झाले. पश्चिम आणि दक्षिण अमेरिकेत रेल्वेचे बांधकाम सुरु झाल्याने पोलादाची मागणी सतत वाढत गेल्याने पोलाद उद्योगाचा विस्तार शक्य झाला. १८८० मध्ये अमेरिकेत ९३,२६२ मैल (१,५०,१५१ कि.मि.) लांबीचे रेल्वेमार्ग होते, होती, १९०० मध्ये त्यांची लांबी १,९०,००० मैल (३,१०,००० कि.मि.) येवढी होती.

तथापि, रेल्वेमार्गांची मालकी अगदी मोजक्या व्यक्तींच्या हाती होती; त्या रेल्वेमार्गाचा वापर सार्वजनिक सोयीसाठी न करता स्वतः च्या व्यक्तीगत फायद्यासाठी करत असत. हे रेल्वेमार्ग सर्वांना वहातुकीचे समान दर आकारात नसत ही गोष्ट अधिकच वाईट होती. मोठया प्रमाणात मालाची वहातुक करणाऱ्या कंपन्यांना त्या खास सवलत देत असत. त्यामुळे या कंपन्यांना त्यांच्या छोटया स्पर्धक कंपन्यांना शह देणे शक्य होत असे. आपली साधन सामुग्री एकत्र करून विविध रेल्वे कंपन्या स्पर्धा टाळत असत, सर्व वहातुक आपसात वाटून घेत असत आणि वहातुकीचे दर आपल्या मनाप्रमाणे वाढवत असत. सार्वजनिक नियंत्रण टाळण्यासाठी या कंपन्या राजकारणी आणि प्रतिष्ठित व्यक्तींना मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करून देत असत आणि काँग्रेस मार्फत आपल्या सोयीचे कायदे पारित करून घेत असत.

### १.३.५ अन्य उद्योग :

त्याचवेळेस अन्य उद्योगातही क्रांतीकारी बदल झाले. अनेक यांत्रिक अवजारांचा शोध लागल्याने जमिनीची मशागत करण्याच्या पद्धतीमध्ये मोठे परिवर्तन झाले. शीतगृहे आणि अन्न डबाबंद करण्याच्या शोधामुळे सामान्य जनतेच्या आहाराच्या सवयी बदलल्या. १८४४ मधील बिनतारी तारायंत्राचा, १८६७ मधील टंकलेखन यंत्राचा, १८७६ मधील दूरध्वनीचा आणि १८८८ मधील बेरिज करणाऱ्या यंत्राचा, आणि १८९७ मधील कॅश रजिस्टर इत्यादी शोध लागल्याने आर्थिक व्यवहार सुलभ होऊन उद्योगांचा विस्तार शक्य झाला. १८८६ मध्ये लिनोटाइप यंत्राचा लागलेला शोध छपाइच्या रोटरी यंत्रामुळे एका तासात ८ पानी वृत्तपत्राच्या २,४०,००० प्रती छापणे शक्य झाले. थॉमस एडिसन यांनी फोनोग्राफ उर्फ बोलण्याचे यंत्र शोधून काढले. जॉर्ज इस्टमन यांच्या सहकार्याने त्यांनी चलत चित्रपटाचा देखील शोध लावला होता. या आणि अन्य अनेक वैज्ञानिक शोधामुळे जवळपास सर्वच क्षेत्रामधील उत्पादकता मोठया प्रमाणात वाढली होती.

१८७५ नंतर मांसाचे वेष्टन करण्याचा व्यवसाय अमेरिकेतील एक प्रमुख व्यवसाय झाला होता. या व्यवसायाचा फार मोठा भाग शिकागो शहराच्या परिसरात केंद्रित झाला होता.

पीठाच्या गिरण्या, आसवाचे गाळप आणि शेतीच्या अवजारांचे उत्पादन आणि लाकडाच्या फळ्या तयार करणे इत्यादी महत्त्वाचे उद्योग अमेरिकेच्या मध्य-पश्चिम (मिड -वेस्ट) राज्यांत विकसित झाले होते. अमेरिकेच्या दक्षिणेकडील राज्यांतील औद्योगिक विस्तारामध्ये सुती कापडाच्या गिरण्या आघाडीवर होत्या. जॉर्जिया आणि अलाबामा या अमेरिकेतील राज्यांच्या परिचय सुती कापडाच्या गिरण्यामुळे केला जाऊ लागला. १९०० पर्यंत अमेरिकेतील एकूण सुती कापडाच्या गिरण्यापैकी २५ टक्के दक्षिणेतील राज्यांत केंद्रित झाल्या होत्या. न्यु इंग्लंड प्रदेशामध्ये या उद्योगाचा जो विस्तार झाला होता त्यापेक्षा अधिक वेगाने दक्षिणेतील या राज्यांतील या उद्योगाचा विस्तार झाला होता.

### १.३.६ परदेशांशी चालणारा व्यापार :

निर्यात मालाचे मूल्य लक्षात घेतल्यास अमेरिकेचा परदेशांशी चालणारा व्यापार देशांतर्गत उद्योगांच्या बरोबरीने वाढत गेला. सोने, चांदी आणि पुनर्निर्यातीचा माल वगळता १८७७ मध्ये अमेरिकेचा निर्यातीचा व्यापार दर वर्षी ५९०,०००,००० डॉलरचा होता; १९०० पर्यंत तो सुमारे १,३७१,०००,००० डॉलर येवढा वाढला आयात मालाची वाढ झाली असली तरी ती मंद गतीने होत राहिली. सोने आणि चांदी लक्षात घेतल्यास या काळातील फक्त एकाच वर्षात अमेरिकेच्या आयात-निर्यातीचा व्यापार घाट्याचा झाला होता. १९ व्या शतकाच्या अखेरिस अमेरिकेच्या निर्यातीमध्ये आयातीपेक्षा लक्षणिय वाढ झाली होती.

निर्यातीच्या मालामध्ये शेतमालाच्या निर्यातीचे प्रमाण जास्त होते. कापुस, गहू, पीठ आणि मांसाचे पदार्थ या निर्यात होणाऱ्या मालाची किंमत दर वर्षी जास्त असे. बिगर शेतमालामध्ये पेट्रोलची निर्यात मोठया प्रमाणात होत असे. परदेशी व्यापारामध्ये सतत वाढ होत असली तरी त्याच्या तुलनेने व्यापारी जहाजांची संख्या वाढली नाही. अमेरिकन जहाजातून वाहून नेण्यात येणाऱ्या मालाचे वजन कायम असले तरी त्यामधील निर्यातीच्या मालाचे प्रमाण कमी असे. यादवी युद्धाच्या शेवटी २४,००,००० टन निर्यातीचा माल अमेरिकन जहाजांतून वाहून नेण्यात आला तर १८९८ मध्ये त्याचे प्रमाण ७,२६,००० टनापर्यंत खाली आले.

## १.४ सारांश

१९ व्या शतकाच्या अखेरीस अमेरिकन जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये परिवर्तन झाले. राजकीय क्षेत्रामध्ये १८८८ पासून कॉंग्रेसने लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वोपरी प्रयत्न सुरु केले. औद्योगिक आणि शेती क्षेत्रामधील क्रांतीमुळे अमेरिकेला अभूतपूर्व प्रगती करणे शक्य झाले. १९१४ पर्यंत अमेरिकेचे औद्योगिक उत्पादन उर्वरित जगाच्या उत्पादनापेक्षा अधिक होते. तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रामध्ये जर्मनी वगळता अन्य कोणताही देश तिची स्पर्धा करू शकत नसे. पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यांना जोडणारा रेल्वे मार्ग बांधून तयार झाल्याने औद्योगिक सुबत्तेचे नवे युग अमेरिकेत सुरु झाले. परदेशांशी चालणाऱ्या व्यापारामध्ये देखील अमेरिकेने अशीच प्रगती केली होती. अशा रीतीने अमेरिका एका महान राजकीय आणि आर्थिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू लागली होती.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१. अमेरिकेच्या औद्योगिक विकासाचे वैशिष्टय सांगा.

२. शेरमन अँटि - ट्रस्ट ॲक्टचे महत्त्व स्पष्ट करा.

## १.५ प्रश्न

१. अमेरिकेतील शेती विषयक आणि औद्योगिक क्रांतीची कारणे कोणती होती ? तिचे परिणाम कोणते होते ?

२. अमेरिकेतील तेल, पोलाद, विद्युतशक्ती या उद्योगांच्या उदयाची करणे द्या. त्यांचे परिणाम काय झाले ?

३. अमेरिकेच्या औद्योगिक विकासात रेल्वेच्या योगदानाची चर्चा करा

## १.६ संदर्भ ग्रंथ


- बायर, द ऑक्सफर्ड कम्पॅनियन टू द युनायटेड स्टेट्स हिस्टरी, न्युयॉर्क, २००१
- बियर्डस, न्यु बेसिक हिस्टरी ऑफ द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, न्युयॉर्क १९६०
- पार्क्स, हेन्री बामफर्ड, द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका: अ हिस्टरी (भारतीय आवृत्ती), खोसला पब्लिशिंग हाऊस, न्यु दिल्ली, १८८६
- आर. के. मजुमदार आणि ए. एन. श्रीवास्तव, *हिस्टरी* ऑफ द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, सुरजीत बुक डेपो, न्यु दिल्ली, १९९३
- युनायटेड स्टेट्स डिपार्टमेंट ऑफ स्टेट्स ॲन आऊटलाइन ऑफ अमेरिकन हिस्टरी, न्युयॉर्क, १९९४.


❖❖❖❖

# २

## प्रागतिक चळवळ (१९०० - १९१९)

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ प्रागतिक चळवळीचे स्वरूप

२.३ प्रागतिक चळवळीची महत्त्वाची वैशिष्टये

२.४ थिऑडॉर रूझवेल्ट आणि प्रागतिक चळवळ

२.५ निसर्गाचे संरक्षण

२.६ राष्ट्राध्यक्ष टॅफ्ट आणि प्रागतिक चळवळ

२.७ वुड्रो विल्सन आणि प्रागतिक कार्यक्रम

२.८ समारोप

२.९ प्रश्न

२.१० संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टये

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी समजतील.

- प्रागतिक चळवळीची महत्त्वाची वैशिष्टये समजून घेणे.
- अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी प्रागतिक चळवळीत बजावलेल्या भूमिकेचा आढावा घेणे.

## २.१ प्रस्तावना

१८८० आणि १८९० च्या दशकांत अमेरिकन समाजामध्ये झालेल्या बौद्धिक आणि राजकीय विचार मंथनाचे भरीव परिणाम एका सुधारणेच्या चळवळीच्या स्वरुपात दिसू लागले. या चळवळीचा रोख दोन अपप्रवृतींच्या विरोधात होता. १. राजकीय भ्रष्टाचार आणि शासनाच्या सर्व थरामध्ये संघटीत संपत्तीला खास हक्क देण्याची प्रवृत्ती. सुधारकांचा बहुसंख्य लोकांच्या उपजत सूज्ञपणावर विश्वास होता. आपल्या आकांक्षा परिणामकारक करण्याची लोकांची क्षमता वाढवणे हेच सुशासनाचे खरे रहस्य आहे असे आग्रही प्रतिपादन ते करत असत. राजकीय बडी मंडळी आणि यंत्रे यांचे अदृश्य शासन नष्ट करणे.



munotes.in

प्रामाणिकपणाची नवी मानके विकसित करणे आणि लोकांप्रती असणारे सरकारी अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व अधिक वृद्धिंगत करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. २. वाढती मक्तेदारी आणि शेतकरी आणि कामगार वर्गाच्या शोषणाचा धोका त्यांनी ओळखला होता. अर्थव्यवस्थेने सर्व सामान्यांचे कल्याण साधण्यासाठी अर्थव्यवस्थेने काळजी घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ते करत असत. महाकाय आर्थिक व्यवहारांचे सरकारने नियंत्रण करावे शोषित वर्गाचे रक्षण करावे अशी त्यांची इच्छा होती. रूझवेल्ट, टॅफ्ट आणि विल्सन हे राष्ट्रध्यक्ष प्रागतिक चळवळीचे प्रतिनिधी होते. राज्य आणि नगरपालिकेच्या स्तरावरील अनेक अन्य नेत्यांची त्यांची साथ केली.

प्रागतिक चळवळीचे तपशीलवार विश्लेषण करून अमेरिकेच्या इतिहासावर झालेल्या तिच्या परिणामांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

## २.२ प्रागतिक चळवळीचे स्वरूप

प्रागतिक चळवळीच्या नेत्यांचा लोकशाही प्रशासन, व्यक्ती स्वातंत्र्य कायद्याचे राज्य आणि खाजगी मालमत्तेचे रक्षण या पारंपारिक अमेरिकन मूल्यांवर विश्वास होता. नव्या औद्योगिक युगामध्ये त्यांचे रक्षण नव्या राजकीय तंत्रांनी करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ते करत असत. आर्थिक असंतोष आणि वर्ग विग्रह निर्माण करण्यापेक्षा नैतिक, मानवी आणि धार्मिक मूल्यांवर त्यांनी खास भर दिला. पारंपारिक आणि आर्थिक व्यवस्थेमध्ये काही आमूलाग्र बदल करण्याच्या समाजवादी विचारांना फारसा पाठिंबा मिळाला नाही.

प्रागतिक चळवळीची उद्दिष्टे आणि दृष्टीकोन प्रामुख्याने मध्यमवर्गीय होता. चळवळीला पाठिंबा देणारे बहुतेक छोटे व्यवसायिक, वकील आणि पत्रकार होते. देशातील भ्रष्ट्राचार आणि कुशासनाचा उबग आल्याने त्यांनी चांगले आणि प्रामाणिक प्रतिनिधींना निवडून देण्यासाठी एक प्रकारचे धर्मयुद्ध सुरु केले. मात्र समग्र व्यवस्था बदलण्याची आणि व्यक्तीच्या दृष्टीकोनात आमूलाग्र परिवर्तनाची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

एखाद्या ठिकाणी आढळलेल्या विपरीत गोष्टी विषयी त्यांनी व्यवहारी मार्ग अवलंबला, एखादा व्यापक सिद्धांत मांडण्याचा किंवा अंतिम उद्दिष्ट समोर ठेवण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. प्रागतिक चळवळीमधील कर्मठ आणि सुधारक यांच्यातील सीमारेषा स्पष्ट नव्हती. सुधारणांच्या विषयी लोकभावना एवढी तीव्र होती की बहुतेक जबाबदार नेत्यांना या सुधारणा आवश्यक असल्याची जाणीव झाली होती. सुधारकांच्या संदर्भात राजकीय पक्ष अप्रस्तुत ठरले. रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक या दोन्ही पक्षाचे सभासद सुधारणावादी होते.

## २.३ प्रागतिक चळवळीची महत्त्वाची वैशिष्टये

### १. प्रागतिक चळवळ आणि शासनव्यवस्था :

जेफरसन आणि हॅमिल्टन या राष्ट्राध्यक्षांच्या कारकिर्दीमधील अमेरिका हा छोटया जमीनधारकांचा आणि मुबलक जमीन उपलब्ध असणारा देश होता. अशा परिस्थितीमध्ये लोकशाहीच्या रक्षणासाठी शासनाचे अधिकार मर्यादित ठेवण्याची आणि वैयक्तीक

उपक्रमशीलतेला मुक्त अवसर देण्याची गरज होती. प्रारंभिचे अमेरिकन उदारमतवादी साधारणपणे शासनाविषयी साशंक असत, शासनाचे अधिकार आणि जबाबदारी वाढवण्याला त्यांचा विरोध असे. परिणामी, एकोणिसाव्या शतकातील आर्थिक प्रगतीच्या फलस्वरुप महाकाय औद्योगिक कंपन्या आणि रोजगार कमावणाऱ्यांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात आला तर शेतकऱ्यांची परिस्थिती मात्र खालावत गेली. साधारण व्यक्तीला आपल्या स्वतः च्या प्रयत्नाने आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करणे अवघड होऊ लागले. शासनाने आपले रक्षण करावे अशी मागणी ते करू लागले. परिणामी सुधारक आणि उदारमतवादी यांना शासनाचे अधिकार वाढवून हवे होते.

### २. मक्तेदारीची समस्या :

शासनाने अधिक आर्थिक जबाबदारी स्वीकारावी अशी सुधारकांची इच्छा असली तरी ते साध्य करण्याच्या बाबतीत यांच्यामध्ये मतभेद होते. आर्थिक मक्तेदाराची वाढ ही त्या काळातील सर्वात महत्त्वाची समस्या होती. महाकाय कंपन्यांची वाढ अटळ असून त्या नष्ट करण्याऐवजी शासनाने त्यांच्यावर नियंत्रण ठेवावे असा युक्तिवाद थिऑडॉर रूझवेल्ट आणि इतर करत असत तर विल्सन आणि इतरांनी मक्तेदारीला आळा घालण्यावर आणि मुक्त स्पर्धेचे वातावरण निर्माण करण्यावर अधिक भर दिला. या मूलभूत समस्येविषयी प्रागतिक चळवळीमध्ये व्यापक मतभेद होते.

हर्बर्ट क्रॉवले यांनी त्यांच्या *प्रॉमिस ऑफ अमेरिकन लाइफ* (१९०९) या ग्रंथामध्ये असा युक्तीवाद केला की आर्थिक अन्याय दूर करण्यासाठी महाकाय कंपन्या नष्ट करण्याची गरज नाही. त्यासाठी त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे शासनाचे अधिकार वाढवावेत आणि एक प्रबळ कामगार चळवळ सुरु करावी, अशी कामगार चळवळ महाकाय कंपन्यांच्या कारभारावर वाचक ठेवू शकेल. धनवानांचे खास हक्क रद्द करण्याऐवजी समाजातील अन्य वर्गांना या खास हक्काच्या बदली भरपाई दाखल खास अधिकार द्यावेत.

१९१६ मध्ये लुई ब्रँडिस यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशपदी नियुक्ती झाली. महाकाय कंपन्यांच्या वाढीमुळे ते अस्वस्थ झाले, याला ते *मोठेपणाचा शाप* म्हणत असत. शासनातील किंवा आर्थिक व्यवसायातील कोणतीही संघटना महाकाय झाल्यास तिचे व्यवस्थापन कार्यक्षम रितीने करता येत नाही अशी त्यांची धारणा होती. कोणत्याही उद्योगातील ३० टक्यापेक्षा जास्त व्यवहार एका कंपनीच्या हाती असू नयेत अशी सूचना त्यांनी केली.

### ३. मक्रेकर्स (चिखलफेक करणारे) :

पत्रकार मकरेकर्स किंवा चिखलफेक करणाऱ्या पत्रकारांनी सुधारणांच्या गरजेची व्यापक प्रसिद्धी करण्यात महान कामगिरी बजावली. राष्ट्राध्यक्ष थिऑडॉर रूझवेल्ट त्यांना मकरेकर्स किंवा चिखलफेक करणारे असे म्हणत असत. त्यांनी भ्रष्टाचार आणि अपहाराच्या प्रकरणांचा शोध घेतला, त्यांची पद्धतशीर नोंद केली आणि व्यवसायिक आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधावर प्रकाशझोत पाडला. हेन्री डेमारेस्ट लॉइड यांनी त्यांच्या *वेल्थ अगेन्स्ट कॉमनवेल्थ* (१९०४) हा ग्रंथ चिखलफेक करणाऱ्या लेखनाचे पहिले उदाहरण होते, या ग्रंथामध्ये त्यांनी ट्रस्टची (न्यासाची) निर्भस्तना केली होती. १९०२ पर्यंत अशा

लेखनाला व्यापक वाचकवर्ग लाभला होता. लिंकन स्टेफन्स यांनी सेंट लुई शहरातील राजकीय भ्रष्टाचाराचे विश्लेषण केले तर इडा टारबेल यांनी स्टँडर्ड ऑइल कंपनीच्या इतिहासाचा पहिला भाग प्रसिद्ध केला. अप्टन सिंक्लेअर यांनी त्यांच्या द *जंगल* या कादंबरीमध्ये शिकागो शहरातील मांस आवरण करण्याच्या उद्योगातील गलिच्छपणा आणि अस्वच्छतेवर प्रकाशझोत पाडला होता. या कादंबरीने समाजात निर्माण झालेल्या खळबळीमुळे सरकारला मांस उद्योगावर देखरेख करण्याची व्यवस्था करणारा कायदा करावा लागला होता. रे स्टॅनफर्ड बेकर, चार्लस रसेल, नॉर्मन हॅपगूड आणि मार्क सुलिव्हान हे चिखलफेक करणारे लेखन करणारे काही अन्य नावाजलेले पत्रकार होते.

असे लेखन करणाऱ्या काही पत्रकारांनी सनसनाटी करणारे लेखन केली तर काहींचे लेखन अविश्वसनिय होते. लवकरच सर्व सामान्य लोकांमध्ये हे लेखन अप्रिय झाले. १९१४ पर्यंत अशा लेखनाचा अस्त झाला. अमेरिकन पत्रकारितेच्या इतिहासात या पूर्वी असे लेखन कधी झाले नव्हते आणि त्यानंतरही  असे लिखाण परत कधी होण्याची शक्यता नव्हती.

**४. राज्य आणि नगरपालिकांच्या पातळीवरील प्रागतिक चळवळ :**

स्थानिक शासनाच्या पातळीवर चळवळीने कदाचित विशेष प्रभावी कामगिरी केली होती. मध्यमवर्ती पातळीवरील राजकारणापेक्षा स्थानिक पातळीवरील राजकारण लोकांना सहज समजत असे, तेथील भ्रष्टाचार देखील उघड स्वरूपाचा असे, त्याचे प्रमाणही अधिक होते. स्थानिक पातळीवरील नागरिकांना सहज समजेल अशा नाट्यमय रितीने ते सादर केले जात असे. स्थानिक पातळीवरील शासन अधिक प्रामाणिक असावे, नगर रचना चांगली असावी, गलिच्छ वस्त्यांचे सुदृढ नियोजन. घर बांधणीचे नियम, सुरक्षिततेच्या उपायांची कठोर अंमलबजावणी, शाळा, उद्यान खेळाची मैदाने आणि अन्य नागरी सुविधा साठी प्रागतिक नेत्यांनी विशेष लढा दिला होता. या लढयामधील आपले खरे प्रतिस्पर्धी भ्रष्ट राजकारणी नसून शहरातील सार्वजनिक परिवहन व्यवस्था आणि अन्य नागरी सुविधांचे मालक असल्याची जाणीव त्यांना झाली. त्यांनी भ्रष्ट मार्गांनी खास अधिकार मिळवले होते. परिणामी अनेक प्रागतिक नेत्यांनी सार्वजनिक परिवहन आणि अन्य नागरी सुविधा आम जनतेच्या मालकिची असावी अशी मागणी केली.

ओहियो राज्यातील क्लिव्हलँड येथील थॉमस जॉन्सन नगरांची सुधारणा करणारे सर्व ज्ञात नेते होते. १९०१ ते १९०७ या काळात त्यांनी क्लिव्हलँड शहराचे महापौरपद  भूषवले होते. त्यांनी आपल्या समवेत सक्षम आणि उत्साही कार्यकर्त्यांचा एक गट संघटित केला होता. त्यांच्या कार्यामुळे समग्र देशातील उत्तम प्रशासित नगर अशी क्लिव्हलँडची ख्याती झाली.

इतर अनेक शहरात अशा सुधारणेच्या चळवळी सुरु झाल्या होत्या, नगरपालिकातील नेत्यांची दादागिरी, आणि यंत्रणांचे प्राबल्य नष्ट करण्याचा त्यांचा उद्देश होता. त्या ऐवजी महापौर आणि नगरसेवकांचे एक मंडळ यांचे पारंपारिक प्रशासन पद्धती सुरु करण्याचा त्यांचा विचार होता. काही वेळेस महापौर आणि नगरसेवकांच्या मंडळाच्या मदतीसाठी एक पक्षविरहित समिती आणि नगरपालिकेचा व्यवस्थापक नियुक्त केली जात असे. १९२१ पर्यंत ५०० नगरामध्ये अशी प्रशासन पद्धती अमलात आली असली तरी तिचे परिणाम मात्र उत्साहजनक नव्हते कारण अनेक नगरातील नेत्यांनी पारंपारिक प्रशासन पद्धतीवर विविध

मार्गांनी आपले वर्चस्व स्थापन केले. अमेरिकेतील न्युयॉर्क, शिकागो आणि फिलाडेल्फिया या तीन महानगरात मात्र पूर्वीप्रमाणे भ्रष्ट नेत्यांचे प्रशासन पूर्वीप्रमाणे चालू राहिले.

### २.३.१ राज्य पातळीवरील सुधारणा :

इ. ८९० च्या दशकात प्रागतिक चळवळीच्या अग्रणींना राज्य पातळीवरील सुधारणा करण्यात पुढाकार घेतला होता. त्यापैकी जॉन पी. अल्फ्रेड (इलिनॉय) आणि हेझन प्रिंगल (मिचिगन) हे विशेष नावाजलेले होते. परंतु विस्कॉन्सिन राज्यातील रॉबर्ट मारियान ला फॉलेट राज्य पातळीवरील सुधारकामध्ये आणि समग्र सुधारणा चळवळीमधील अतिशय नावाजलेले आणि अग्रगण्य नेते होते. लोकांच्या मनामध्ये त्यांच्या विषयी प्रेमा ऐवजी आदराची भावना होती. अमेरिकेतील फारच थोडया नेत्यांनी लोकशाही उद्धिष्टासाठी त्यांच्या सारखा संघर्ष केला असेल. सामान्य लोकांच्या सूज्ञपणावर त्यांचा गाढा विश्वास होता. लोकांच्या पूर्वग्रहांच्या ऐवजी त्यांच्या विवेक बुद्धीला त्यांनी अवाहन केले. सहा वर्षे त्यांनी विस्कॉन्सिन राज्याचे राज्यपालपद भूषवले. या काळात त्यांनी राज्याच्या कायदे मंडळामध्ये अनेक कायदे पारित करवले ते विस्कॉन्सिन आयडिया या नावाने ओळखले जातात. राज्यातील रेल्वेमार्गावर कर आकारणी, त्यांच्या मिळकतीच्या भौतिक मूल्यावर आधारित त्यांचे दर निश्चित करणे, बँका आणि विमा कंपन्यांचे नियंत्रण, स्त्रीया आणि लहान मुलांच्या कामाचे तास निश्चित करणे कामगारांसाठी नुकसान भरपाईचा कायदा, राखीव वनांची निर्मिती आणि सार्वत्रिक निवडणुकीतील पक्षांचे उमेदवार प्राथमिक निवडणुकीने निश्चित करणे इत्यादींचा त्यामध्ये समावेश होता.

आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण अचूक माहितीवर करण्यावर त्यांनी खास भर दिला आणि अशी माहिती संकलित करण्यासाठी त्यांनी अनेक अभ्यासकांना राज्यसेवेत दाखल केले तसेच राज्य आणि अर्थ शास्त्राच्या तज्ज्ञांचे सहकार्य मिळवले. त्यांच्या समग्र कार्यक्रमाची व्याख्या *नव व्यक्तीवाद* अशी करण्यात येते, त्यामुळे व्यक्तीला संपत्ती मिळवण्याची चांगली संधी मिळू शकते.

मध्य अमेरिकेतील आयोवा, मिनिसोटा, कान्सास, नेब्रास्का आणि उत्तर आणि दक्षिण डाकोटा या राज्यामध्ये विस्कॉन्सिन आयडियाचा विशेष प्रभाव असला तरी अमेरिकेतील बहुतेक राज्यातही तशा सुधारणांची सुरुवात झाली होती.

### २.३.२. लोकशाहीची विस्तारित व्याप्ती :

शासनावर मतदारांचे अधिक प्रत्यक्ष नियंत्रण आणण्यासाठी केलेल्या उपाय योजनेला राज्यपातळीवरील अनेक नेत्यांनी पाठिंबा दिला. अशा सुधारणांनी राजकीय नेत्यांची दादागिरी आणि त्यांचा प्रभाव कमी करता येइल अशी आशा त्यांना वाटत होती. सार्वत्रिक निवडणुकीतील पक्षांचे उमेदवार प्राथमिक निवडणुकीने निश्चित करण्याची पध्दत या सुधारणापैकी विशेष महत्त्वाची सुधारणा होती. १८९० च्या दशकात दक्षिणेतील राज्यांमध्ये सुरु झालेली ही पद्धत १९१५ पर्यंत १५ राज्यामध्ये अमलात आली. १९१२ पर्यंत २९ राज्यांनी सिनेटच्या निवडणुकीसाठी देखील या पद्धतीचा अवलंब केला आणि कायदे मंडळांच्या सभासदांनी लोकांचा निर्णय मान्य केलाच पाहिजे अशा स्वरूपाचा कायदा केला.

यासाठी घटनेमध्ये सतरावी दुरुस्ती करावी लागली, या घटना दुरुस्तीनुसार सेनेटच्या सभासदांची निवडणुक प्रत्यक्ष रितीने होत असे.

पश्चिमेकडील राज्यांनीही लोकशाहीच्या व्याप्तीचा विस्तार करावा अशी मागणी केली होती. या राज्यांच्या कार्यक्रमामध्ये सार्वमतचा समावेश होता, त्याप्रमाणे एखाद्या प्रस्तावावर सर्व मतदारांचे मत आजमावून त्या निर्णयाची अंमलबजावणी केली जात असे. सामान्य मतदारांच्या मागणीवरून एखाद्या निर्वाचित सभासदाला परत बोलावण्याची पध्दत अंमलात आली, ती रिकॉल या नावाने ओळखली जात असे. सामान्य मतदारांच्या मागणीवरून कायदे मंडळाने एखादा कायदा करण्याच्या पद्धतीला इनिशिएटिव्ह असे नाव आहे. २१ राज्यांनी सार्वमत आणि इनिशिएटिव्ह पध्दत अवलंबली, १२ राज्यांनी निर्वाचित सभासदांना परत बोलावण्याच्या रिकॉल पद्धतीचा अवलंब केला तर ८ राज्यांनी न्यायाधीशांच्या बाबतीतही ही पध्दत अमलात आणली.

स्त्रियांना मताचा हक्क दिला जातो. १८९० पर्यंत द नॅशनल अमेरिकन विमेन्स सफरेज असोशिसोएशनची स्थापना करण्यात आली. कॅरी चॅपमन काटा आणि ॲना हॉवर्ड शॉ तिच्या प्रमुख नेत्या होत्या. प्रागतिक चळवळीच्या काळात अनेक स्त्रियानी राजकीय हक्काची मागणी सतत केली होती. १९२० पर्यंत घटनेची १९ वी दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीनुसार स्त्रियांना मताचा हक्क बहाल केला गेला.

### २.३.३. आर्थिक कायदे :

महाकाय कंपन्यांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने अनेक राज्यांनी आयोग स्थापन केले. या आयोगांनी रेल्वेमार्ग आणि अन्य सार्वजनिक सेवांचे आकार आणि पद्धतीचे नियंत्रण करावयाचे होते. अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदे करण्यात आले तसेच नागरी सेवांच्या नियमांची संहिता तयार करण्यात आली. १९२० पर्यंत ४३ राज्यांनी कामगारांना भरपाई देणारे कायदे केले होते. मालकांच्या जबाबदारीविषयक तरतूदी अधिक कठोर करण्याच्या उद्देशाने या कायद्यामध्ये आवश्यक ती तरतूद करण्यात आली होती. जखमी कामगारांचा उपचार करण्यासाठी विमा योजना अनिवार्य करण्यात आली. कामगारांचे कामाचे तास मर्यादित करण्याची आणि किमान वेतनाच्या योजनेवर कडाक्याचा वाद झाला. या विषयीच्या तरतूदी घटनेच्या चौदाव्या दुरुस्तीच्या विरोधी असल्याच्या कारणावरून सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्या. स्त्रियांच्या कामाच्या तासाची मर्यादा निश्चित करणारे कायदे अनेक राज्यांनी केले तर ऑरेगॉन आणि मॅसाच्युसेट्स या राज्यांनी पुरुष कामगाराच्या कामाचे तास मर्यादित केले होते. तथापि सर्वोच्च न्यायालयाने असे काही कायदे रद्द केले होते.

### १. दारूबंदी :

घटनेची १९ वी दुरुस्ती केली जाणे हा प्रागतिक चळवळीचा एक विजय होता. मादक आणि गुंगी आणणारी दारू तयार करणे, तिची विक्री करणे, तिची विक्री करणे आणि अशा दारूची वहातूक करण्यास या दुरुस्तीने मनाई करण्यात आली. ज्या दारू मधील अल्कोहोलचे प्रमाण ०.५ टक्यापेक्षा जास्त आहे अशा दारूला हा कायदा लागू होता. ही घटना दूरुस्ती १ जानेवारी, १९२० रोजी अमलात आली. पहिल्या महायुद्धाच्या काळामध्ये अमेरिकेतील

वातावरण आदर्शवाद आणि आत्म समर्पणाच्या भावनेने भारलेले असताना ही घटना दुरुस्ती सूचवण्यात आली होती. दारूबंदी केल्याने अमेरिक लोकांची कार्यक्षमता वाढेल आणि युद्धप्रयत्न अधिक जोमाने होतील अशी सर्वसाधारण भावना होती. मात्र एकदा युद्ध समाप्त झाल्यावर आदर्शवादाची आणि आत्मसमर्पणाची भावना ओसरली आणि त्यानंतर दारूबंदीच्या अंमलबजावणीमधील अनेक अडचणींची अमेरिकन लोकांना कल्पना आली. प्रत्यक्ष व्यवहारात दारूचे सेवन आणि आयातीवरील बंदी अमलात येण्यासारखी नव्हती. अमेरिकेला १८,००० मैलांची सागरी आणि भूमिची सीमा लाभली होती. या सीमेवरील कोणत्याही भागातून सागर किनाऱ्यावर दारूची चोरटी वहातूक करणे अतिशय सोपे होते. मद्यपान करण्यासाठी कायद्याचा भंग करण्याची अनेक अमेरिकन लोकांची तयारी होती. अनेक अमेरिकन लोकांनी सुरुवातीपासूनच दारूबंदी करण्यास विरोध केला होता. दारूबंदीची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने दर वर्षी एक कोटी डॉलरचा खर्च केला आणि ५०,००० लोकांना अटक केली असली तरी दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकली नाही. मद्यपानाचे आणि दारूच्या चोरटया वहातूकीचे प्रमाण वाढतच गेले.

**२. दारूबंदीमुळे सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचे, विशेषत :**

हिंसक गुन्ह्यांचे प्रमाण फारच वाढले. १९३३ मधील घटनेच्या २१ व्या दुरुस्तीनुसार १८ वी दुरुस्ती रद्द करण्यात आल्याने दारूबंदी आपोआपच रद्द झाली. ही घटना दुरुस्ती म्हणजे दारूबंदीचा प्रयोग फसला असल्याची कबुलीच होती. या प्रयोगाचे फलित म्हणजे राष्ट्रीय आपत्तीच होती.

## २.४. थिऑडॉर रूझवेल्ट आणि प्रागतिक चळवळ :

राष्ट्राध्यक्ष मॅकिन्ले यांच्या हत्येनंतर थिऑडॉर रूझवेल्ट राष्ट्रध्यक्षपदी आले. अमेरिकन इतिहासात रूझवेल्ट यांचे व्यक्तीमत्व अतिशय वादग्रस्त होते. अंतर्गत बाबतीमधील त्यांची कामगिरी फारशी भरीव नसली तरी त्यांनी देशाच्या राजकारणात नवे चैतन्य निर्माण केले. बडया उद्योगपतींची नैतिकतेची घसरलेली पातळी आणि आपण कायद्याच्या कक्षेच्या आणि सरकारी नियमांच्या बाहेर असल्याची त्यांची धारणा यांनी ते आश्चर्यचकित झाले. अर्थव्यवस्थेमध्ये मूलभूत सुधारणा करण्याची त्यांची इच्छा नसली तरी बडे उद्योगपती आणि आर्थिक व्यवहार उच्च नैतिक मूल्यावर आधारित असावेत असे त्यांना वाटत असे, अन्यथा अमेरिकेतील क्रांतीकारी विचार बळावून अमेरिकन संस्थांना धोका निर्माण होईल. महाकाय कंपन्याचा उदय झाल्यापासून त्यांच्यावर सरकारी नियंत्रणाचा आग्रह धरणारे ते पहिले राष्ट्रध्यक्ष होते. लिंकन यांच्या नंतर नेतृत्वाच्या प्रभावी कार्यकारी कारवाईचा पुनरुच्चार करणारे ते पहिलेच राष्ट्रध्यक्ष होते.

**१. थिऑडॉर रूझवेल्ट आणि न्यासविरोधी कारवाई :**

मार्च १९०२ मध्ये नॉर्दन सिक्युरिटीज कंपनीच्या विरोधात शेरमन कायद्यानुसार कारवाई करावी अशी आज्ञा त्यांनी त्यांच्या कायदे मंत्र्याला दिली. वायव्य अमेरिकेतील रेल्वेमार्गावर आपली मक्तेदारी असावी या उद्देशाने जेम्स हिल आणि एडवर्ड हॅरिमन यांनी ही कंपनी स्थापन केली होती. शेरमन कायद्यानुसार करण्यात येणारी ही पहिलीच कठोर कारवाई असल्याने रूझवेल्ट प्रशासनाने त्याची गंभीर दखल घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने

सरकारच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर रूझवेल्ट यांनी इतर अनेक न्यासांच्या विरोधात अशी कारवाई केली, त्यामध्ये स्टँडर्ड ऑइल कंपनीचा समावेश होता. राष्ट्रध्यक्षपदी असताना त्यांनी ४३ न्यासांच्या विरोधात अशी कारवाइ केली. न्यासांच्या विरोधातील त्यांच्या या मोहिमेमुळे सर्वसामान्य लोकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले तर बडया उद्योगपतींचा संताप आला. औद्योगिक न्यासांच्या कारभाराचे सक्तीने विभाजन करण्यात आले आणि विभाजन झालेल्या भागांची मालकी विविध लोकांच्या हाती देता येत नसे किंवा त्यांनी आपसात स्पर्धा करावी अशी सक्ती करता येत नसे.

त्यांच्या आर्थिक कारवाईचे परिणाम अपूरे होते आणि न्यासांच्या विरोधातील आपली कारवाई अपूरी असल्याचे खुद्द रूझवेल्ट यांनी मान्य केले होते. बडया उद्योगांना त्यांचा विरोध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चांगल्या आणि वाईट न्यासांमध्ये मात्र त्यांनी भेद केला. त्यांच्या रोख न्यासांच्या गैरवर्तनाच्या विरोधात होता, संपत्ती निर्माण करण्याला मात्र त्यांनी कधीच विरोध केला नाही. बडया कंपन्यांवर राज्यांच्या ऐवजी केंद्र सरकारचे नियंत्रण असावे असे त्यांचे मत असले तरी अशा कायदा करण्यास काँग्रेसचा विरोध होता. शासन सर्वोच्च असल्याचे तत्त्व सर्वमान्य व्हावे अशी त्यांची इच्छा होती. बडया उद्योगपतींना सरकारी नियंत्रणा पासून मुक्ती हवी होती. बाराव्या शतकातील सरंजामी सरदार सरकारी कारवाईच्या कक्षेच्या बाहेर असत, बडया उद्योगपतींची मागणी देखील अशीच ती मान्य करणे मूर्खपणा झाला असता. त्यांच्यावर सरकारचे काही नियंत्रण असावे किंवा नाही हा मुख्य प्रश्न होता.

रूझवेल्ट यांनी इंटरस्टेट कॉमर्स कमिशन ॲक्टच्या सहाय्याने आर्थिक व्यवहाराचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला. १९०३ मध्ये करण्यात आलेल्या या कायद्यानुसार रेल्वे कंपन्यांनी त्यांचे माल वहातुकीचे दर प्रसिद्ध करणे आवश्यक होते, तसेच या दरामध्ये कोणालाही सूट देण्याची मनाई करण्यात आली होती. रेल्वे कामगारांनी पाठिंबा दिलेल्या या कायद्याचा रोख स्टँडर्ड ऑइल कंपनी सारख्या महाकाय कंपन्याच्या विरोधात होता. या कंपन्या रेल्वे व्यवस्थापनावर आपला माल कमी दराने वाहून नेण्यासाठी दबाव आणत असल्याने त्यांना अनाठायी फायदा होत असे. तथापि या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करणे शक्य झाले नाही.

मालवहातूकीचे दर कमी करणे हे प्रागतिक चळवळीचे अधिक महत्त्वाचे उद्दिष्टये होते. मालवहातूकीच्या दरांचे नियंत्रण करण्यासाठी इंटरस्टेट कॉमर्स कमिशन या आयोगाला व्यापक अधिकार दिले जावे अशी सूचना रूझवेल्ट यांनी केली. मात्र ही सूचना सिनेट सभासदांना मान्य न झाल्याने त्यांनी तडजोड करण्याचे मान्य केले. या तडजोडीमुळे १९०६ चा हेपबर्न ॲक्ट करण्यात आला. या कायद्यान्वे आयोगाला माल वहातूकीचे गैरवाजवी दर कमी करण्याचे अधिकार देण्यात आले. मात्र आयोगाच्या निर्णयाच्या विरोधात रेल्वे कंपनीला न्यायालयात दाद मागता येत असे आणि न्यायालय निवाडा करेपर्यंत आयोगाचा निर्णय तहकूब ठेवला जाई. सर्व रेल्वे कंपन्यांचे माल वहातूकीचे समान दर निश्चित करण्याचा आयोगाला देण्यात आलेला अधिकार हे हेपबर्न कायद्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टये होते. अशा रितीने प्रथमच रेल्वे कंपन्या माल वहातूक कोणत्या दराने करत असत आणि त्यांना मिळणाऱ्या अतिरिक्त फायद्याचे प्रमाण किती होते हे समजू शकले.

प्रागतिक चळवळीच्या नेत्यांना हेपबर्न कायद्याच्या तरतूदी अपूऱ्या वाटल्या आणि या कायद्यामध्ये काही दोष असले तरी रेल्वे कंपन्यांनी माल वहातूकीसाठी जादा दर आकारत असल्याचा हजारो तक्रारी आयोगाकडे आल्या. अशा तक्रारीमुळे नंतरच्या काळात अमेरिकन सरकारला माल वहातूकीचे दर निश्चित करण्याचे पूर्ण अधिकार मिळाले.

कोळसा खाणीतील कामगारांचा संप: १९०२ मध्ये कोळसा खाणीतील कामगारांनी केलेल्या संपामध्ये रूझवेल्ट यांनी केलेल्या हस्तक्षेपाने एक नाव पायंडा पडला. १९०२ मध्ये कोळसा खाणीतील कामगारांनी अधिक वेतन, कामाचे कमाल ९ तास आणि त्यांच्या कामगार संघटनेला मान्यता या मागण्यासाठी संप केला. वाटाघाटीने तडजोड व्हावी या उद्देशाने रूझवेल्ट यांनी संपामध्ये हस्तक्षेप केला. खाण मालकांनी सरकारची मध्यस्थी मान्य केली. १९१६ पर्यंत कामगारांचा संघटना करण्याचा हक्क मान्य झाला नसला तरी त्यांना अधिक वेतन मिळू लागले आणि त्यांच्या कामाचे तास ९ करण्यात आले.

## २.५ निसर्गाचे संरक्षण

१९०२ मध्ये रूझवेल्ट यांनी पुढाकार घेतल्याने न्यु लँड्स अ‍ॅक्ट हा कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये सरकारला उजाड जमिनीच्या क्षेत्रामध्ये सिंचनाच्या योजना हाती घेणे शक्य झाले. अशा योजनावर देखरेख करण्यासाठी रेक्लमेशन सर्विस हे खास मंडळ नियुक्त केले गेले. सरकारने नंतरच्या काळात धरणांची एक मालिका बांधून घेतली, मानवी इतिहासातील अभियांत्रिकीचे उत्तम नमूने असा या धरणांचा उल्लेख केला जातो. १९०८ मध्ये रूझवेल्ट यांनी देशाच्या नैसर्गिक संपत्तीचे रक्षण आणि संवर्धन करण्याची गरज आहे अशी सार्वजनिक जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने व्हाइट हाउस या राष्ट्रध्यक्षांच्या निवासस्थानी एक खास परिषद भरवली. त्यांच्या प्रयत्नाने आपल्या खर्चिक व्यक्तीगत जीवनशैलीवर काही मर्यादा आवश्यक असल्याची जाणीव अमेरिकन लोकांना प्रथमच झाली.

मिट इस्पेक्षण अ‍ॅक्ट आणि फूड अँड ड्रग इस्पेक्षन अ‍ॅक्ट हे कायदे १९०६ मध्ये करण्यात आले. फूड अँड ड्रग इस्पेक्षन अ‍ॅक्टनुसार काही धोकादायक अन्नाच्या विक्रीला मनाई करण्यात आली, आणि धोकादायक घटक असलेल्या औषधाच्या वेष्टनावर अचूक लेबल असावे अशी सक्ती करण्यात आले. या दोन्ही कायद्यांनी जुन्या निर्हस्तक्षेप सिद्धांताची परंपरा खंडित केली होती, या सिद्धांतानुसार ग्राहक आपले रक्षण करण्यास समर्थ असल्याचे मानले जात असे.

## २.६ राष्ट्राध्यक्ष टॅफ्ट आणि प्रागतिक चळवळ

टॅफ्ट १९०४ पासून रूझवेल्ट यांचे परराष्ट्र मंत्री होते. नेतृत्व करण्यासाठी आवश्यक ते गुण त्यांना अंगी नव्हते. ३५० पॉउंड वजनाचे महाकाय टॅफ्ट यांच्याकडे राजकीय बारकावा आणि गतीशील चैतन्य हे गुण नव्हते. पुढाकार घेण्यास किंवा कार्यकारी जबाबदारी पार पाडण्यास ते नाखुष असत. परिणामी, त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे श्रेय त्यांना मिळाले नाही.

**टॅफ्ट आणि प्रागतिक कायदे :**

टॅफ्ट् यांनी त्यांच्या चार वर्षाच्या कारकिर्दीमध्ये जेवढे कार्य केले तेवढे कार्य रूझवेल्ट यांना यांच्या साडेसात वर्षाच्या कारकिर्दीमध्ये देखील करता आले नव्हते. सुधारणांची लोकांनी केलेली मागणी एवढी जबरदस्त होती की अगदी जुन्या नेत्यांना देखील या सुधारणा केल्या पाहिजेत याची जाणीव झाली. जे कायदे करण्यात कायद्याचा आडथळा आहे त्यांचा अपवाद वगळता टॅफ्ट यांनी बहुतेक सर्व प्रागतिक कायद्यांचे प्रस्ताव कायद्यांचे प्रस्ताव मान्य केले होते. त्यांनी कायद्याचे शब्द आणि त्यांच्या मागची भावना यांचा आदर केला होता. काँग्रेसच्या खास अधिकारात हस्तक्षेप करण्याची त्यांची तयारी नसे.

टॅफ्ट प्रशासनाने एकूण ९३ न्यास रद्द केले. काँग्रेसने देखील अनेक प्रागतिक कायदे पारित केले. १९१० च्या मॅन - एल्किन्स ॲक्ट या कायद्यानुसार इंटरस्टेट कॉमर्स कमिशन या आयोगाचे अधिकार वाढवण्यात आले होते. या कायद्यानुसार आयोगाला मालवहातूकीच्या दरातील वाढ योग्य आहे किंवा नाही याचा निवाडा होई पर्यंत दहा महिन्यापर्यंत ती स्थगित करता येत असे. जमिनीखालच्या खनिज संपत्तीची मालकी जमिनीच्या पृष्ठ भागाच्या मालकीपासून विभक्त करण्यात आली, सार्वजनिक जमिनीखालच्या खनिज संपत्तीची विक्री करण्याऐवजी तीचा भाडेपट्टा देण्यात येऊ लागला. पोस्टल सेव्हिंग बँक आणि पोस्टाची पार्सल सेवा सुरु करण्यात आली. निवडणुकीच्या प्रचाराचा खर्च आणि राजकीय पक्षांना मिळालेल्या देणग्या यांची सार्वजनिक प्रसिद्धी देऊन राजकीय भ्रष्ट्राचाराला आळा घालण्यात आला. घटनेच्या सोळाव्या दुरुस्तीनुसार आयकर आकारण्याचा अधिकार शासनाला मिळाला तर सतराव्या घटना दुरुस्तीनुसार सिनेट सभासदांची सार्वत्रिक निवडणुक घेण्याची पध्दत अमलात आली. हे कायदे आणि अन्य उपाय योजना प्रभावी ठरल्या होत्या. तथापि काँग्रेसने काही कायद्यांचा, विशेषतः मॅन - एल्किन्स ॲक्टच्या तरतूदी टॅफ्ट यांच्या इच्छे विरुद्ध अधिक कठोर केल्या असल्या तरी बहुतेक सर्व प्रागतिक कायद्यांना त्यांच्या पाठिंबा होता.

रूझवेल्ट यांच्या प्रमाणे टॅफ्ट यांनी देखील प्रागतिक नेत्यांच्या पेक्षा राजकीय पक्षाच्या नेत्यांशी अधिक सहकार्य केले. परिणामी, लवकरच प्रागतिक नेते लूटारू प्रवृत्तीच्या व्यवसायिकांच्या हितसंबंधाचे रक्षक अशी त्यांची निर्भत्सना करू लागले. आयोवा राज्याचे सिनेट सभासद डॉलिव्हर यांचे मते टॅफ्ट मनमिळावू असले तरी त्यांच्या सभोवती असणारे नेते असे होते की ज्यांना स्वतः ला काय हवे आहे याची पूर्ण कल्पना असे.

प्रागतिक चळवळीची शक्ती उत्तरोत्तर वाढतच गेली. १९१० च्या निवडणुकीमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाला लक्षणीय यश मिळाले. काँग्रेसच्या कनिष्ठ सभागृहात या पक्षाला बहुमत मिळाले तर मिसिसिपी नदीच्या पश्चिमेकडील बहुतेक राज्ये प्रागतिक विचारांच्या रिपब्लिकन नेत्यांच्या नियंत्रणाखाली आली. पुढील निवडणुकीमध्ये सर्व सामान्य मतदार अशा नेत्याची निवड करतील की जो अधिक प्रभावी आणि प्रागतिक कार्यक्रमाशी ज्याची बांधिलकी अधिक दृढ आहे. वुड्रो विल्सन असे प्रभावी नेते होते.

## २.७ वुड्रो विल्सन आणि प्रागतिक कार्यक्रम

**जकात करांची नवी आकारणी :** १९१३ मध्ये अंडरवूड टॅरिफ कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार यादवी युद्धाच्या नंतर प्रथमच जकात करांच्या आकारणी नव्याने करण्यात आले. शंभरापेक्षा जास्त वस्तुंच्या वरील जकात कर रद्द करण्यात आला तर अन्य हजार वस्तुवरील जकात करांचे प्रमाण कमी करण्यात आले. जकात करांचे नवे दर सरासरीने ३७ ते २७ टक्क्यांनी कमी करण्यात आले होते. लवकरच पहिले महायुद्ध सुरू झाल्याने आंतरराष्टीय व्यापारात अडचणी निर्माण झाल्याने जकात कर कमी करण्याच्या परिणांचे परिक्षण करता आले नाही.

**फेडरल रिझर्व सिस्टिम :** ग्लास - ओवेन ॲक्ट या कायद्याने देशाची वित्तीय व्यवस्था सुधारण्यात आली. चलन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची मागणी शेतकरी वर्गाने केली होती आणि पूर्वेकडील कर्मठ नेत्यांनाही अशा सुधारणा आवश्यक असल्याची जाणीव झाली होती. १८६३ च्या या संबंधीच्या कायद्यामध्ये दोन वैगुण्ये होती. १. व्यवहारात येणाऱ्या बँक नोटांची संख्या बँकांच्या मालकीच्या सरकारी रोख्याच्या संख्येवर अवलंबून असल्याने नोटांच्या गरजेनुसार पुरेशा प्रमाणात नोटा व्यवहारात येत नसत. ज्या प्रमाणात आर्थिक व्यवहाराचे प्रमाण वाढत जाईल त्या प्रमाणात व्यवहारातील नोटांची संख्या वाढवण्याची तरतूद नसल्याने देशातील, विशेषः दक्षिण आणि पश्चिमेकडील राज्यांच्या व्यवहारातील नोटांचे प्रमाण फार कमी असे. २. अमेरिकेत एकूण ३०,००० बँका होत्या, प्रत्येक बँक स्वतंत्र आणि वेगळी असे. संकट काळात या बँकाना स्वतः च्या आर्थिक बळावर अवलंबून राहावे लागत असल्याने आर्थिक संकटाच्या काळात अनेक बँकां दिवाळखोरीत जात असत. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी देशाच्या विविध भागामध्ये १२ फेडरल बँकांची स्थापना करण्यात आली आणि त्यांच्या कारभारावर देखरेख करण्याची जबाबदारी फेडरल रिझर्व बोर्ड या मंडळावर सोपवली गेली. केंद्र सरकारचा अर्थमंत्री चलन व्यवस्थेचा नियामक आणि राष्ट्रध्यक्षांनी नियुक्त केलेले ५ सभासद या मंडळाचे सभासद असत. त्यांचा कार्यकाल १० वर्षांचा असे. या नव्या व्यवस्थेमध्ये सर्व राष्ट्रीय बँकांनी सहभागी व्हावे अशी अपेक्षा होती तर राज्यांतील सर्व बँकांना त्या मध्ये सामील होण्याची विनंती करण्यात आली. पूर्वी व्यवहारात असलेल्या बँकांच्या नोटा रद्द करून त्यांच्या ऐवजी फेडरल रिझर्व बोर्डाने काढलेल्या नोटा व्यवहारात आल्या. १९१५ पर्यंत देशातील निम्या बँका फेडरल रिझर्व बोर्डाच्या नियंत्रणाखाली आल्या आणि १९२८ पर्यंत त्यांचे प्रमाण ८० टक्क्यापर्यंत पोचले होते.

**न्यास विरोधी कायदे :** १९१४ च्या सप्टेंबर आणि ऑक्टोबर मध्ये फेडरल ट्रेड कमिशन ॲक्ट आणि क्लेटन ट्रस्ट ॲक्ट पारित करण्यात आले. फेडरल ट्रेड कमिशन इंटर स्टेट कॉमर्स कमिशनच्या धर्तीवर बनवण्यात आले होते. कमिशन देशातील व्यवहाराच्या पद्धतीवर देखरेख करणार होते, त्याला संबंधित कंपन्यांना थांबवा आणि करू नका (सिझ अँड डेझिस्ट) अशा आज्ञा करण्याचे अधिकार होते. अशा आज्ञे विरुद्ध संबंधित कंपनीला अपिल करता येत असे. स्पर्धेला मारक ठरतील असे अनेक आर्थिक व्यवहार क्लेटन ॲक्टनुसार बेकायदेशीर ठरवण्यात आले. सॅम्युएल गॉम्पर्स कामगार नेते. या दोन कायद्यांचे वर्णन कामगार वर्गाचा मॅग्ना चार्टा (मोठी सनद) असे करत असत. कायद्याच्या सहाव्या कलमानुसार कामगार संघटनांना अँटी ट्रस्ट ॲक्टच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्यात आले होते,

तर कायद्याच्या विसाव्या कलमानुसार संप, बहिष्कार आणि निदर्शने करणे केंद्र सरकारच्या कायद्याच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

रूझवेल्ट यांनी सुरु केलेली न्यास विरोधी मोहीम विल्सन यांनी पुढे चालू ठेवली. विल्सन यांनी राष्ट्राध्यक्ष पदाच्या आठ वर्षाच्या कार्यकालात अशी ९२ प्रकाराने हाताळली. मक्तेदारीची समस्या उपचारापेक्षा प्रतिबंध करण्याने सुटण्यासारखी असल्याचे आशा व्यक्त करण्यात आली. १९१५ ते १९२१ या काळात फेडरल ट्रेड कमिशन या आयोगाने ७८८ प्रकरणी औपचारिक तक्रारी केल्या आणि ३७९ कंपन्यांवर थांबवा आणि करू नका अशा नोटिसा बजावल्या. १९१५ च्या ला फॉलेट सिमेन्स ॲक्ट या कायद्यानुसार जहाजावर काम करणाऱ्या खलाशांची परिस्थिती सुधारण्यात आली. १९१६ च्या ॲडॅम्सन ॲक्ट या कायद्यानुसार आंतर राज्यीय रेल्वेमार्गावर काम करणाऱ्या रेल्वे कामगारांसाठी दिवसाचे कामाचे आठ तास निश्चित करण्यात आले. त्याच वर्षीच्या फेडरल फार्म ॲक्ट या कायद्यानुसार १२ जमिनविषयक बँका स्थापन करण्यात आल्या. त्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना अल्प व्याजाने कर्ज देण्यात येणार होते. ऑगस्ट १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरु झाल्याने प्रागतिक चळवळीच्या कामगिरीला खीळ बसली आणि त्या बरोबरच राष्ट्रीय राजकारणातील प्रागतिक चळवळ देखील समाप्त झाली.

## २.८ समारोप

प्रागतिक चळवळीने देशातील राजकारण आणि अर्थव्यवस्थेमध्ये काही मूलभूत परिवर्तन केले नव्हते, तसा या चळवळीचा उद्देशही नव्हता. काही विशिष्ट सुधारणांवर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले होते आणि १९१४ पर्यंत त्यापैकी बहुतेक सुधारणा करण्यात आल्या होत्या. राजकारणात सरकारी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची लोकभावनेप्रती असणारी जबाबदारी अधिक वाढल्याने लोकशाही अधिक बलवान झाली. मक्तेदारीच्या समस्येवर मात्र त्यांना कोणताही तोडगा काढता नसला तरी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारांचे अधिकारात वाढ केली असल्याने त्यांना आर्थिक व्यवहार नियंत्रित करता आले, कामगारांच्या शोषणावर आळा घालता आला आणि नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करता आले.

प्रत्यक्ष सुधारणांपेक्षा दृष्टीकोनात झालेला बदल अधिक महत्त्वाचा होता. प्रागतिक चळवळीचा एक लक्षणिय परिणाम असा होता की राजकीय नेते आणि उद्योगपतींना पूर्वीपेक्षा लोकांचा पाठिंबा मिळवण्याची अधिक गरज भासू लागली. जनमानसातील आपली प्रतिमा सुधारण्यासाठी महाकाय कंपन्या जनसंपर्कावर आता फार मोठा खर्च करू लागल्या ही गोष्ट अधिक महत्त्वाची होती. शेवटी प्रागतिक चळवळीची परिणामकारकता सुबुद्ध नागरिक आणि योग्य रितीने प्रचार करण्याची त्यांची क्षमता यावर अवलंबून होती.

**आपली प्रगती तपासा :**

१. वुड्रो विल्सनचे प्रागतिक चळवळीतील योगदान सांगा.

२. थिऑडॉर रूझवेल्ट यांचे प्रागतिक चळवळीतील योगदान सांगा.

## २.९ प्रश्न

१. प्रागतिक चळवळीची महत्त्वाची वैशिष्टये नमूद करा.

२. राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट किंवा टॅफ्ट किंवा विल्सन यांनी प्रागतिक चळवळीत बजावलेल्या भूमेकीची चर्चा करा.

## २.१० संदर्भ ग्रंथ

१. पार्कस, हेन्री बामफोर्ड, द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका: अ हिस्टरी. सायंटिफिक बूक एजन्सी, कोलकाता १

२. बिअर्डस, न्यु बेसिक हिस्टरी ऑफ द युनायटेड स्टेट्स, न्यु यॉर्क, १९६०

३. हिल सी. पी. अ हिस्टरी ऑफ युनायटेड स्टेट्स अर्नोल्ड हायनेमन, इंडिया

४. जयपालन, एन. हिस्टरी ऑफ द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, अटलांटिक पब्लिशर्स, न्यु दिल्ली.

❖❖❖❖

munotes.in

# ३

# जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेचा झालेला उदय (१९०० ते १९१९)

**घटक रचना :**


३.० उद्दिष्टये

३.१ प्रस्तावना

३.२ अमेरिकेचा साम्राज्यवाद

३.३ सामाजिक डार्विनवाद

३.४ चीन आणि मुक्त द्वार धोरण

३.५ कॅरिबियन प्रदेश आणि मेक्सिकोमधील धोरण

३.६ मेक्सिकोमधील क्रांती

३.७ मेक्सिकोमधील हस्तक्षेप

३.८ अमेरिका आणि जपान

३.९ समारोप

३.१० प्रश्न

३.११ संदर्भ ग्रंथ


munotes.in

## ३.० उद्दिष्टये

- जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेचा झालेल्या उदयाचा अभ्यास करणे.
- अमेरिकन साम्राज्याच्या विस्तारवादी धोरणाचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रस्तावना

अठराव्या शतकाच्या अखेरीस पश्चिम युरोपातील बहुतेक देशांच्या औद्योगिक क्रांतीची प्रक्रिया पूर्ण केली होती. या प्रक्रियेनुसार कच्च्या मालाचे यंत्राच्या सहाय्याने उत्पादित मालात परिवर्तन होत असे. परिणामी या उत्पादित मालाच्या खपासाठी त्यांना परदेशातील बाजार पेठांची गरज भासू लागली. युरोपातील औद्योगिक देशांना कच्च्या मालाचा पुरेसा होत नसल्याने त्यांनी वसाहतींचा शोध घेण्यास सुरुवात केली. या वसाहती त्यांना लागणारा

कच्चा माल अल्प किमतीती पुरवू शकत तसेच या वसाहतीमध्ये त्यांच्या उत्पादित मालासाठी खात्रीच्या बाजारपेठा उपलब्ध होत असत, तसेच या मालाला अन्य देशांच्या मालाशी स्पर्धा करावी लागत नसे. युरोपातील औद्योगिक देशांना कच्च्या माला पुरवठा करण्यासाठी आणि उत्पादित मालाच्या खात्रीशीर उठावासाठी वसाहतींची गरज होती. या गरजामधूनच साम्राज्यवादाचा जन्म झाला. साम्राज्यवादाचा परिणाम म्हणून युरोपातील औद्योगिक देशांमध्ये वसाहतींची शर्यत सुरु झाली. या शर्यतीमध्ये इंग्लंड आणि फ्रान्स आघाडीवर होते तर अठराव्या शतकाच्या अखेरीस जर्मनी त्यांना सामील झाला.

दरम्यान जगाच्या दुसऱ्या बाजूला जपान सत्तेचा उदय झाला. जपान युरोपियन देशांच्या बरोबरीने चिनी प्रदेशाच्या वाटपात सहभागी झाला. १८९४ मधील चिन-जपान युद्ध जिंकून जपानने जगाला इशारा दिला की पूर्वेला एका नव्या सत्तेचा उदय झाला असून ती आता जागतिक राजकारणात हक्काचे स्थान मिळवणार आहे.

अमेरिकेला कदाचित पूर्वी प्रमाणे सुरक्षिततेची भावना वाटत नव्हती आणि अमेरिकेने आपल्या अलगतावादी परराष्ट्रीय धोरणाचा त्याग करण्याचे हे खरे कारण असावे. समग्र एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश आरमारी सामर्थ्याचे अटलांटिक महासागरावर नियंत्रण होते, तर पॅसिफिक महासागरावर कोणत्याही सत्तेचे नियंत्रण नव्हते. मात्र एकोणिसाव्या शतकाच्या अखेरिस साम्राज्यवादाचे पुरुज्जीवन झाल्याने विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सर्व देशांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. जर्मनी आणि जपान यांच्या वाढत्या आरमारी सामर्थ्याने सत्तेचा जागतिक समतोल ढासळेल अशी अमेरिकेला काळजी वाटू लागली.

## ३.२ अमेरिकेचा साम्राज्यवाद

दरम्यान अमेरिकेतील साम्राज्यवादी प्रवृत्ती प्रबळ होत गेल्या. अमेरिकन उद्योगांना परदेशी बाजारपेठांची गरज भासू लागली. पहिल्या महायुद्धापर्यंत अमेरिका एक कर्जबाजारी देश असला तरी कॅनडा, मेक्सिको आणि क्युबा या शेजारी देशामध्ये अतिरिक्त अमेरिकन भांडवलाची गुंतवणूक होऊ लागली. युरोपियन देशांनी जगातील प्रदेशाचे आपसात वाटप केल्याने अमेरिकन औद्योगिक मालाला जगातील किफायतशीर बाजारपेठामध्ये प्रवेश मिळणार नाही अशी भीती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि त्यांच्या परराष्ट्र मंत्र्यांना वाटू लागली. परदेशी बाजारपेठा अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणूकीसाठी खुल्या राहतील याची काळजी घेण्याची गरज आहे असे त्यांना वाटू लागले. आणि म्हणूनच अमेरिकेने वसाहती मिळवण्यास सुरुवात केली.

मॅनिफेस्ट डेस्टिनी किंवा उघड नियतीच्या विचारावर विश्वास असणाऱ्या एका गटाने अमेरिकन साम्राज्याच्या निर्मितीला खंबीर पाठिंबा दिला. सामाजिक डार्विनवाद आणि रडयार्ड किप्लिंग सारख्या युरोपियन साम्राज्यवादी लेखकांच्या लिखाणाने प्रभावित होऊन त्यांनी अमेरिकन जगाचे नेतृत्व केले पाहिजे असा युक्तीवाद केला थिऑडॉर रूझवेल्ट, हेन्री कॅबट लॉज आणि अल्बर्ट बिव्हरीज हे सिनेटचे सभासद हे या गटाचे काही प्रमुख नेते होते. या नेत्यांचा अमेरिकेच्या धोरणावर, विशेषतः आरमारी तळ मिळवण्यावर लक्षणिय प्रभाव होता. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीचा अमेरिकन साम्राज्यवाद आर्थिक घटकांपेक्षा

रणनितीविषयक विचारावर अधिक विसंबून होता. कॅप्टन अल्फ्रेड टी. महान यांनी त्यांच्या *इनफ्लुअन्स ऑफ नॅव्हल पॉवर ऑन हिस्टरी* (१८९०) या ग्रंथामध्ये आरमारी तळाच्या महत्त्वावर विशेष भर दिला. आरमारी सत्तेमधूनच राष्ट्रीय महानता आणि समृद्धी निर्माण होईल असा युक्तीवाद त्यांनी केला होता. आर्थिक विकासासाठी एका प्रबळ आरमाराची आणि तेवढयाच प्रबळ व्यापारी जहाजांच्या ताफ्याची गरज असल्याचे प्रतिपादन ते करत असत. कॅरिबियन प्रदेशावर नियंत्रण ठेवणे, दक्षिण आणि उत्तर अमेरिकन खंडांना जोडणारा कालवा निर्माण करणे आणि पॅसिफिक महासागराच्या प्रदेशामध्ये पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रसार करणे हे अमेरिकेचे नियत कर्तव्य असल्याचा त्यांचा आग्रह होता.

## ३.३ सामाजिक डार्विनवाद

नैसर्गिक निवडीच्या डार्विनच्या सिद्धांताचे साम्राज्यवादी कार्यक्रमाला आयतेच समर्थन मिळाले. जीव सृष्टीला जर हा सिद्धांत लागू पडत असेल तर मानवी समाजाला तो का लागू पडू नये असा प्रश्न विचारला गेला. जॉन फिस्क या अमेरिकन इतिहासकाराने त्यांच्या *अमेरिकन पोलिटिकल आयडियाज* (१८८५) या ग्रंथामध्ये अँग्लो - सॅक्सन वंशांच्या लोकांच्या आणि संस्थांच्या श्रेष्ठत्वावर विशेष भर दिला. अँग्लो - सॅक्सन लोकांचे जगावर राज्य असावे असा नियतीचा संकेत असल्याचा त्यांचा युक्तीवाद होता. जोशिया स्ट्रॉंग यांनी *अवर कंट्री : इट्स पॉसिबल फ्युचर अँड प्रेझेंट क्रायसिस* (१८८५) या ग्रंथामध्ये असा युक्तीवाद केला की अँग्लो - सॅक्सन वंश नागरी स्वातंत्र्य आणि आध्यात्मिक ख्रिश्चन विचारांचे प्रतिनिधित्व करते.

**१. पॅसिफिक महासागरातील विस्तार :**

१८६७ मध्ये सीवार्ड या परराष्ट्र मंत्र्यांनी रशिया बरोबर केलेल्या एका करारान्वये रशियाचा अलास्काचा प्रदेश ७.२०,००० डॉलरला विकत घेतला. त्यांनी पॅसिफिक महासागरातील मिड - वे बेटे देखिल खालसा केली. नंतरच्या काळात आरमारी सामर्थ्यावर वाढता भर दिल्याने अमेरिकन पॅसिफिक महासागरामध्ये आरमारी तळ मिळवले. १८७८ मध्ये सामोआशी केलेल्या एका करारान्वये अमेरिकेला पॅगो-पॅगो येथे एक आरमारी तळ स्थापन करण्याचा अधिकार मिळाला. लवकरच जर्मनी आणि इंग्लंड या दोन्ही देशांनी सामोआमध्ये स्वारस्य दाखवल्याने सामोआ बेटाच्या नियंत्रणावरून तीन देशामध्ये संघर्ष होण्याची शक्यता होती. जर्मन सरकारने माघार घेतल्याने सामोआ बेटावर तीन देशांचे संयुक्त नियंत्रण स्थापन करणारा करार करण्यात आला. काही काळाने सामोआ बेटाचे तीन देशामध्ये विभाजन करण्यात आले. पॅगो-पॅगोचा तळ असलेला टिटूलियाचा प्रदेश अमेरिकेच्या वाटयाला आला. सामोआचा प्रसंग तसा महत्त्वाचा नसला तरी त्यामध्ये अमेरिकेची नवी साम्राज्यवादी मानसिकता स्पष्ट दिसून येते. अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याकडे जाणाच्या सागरी मार्गाचे रक्षण हवाई बेटे करत असल्याने त्यांचे रणनितीविषयक महत्त्व यादवी युद्धाच्या पूर्वीच अमेरिकन नेत्यांच्या लक्षात आले होते. अन्य कोणत्याही देशाने हवाई बेटे काबीज करण्याच्या प्रयत्न केल्यास अमेरिका त्याला विरोध करेल असे १८४२ मध्येच परराष्ट्र मंत्री वेब्स्टर यांनी जाहीर केले होते. १८७५ मधील एका करारान्वये हवाई बेटे अमेरिकेच्या संरक्षणाखाली आली. १८८७ मध्ये अमेरिकन सरकारने पर्ल हार्बर येथे आरमारी तळ स्थापन करण्याचा अधिकार मिळवला. जुलाई

१८९८ मध्ये अमेरिकन काँग्रेसने हवाई बेटे खालसा करण्याचा निर्णय घेतला, यथावकाश या बेटांना अमेरिकेच्या राज्याचा दर्जा मिळाला. १८९८ मध्ये झालेल्या स्पॅनिश युद्धामध्ये विजयी झाल्याने अमेरिकेची मनोवृत्ती विस्तारवादी झाली तेव्हा ही बेटे खालसा करण्यात आली.

**२. पॅन अमेरिकॅनिझम किंवा बृहद अमेरिकावाद :**

१८८० आणि १८९० च्या दशकात अमेरिकेचे लक्ष दक्षिण आणि पश्चिमेकडील देशांकडे वळले. दक्षिण अमेरिकेतील देशामध्ये अमेरिकन उद्योगांना बाजार पेठ मिळावी या हेतूने तेथील देशांशी घनिष्ट संबंध स्थापन करण्याचा प्रयत्न देखील सरकारने सुरु केले कारण अमेरिकेच्या सुरक्षिततेसाठी या प्रदेशावर अमेरिकन नियंत्रण असण्याची गरज असल्याचा सार्वत्रिक समज होता. १८८९ मध्ये वॉशिंग्टन येथे भरलेल्या एका परिषदेमध्ये व्यापार वाढवण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी झाले नसले तरी पॅन अमेरिकन युनियन ही संघटना स्थापना करण्यात आली. विचारांचे आणि माहितीचे आदान प्रदान करण्याचे या संघटनेचे उद्दिष्ट होते. पहिल्या महायुद्धानंतर ही संघटना गंभीर राजकीय आणि आर्थिक समस्यांचा विचार विनिमय करू लागली. लॅटिन अमेरिकन देशांशी सहकार्य करण्याची कल्पना अधिक लोकप्रिय झाली.

**३. व्हेनिझुएलाचा सीमा संघर्ष :**

गियाना ही ब्रिटिश वसाहत आणि व्हेनिझुएला यांच्या दरम्यानच्या सीमा संघर्षात अमेरिकन प्रथमच कॅरिबियन प्रदेशात आपली सत्ता गाजवली. पश्चिम गोलार्धातील जमिनीच्या मालकीचा प्रश्न असल्याने आणि ब्रिटिश सरकारने या प्रश्नामध्ये लवादाचा निर्णय अमान्य केला असल्याने मन्रो सिद्धांत लागू केला पाहिजे असा राष्ट्राध्यक्ष क्लिव्हलँड यांनी विचार केला. ब्रिटनने माघार न घेतल्यास अमेरिकेला बलप्रयोग करावा लागेल असा इशारा परराष्ट्र मंत्री ओल्नी यांनी दिला. आज मितीला या खंडावर अमेरिकेची सत्ता सार्वभौम आहे, अमेरिकेला हव्या त्या विषयावर तिचे फरमान म्हणजे कायदा आहे. अगणित साधन संपत्ती आणि तिचे एकाकीपण या कारणांनी अमेरिका सर्व परिस्थिती नियंत्रित करते आणि तिच्या समोर जवळपास सर्व सत्तांची काहीच मात्रा चालत नाही, असे ओन्ली यांनी ठणकावून सांगितले.

हा वाद काही दिवस चालू राहिला आणि एका वेळेस उभयतांमध्ये संघर्ष होण्याची शक्यता दिसू लागली. नेमक्या त्याच वेळेस ब्रिटन दक्षिण आफ्रिकेतील एका झगडयात गुंतला होता आणि त्याच्या तुलनेमध्ये दक्षिण अमेरिकेतील काही चौरस मैल जंगलाचे काहीच महत्त्व नव्हते. ब्रिटनने आंतरराष्ट्रीय लवाद मंडळाचा निवाडा मान्य करण्यास संमती दिली. मात्र त्याच वेळेस लॉर्ड सॅलिस्बरी या ब्रिटिश पंतप्रधानांनी असाही इशारा दिला की अमेरिका लॅटिन अमेरिकेतील देशांचे युरोपियन देशांच्या हस्तक्षेपापासून रक्षण करणार असल्यास तिला या देशांच्या चांगल्या वर्तनाची जबाबदारी स्वीकारावी लागेल. अमेरिकन लॉर्ड सॅलिस्बरी यांचे मत मान्य केले. या मधूनच नंतर १९०४ मध्ये मन्रो सिद्धांचा रूझवेल्ट उप-सिद्धांत सादर करण्यात आला. ओन्ली या अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दमदाटीची भाषा वापरी असली तरी व्हेनिझुएला प्रकरणानंतर ब्रिटन आणि अमेरिका यांचे परस्पर संबंध

अधिक घनिष्ट झाले. ब्रिटनने पश्चिम गोलार्धातील आपले सर्व सैन्य मागे घेतले आणि तिने मन्रो सिद्धांताला मान्यता देण्यासही सुरुवात केली.

**४. स्पेन आणि अमेरिका दरम्यानचे युद्ध :**

कॅरिबियन प्रदेशामध्ये अमेरिकेचे वर्चस्व स्थापन करण्यातील पुढील पायरी स्पेनच्या विरोधातील युद्ध होते. दक्षिण अमेरिकेतील आपल्या वसाहती गमावल्यावर फक्त क्युबा आणि पोर्टो रिको या प्रदेशावरच स्पेनची मालकी असली तरी स्पेनने आपली शासन पद्धत मात्र बदलेली नव्हती. १८६८-१८७८ या काळातील क्युबामधील उठाव अयशस्वी झाला. १८९५ मध्ये क्युबामध्ये परत एकदा उठाव झाला होता, तो दडपून टाकण्यासाठी स्पॅनिश सरकारने अत्याचार केले आणि त्या संघर्षाचे रानटी स्वरूप या मुळे अमेरिकेतील लोकमत विशेष प्रक्षुब्ध झाले. १८९८ च्या सुरुवातीला अमेरिकेतील लोकमत स्पेनशी युद्ध करण्याच्या बाजूने झुकू लागले. उदारमतवादी आणि मानवी भावना आणि उत्साही राष्ट्रवादी विचार यांच्या मिश्रणातून आपल्या सामर्थ्याचा वापर करण्यास अमेरिकन लोक अधीर झाले.

दरम्यान थिऑडॉर रूझवेल्ट यांच्या नेतृत्वाखालचा एका गट जगाचे नेतृत्व अमेरिकेने करावे अशी मागणी लागला; रूझवेल्ट त्या वेळेस आरमाराचे उप-मंत्री होते. हा गट अधिक व्यवहारी कारणांसाठी स्पेनशी युद्ध करण्यास उत्सुक होता. क्युबाला मुक्त करताना कॅरिबियन प्रदेशात अमेरिकेला आरमारी तळ सहज स्थापन करता येतील. फिलिप्पीन्स देखील स्पेनच्या मालकीचे होते. अमेरिकेला आरमारी फिलिप्पीन्स जिंकता आल्यास तिला पॅसिफिक महासागरात पाय ठेवण्यासाठी सोयीची जागा मिळेल असाही एक विचार होता. दुसरीकडे अमेरिकन उद्योगपती आणि भांडवलदारांचा या युद्धाला विरोध होता. क्युबामधील त्यांची गुंतवणूक फारच थोडी होती आणि क्युबा स्वतंत्र्य झाल्यास त्यांचा काहीच फायदा होण्यासारखा नव्हता.

फेब्रुवारी, १८९८ मध्ये अमेरिकेचे *यु. एस. एस मेन* हे आरमारी जहाज बुडवले गेले. एप्रिल १८९८ मध्ये राष्ट्राध्यक्ष मॅकिन्ले यांनी स्पेनच्या विरोधात युद्ध पुकारले. जुलै, १८९८ मध्ये अमेरिकन सैनिक क्युबाच्या किनाऱ्यावर उतरले, त्यांनी स्पॅनिश सैन्याचा पराभव केला आणि नंतर पोर्टो रिको आपल्या नियंत्रणाखाली आणले.

डिसेंबर, १८९८ च्या पॅरिस तहानुसार स्पेनच्या सरकारने क्युबा, पोर्टो रिको आणि फिलिप्पीन्स आणि पॅसिफिक महासागरातील गुआमा हे छोटे अमेरिकेच्या हवाली केले. १९०२ मध्ये क्युबामध्ये काही नियंत्रणासह स्वयंशासन  लागू करण्यात आले. १९०१ मध्ये अमेरिकन काँग्रेसने पारित केलेल्या प्लॅट दुरुस्तीनुसार अमेरिका आणि क्युबा दरम्यानचे संबंध नियंत्रित करण्यात आले. खर्च विनिमयाच्या एका प्रस्तावाच्या दुरुस्तीचा एक भाग म्हणून ही दुरुस्ती करण्यात आली होती.

**पोर्टो रिको:**

अमेरिकन प्रशासनाने पोर्टो रिको मध्ये अनेक सुधारणा केल्या असल्या ती त्या यशस्वी केल्या असल्या तरी त्या यशस्वी झाल्या होत्या असे म्हणता येत नाही. मृत्युच्या दरात घट झाली, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या आणि अनेक सार्वजनिक कामे करण्यात आली

असली तरी लोकसंख्या झपाटयाने वाढत गेली आणि सरकारला वाढत्या लोकसंख्येच्या समस्या सोडवता न आल्याने जीवनाचा स्तर अतिशय कमी होता. बहुतेक सर्व जमीन उस आणि अन्य विषुव वृत्तीय पिके घेणाऱ्या अमेरिकन कंपन्यांच्या मालकीची होती. लोकसंख्येचा मोठा भाग उसाच्या मळ्यावर अतिशय कमी रोजगारावर मजुरी करत असे. पोर्टो रिकोच्या जनता देशावरील अमेरिकेच्या नियंत्रणाचा तिरस्कार करत असे. परिणामी तेथे एक प्रबळ राष्ट्रवादी चळवळ लवकरच उदयाला आली.

**५. फिलिप्पीन्स :**

काही फिलिपिनोंनो अशी आशा वाटत होती की देशाला स्वातंत्र्य मिळेल परंतु तसे न झाल्याने फिलिपिनो जनतेने एमिलिओ ॲक्विनाल्डो यांच्या नेतृत्वाखाली उठाव केला. १९०१ मध्ये तेथे नागरी शासनाची स्थापना झाली; विल्यम हॉवर्ट टॅफ्ट फिलिप्पीन्सचे पहिले राज्यपाल होते. एका निर्वाचित कायदेमंडळाची नियुक्ती करण्यात आली, सार्वजनिक शिक्षणाची सुरुवात झाली आणि सार्वजनिक आरोग्यात सुधारणा करण्यात आल्या.

अमेरिकन राष्ट्रीय हीतसंबंधाच्या दृष्टीने फिलिप्पीन्स खालसा करणे कदाचित चुकीचे होते. अमेरिकेला त्यांचा फारसा फायदा होण्यासारखा नव्हता. पूर्व आशियातील अन्य देशांबरोबरच्या व्यापारासाठी एक तळ म्हणून फिलिप्पीन्सचा काहीच उपयोग होण्यासारखा नव्हता. अमेरिकेच्या किनाऱ्यापासून ६,००० मैल दूर असल्याने सैनिकी दृष्टीने ती एक न पेलणारी जबाबदारी होती. त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी अमेरिकेसाठी गंभीर अडचणीची होती.

## ३.४ चीन आणि मुक्त द्वार धोरण

पॅसिफिक प्रदेशात फार पूर्वी पासून अमेरिका सक्रीय होती. अठराव्या शतकात अमेरिकेचे चीन आणि इंडोनेशियाशी व्यापारी संबंध स्थापन झाले. १८३० च्या दशकापासून अमेरिकन प्रॉटेस्टंट मिशनरी चीन मध्ये विशेष सक्रीय होते. विशेषत: चीन मध्ये फायदा, सत्ता आणि आदर्शवादी उपक्रमासाठी फार मोठी संधी असल्याचा सार्वत्रिक समज होता. आणि म्हणूनच चीनने दरवाजे व्यापारासाठी खूले ठेवणे ही अमेरिकन सरकारची जबाबदारी आहे असे अमेरिकन लोकांना वाटत होते. पूर्व आशियातील देशांमध्ये गुंतण्याची या पुढील पायरी मुक्त द्वार धोरणाचा पुरस्कार करण्याची होती. काही काळाने मुक्त द्वार धोरण अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाचे मार्गदर्शक सूत्र झाले होते.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणीन जपान या देशांनी चिनी प्रदेश एकतर खालसा केला किंवा चीनच्या सीमावर्ती प्रदेशात अनेक ठिकाणी आपले संरक्षित क्षेत्र निर्माण केले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस चीनच्या मध्यमवर्ती प्रदेशामध्ये देखील युरोपियन देशांशी आपली हितसंबंधांची क्षेत्र निर्माण होती. तत्त्वतः या हितसंबंध क्षेत्रातील राजकीय सत्ता चिनी सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती असली तरी परकीय सत्तांनी तेथे भांडवलाची गुंतवणूक करण्याचा आणि त्यावर आर्थिक नियंत्रण ठेवण्याचा हक्क मिळवला होता. या हक्कांचे रुपांतर नंतरच्या काळात वसाहतीमध्ये होण्याची शक्यता होती. १८९८ मध्ये चीनच्या संदर्भात मुक्त द्वार धोरणाचा पुरस्कार अमेरिकन सरकार आणि ब्रिटन यांनी मिळून करावा अशी सूचना अमेरिकेने ब्रिटिश



munotes.in

अधिकाऱ्यांना केली. या धोरणानुसार चीनची फाळणी होणार नव्हती, चीनमध्ये सर्व देशांना व्यापार करण्याची समान संधी मिळणार होती. राष्ट्राध्यक्ष मॅकिनले यांनी या योजनेमध्ये स्वारस्य न दाखवल्याने या सुचने मधून काहीच फलनिष्पत्ती झाली नाही. तथापि, १८८९ मध्ये अमेरिकन परराष्ट्रमंत्री जॉन हे यांनी संबंधीत देशांना एक खलिता पाठवून त्यांनी आपल्या हितसंबंध क्षेत्रामध्ये सर्व देशांच्या नागरिकांना व्यापाराची समान संधी द्यावी अशी विनंती केली. त्या सर्व देशांनी पाठवलेली उत्तरे संदिग्ध असली तरी हे यांनी असा बहाणा केला की सर्वांनी त्यांनी सूचना मान्य केली आहे. १९०० मध्ये चीनमधील राष्ट्रवादी असंतोषाचे पर्यवसान बॉक्सर उठावात झाले. उठावाच्या उद्रेकापासून आपल्या नागरिकांचे रक्षण करण्यासाठीच्या संयुक्त कारवाईत अन्य देशांच्या बरोबरीने अमेरिकन सैन्य देखील सहभागी झाले. काही सत्ता ही संधी साधून उठावाचा बंदोबस्त झाल्यावरही आपले सैन्य चीनमध्ये कायम ठेवतील अशी भीती अमेरिकन परराष्ट्रमंत्र्याना वाटल्याने त्यांनी मुक्त द्वार धोरणाविषयाचा दुसरा खलिता पाठवला. या खलित्याचा मतीतार्थ पहिल्या खलित्यापेक्षा अधिक व्यापक होता. चीनच्या प्रादेशिक अखंडतेचे आणि प्रचलित प्रशासनाने रक्षण करण्याचे अमेरिकेचे धोरण असल्याचे या खलित्यामध्ये नमूद करण्यात आले होते.

प्रत्यक्ष व्यवहारामध्ये एकही देश, अगदी ब्रिटनही मुक्त द्वार सिद्धांत स्वीकारण्यास तयार नव्हता. चीनने वसाहतीमध्ये विभाजन झाले नसले तरी साम्राज्यवादी देशांचे त्या विषयी आपसात एकमत न झाल्याने आणि नंतर लवकरच पहिले महायुद्ध सुरु झाल्याने चीनचे वसाहतीमध्ये विभाजन होऊ शकले नाही. अमेरिकेच्या प्रभावामुळे चीनचे विभाजन टळले असे काही नव्हते. एकटयाच्या जबाबदारीवर चीनचे रक्षण करण्यायेवढे अमेरिकेचे सामर्थ्य नव्हते आणि असा प्रयत्न करण्यासाठी तिचे पूर्व आशियात पूरेसे हितसंबंध नव्हते. अशा प्रकारे मुक्त द्वार सिद्धांत म्हणजे एक पवित्र हेतू, होता, त्यामागे पुरेशा सामर्थ्याचे पाठबळ नव्हते.

नंतर राष्ट्राध्यक्ष थिऑडॉर रूझवेल्ट, टॅफ्ट आणि विल्सन यांनी त्यांच्या पूर्व आशियाच्या धोरणात मुक्त द्वार धोरणाचा पुनरुच्चार केला असला तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी फारशी कारवाई करता येणार नाही याची जाणीव त्यांना झाली. चीनी प्रदेशामध्ये आपला विस्तार करण्याची जपानची महत्त्वाकांक्षा हा त्या मागचा प्रमुख घटक होता.

### ३.५ कॅरिबियन प्रदेश आणि मेक्सिकोविषयक धोरण :

चीनपेक्षा कॅरिबियनचा प्रदेश अधिक जवळचा असल्याने तेथे आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी बळाचा वापर करण्याची अमेरिकेची तयारी होती. मात्र अमेरिकेने आपल्या बळाचा केलेला वापर नेहमीच सूज्ञपणाचा होता किंवा तो पूरेशा कारणासाठी होता असे म्हणता येत नाही. संबंधित अमेरिकन अधिकाऱ्यांनी पूरेसा संयम बाळगला असता किंवा लॅटिन अमेरिकेतील आपल्या शेजारी देशांच्या मताचा अधिक आदर केला असता तर अमेरिकेच्या धोरणाची महत्त्वाची उद्दिष्टये अधिक साध्य झाली असती असा युक्तीवाद करता येतो.

१९०१ मध्ये मॅककिनले यांच्या ऐवजी थिऑडॉर रूझवेल्ट राष्ट्राध्यक्षपदी आले. परराष्ट्रीय धोरणात बळाचा वापर करण्यास ते नेहमीच तयार असत. ज्या रितीने त्यांनी पनामाचा कालवा बांधण्याचा अधिकार मिळवला ते बळाच्या वापराचे धडधडित उदाहरण होते.

**पनामा कालवा :** १८५० मध्ये क्लेटन-बुल्वार करार झाल्यानंतर मध्य अमेरिकेला भेदून जाणारा पनामा कालवा बांधण्याचा प्रकल्प काही काळ मागे पडला. १८७० च्या दशकात अमेरिकेने कालव्याच्या बांधकामात परत एकदा स्वारस्य दाखवले असले तरी कालव्या वरील नियंत्रणात ब्रिटनला सहभागी करण्याची अमेरिकेची तयारी नव्हती. प्रस्तावित कालवा अमेरिकेचा एक भाग असेल असे राष्ट्राध्यक्ष हे यांनी स्पष्ट केले. मात्र दिर्घ काळ क्लेटन -बुल्वार करारामध्ये कोणताही बदल स्वीकारण्यास ब्रिटन तयार नव्हते. दरम्यान एका फ्रेंच कंपनीने हा कालवा बांधण्याची परवानगी कोलंबियाच्या गणराज्याकडून मिळवली, कालव्याची भूमी कोलंबियाची होती. तिने कालव्याचे काही बांधकाम केले असले तरी नंतर मात्र पैशाच्या अभावी ते थांबवण्यात आले.

स्पॅनिश युद्धानंतर अमेरिकेला आपल्या सुरक्षिततेची अधिक काळजी वाटू लागली. अशा एखाद्या कालव्याची गरज असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. अन्यथा अटलांटिक महासागरासाठी एक आणि पॅसेफिक महासागरासाठी एक अशी दोन आरमारे अमेरिकेला बाळगावी लागली असती. १९०१ च्या हे - पॉन्सेफोट करारान्वये ब्रिटनने नियंत्रणाच्या आपल्या अधिकाराचा दावा मागे घेतला. अमेरिकेने हा कालवा बांधून त्याचे रक्षण करावे हा प्रस्ताव तिने मान्य केला, मात्र शांततेच्या काळात हा कालवा वापरण्याचा समान हक्क सर्व देशांना असावा अशी तिची अट होती. हा कालवा पनामाच्या प्रदेशात बांधावा की निकारागुआच्या प्रदेशात बांधावा हा प्रश्न आता निर्माण झाला. अमेरिकन काँग्रेसने पनामाच्या प्रदेशात कालवा बांधण्याचा प्रस्ताव मान्य केला. फ्रेंच कंपनीने देखील प्रस्तावाचे स्वागत केले कारण कालवा बांधण्याचा आपला अधिकार आणि त्या प्रदेशातील आपल्या मालमत्तेची विक्री करण्यास कंपनी उत्सूक होती.

munotes.in

१९०३ मध्ये कोलंबियाशी झालेल्या हे - हॅरन करारान्वये कालव्याच्या क्षेत्राच्या भाडेपट्ट्यासाठी दहा लाख डॉलर आणि दरवर्षी आडीच लाख डॉलर भाडे देण्याचे अमेरिकेने मान्य केले. फ्रेंच कंपनीने आपली सर्व मालमत्ता चार कोटी डॉलरला विकण्याचे मान्य केले. हा करार नंतर कोलंबियाच्या सिनेटकडे संमतीसाठी सादर करण्यात आला. कराराच्या अटी समाधानकारक नसल्याच्या कारणावरून सिनेटने तो मान्य करण्यास नकार दिला. या वेळेस अमेरिकेला कोलंबियाशी नाव करार करता आला असता किंवा कालवा बांधण्याची जागा निकारागुआच्या प्रदेशात हलवता आले असती. थिऑडॉर रूझवेल्ट यांनी यापैकी काहीच केले नाही. त्यांनी पनामामधील क्रांतीला प्रत्यक्ष पाठिंबा दिला नसला तरी त्यांनी असा संकेत दिला की पनामियन लोकांनी कोलंबियातून फुटून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यास अमेरिका त्यांना पाठिंबा देइल. लवकरच पानामामध्ये स्वतंत्र्य प्रजासत्ताकाची स्थापना झाली. अमेरिकेने प्रजासत्ताकास ताबडतोब मान्यता देऊन कोलंबियाने पानामामध्ये आपली सत्ता परत स्थापन करु नये यासाठी त्या क्षेत्रात एक अमेरिकन लढाऊ जहाज रवाना केले. अमेरिकेने नंतर पानामाबरोबर एक करार करून कालवा बांधण्याच्या क्षेत्राचा भाडेपट्टा आणि पनामामधील कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण

करण्यासाठी हस्तक्षेप करण्याचा हक्क मिळवला. यथावकाश कालव्याचे बांधकाम सुरु होऊन १९१४ मध्ये पनामाच्या कालव्यातून पहिल्या जहाजाने प्रवास केला.

मेक्सिकोचे युद्ध वगळता अमेरिकन परराष्ट्रीय धोरणातील अन्य कोणत्याही प्रसंगाने लॅटिन अमेरिकेत अमेरिकन यांनी साम्राज्यवादविषयी आणि उत्तरेकडील महाकाय देशाविषयी एवढी भिती निर्माण केली नव्हती. १९२१ मध्ये अमेरिकेने आपली चूक सुधारून कोलंबियाला नुकसान भरपाईपोटी पन्नास लाख डॉलर देण्याचे मान्य केले.

### १. रूझवेल्ट उप - सिद्धांत :

पनामा कालव्याचे बांधकाम पूर्ण झाल्याने कॅरिबियन प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याची आणि त्या क्षेत्रामधे अन्य कोणत्याही सत्तेला सैनिकी तळ मिळणार नाहीत याची काळजी घेण्याची गरज भासू लागली. १९०४ मध्ये या गरजेमधूनच मन्रो सिद्धांताला रूझवेल्ट उप - सिद्धांत जोडावा लागला.

कॅरिबियन प्रदेशातील आणि अन्य मध्य अमेरिकेतील बहुतेक छोटया प्रजासत्ताकावर हुकुमशाही राजवट असे, या प्रजासत्ताकांत वारंवार क्रांती होत असल्याने परदेशी नागरिकांच्या जीवाला कधी कधी धोका निर्माण होत असे. या प्रजासत्ताकांना त्यांच्या कर्जाची परतफेड करणेही जमत नसे, यापैकी बहुतेक कर्जे युरोपियन सावकारांनी दिलेली असत. अशा परिस्थितीत आपल्या नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी युरोपियन सत्ता बलप्रयोगाने हस्तक्षेप करण्याचा आपला अधिकार असल्याचा दावा करत असत. अगदी नाइलाज म्हणून आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार असा अधिकार वैध मानला जात असे. परंतु त्यामध्ये एक धोका असा होता की हस्तक्षेप करणारी एखादी सत्ता या अधिकाराचा वापर तेथे सैनिकी तळ किंवा राजकीय सत्ता मिळवण्यासाठी करण्याची शक्यता होती. असा धोका टाळण्यासाठी रूझवेल्ट यांनी अशी सूचना केली की ज्यावेळी असा हस्तक्षेप आवश्यक असेल तेव्हा तो केवळ अमेरिकाच करेल. त्यांची ही सूचना रूझवेल्ट उप - सिद्धांत या नावाने ओळखली जाते. आपली सूचना स्पष्ट करताना त्यांनी असा युक्तीवाद केला की अमेरिका किंवा इतरत्र दीर्घकालीन चूकांचे पारिपत्य करण्यासाठी एखाद्या सुसंस्कृत देशाने हस्तक्षेप करण्याची आवश्यकता असते आणि पश्चिम गोलार्धामध्ये मन्रो सिद्धांताचे पालन करण्यास अमेरिका वचनबद्ध असल्याने तिला अगदी नाइलाजास्तव चूकांच्या किंवा योग्य कारवाईच्या अशा गंभीर प्रकरणात हस्तक्षेप करून पोलिसाची कामगिरी पार पाडावी लागेल. रूझवेल्ट उप - सिद्धांताला प्रत्युत्तर देताना अर्जेन्टिनचे परराष्ट्रमंत्री लुई ड्रॅगो यांनी आपला सिद्धांत सादर केला. अशा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सार्वभौम राज्याच्या हक्कांचा भंग मानावा अशा अर्थाचा हा सिद्धांत होता. अमेरिकेने साम्राज्यवादी विस्ताराचा एक कार्यक्रम मुद्दामच हाती घेतला आहे आणि त्याला बलप्रयोगानेच रोखता येईल असा युक्तीवाद ड्रॅगो यांनी केला.

१९०५ मध्ये डोमिनिकन प्रजासत्ताकमध्ये रूझवेल्ट उप - सिद्धांत अमलात आणला गेला. प्रजासत्ताकाच्या सरकारला कर्जाची परतफेड करता न आल्याने सरकारच्या संमतीने अमेरिकेने प्रजासत्ताकाची अर्थव्यवस्था आपल्या हाती घेतली. परकीय कर्जाचे प्रमाण कमी करण्यात आले. युरोपियन सावरकरानी दिलेल्या या कर्जाची जबाबदारी आता अमेरिकन सावरकरानी स्वीकारली. अमेरिकन अधिकाऱ्यांनी सर्व करांची वसूली करून त्यापैकी काही

munotes.in

भाग कर्जफेडीसाठी वापरला. अन्यथा देशाची स्वायत्तता तशीच कायम राहिली. थिऑडॉर रूझवेल्ट यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या दुसऱ्या कार्यकालात १९०६ मध्ये क्युबा मध्ये असाच हस्तक्षेप झाला होता. त्यावेळेस त्यांनी आपल्या हस्तक्षेपाचे समर्थन प्लॅट दुरुस्तीच्या आधाराने केले होते. १९०६ मध्ये क्युबामधील क्रांतिकारक चकमकी नंतर अमेरिकन सैन्याची एक तुकडी क्युबामध्ये तैनात करण्यात आली, १९०९ पर्यंत ही तुकडी तेथेच होती.

## ३.६ मेक्सिकोमधील क्रांती

अमेरिकेचा दक्षिणेकडील अगदी लगतचा शेजारी देश असलेल्या मेक्सिकोची समस्या कॅरिबियन प्रदेशातील अन्य छोटया देशांपेक्षा अधिक राजनैतिक गुंतागुंतीची होती. १८७६ ते १९११ या काळात पोर्फिरिओ दियाझ मेक्सिकोचे राष्ट्रपती होते. परकीय भांडवलाच्या गुंतवणूकीला उत्तेजन देण्याचे त्यांचे मुख्य धोरण होते. त्यांच्या कारकिर्दीमध्ये रेल्वेमार्ग, सार्वजनिक सोयी, मळे, खाणी आणि कच्च्या तेलाच्या विहिरी इत्यादी उद्योगामध्ये सुमारे दिड कोटी डॉलरची गुंतवणूक झाली होती, त्यापैकी २/३ गुंतवणूक अमेरिकन नागरिकांची होती. दियाझ यांच्या कारकिर्दीमध्ये मेक्सिकोचा आर्थिक विकास झाल्याने पश्चिम गोलार्धातील महान मुत्सद्द्यामध्ये त्यांची गणना केली जात असे. दुर्दैवाने या विकासाचा लाभ फक्त उच्च वर्गियांनाच झाला. मेक्सिकोमधील मूळ निवासी असलेल्या इंडियन लोकांच्या जमिनी हिरावून घेतल्या गेल्याने त्यांना जमीनदारांच्या जमिनीवर अत्यल्प रोजगारावर शेतमजूराचे काम करणे भाग पडले. औद्योगिक आणि खाण कामगारांचेही असेच शोषण होत असे. परकीय व्यवसायिकांना देण्यात आलेल्या खास अधिकारांचा बहुतेक सर्व मेक्सिकन लोक तिरस्कार करत असत. राष्ट्रीय संपत्तीचा फार मोठा भाग युरोपियन आणि अमेरिकन भागधारकांना नफ्याचे वाटप करण्यात खर्च केला जात असल्याची त्यांची धारणा होती.

सार्वजनिक असंतोषाचा भडका एका क्रांतीमध्ये झाला. या क्रांतीने मेक्सिकोच्या समाजात दूरगामी बदल झाले होते. १९११ मध्ये दियाझ यांना हद्दपार करण्यात आले. त्यांच्या जागी आलेले फ्रान्सिस्को मेडेरो हे नवे राष्ट्रपती आदर्शवादी असले तरी त्यांचे व्यक्तीमत्त्व विशेष प्रभावी नव्हते. त्यांनी काही भरीव सुधारणा केल्या नसल्या तरी त्यांनी शेतकरी आणि कामगारांच्या संघटना स्थापन करण्याची परवानगी दिली होती. दियाझ यांच्या सारखे परकीय भांडवलाच्या गुंतवणूकीसाठी ते उत्सुक नव्हते. फेब्रुवारी १९१३ मध्ये एका प्रतिक्रियावादी गटाने उठाव करून त्यांना पदच्युत केले. जनरल व्हिक्टोरियानो ह्युएर्टो यांनी या गटाचे नेतृत्व केले होते. अमेरिकेचे मेक्सिकोमधील प्रतिनिधी हेन्री विल्सन लेन यांनी या उठवाला मदत केली होती ही गोष्ट विशेष लांछनस्पद होती.

ह्युएर्टा यांनी देशाच्या बहुतेक भागावर आपली सत्ता प्रस्थापित केली असली तरी उत्तर आणि दक्षिण मेक्सिकोमध्ये मात्र मेडेरो यांच्या वधाचा बदला घेण्यासाठी आणि घटनाधिष्ट राज्याची पुनर्स्थापना करण्यासाठी आणि जमीन आणि कामगार सुधारणा करण्यासाठी काही चळवळी सुरु झाल्या. या चळवळींचे नेतृत्व व्हेनुशियानो कारान्झो, पांचो व्हिला आणि मूळ रहिवाशांचे नेते एमिलियानो झपाटा यांनी केले होते. अशा रितीने विल्सन राष्ट्राध्यक्षपदी आले तेव्हा मेक्सिकोमध्ये यादवी युद्धाची सुरुवात झाली होती. विल्सन

munotes.in

यांनी सबूरीचे धोरण अवलंबिले. ह्युएर्टा यांना निवृत्त व्हावे यासाठी त्यांचे मन वळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि नव्याने खुल्या निवडणूका घेण्याची मागणी केली. ह्युएर्टा यांनी ही मागणी फेटाळली. नंतर विल्सन यांनी राष्ट्रवादी नेत्यांना अमेरिकन शस्त्रास्त्रे विकत घेण्याची परवानगी दिली मात्र ह्युएर्टा यांना अशी परवानगी नाकारली. मेक्सिकोमधील संघर्षात अमेरिका पक्षपात करत आहे असा त्याचा अर्थ होत असला तरी काही तरी हस्तक्षेप आवश्यक होता. अमेरिकन घेतलेल्या कोणत्याही भूमिकेचा फायदा कोणत्याही एकाच पक्षाला फायदा झाला असता.

## ३.७ मेक्सिकोमधील हस्तक्षेप

यथावकाश विल्सन यांना सबूरीच्या धोरणास सोडचिठ्ठी द्यावी लागली. एप्रिल १९१४ मध्ये त्यांना असे समजले की एक जर्मन व्यापारी जहाज शस्त्रासह व्हेरा क्रुझ या मेक्सोकेतील बंदराच्या मार्गावर आहे, ही शस्त्रे ह्युएर्टा यांच्या साठी होती. परिणामी विल्सन यांची ही कारवाई राष्ट्रवादी नेत्यांच्या मदतीसाठी केले असली तरी त्यांनी ह्युएर्टाच्या बरोबरीने विल्सन यांच्या कारवाईची जोरदार निर्भत्सना केली. नंतर विल्सन यांनी मेक्सिकोच्या प्रश्नावर भरवलेल्या एका परिषदेला दक्षिण अमेरिकेतील देशांचे अग्रगण्य नेते हजर होते. लॅटिन अमेरिकेतील देशांचे सहकार्य करण्यातील विल्सन यांची ही कारवाई एक महत्त्वाचे पाऊल होते, त्यामुळे नंतरच्या काळातील चांगल्या शेजाऱ्याच्या धोरणाचा (गूड नेबर पॉलिसी) मार्ग मोकळा झाला.

ऑगस्ट १९१४ मध्ये ह्युएर्टा यांनी परदेशात आश्रय घेतला, त्यानंतर नोव्हेंबर मध्ये अमेरिकन आरमार व्हेरा क्रुझ मधून बाहेर पडले. आता राष्ट्रीय चळवळीतील विविध गटांमध्ये संघर्ष सुरु झाला ते दोन वर्षे चालल्याने परत एकदा अमेरिकेला मेक्सिकोच्या प्रश्नामध्ये लक्ष घालावे लागले. १९१७ पर्यंत मेक्सिकोमध्ये काही प्रमाणात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण झाली, मेक्सिकोने नवी राज्यघटना स्वीकारली. या घटनेमध्ये शेती आणि कामगार विषयक जहाल सुधारणांची तरतूद होती. दियाझ यांच्या कारकिर्दीमध्ये अमेरिकन गुंतवणूकदारांना मिळालेल्या विशेष सवलती मेक्सिकन सरकारने १९२० नंतर कमी करण्यास सुरुवात केली.

## ३.८ अमेरिका आणि जपान

पूर्व आशियाविषयक धोरणामध्ये रूझवेल्ट, टॅफ्ट आणि विल्सन या राष्ट्राध्यक्षांनी हे यांच्या मुक्त द्वार धोरणाचा पुरस्कार केला असला तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी फारसे काही करता येण्यासारखे नव्हते. पूर्व आशियाच्या राजकारणातील जपानची वाढती सत्ता आणि चीन विषयक तिची महत्त्वाकांक्षा हे महत्त्वाचे घटक होते.

**थिऑडॉर रूझवेल्ट आणि जपान :** १९०४ मध्ये कोरिया आणि मांचुरिया या चीनच्या प्रदेशावरील नियंत्रणाच्या प्रश्नावरून युद्ध सुरु झाले. जपानचा सुरुवातीला विजय होत गेला असला तरी पूरी दमछाक होण्यापूर्वी शांततेचा तह करण्यास जपान उत्सूक होते. त्यांच्या विनंतीवरून थिऑडॉर रूझवेल्ट यांनी मध्यस्ताचे काम केले. त्यांच्या मध्यस्तीने जपान आणि रशिया यांच्या दरम्यान पोर्टस्मथ, न्यु हॅम्पशायर, येथे शांततेचा तह झाला. या

तहानुसार जपानचे कोरियावर पूर्ण नियंत्रण स्थापन झाले असले तरी तिला रशियाकडून हवी असलेली नुकसान भरपाई मात्र मिळाली नाही.

त्यानंतर जपान आणि अमेरिकेचे संबंध झपाटयाने बिघडत गेले. मुक्त द्वार धोरणाकडे पूर्ण दुर्लक्ष करून जपानने कोरिया आणि दक्षिण मांचुरिया प्रदेशावर फक्त आपले नियंत्रण स्थापन केले. रशिया कडून नुकसान भरपाई न मिळाल्याबद्दल जपान अमेरिकेला दोष देत असे. अमेरिकेत स्थायिक झालेल्या जपानी लोकांशी वांशिक भेदाच्या कारणावरून जपान आणि अमेरिका यांच्या दरम्यान दुरावा निर्माण झाला, जपानी लोकांचे वर्णन पिवळे संकट (यलो पेरिल) असे करण्यात येत असे. जपानी लोक दुय्यम दर्जाचे असल्याच्या कोणत्याही मताविषयी जपानी लोक विशेष संवेदनशील असत. उभय युद्धाची तयारी सुरु केली.

रूझवेल्ट यांनी या धोक्याचा व्यवहारी दृष्टीने मुकाबला केला. त्यांनी जपानी लोकाविरुद्ध केला जाणारा वांशिक भेदभाव थांबवला आणि १९०७ - ०८ मध्ये जपानी सरकारशी एक समझोता करून अमेरिकेत येणारा जपानी लोकांचा लोंढा रोखला. १९०८ मध्ये झालेल्या रूट - ताकाहिरा करारानुसार उभय देशांनी एकमेकांच्या वसाहतींना मान्यता दिली आणि पॅसिफिक क्षेत्रामध्ये जैसे थे परिस्थितीचे रक्षण करण्याची तयारी दाखवली. या कराराने मुक्त द्वार धोरणाचा आणि चिनी प्रदेशाच्या अखंडतेच्या पुनरुच्चार केला. जैसे थे परिस्थितीमध्ये दक्षिण मांचुरियावरील जपानी नियंत्रणाचा समावेश असल्याने हा खलिता म्हणजे अब्रू वाचवण्याचा प्रकार होता.

कोणत्याही प्रसंगी नंतर वठवता न येणारी भूमिका स्वीकारण्यातील धोका थिऑडॉर रूझवेल्ट यांना समाजाला होता. (गोळी) मारायची तयारी नसल्यास बंदूक हाती धरू नये असे ते नेहमी म्हणत असत. मांचुरियामधील जपानची मुसंडी रोखण्यासाठी अमेरिकेला इंग्लंड सारख्या बलाढय आरमाराची आणि जर्मन सारख्या प्रबळ सैन्याची आवश्यकता असल्याचे त्यांचे होते.

टॅफ्ट डॉलर राजनितीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी मूळ स्वरूपातील मुक्त द्वार धोरणाचा अवलंब करून चिनी रेल्वेमार्ग बांधणीमध्ये अमेरिकेची गुंतवणूक वाढवण्याचा प्रयत्न केला. मात्र १९१३ मध्ये विल्सन राष्ट्रध्यक्षपदी येताच त्यांनी चीन मधील अमेरिकन गुंतवणुकीला सरकारी पाठिंबा देण्यास नकार दिला.

अशा प्रकारे अमेरिकन कागदोपत्री तरी मुक्त द्वार धोरणाचा पुनरुच्चार केला असला तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्याची अंमलबजावणी केली नाही. तथापि आता अमेरिकेचा हेतू बदलला होता. सुरुवातीला विस्तारवादी धोरणाचा एक भाग असलेले हे धोरण चीनी बाजारपेठ अमेरिकन माल आणि गुंतवणूकीसाठी खुली करण्याच्या उद्देशाने स्वीकारण्यात आले होते. त्याचे उद्दिष्ट संरक्षणाचे होते. १९१३ पर्यंत चीनमध्ये अमेरिकेची गुंतवणुक फक्त पाच कोटी डॉलरची होती. अमेरिकेच्या एकूण आयातापैकी फक्त दोन टक्के आयात चीनमधून होत असे तर एकूण निर्यातीपैकी फक्त एक टक्का निर्यात चीनला होत असे. चीन पेक्षा जपानशी अमेरिकेचे अधिक घनिष्ट आर्थिक संबंध होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) सामाजिक डार्विनवाद म्हणजे काय ?

२) मेक्सिकोमधील क्रांतीची थोडक्यात पार्श्वभूमी सांगा.

३) थिऑडॉर रूझवेल्टच्या जपानविषयी धोरणाची माहिती लिहा.

## ३.९ समारोप

एक जागतिक सत्ता या नात्याने झालेला अमेरिकेचा उदय प्रयोग आणि चूक (करण्याचा) (ट्रायल अँड एरर) एक भाग होता. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये अमेरिकेचे धोरण उत्क्रांत होत गेले. तत्त्व आणि व्यवहार, आदर्शवाद आणि वास्तव यातील फरक अमेरिकेच्या लक्षात आला. कागदावर आकर्षक वाटणारी एखादी योजना प्रत्यक्ष व्यवहारात अमलात आणता येत नाही किंवा तिची अंमलबजावणी केल्यास राष्ट्राचे हितसंबंध धोक्यात येतात. परिणामी एखाद्या धोरणाविषयीची अमेरिकेची भूमिका वारंवार बदलत गेली आणि त्यामुळे तिचे धोरण संधीसाधू असल्याचा आक्षेप घेता आला.

## ३.१० प्रश्न

१. एक जागतिक सत्ता या नात्याने अमेरिकेच्या झालेल्या उदयातील विविध घटक नमूद करा.

२. मुक्त द्वार धोरण म्हणजे काय ? ते कितपत यशस्वी झाले ?

३. एक जागतिक सत्ता या नात्याने अमेरिकेचा जो उदय झाला त्यातील विविध टप्प्यांची चर्चा करा.

## ३.११ संदर्भ ग्रंथ

१. बार्क, ओ.टी., आणि ब्लेक एन. एम. सिन्स नायन्टिन हंड्रेड : अ हिस्टरी ऑफ द युनायटेड स्टेस्टस इन अवर टाइम्स

२. पार्कस, हेन्री बामफर्ड, द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका : अ हिस्टरी.

❖❖❖❖

# ४

# अमेरिका आणि जागतिक महामंदी

**घटक रचना :**

४.० उद्दिष्टये

४.१ प्रस्तावना

४.२ अमेरिकेचा आर्थिक विकास

४.३ विपूलतेची अर्थव्यवस्था

४.४ आर्थिक व्यवस्थेतील कमजोर घटक

४.५ महामंदीची कारणे

४.६ मंदीचे स्वरूप

४.७ महामंदीची वाटचाल

४.८ राजकीय परिणाम

४.९ समाजवाद आणि साम्यवाद

४.१० समारोप

४.११ प्रश्न

४.१२ संदर्भ ग्रंथ

munotes.in

## ४.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी समजतील.

- जागतिक मंदीचे स्वरूप व कारणे अभ्यासणे.
- जागतिक मंदीच्या काळातील अमेरिकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.
- जागतिक मंदीच्या परिणामांचे परिक्षण करणे.

## ४.१ प्रस्तावना

हार्डिंज, कूलिज आणि हर्बर्ट हूवर या राष्ट्राध्यक्षांची अशी ठाम समजूत होती की शासनाचे प्राथमिक आर्थिक कार्य उद्योगांना प्रचंड फायदा मिळवण्यास मदत करण्याचे आहे; उद्योगांच्या कार्यपद्धतीवर देखरेख करण्याशी शासनाचा मुळीच संबंध नाही. १९२० च्या दशकामध्ये त्यांची ही समजूत समर्थनिय वाटत होती. उद्योगांनी अभूतपूर्व फायदा मिळवला आणि औद्योगिक विस्तारामध्ये त्यांची झपाट्याने गुंतवणूक केली. ग्राहकोपयोगी वस्तू, कायम नोकरी आणि जीवनाचा उंचावलेला स्तर यांच्या रूपाने या फायद्याचा काही भाग कामगारांच्या हाती आला होता. तथापि, लोकसंख्येचा लक्षणीय भाग या समृद्धीचा पासून दूर राहिला होता. फायदा मिळवण्यास उत्तेजन देण्याचे धोरण यादवी युद्धाच्या नंतरच्या काळात समर्थनीय असले तरी समृद्धीच्या नव्या काळामध्ये यथावकाश त्याचे पर्यवसान महान संकटामध्ये होईल याची कल्पना कर्मठ विचारसरणीच्या लोकांना किंवा उदारमतवादांना आली नाही. लवकरच अतिरिक्त उत्पादन, अतिरेकी वायदेबाजी आणि घटता वापर या कारणांनी अमेरिकेच्या इतिहासातील अतिशय वाईट आर्थिक महामंदी आली होती. समग्र अर्थव्यवस्थेच्या रचनेमध्ये काही गंभीर दोष असल्याचे १९२० च्या दशकामध्ये अगदी स्पष्ट झाले होते आणि हे दोष दूर न करण्यात शासनाला त्याच्या विहित कर्तव्याचा विसर पडला होता.

## ४.२ अमेरिकेचा आर्थिक विकास

वैज्ञानिक शोधांचा प्रायोजित उपयोग, उर्जेची नवी साधने आणि कार्यक्षमतेमध्ये वाढ करण्याची नवी तंत्रे यांच्या साहाय्याने औद्योगिक उत्पादनात होणारी वाढ हे १९२० च्या दशकातील आर्थिक विकासाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य होते. १९२० मध्ये जे काम कामगार करत असत तेच कम १९२९ मध्ये फक्त ६९ कामगार करू शकत होते. १९२० ते १९२९ या काळात अर्थव्यवस्थेच्या सर्व शाखातील उत्पादन ४६ टक्क्यांनी वाढले होते. १९२९ मध्ये अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पन्न ८२०० कोटी डॉलर एवढे होते. चलनाच्या मूल्यातील फरक लक्षात घेतल्यास १९२२ च्या तुलनेमध्ये ही वाढ ३१ टक्के होती. त्याच काळात अमेरिकेची लोकसंख्या ११ टक्क्यांनी वाढली.

उत्पादनाच्या पद्धतीमध्ये धिमी सुधारणा झाल्याने अन्न आणि वस्त्र या मुलभूत गरजा भागवण्यासाठी कमी कामगारांची आवश्यकता भासत असे. १८९९मध्ये अशा कामगारांचे प्रमाण ५७.६ टक्के होते, १९२९ पर्यंत हे प्रमाण ४३.६ टक्क्यापर्यंत हे प्रमाण ४३.६ टक्क्यापर्यंत खाली आले होते. दरम्यानच्या काळात नव्या इमारतींच्या बांधकामात आणि मोटार गाडया, रेफ्रिजरेटर, टेलिफोन आणि वीजेची उपकरणे यांच्या वापरात झपाट्याने वाढ झाली होती. वरिष्ठ वर्ग ज्या गोष्टी पूर्वी चैनीच्या समजत असे त्या आता सर्वसाधारण अमेरिकन कुटुंबाला सहज उपलब्ध होऊ लागल्या. अमेरिकेच्या इतिहासात एके काळी जे राहणीमान धनवान लोकांना देखील अविश्वसनीय वाटत असे त्याचा उपभोग आता मध्यम वर्गीय अमेरिकन कुटुंब घेत असे.

सेवा, वितरण क्षेत्र आणि कारकूनी कामात झालेली झपाट्याने वाढ हा आर्थिक प्रगतीचा एक अन्य पैलू होता. वस्तूंच्या प्रत्यक्ष उत्पादनात फारच थोडे कामगार गुंतले होते तर प्रशासन

munotes.in

आणि ग्राहकांना सेवा पुरवण्यात गुंतलेल्या सेवकांचे प्रमाण जास्त होते. १०२१ ते १९२९ या काळात उत्पादन, खाणी आणि परिवहन क्षेत्रातील औद्योगिक कामगारांची संख्या पाच लाखांनी कमी झाली तर शेतकऱ्यांची संख्या २,५०,००० ने कमी झाली. १९३० च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येपैकी फक्त ५८ टक्के लोक प्रत्यक्ष उत्पादनाचे काम करत असत. बाकी लोकांपैकी ८ टक्के लोक आर्थिक व्यवहारात तर ५.५ टक्के लोक घरगडयांचे काम आणि ३०.५ टक्के लोक व्यवसाय, कारकूनी आणि सेवा क्षेत्रामध्ये काम करत असत.

### १. मोटार वाहन उद्योगांचा विकास :

एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक विस्तार रेल्वे मार्ग आणि पोलादाशी निगडित होता. १९२० च्या दशकातील औद्योगिक विस्तार इमारतींच्या बांधकामातील तेजी आणि ग्राहकोपयोगी अनेक वस्तुंचे उद्योग यांच्याशी निगडित होता. मोटार गाडयांचे उत्पादन हा त्या पैकी सर्वात महत्वाचा उद्योग होता, हेन्री फोर्ड या उद्योगातील अग्रगण्य व्यक्तिमत्व होते. १९०९ पर्यंत त्यांनी मोटार गाडीचे सुप्रसिद्ध टी प्रारूप विकसित केले होते. तिची किंमत सर्व सामान्य अमेरिकन माणसाला परवडण्यासारखी होती.

समृद्धीच्या नव्या युगातील आवश्यक मंत्र हेन्री फोर्ड यांनी आत्मसात केला होता. उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी कार्य विभाजन आणि प्रमाणीकरण, खरेदीची क्षमता वाढवण्यासाठी वेतन वाढ आणि किमती कमी ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून बाजारातील खप वाढवणे हे त्या मंत्राचे मुख्य घटक होते. त्यांच्या नेतृत्वामुळे १९०९ नंतर मोटार गाडी श्रीमंतांचे वाहन राहिले नाही, अमेरिकन राहणी मानाचा तो एक आवश्यक भाग झाला होता.

१९२८ पर्यंत अमेरिकेत २४,५००,००० मोटार गाडयांचे उत्पादन झाले होते. या उद्योगावर ४०,००,००० कामगार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून होते. दरम्यान केंद्र आणि राज्य सरकारे दर वर्षी महामार्गांच्या बांधणी साठी १०० कोटी डॉलर खर्च करत असत. अशा रितीने अमेरिकन लोकांच्या पायाला चाके लावली गेली. प्रत्येक अमेरिकन शहरामध्ये वाहतूकीच्या कोंडीचा कधी न सुटणारा प्रश्न निर्माण झाला होता. जीवन अधिक वेगवान झाले. पेट्रोलचा वापर झपाटयाने वाढत गेल्याने देशातील कच्च्या तेलाचे साठे झपाटयाने कमी होत गेले. तथापि, सर्व साधारण अमेरिकन माणसाचे, विशेषत: ग्रामीण भागातील अमेरिकन माणसाचे जीवन प्रचंड प्रमाणात समृद्ध आणि वैविध्यपूर्ण झाले होते.

### २. अन्य उद्योग :

वीजेच्या वापरात झपाटयाने झालेली वाढ ही १९२० च्या दशकातील एक उल्लेखनीय प्रगती होती. त्यामुळे उत्पादन आणि वाहतुकीचे अनेक प्रकार अतिशय स्वस्त आणि कार्यक्षम झाले. वीजेच्या वापराने घरकाम अधिक सुलभ झाले आणि त्या प्रमाणात गृहिणींचे कम हलके झाले.

अश्व शक्तीच्या मानाने वीजेचे उत्पादन १९१२ मध्ये ७.५ कोटी अश्वशक्ती होते ते १९२२ मध्ये २०३ आणि १९३० मध्ये ४०३ कोटी पर्यंत वाढले. १८ वर्षांमध्ये वीजेचे उत्पादन ६० टक्क्यांनी वाढले होते. बंदुकीची दारू तयार करण्यात इ. आय. डयुपॉ यांनी भरपूर पैसा कमावला, त्या नंतर त्यांनी विविध रसायनाचे उत्पादन सुरु केले. ए.टी.अँड टी आणि

जनरल मोटर्स या अनुक्रमे संपर्क आणि मोटार गाडयांच्या क्षेत्रातील महाकाय कंपन्या होत्या. १०२० च्या दशकामध्ये चित्रपट पहाणे राष्ट्राच्या अंगवळणी पडले होते, १९२६ पर्यंत अमेरिकेत एक कोटी चित्रपटगृहे बांधण्यात आली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मार्कोनी आणि ली डी फॉरेस्ट या अनुक्रमे इटालियन आणि अमेरिकन संशोधकांनी रेडिओचा शोध लावला. १९२७ पर्यंत अमेरिकेमध्ये ७३२ रेडिओ केंद्रे स्थापन झाली आणि अमेरिकन घरामध्ये रेडिओचा वापर सर्रास होऊ लागला.

## ४.३ विपूलतेची अर्थव्यवस्था

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला लागलेल्या अनेक नव्या शोधांमुळे साधारण अमेरिकन माणसाचे जीवन समृद्ध झाले. त्या सर्व शोधांचा मानवी जीवनावर एवढा मोठा प्रभाव पडला होता की त्याला दुसरी औद्योगिक क्रांती म्हणता येईल. कोळसा आणि वाफेच्या ऐवजी आता वीज आणि तेल वापरले जाऊ लागले. उर्जेच्या नव्या स्त्रोतांचा आणि वाहतुकीच्या नव्या प्रकारांचा वापर यामुळे सामान्य माणसाला प्रचंड मोठ्या शहरात गर्दी करून राहण्याची गरज नव्हती. शहरातील धुरांच्या चिमण्या नाहीशा झाल्या, शहरे अधिक स्वच्छ आणि आरोग्यदायी झाली. साधारण शेतकरी एकाकी ग्रामीण प्रदेशात वास्तव्य करेनासा झाला. शहरे आणि ग्रामीण भागातील दुरावा नाहिसा होण्यास सुरुवात झाली.

१९२० च्या दशकात अमेरिकेने कायमस्वरूपी विपूलतेच्या एका नव्या युगात प्रवेश केला आहे अशी सर्वांची समजूत होती. या नव्या युगामध्ये इतिहासात प्रथमच मोठया प्रमाणावरील उत्पादन आणि रोजगाराचे वाढते प्रमाण या मुळे गरिबी नाहीशी होऊन सर्वांचे जीवनमान उंचावले होते. लोकांची सेवा आपण करत आहोत असा अनेक उद्योगपतींचा समाज होता. रोटरी क्लब आणि अन्य संघटनांनी सेवा आणि उच्च नैतिक मानकांचा प्रसार करण्यास सुरुवात केली. सर्वसामान्यांच्या पाठिंब्याची गरज असल्याने बहूतेक महाकाय कंपन्यांनी जनसंपर्कावरील खर्चात वाढ केली. जनसंपर्क हा जाहिरातीचा एक प्रकार होता. उद्योगपतींच्या सेवेच्या दाव्याचा उपहास करणे सोपे आहे – अद्याप महाकाय कंपन्या मोठया प्रमाणात नफा मिळवतच होत्या. तथापि, उद्योगपतींना त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली, उद्योगांची समृद्धी सर्व सामान्य लोकांनी केलेल्या खरेदीवर अवलंबून आहे याची जाणीव त्यांना झाली आणि ही नवी गोष्ट विशेष महत्त्वाची होती.

## ४.४ आर्थिक व्यवस्थेतील कमजोर घटक

१९३० च्या दशकातील आर्थिक महामंदीने १९२० च्या दशकातील उंचावलेल्या आशा व्यर्थ ठरल्या. अर्थ व्यवस्थेमधील वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण आणि विविधता आश्चर्यकारक असली तरी वितरणाची समस्या अद्याप सुटली नव्हती. उद्योगाची संघटना आणि तिच्यावरील नियंत्रण पद्धतीचे विश्लेषण केल्यावर अर्थव्यवस्थेमधील पणनाच्या कार्यपद्धतीमध्ये गंभीर दोष असल्याचे स्पष्ट होते. या दोषामुळे आर्थिक संकट ओढवले आणि त्यामुळे येऊ घातलेली आर्थिक महामंदी तीव्र झाली आणि ती दीर्घकाळ चालली.

## १. मक्तेदारी आणि ओलिगापॉली :

१९२० च्या शतकाच्या अखेरीस महाकाय कंपन्यांचे अर्थव्यवस्थेवर प्रभुत्व स्थापन झाले. १९२९ मध्ये अमेरिकेतील महाकाय कंपन्यांची संख्या १,३४९ होती, त्या पैकी प्रत्येक कंपनीचे वार्षिक उत्पन्न १० लाख डॉलरपेक्षा जास्त होते. लहान मोठया कंपन्यांना होणाऱ्या एकूण नफ्यापैकी ८० टक्के नफा या महाकाय कंपन्यांना होत असे, राहिलेला २० टक्के नफा बाकीच्या ४,५५,००० कंपन्यांमध्ये वाटला जात असे. कंपन्यांच्या संपत्तीचा अर्धा आणि राष्ट्रीय संपत्तीचा १/४ हिस्सा फक्त २०० महाकाय कंपन्यांचा मालकीचा होता. वाहतूक आणि सार्वजनिक सेवा महाकाय कंपन्यांचे नियंत्रण असे, बहुतेक सर्व उत्पादन त्यांच्या हातीच होते, त्या आता किरकोळ विक्रिच्या क्षेत्रामध्ये झपाटयाने प्रवेश करत होत्या. शेतकी क्षेत्र, कपडे आणि इतर काही प्रकारच्या किरकोळ विक्रीचे क्षेत्र मात्र छोटया व्यावसायिकांच्या मालकीचे होते.

१९०१ पेक्षा १९२९ मधील ठोक मक्तेदारीचे प्रमाण कदाचित कमी होते. अंशत: न्यासांच्या विरोधातील कारवाई आणि अंशत: प्रचंड प्रमाणावरील औद्योगिक विस्तार यांचा हा परिणाम होता. अशा परिस्थितीमध्ये एकाच कंपनीला संपूर्ण उद्योगावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. परंतु मक्तेदारी कमी झाली असली तरी वस्तूंच्या किमती मध्ये कोणतीही स्पर्धा सुरु झाली नाही. बाजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी ओलिगापॉली या नव्या पद्धतीचा वापर सुरु झाला. या पद्धतीनुसार बाजारावर फक्त एकच नव्हे तर काही कंपन्या पूर्ण नियंत्रण ठेवत असत. ओलिगापॉलीच्या पद्धतीनुसार साधारणपणे महाकाय कंपन्या एकमेकांच्या संगनमताने वस्तूंच्या किमती निश्चित करत असत. परंतु, त्या आपल्या मालाची प्रत सुधारून आणि जाहिराती करून स्पर्धा करत असत. पोलाद आणि काही ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत असे होत असे; चार किंवा पाच सिगरेट कंपन्यांच्या सिगरेटच्या किमती सारख्याच असत.

वस्तुंच्या किमतीचे व्यवस्थापन करण्यासंबंधी काही प्रभावी युक्तीवाद करता येतो ; त्यामुळे दीर्घकालीन नियोजन आणि विस्तार शक्य होत असे. परंतु त्यामुळे समग्र अर्थ व्यवस्थेला महामंदीचा मुकाबला अवघड होत असे. पूर्ण स्पर्धेच्या व्यवस्थेमध्ये लोकांची क्रयशक्ती कमी झाल्यास त्याची भरपाई वस्तूंच्या किमती कमी करून करता येत असे. मात्र एकदा महामंदीची सुरुवात झाल्यावर महाकाय कंपन्यांना वस्तूंच्या किमती त्याच पातळीवर ठेऊन उत्पादन करणे सोयीचे होत असले तरी त्यामुळे बेरोजगारी वाढत असल्याने आर्थिक संकट अधिकच गंभीर होत असे. वस्तूंच्या किमतीची दृढता हा आर्थिक व्यवस्थेमधील एक मोठा दोष होता.

## २. कंपन्यांची संघटना :

कार्नेगी आणि रॉकफेलर या सारख्या काही उद्योजकांच्या हाती काही उद्योगांची मालकी आणि व्यवस्थापन होते. मात्र अन्य उद्योगपती मूलत: कंपन्यांचे आर्थिक प्रायोजक असत आणि सौदेबाजीने नफा मिळवणे हा त्यांचा मुख्य हेतू असे. वीज उद्योगामध्ये अशा प्रकारची संघटना प्रचलित होती. कंपन्यांची मालकी आणि व्यवस्थापन अलग करण्याकडे सर्वसाधारण व्यक्तिगत उपक्रमशीलता आणि महत्वाकांक्षा यांना फारसा वाव नसे. कंपन्यांची मालकी असंख्य भाग-भांडवलधारकामध्ये विखूरली जात असे तर कंपन्यांचे व्यवस्थापन

पगारी अधिकारी करत असत. १९३० मध्ये ए.टी.अँड टी कंपनीची मालकी ५,७०,००० भागभांडवलदारांच्या हाती होती, आणि त्यापैकी एकाचेही भागभांडवल एक टक्क्यापेक्षा जास्त नव्हते. भागभांडवलदारांची संख्या झपाटयाने वाढत गेल्याने अमेरिका भांडवलदारांचा देश असल्याचा भास होत असे. मात्र हे चित्र फारच आशादायक होते. एखाद्या कंपनीच्या भागभांडवलदारांची निश्चित संख्या कोणालाही माहित नसे. तथापि, उद्योगाच्या नफ्याचा फार मोठा भाग मोजक्या लहान गटांना मिळत असे.

**३. उत्पन्नाचे वितरण :**

१९२०च्या दशकामध्ये अधिकाऱ्यांचे पगार आणि कंपन्यांचा नफा कामगारांच्या रोजगारापेक्षा अधिक झपाटयाने वाढला. अनेक कंपन्यांनी आपल्या कामगारांचा रोजगार वाढवला, त्यांना निवृत्तिवेतनाची योजना लागू केली आणि त्यांच्या कल्याण आणि मनोरंजनासाठी मोठा खर्च केला असला तरी उत्पादनात ज्या प्रमाणात वाढ झाली त्या प्रमाणात कामगारांचा रोजगार वाढला नव्हता. १९२२ ते १९२९ या काळात कामगारांचा रोजगार दर वर्षी सरासरीने १.४ टक्क्याने वाढला तर तो दरडोई उत्पादनात २.४ टक्के वाढ झाली. या काळात औद्योगिक कामगारांना मिळालेले एकूण रोजगार ३३ टक्क्यांनी वाढला तर त्याच्या तुलनेत अधिकाऱ्यांचे पगार ४० टक्क्यांनी वाढले, भागभांडवलधारकांना मिळणारा नफा १०८ टक्क्यांनी वाढला तर कंपन्यांचा नफा ७६ टक्क्यांनी वाढला. अशा रितीने कामगारांचा रोजगार वाढला असला तरी त्याच वेळेस राष्ट्रीय उत्पन्नातील त्यांचा हिस्सा कमी होत गेला.

सुती वस्त्रोद्योग आणि कोळश्याच्या खाणीतील कामगारांसारख्या लोकसंख्येच्या फार मोठ्या भागाला देशाच्या समृद्धीचा काहीच लाभ झाला नाही. पहिल्या महायुद्धाच्या काळातील शेतमालाचे उत्पादन धिम्या गतीने असले तरी १९२१ पासून शेतमालाच्या किमती ४० टक्क्यांनी उतरत गेल्या. १९२० च्या दशकात शेतीची परिस्थिती कधीच सुधारली नाही. परदेशी बाजारपेठ नाहीशी झाल्याने शेतमालाचे अतिरिक्त उत्पादन हा नित्याचा प्रकार झाला असल्याने शेतमालाच्या किमती नेहमीच कमी राहिल्या. १९२९ मध्ये शेतमालाच्या किमती आणि अन्य वस्तूंच्या तौलनिक किमती लक्षात घेतल्यास शेतकऱ्यांची परिस्थिती १९१३ च्या मानाने १३ टक्क्यांनी घसरली होती. युद्धकालीन तेजीच्या वेळेस घेतलेली कर्जे परत करणे अनेक शेतकऱ्यांना अशक्य झाले होते. देशातील विशेषत: दक्षिणेतील राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबाची उपासमार होऊ लागली. सुमारे ३०,००,००० शेतकरी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक हजार डॉलर पेक्षा कमी होते.

१९२९ मध्ये लोकसंख्येतील ७० टक्क्यापेक्षा नोकरदारांचे वार्षिक उत्पन्न २५०० डॉलर पेक्षा कमी असे, ४० टक्के नोकरदारांचे वार्षिक उत्पन्न १५०० डॉलर पेक्षा कमी होते. उत्पन्नातील विषमतेचे प्रमाण एवढे गंभीर होते की ६,३१,००० शिखरस्थ कुटुंबाचे उत्पन्न सर्वात खालच्या पातळीवरील १.६ कोटी पेक्षा जास्त कुटुंबापेक्षा कितीतरी अधिक पटीने अधिक असे.

**४. बचत आणि क्रयशक्ती :**

श्रीमंत वर्ग त्यांच्या उत्पन्नाच्या मोठ्या भागाची बचत करत असतो तर गरीब वर्ग फारच थोडी किंवा अजिबात बचत करत नसल्याने उत्पन्नाच्या वितरणातील विषमतेमुळे बचतीचे प्रमाण वाढत जाते. बचत उद्योगाच्या विस्तारात गुंतवणे चांगले असते. परंतु उद्योगाच्या विस्ताराचा उद्देश ग्राहकोपयोगी वस्तुंचे उत्पादन वाढवण्याचा असतो, आणि जोपर्यंत बाजारातील उत्पादित माल विकत घेण्याची लोकांची क्षमता आणि तयारी असते तो पर्यंत हा विस्तार किफायतशीर ठरतो. या कारणाने ग्राहकांच्या क्रयशक्तीच्या पेक्षा बचतीचे प्रमाण वाढू दिल्यास आर्थिक व्यवस्था संकटात सापडण्याची शक्यता असते. १९२० च्या दशकात नेमका हाच प्रकार घडला, उच्च उत्पन्नाच्या लोकांनी फार मोठया प्रमाणात बचत केली. बहुतेक महाकाय कंपन्या आपल्या नफ्याचे भागभांडवलधारकात वाटप करण्याऐवजी बचतीचे प्रमाण वाढवत गेल्या. याचा परिणाम असा की १९२० च्या दशकात उत्तरार्धातील औद्योगिक उत्पादन अर्थव्यवस्थेच्या परिणामकारक मागणीपेक्षा कितीतरी प्रमाणात जास्त होते तर बचतीचे लाको डॉलर वस्तूंच्या उत्पादनाऐवजी स्थावर मिळकतीत आणि शेअर बाजारात गुंतवण्यात आले.

क्रयशक्तीमधील ही कमतरता कर्जाचे प्रमाण वाढत गेल्याने स्पष्ट झाली नाही. १९२० च्या दशकातील विक्री झालेल्या ग्राहकोपयोगी वस्तूंचा, विशेषत: टिकाऊ वस्तूंच्या फार मोठया भागाची विक्री रोखीने झाली नव्हती. परंतु कर्ज काढण्याची प्रक्रिया दीर्घकाळ चालवण्यासारखी नव्हती. उसनवार आणि उधारीत केलेली खरेदी काही काळ चालू शकते, परंतु कधीनाकधी कर्जाची परतफेड करावी लगाते आणि त्या नंतर मात्र बाजारातील विक्री कमी होत जाते.

**५. कर्जातील वाढ :**

वस्तूंची हप्तेबंदीने खरेदी हा कर्जाचा एक प्रकार होता. १९२३ ते १९२९ या काळात दर वर्षी अशा प्रकारचे ५०० कोटी डॉलरचे कर्ज काढले जात असावे असा अंदाज आहे. साधारण अमेरिकन कुटुंब त्यांची मोटार गाडी आणि रेफ्रिजरेटर इत्यादी वस्तू खरेदी करताना किमतीचा काही भाग रोखीने प्रथम देत असे आणि बाकी रक्कम हप्तबंदीने नंतरच्या काळात देत असे. अन्य प्रकारच्या खाजगी कर्जातही झपाटयाने वाढ झाली. १९३० पर्यंत शेत जमिनीच्या गहाणखतावरील कर्ज सुमारे ९२ अब्ज डॉलरचे होते. शहरी भागातील गहाणखतावरील कर्ज सुमारे २,६०० कोटी डॉलरचे होते. छोटे आणि मध्यम व्यावसायिक देखील आपल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी मोठया प्रमाणावर कर्ज काढत असत. १९३० पर्यंत अल्प आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाची रक्कम २०,००० कोटी डॉलर एवढी प्रचंड होती. जवळपास प्रत्येक व्यक्तीने कोणते ना कोणते कर्ज काढले होते. या मुळे अर्थव्यवस्था अतिशय नाजूक झाली कारण या पैकी एकाही गटाला आपले कर्ज फेडण्यास जमले नाही तर तर कर्जाची समग्र रचना पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली असती.

**६. सार्वजनिक कर्ज :**

केंद्र सरकार सार्वजनिक कर्जाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करत असले तरी राज्ये आणि नगरपालिका रस्ते, इस्पितळे आणि कार्यालयाच्या इमारती बांधण्यासाठी अधिक

अधिक कर्ज काढत असत. १९२० च्या दशकात दर वर्षी सार्वजनिक बांधकामावर सरासरीने ३०० कोटी डॉलर खर्च केले जात असत. या कर्जाची परतफेड अंशत: कर आकारणीतून केली जात असली तरी १९३० पर्यंत स्थानिक संस्थांचे कर्ज १९०० कोटी डॉलर एवढे होते.

**७. परदेशातील गुंतवणूक :**

पहिल्या महायुद्धाचा पूर्वी अमेरिका कर्जबाजारी होती ; परकीय देशांनी अमेरिकेत जेवढी गुंतवणूक केली होती त्यापेक्षा अमेरिकेची परदेशातील गुंतवणूक कमी होती. मात्र १९२९ पर्यंत अमेरिकेची परदेशातील दीर्घ मुदतीची गुंतवणूक १४.४० कोटी डॉलरची होती तर परदेशांची अमेरिकेतील गुंतवणूक ५०० ते ७०० कोटी डॉलरची होती. म्हणजेच अमेरिकेने परदेशातील अमेरिकन गुंतवणूक जास्त होती.

परदेशातील गुंतवणुकीचा एक परिणाम असा होता की संबंधित परकीय देशाला अमेरिक माल विकत घेता येत असे. तंबाखू, गहू आणि कापूस या शेतमालाची आणि उत्पादित वस्तूंची निर्यात अमेरिका करत राहिली, पूर्वी जी बाजारपेठ ब्रिटन आणि जर्मनीच्या ताब्यात असे, ती आता अमेरिकेच्या हाती आली. १९२२ ते १९२९य काळात अमेरिकेची निर्यात तिच्या आयती पेक्षा दर वर्षी सरासरीने ७० कोटी डॉलर जास्त होती. म्हणजेच अमेरिका तिच्या अतिरिक्त उत्पादनाचा काही भाग निर्यात करत असे आणि त्याच वेळेस त्या मालाची आयात करता यावी यासाठी त्या देशाला कर्ज देत असे.

## ४.५ महामंदीची कारणे

१. बचतीचे तौलनिक प्रमाण जास्त होते तर ग्राहकांच्या हाती वस्तूंच्या खरेदी साठी फारच थोडे रोख पैसे राहात असत. बचतीचा काही भाग उद्योगांच्या विस्तारत गुंतवण्यात आला असला तरी कधी ना कधीतरी कारखाने, यंत्रसामुग्री आणि कार्यालयाच्या इमारती आणि राहती घरे यांचा पुरवठा मागणीपेक्षा जास्त होणार होता. १९२० च्या दशकात अंतर्गत आणि परकीय कर्जाने मागणीचे प्रमाण कृत्रिम रितीने वाढवण्यात आले होते. परंतु कर्ज अफूच्या व्यसनासारखे असते, अफूची मात्रा सतत वाढवावी लागते आणि दीर्घ काळ ती वाढवणे सुरक्षित नसते. एकदा विस्ताराचा काळ संपल्यावर भांडवली मालाचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना त्यांचे उत्पादन कमी करावे लागले आणि त्यानंतर अर्थव्यवस्था त्वरीत सावरणे शक्य नव्हते.

२. अत्यंत गुंतागुंतीची कर्ज व्यवस्था महामंदीचे एक अन्य कारण होते. जेव्हा एखादा गट घेतलेले कर्ज परत करू शकला नाही तेव्हा सर्वजण अडचणीत आले.

३. महाकाय कंपन्या आपल्या उत्पादित मालाच्या किमती स्वतःच ठरवत असल्याने अर्थव्यवस्था स्वतःला सावरण्यासाठी लवचिक राहिली किंवा नव्या परिस्थितीशी ती जमवून घेऊ शकली नाही. मालाचे उत्पादन तसेच ठेवून किमती कमी करण्याऐवजी महाकाय कंपन्यांनी किमती कायम ठेवून उत्पादन कमी केले. त्यामुळे मोठया प्रमाणावर बेरोजगारी निर्माण झाली.

४. ग्राहकोपयोगी टिकावू वस्तूंच्या विक्रीवर अर्थव्यवस्था मोठया प्रमाणात अवलंबून होती. संकट काळात माणसाला दोन वेळचे भोजन करावेच लागते पण मोटार गाडी किंवा रेफ्रिजरेटर सारख्या वस्तू खरेदी केल्या नाही तरी चलते. परिणामी हे उद्योग लवकर सावरू शकले नाहीत.

५. या भौतिक घटकांनी पूर्ण चित्र नजरेसमोर येत नाही. आधुनिक औद्योगिक समजतील व्यवहार चालवणारा घटक मनोवैज्ञानिक असतो. विश्वास नावाच्या गुढ गोष्टीवर समृद्धी अवलंबून असते. या विश्वासापोटी व्यावसायिक आपला व्यवसाय वाढवण्यासाठी कर्ज काढतात, घेतलेले कर्ज आपल्याला परत करता येईल असा त्यांना विश्वास वाटतो. या विश्वासापोटीच उद्योगपती उत्पादन वाढवण्यासाठी कर्ज काढतात. वाढीव उत्पादन बाजारात विकले जाईल आणि आर्थिक व्यवहारातील पैसा खेळता राहील अशी त्यांची खात्री असते. १९२० च्या दशकातील तेजीच्या काळात या विश्वासापोटी वस्तुंचे अतिरिक्त उत्पादन झाले. वायदे बाजाराला प्रोत्साहन मिळाले, कर्जाचे प्रमाण वाढत गेले. बाजार कोसळल्यावर विश्वासाला तडा गेला आणि व्यावसायिक किंवा उद्योगपतींनी नवे व्यवसाय आणि उद्योग सुरु करण्याचे अचानक थांबवले.

## ४.६ मंदीचे स्वरूप

**१९२९ मध्ये बाजार गडगडतो :**

एप्रिल – मे पर्यंत येणाऱ्या महामंदीची लक्षणे स्पष्ट दिसू लागली होती. बांधकाम, पोलाद, मोटार गाडयांच्या उद्योगातील उत्पादन कमी होऊ लागले आणि कामगारांना कमी केले जाऊ लागले. मात्र या तथ्यांचे महत्त्व कोणाच्याही लक्षात आले नाही कारण सर्वांचे लक्ष शेअर बाजाराच्या वाढत्या आलेखाकडे लागले होते. १९२९ मधील तेजीच्या बाजाराचे वर्णन तात्पुरत्या सामुदायिक वेडेपणा असेच करता येईल.

उत्पादक उद्योगांमध्ये भांडवलाच्या गुंतवणुकीची सोय उपलब्ध करून देणे हे शेअर बाजाराचे मुख्य कार्य असते आणि नेमक्या याचा कार्याचा सर्वांना विसर पडला होता. अमेरिकन लोकांनी शेअरांच्या किमतीवर सट्टेबाजी सुरु केली. सुरक्षित गुंतवणुकीसाठी नव्हे तर अल्पावधीत भरमसाठ नफा मिळवण्यासाठी लोकांनी शेअरची खरेदी विक्री सुरु केली. अनेक अमेरिकन लोकांनी मार्जिनवर शेअरचे व्यवहार सुरु केले. शेअर खरेदीसाठी ते अत्यल्प कीमत रोख देत असत आणि उरलेल्या किमतीचे कर्ज त्यांना बाजारातील दलाल देत असत. घाऊक सट्टेबाजीमुळे शेअरच्या किमती झपाटयाने वाढत गेल्या, या वाढत्या किमतींचा कंपनींच्या आर्थिक सुदृढतेशी काहीच संबंध नव्हता. मात्र ही प्रक्रिया अखंड चालणे अशक्य होते. शेअरच्या किमती कमी होताच मार्जिनचे व्यवहार करणाऱ्या गुंतवणूकदारांना आपले शेअर मिळेल त्या किमतीत विकणे भाग पडले. या परिस्थितीत गंभीर संकट अपरिहार्य होते.

१९ ऑक्टोबर, १९२९ रोजी शेअरच्या किमती घसरू लागल्या आणि २९ ऑक्टोबर रोजी अपरिहार्य संकट कोसळले. त्या दिवशी सुमारे १६५० कोटी शेअरची खरेदी विक्री झाली. काही शेअरच्या किमती सप्टेंबर १९२९ च्या तुलनेत ८० टक्क्यांनी खाली आल्या. हजारो मार्जिनचे व्यवहार नाहिसे झाले. सुमारे ३,००० कोटी कागदी संपत्ती नाहीशी झाली. उद्योगपतींनी नवी गुंतवणूक थांबवली, ग्राहकांनी वस्तूंच्या खरेदीचे प्रमाण कमी केले.

कारखान्यातील भांडवली आणि ग्राहकोपयोगी वस्तुंचे उत्पादन थांबले. या कारखान्यातील कामगारांना कमी करण्यात आले. वाढत्या बेरोजगारीमुळे क्रयशक्ती आणखीनच कमी झाली. अशा रितीने घटती गुंतवणूक, घटते उत्पादन, वाढती बेरोजगारी आणि घटती मागणी यांचे दुष्टचक्र सुरु झाले.

## ४.७ महामंदीची वाटचाल

१९२९ आणि १९३२ च्या दरम्यान राष्ट्रीय उत्पन्न ८,२०० कोटी डॉलरपासून ४०० कोटी डॉलर पर्यंत खाली आले. घटत्या किमतीचे प्रमाण लक्षात घेतल्यास एकूण उत्पादन ३७ टक्के घट झाली असा त्याचा अर्थ होता. समग्र औद्योगिक उत्पादन ४८ टक्क्यांनी घसरल्याने बेरोजगारीत झपाटयाने वाढ झाली. १९३२ च्या उन्हाळ्यापर्यंत बेरोजगारांचे प्रमाण १.२० ते १.६० च्या दरम्यान पोचले होते, एकूण श्रमशक्तीचा हा २५ टक्के भाग होता.

दुसरीकडे शेतकऱ्यांचे किमतीवर काहीच नियंत्रण नसले तरी त्यांना शेतमालाचे उत्पादन करावेच लागे. शेतमालाचे एकूण उत्पादन ६ टक्क्यांनी घटले तर शेतमालाच्या किमती ६३ टक्क्यांनी घटले. १९३२ मध्ये एक वेळ अशी आली की शेतकऱ्यांची क्रयशक्ती दहा वर्षापूर्वीच्या त्यांच्या क्रयशक्तीच्या बरोबर निम्मी होती. हे आकडे सामान्यांच्या हालअपेष्टांची कथा सांगतात. अमेरिकेच्या इतिहासात त्यांच्यावर असा गंभीर प्रसंग कधीच आला नव्हता. त्याचे मनोवैज्ञानिक परिणाम धक्कादायक होते कारण १९२० च्या दशकात त्यांच्या समोर कायमच्या समृद्धीचे जे चित्र उभे करण्यात आले होते ते या परिस्थितीच्या अगदी विरुद्ध १९३३ पर्यंत लाखो बेघर स्थलांतरित देशामध्ये सर्वत्र विनाकारण हिंडत राहिले. त्यांच्या पैकी अनेक शहरातील रिकाम्या जागावर लाकडाच्या ढलप्यांनी बनवलेल्या झोपडयातून राहात असत, अशा वस्त्यांना हूवरविल या नावाने प्रसिद्ध होत्या. ५,००,००० शहरी कामगार शेतीकडे परत वळले, तर अन्य बेरोजगार सरकारी भत्यावर चरितार्थ चालवू लागले. घरादाराला आणि बचतीला कायमचे मुकणे, प्रदीर्घ कुपोषण आणि हिरावलेला आत्मसन्मान आणि स्वतःचा चरितार्थ स्वतः चालवण्याचा गमावलेला आत्मविश्वास असा महामंदीचा खरा अर्थ लाखो अमेरिकन लोकांच्या लेखी होता.

## ४.८ राजकीय परिणाम

युरोपातील काही देशात महामंदीने उदारमतवाद, लोकशाही आणि खाजगी उपक्रमशील भांडवलशाहीवर जीवघेणा हल्ला केला. आर्थिक सुरक्षितता मिळवण्याच्या आशेने त्यांच्यापैकी अनेक स्वातंत्र्याला तिलांजली देण्यास तयार झाले. अन्य काही साम्यवादाकडे वळले कारण साम्यवादाने वर्गरहित समाज आणि नियोजनबद्ध अर्थ व्यवस्थेचे वचन दिले होते. अनेकांनी जर्मनी आणि इटली प्रमाणे फॅसिस्ट संघटनांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. ज्या देशांचा लोकशाही शासनावर अद्याप विश्वास होता त्या देशातील शासनाच्या हाती आर्थिक नियंत्रणाचे व्यापक अधिकार आले होते. सर्व देशांचा आर्थिक राष्ट्रवादाकडे साधारण कल होता. या आर्थिक राष्ट्रवादाचे १७ व १८ व्या शतकातील व्यापारवादशी (मर्कन्टॅलिझम) साम्य होते. लॅटिन अमेरिकेतील अर्जेन्टिना, ब्राझील, चिली आणि अन्य ९ देशात क्रांती झाली. फक्त सोव्हिएत रशिया अन्य देशापासून अलग पडल्याने आणि तिची

munotes.in

अर्थव्यवस्था भिन्न सिद्धांतावर आधारित असल्याने तेथे महामंदी आणि बेरोजगारीचा काहीच परिणाम झाला नाही.

अमेरिकेतील लोकशाही भक्कम पायावर उभी होती तेथे एकाधिकारशाहीच्या चळवळींचा काहीच प्रभाव पडला नाही. लोकमत रिपब्लिकन पक्षाकडून डेमॉक्रॅटिक पक्षाकडे झुकले होते. काळत नकळत महामंदीमुळे अमेरिकन परंपरेवरील लोकांचा विश्वास डळमळीत झाला होता. बुद्दीवादी गटामध्ये हे उघडपणे जाणवत असे. पहिल्या महायुद्धाचा झटका, त्यानंतर १९२० च्या दशकातील पैसे मिळवण्याच्या वेडया शर्यतीमुळे त्यांच्या मानत परात्मतेची भावना निर्माण झाली. त्यांना समाजाच्या कार्यक्रमात सहभागी होता आले नाही किंवा समाजाच्या मूल्यावर त्यांचा विश्वास राहिला नाही. आर्थिक संकटाने परात्मतेची ही भावना अधिक तीव्र झाली.

## ४.९ समाजवाद आणि साम्यवाद

आर्थिक महामंदीमुळे अनेक अमेरिकन लेखक, प्राध्यापक, धर्मगुरू आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांचा असा ग्रह झाला की आर्थिक निर्वाण नियोजनबद्ध अर्थ व्यवस्थेच्या सहाय्यानेच मिळू शकेल, सोव्हिएट रशियातील प्रयोगामध्ये त्यांनी सहानुभूतीपूर्वक स्वारस्य दाखवले. तेथील प्रयोग योग्य मार्गाने चालला असल्याचा विश्वास त्यांना वाटू लागला.

आर्थिक महामंदीमुळे तीन लोकनेत्यांचा उदय झाला. त्यांचा अलगतेचा कार्यक्रम आणि झपाटलेल्या प्रचाराला निश्चित फॅसिस्ट छटा होती. ह्युए पी. लॉग, डॉक्टर फ्रॅन्क टाऊनसेंड आणि फादर चार्लस ई. लाऊलिन अशी त्यांची नावे होती. १९२८ मध्ये लॉग लुझियाना राज्याच्या राज्यपालपदी निवडून आले. मंत्रमूग्ध करणारे अमोघ वक्तृत्व आणि कॅरिबियन प्रदेशातील हुकुमशाही यांचे विचित्र मिश्रण त्यांच्या व्यक्तीमत्वामध्ये होते. लुझियाना राज्यावर जवळपास त्यांची एकाधिकाराची सत्ता स्थापन झाली. परंतु त्यांनी आपल्या सत्तेचा लोकांच्या भल्यासाठी वापर केला. डॉक्टर टाऊनसेंड कॅलिफोर्नियातील निवृत्त डॉक्टर होते.

वयाची साठ वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक अमेरिकन माणसाला दरमहा २०० डॉलर निवृत्तवेतन दिल्यास महामंदीचे निवारण करता येईल अशी त्यांची सूचना होती. परंतु निवृत्तवेतनाची सर्व रक्कम त्याने खर्च केली पाहिजे अशी त्यांची अट होती. ते स्वत: प्रामाणिक असले तरी सक्षम अर्थतज्ज्ञांना त्यांच्या योजनेविषयी शंका वाटत होती. आपल्या योजनेचा पुरस्कारही त्यांनी लोकानुनयाच्या मार्गाने केला होता. फादर लाऊलिन मिशिगन राज्यातील कॅथॉलिक धर्मगुरू होते. त्यांनी सावरकरांची निर्भत्सना केली, चलनफुगवटयाची मागणी केली, अलगतावादाचा पुरस्कार केला. हिटलरच्या विचारसरणीविषयी त्यांना आत्मीयता वाटत असे.

या सर्वांनी मोठ्या वल्गना केल्या असल्या तरी साधारण बहुसंख्य अमेरिकन लोकांना वास्तवाची जाणीव होती. त्यांना वस्तुंचे उत्पादन पूर्ववत असावे आणि सर्वांना रोजगार मिळावा असे वाटत असले तरी त्यासाठी आपला व्यक्तिगत व्यवसाय निवडण्याचे, मालमत्ता करण्याचे आणि आपल्या बचतीचे पैसे हवे तसे खर्च करण्याचे मुलभूत स्वातंत्र्य गमावण्याची त्यांची तयारी नव्हती.

आर्थिक महामंदी अतिशय तीव्र असताना बहुतेक सर्वांनी केंद्र सरकारच्या खंबीर कारवाईची मागणी केली असली तरी तिच्या उद्दिष्टाविषयी लक्षणीय मतभेद होते. आर्थिक समृद्धी परत आणण्यासाठी केंद्र सरकारने सकारात्मक कारवाई करावी अशी त्यांची मागणी असली तरी बहुतेकांनी घटनाधिष्ट शासनाची परम्परागत पद्धती आणि खाजगी उपक्रमशीलता यांचा स्वीकार केला होता. खाजगी मालकी नष्ट करण्याचा समाजवादी किंवा साम्यवादी कार्यक्रम त्यांनी झिडकारला होता. सरकारी हस्तक्षेप तात्पुरता असावा असे कर्मठ विचारसरणीच्या लोकांना वाटत असे, जी अर्थव्यवस्था मुळातच मजबूत आहे अशा अर्थव्यवस्थेचा आग्रह त्यांनी धरला होता. त्यांच्या मते अंशत: पहिल्या महायुद्धाचे धक्कादायक परिणाम आणि युद्धोत्तर कर्ज व खंडणीची समस्या आणि अंशत: वित्तिय धोरणातील चुका यामुळे आर्थिक आरिष्ट ओढवले होते. दुसरीकडे उदारमतवाद्यांनी अमेरिकन शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या मर्यादित क्रयशक्तीवर भर दिला आणि उत्पन्नातील विषमता दूर करून लोकांचे जीवनमान वाढवण्यासाठी सरकारने खंबीर कारवाई करावी अशी मागणी केली.

जॉन मेनार्ड केन्स १९३० च्या दशकातील सर्वश्रेष्ठ उदारमतवादी अर्थतज्ज्ञ होते. वित्तिय धोरणातील चुकापेक्षा अधिक मुलभूत कारणांनी बचतीचे प्रमाण वाढते. त्यांच्या मते प्रगल्भ अर्थव्यवस्थेमध्ये असे घडणारच असत. मागणी आणि पुरवठा यांच्या यांत्रिक प्रक्रियेने ते सुधारणे शक्य नाही. सरकारने ही बचत सार्वजनिक कार्यक्रमाच्या मार्गाने अर्थव्यवस्थेमध्ये आणावी आणि असे करून खाजगी गुंतवणुकीची जागा घ्यावी. अशा रितीने संतुलित अंदाजपत्रकातील पारंपारिक श्रद्धेचा त्याग केला पाहिजे आणि समृद्धीच्या काळात सरकारने भरी कर आकारणी करून सार्वजनिक कर्ज कमी केले पाहिजे, परंतु महामंदीच्या काळात सरकारने आपल्या उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला पाहिजे. अशा प्रकारचे सरकारी धोरण योग्य रितीने राबवल्यास अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर नियंत्रण राहील आणि अर्थव्यवस्थेमध्ये वारंवार येणारी तेजी मंदीची आवर्तने नियंत्रणात राहतील तसेच सर्वांना रोजगार मिळू शकेल. हार्वड विद्यापीठातील अल्बिन हॅन्सेन यांच्यासारख्या अनेक प्रतिष्ठित अमेरिकन अर्थतज्ज्ञांनी केन्स यांचा सिद्धांत मान्य केला होता. १९३० च्या दशकातील उदारमतवादी विचारसरणीवर विशेष प्रभाव होता.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकेमध्ये जागतिक महामंदी कोणत्या वर्षी आली होती ?

२) आर्थिक महामंदीच्या काळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कोण होते ?

## ४.१० समारोप

महामंदीला बळी पडलेल्या लाखो अमेरिकन लोकांनी दाखवलेला संयम हे महामंदीच्या काळातील खास वैशिष्टय होते. भयंकर दुरावस्थेच्या काळातही अमेरिकन लोकांनी कायदा आणि सुव्यवस्था तसेच खाजगी मालमत्तेच्या हक्काचा कमालीचा आदर केला. शेतकऱ्यांच्या काही गटांनी हिंसाचाराचे काही प्रकार केले असले आणि कोळसा कामगारांच्या काही गटांनी वेतनाच्या कपातीविरुद्ध संप केला असला तरी एकंदरीने देशामध्ये आश्चर्यकारक शांतता नादनांदत होती.

## ४.११ प्रश्न

१. जागतिक आर्थिक महामंदीची पार्श्वभूमी सांगा.

२. जागतिक महामंदीचा अमेरिकेच्या आर्थिक विकासावर झालेला परिणाम सांगा.

३. जागतिक आर्थिक महामंदीचे परिणाम विषद करा.

## ४.१२ संदर्भ ग्रंथ

१. डॉ. वक्कानी, अमेरिकेचा इतिहास

२. डॉ. सुमन वैद्य, अमेरिकेचा इतिहास

३. डॉ. शांत कोठेकर, अमेरिकन संघराज्याचा इतिहास.

❖❖❖❖

munotes.in

# ५

# अमेरिकेचा नवोपक्रम (न्यु डील) कार्यक्रम

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टये

५.१ प्रस्तावना

५.२ हूवर यांचा कार्यक्रम

५.३ फ्रँकलिन रूझवेल्ट आणि न्यु डील

५.४ न्यु डील कार्यक्रम

५.५ बँकिंग आणि अर्थकारण

५.६ सिव्हिलियन कॉन्झर्वेशन कोअर

५.७ सामाजिक सुरक्षितता

५.८ कामगार संघटना

५.९ टेनिसी व्हॅली अथॉरिटी

५.१० अन्य तपशील

५.११ न्यु डीलचे परिणाम

५.१२ समारोप

५.१३ प्रश्न

५.१४ संदर्भ ग्रंथ

## ५.० उद्दिष्टये

या घटकाच्याअभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी समजतील.

- न्यु डील कार्यक्रमाचा अभ्यास करणे.
- न्यु डील कार्यक्रमाचा अमेरिकन राजकारणानंतर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

munotes.in

## ५.१ प्रस्तावना

एक दशकापर्यंत आर्थिक संकटांचा अमेरिकेतील राजकारणावर प्रभाव पडला होता. हूवर आणि रूझवेल्ट या दोन्ही राष्ट्राध्यक्षांनी परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला होता. सरकारने आर्थिक चालना देणे आणि तिच्यावर देखरेख करणे हा प्रस्थापित प्रघात होता. परंतु १९३० च्या दशकात केलेल्या उपाययोजनांची व्याप्ती अभूतपूर्व होती, त्यामुळे सरकार आणि उद्योग व्यवसाय यांच्यातील संबंधांवर दूरगामी परिणाम झाले होते.

राष्ट्राध्यक्ष हूवर यांचा खाजगी उपक्रमशीलता आणि दृढ व्यक्तीवाद या वर गढ विश्वास होता. राज्याची फार वाढ होण्यास त्यांचा विरोध होता कारण प्रत्येक व्यक्ती अशा राज्याची सेवक होते आणि खऱ्या स्वातंत्र्याचा लोप होतो. बेरोजगारांना मदत करण्याचे काम खाजगी धर्मदाय आणि स्थानिक अस्थापानांकडे सोपवले पाहिजेत अशी खात्री त्यांना वाटत असे. मदतीसाठी सरकारची याचना करण्याची सवय लोकांना झाल्यास स्वातंत्र्याचा लोप होईल आणि देशावर अनामिक नोकरशाहीची हुकुमशाही लादली जाईल. त्याऐवजी सरकारने केंद्र सरकारने खाजगी उपक्रमांना मदत करून संपूर्ण नुकसानापासून त्यांचा बचाव करावा. मात्र हूवर यांनी महाकाय कंपन्यांना केंद्र सरकारची मदत देण्याची तयारी दाखवल्याने मानवी हाल अपेष्टाकडे ते अमानुष दुर्लक्ष करत असल्याचा लोकांचा ग्रह झाला. हूवर स्वत: प्रामाणिक होते, कार्यक्षम प्रशासक आणि दीर्घोद्योगी असले तरी त्यांच्याकडे राजकीय कौशल्य आणि अनुभवाचा अभाव होता आणि ते लोकभावनेला आवाहन करू शकत नसत.

## ५.२ हूवर यांचा कार्यक्रम

महामंदीच्या पहिल्या दोन वर्षामध्ये हूवर यांनी सार्वजनिक कार्यावरील खर्च दुपट्टीने वाढवला, पतपुरवठा वाढवण्याचा प्रयत्न केला आणि उद्योगपतींना कामगारांच्या रोजगारात कपात न करण्याची विनंती केली. महामंदी संपून लवकरच समृद्धी परत येईल या वर त्यांनी भर दिला. परंतु असे काही झाले नाही. औद्योगिक कंपन्यांना कर्ज पुरवठा करण्याचा उद्देशाने त्यांनी रिकन्स्ट्रक्षन फायनान्स कॉर्पोरेशन (आर.एफ.सी,) स्थापन केली. ज्या घरमालकांची घरे कर्जाचे हप्ते न दिल्याने जप्त केली जाण्याची शक्यता होती त्यांना वित्त पुरवठा करण्याच्या उद्देशाने त्यांनी १२ होम लोन बँका स्थापन केल्या. शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यासाठी लँड बँका स्थापन केल्या. तसेच फेडरल रिझर्व व्यवस्थेमध्ये बदल करून बँकामार्फत वित्त पुरवठा वाढवण्याची व्यवस्था केली. केंद्र सरकारच्या महसूलातील तुट भरून काढण्यासाठी त्यांनी कर आकारणीचे प्रमाण वाढवले, असे केल्याने अंदाजपत्रकातील संतुलन परत साध्य होईल अशी आशा त्यांना वाटत होती. या उपाय योजना अमलात येईपर्यंत १९३२ ची अध्यक्षीय निवडणूक जवळ आली होती.

### १९३२ ची निवडणूक :

रिपब्लिकन पक्षाने हूवर यांना परत तिकीट दिले. आपल्या प्रचारात त्यांनी महामंदीचे गांभीर्य जागतिक परिस्थिती मुळे वाढले असून अमेरिकेचे तिच्यावर नियंत्रण नाही असा युक्तीवाद केला. शिवाय त्यांनी केलेल्या उपाययोजनांचा परिणाम होण्यास सुरुवात झाली होती. डेमॉक्रॅटिक पक्षाने फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट यांना उमेदवारी दिली. संतुलित अंदाजपत्रक, केंद्र सरकारच्या कपात, सुयोग्य चलन व्यवस्था आणि खाजगी उपक्रमामध्ये

गैरवाजवी हस्तक्षेप न करणे इत्यादी आश्वासने दिली. उद्योगांच्या चुकीच्या कार्यपद्धतीमध्ये काही सुधारणा करण्याचे, मदत आणि सार्वजनिक कार्यावरील खर्चात वाढ करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी नंतरच्या काळामध्ये जे विचार न्यु डील या नावाने ओळखले जात असत त्यांची संदिग्ध आणि साधारण रूपरेषा त्यांनी मांडली. ४ मार्च १९३३ रोजी त्यांनी अधिकार ग्रहण केले, तोवर गंभीर आर्थिक संकटामुळे सर्व बँका बंद पडण्याची वेळ आली होती. बहुतेक सर्व राज्यांमध्ये बँकांनी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. फेब्रुवारी, १९३३ मध्ये घाबरलेल्या ग्राहकांनी त्यांचे पैसे बँकांमधून काढण्यास सुरुवात केली होती, पैसे काढण्याचे प्रमाण एवढे मोठे होते की सरकारला हस्तक्षेप करणे भाग पडले.

## ५.३ फ्रँकलिन रूझवेल्ट आणि न्यु डील

रूझवेल्ट यांनी व्यवहारी मार्गांनी महामंदीशी सामना केला. सिद्धांताऐवजी त्यांचा अनुभवावर अधिक भरवसा होता. प्रभावी ठरू शकेल अशा कोणत्याही उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची त्यांची तयारी होती. स्वभावत: त्यांना गरिबांविषयी आत्मीयता वाटत असे. आपली उद्दिष्टये साध्य करण्यासाठी त्यांनी जे धैर्य आणि राजकीय कौशल्य दाखवले त्याच्यावर अन्य कोणत्याही नेत्याला कडी करता आली नाही. त्यांना लोकभावनेची अचूक जाण होती, ही जाणीव व्यक्त करून तिला योग्य दिशा दाखवण्यास ते सक्षम होते. शेकोटी जवळच्या त्यांच्या गप्पांची सोपी भाषा कोणालाही समजली असती. या गप्पामुळे ते अमेरिकन लोकांच्या अधिक जवळ आले. अमेरिकन लोकांना फक्त भितीचीच भीती वाटण्यासारखी आहे असे आवाहन त्यांनी आपल्या पहिल्या अध्यक्षीय भाषणात केले. महामंदीवर त्वरित उपाययोजना करण्याचे वाचन त्यांनी दिले. काँग्रेसच्या एका खास अधिवेशनात पहिल्या शंभर दिवसात अनेक महत्वाचे कायदे करण्यात आल्याने आपल्या भवितव्याचे नियंत्रण स्वत: करू शकतो असा आत्मविश्वास अमेरिकन लोकांना वाटू लागला.

## ५.४ न्यु डील कार्यक्रम

अमेरिकन लोकांना महामंदीच्या काळात संकटातून बाहेर काढून त्यांना एका उज्वल भविष्याचा मार्ग दाखवण्यासाठी रूझवेल्ट प्रशासनाने जी उपाययोजना केली तिला न्यु डील असे नाव दिले जाते. ही उपाययोजना एका सुसंगत योजनेनुसार करण्यात आली नाही. १९३३ मध्ये वेळ फारच थोडा होता आणि त्यामानाने उपाययोजना करण्याची निकड अधिक होती. मदत, संकटापासून मुक्ती आणि सुधारणा (रिलिफ, रिकव्हरी व रिफॉर्म) ही न्यु डीलची तीन महान उद्दिष्टये होती. लाखो अमेरिकन लोकांना अन्न आणि रोख पैशाची मदत तातडीने पोचवण्याची गरज होती. आर्थिक संकटातून मुक्त करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना म्हणजे संकटातून मुक्ती (रिकव्हरी) होती. अर्थव्यवस्थेतील गंभीर दोषावर उपाययोजना करून अशी महामंदी परत येणार नाही याची खबरदारी घेण्याचा संबंध सुधारणांशी होता. प्रत्यक्ष व्यवहारात या तिन्ही उद्देशांची सरमिसळ झाली होती. रूझवेल्ट यांना गरिबांना मदत करावयाची होती आणि फक्त गरिबांनाच नव्हेतर कोळसा खाणी, अमेरिकेच्या दक्षिण आणि पश्चिमेकडील राज्यातील गरीब शेतकऱ्यांना आणि आर्थिक अडचणीतील उद्योगांना मदत करावयाची होती. त्यांना श्रीमंत उद्योगपती आणि सावकाराकडून पैसे वसूल करावयाचे होते, गरीब कामगारांना त्यांच्या संघटना बांधण्यास मदत करावयाची होती. अशा संघटना उद्योगांच्या मालकाशी योग्य प्रकारे वाटाघाटी करून

आपला रोजगार वाढवून घेऊ शकल्या असत्या. त्यांना धनिकांच्या सत्तेपासून लोकशाहीचे रक्षण करावायचे होते. त्यांना राष्ट्राध्यक्ष हूवर यांच्याप्रमाणे दिवाळखोर उद्योगांना कर्जाचा पुरवठा करून नव्हे तर सर्व सामान्य अमेरिकन माणसाला त्यांनी उत्पादन केलेल्या मालाची काह्लेडी करण्याची क्षमता निर्माण करून मदत करावयाची होती. त्यांना अमेरिकेतील कच्चे तेल, जमीन या नैसर्गिक साधन संपत्तीची उधळपट्टी थांबवायची होती, त्यामुळेच भावी पिढयांना त्यांचा उपयोग झाला असता. न्यु डील डेमॉक्रॅटिक पक्षाचेही धोरण नव्हते तर फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट यांचे धोरण होते. घटनेने मिळालेल्या सर्व अधिकारांचा त्यांनी पुरेपूर वापर केला. शांततेच्या काळातील एकाही अमेरिकन राष्ट्राध्यक्षांचे त्यांच्याएवढा सत्तेचा वापर केला नव्हता. त्यांनी आपल्या सभोवती महाविद्यालयीन प्राध्यापक, अर्थतज्ज्ञ आणि तत्सम विषयीतील तज्ज्ञ तरुणांचा एक गट जमावाला. या गटाला प्रज्ञापेढी (ब्रेनट्रस्ट) असे नाव देता येत असे. त्यांनी न्यु डील कार्यक्रमाचा तपशील निश्चित केला. शेकोटी सभोवतीच्या आपल्या गप्पामध्ये त्यांनी अमेरिकेतील सामान्य माणसांच्या समस्यांची चर्चा केली. व्हाइट हाऊस या अध्यक्षीय निवासस्थानामध्ये त्यांनी दर पंधरवडयाला वार्ताहर परिषद भरवली. या परिषदेत वार्ताहरांना मुक्त प्रवेश असे, त्यांनी कोणताही प्रश्न विचारण्याची मुभा होती. या प्रश्नांची प्रामाणिक आणि सरळ उत्तरे देताना ते कधी नरम विनोदही करत असल्याने वार्ताहरामध्ये ते विशेष लोकप्रिय झाले.

हेरॉल्ड आइक्स (गृह मंत्री), हॅरी हॉपकिन्स (फेडरल रिलिफ संघटनेचे प्रशासक), हेन्री वॉलेस (शेतकी मंत्री आणि रूझवेल्ट यांच्या तिसऱ्या कार्यकालातील उपाध्यक्ष), फ्रान्सेस पर्किन्स (पहिल्या महिला कामगार मंत्री) यांच्या सारख्या विविध मतांच्या कर्तबगार व्यक्तींनी न्यु डीलचा कार्यक्रम अमलात आणण्यास हातभार लावला. कालानुरुप रूझवेल्ट यांचे सहकारी जसे बदलत गेले तसा न्यु डीलचा कार्यक्रम देखील गेला. हा कार्यक्रम इतका बदलत गेला की न्यु डीलचे दोन कार्यक्रम असल्याचा सर्वसाधारण समज झाला. १९३३ ते १९३५ या काळातील पहिल्या न्यु डीलने आपले लक्ष बँकिंग व्यवस्था सुरळीत करणे, बेरोजगारांना रोजगार पुरवणे, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शेतमालाच्या किमती वाढवणे आणि उद्योगांना सावरणे इत्यादी निकडीच्या समस्यावर केन्द्रित केले. १९३५ ते १९३८ या काळातील दुसऱ्या न्यु डीलने चिरस्थायी सुधारणा, त्यासाठी अतोनात खर्च आणि असंतुलित अंदाजपत्रक आणि श्रीमंत वर्गावर अतिरिक्त कर आकारणी इत्यादी उपाय योजले. या काळात सरकारने उद्योगांपेक्षा कामगार संघटना आणि तत्सम गटांना अधिक सहानुभूती दाखवली. या दोन न्यु डीलचा कार्यक्रमातील बदल नावाप्रमाणे स्पष्ट किंवा अचानक नव्हता कारण सरकारने केलेल्या उपाययोजना एवढया विविध आणि गुंतागुंतीच्या होत्या की त्याचे परिणाम दीर्घ काळाने जाणवले असते. आर्थिक महामंदीवर मात मिळवणे सोपे नव्हते. १९३४ मध्ये, म्हणजे न्यु डील कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर दोन वर्षांनी अमेरिकेचे एकूण उत्पन्न १९२९ मधील एकूण उत्पन्नाच्या निम्म्यापेक्षा थोडेसे जास्त होते आणि सुमारे एक कोटी लोक बेरोजगार होते. उद्योगपतींनी न्यु डीलच्या काही कार्यक्रमावर टीका केली असली तरी त्यांचे आव्हान स्वीकारण्यास रूझवेल्ट नेहमीच तयार असत. ह्युए लॉग आणि डॉक्टर टाऊनसेंड यांच्या सारख्या एकांतिक विचारांच्या व्यक्तींच्या वाढत्या लोकप्रियतेची त्यांना अधिक काळजी वाटत असे. काही गंभीर उपाययोजना करणे हा त्यांना शह देण्याचा चांगला मार्ग होता. १९३६ मध्ये अनेक उद्योगातील कामगारांनी संप केले, त्यावरून रूझवेल्ट यांच्या उपाययोजनेमुळे कामगार संघटनांचे समाधान झाले नसल्याने

स्पष्ट झाले. या कारणांनी कार्यकालाच्या दोन वर्षानंतर त्यांनी दूरगामी सुधारणा केल्या. त्यापैकी काही प्रमुख सुधारणा खालील प्रमाणे होत्या.

## ५.५ बँकिंग आणि अर्थकारण

रूझवेल्ट अधिकारपदी आले तेव्हा देशातील सर्व बँका बंद होत्या. राष्ट्राचे अर्थकारण रुळावर आणणे ही त्यांच्या समोरची पहिली समस्या होती. लोकांच्या मनात बँकाविषयी विश्वास निर्माण करून त्यांनी ही समस्या सोडवली. एका आठवडयातच त्यांनी कॉंग्रेस मार्फत इमरजन्सी बँकिंग ॲक्ट (इ.बी.ए.) हा कायदा करून घेतला. या कायद्यान्वये त्यांना बँकांचे नियंत्रण करता आले आणि ज्या बँका डबघाईला आल्या नव्हत्या असे त्यांना वाटले त्यांचे व्यवहार परत सुरु करण्याचा अधिकार मिळाला. आपल्या शेकोटीसभोवतीच्या पहिल्या गप्पामध्ये त्यांनी अर्थव्यवस्था भक्कम असल्याची ग्वाही दिल्याने लोकांना बँकाविषयी परत विश्वास वाटू लागला आणि त्यांनी परत आपले पैसे बँकेत जमा करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी अनेक महत्वाचे कायदे केले. १९३३ च्या बँकिंग ॲक्टनुसार बँकांवरील नियंत्रण अधिक कडक करण्यात आले. त्यामुळे बँकातील गैरव्यवहाराला आळा बसला तसेच फक्त बँकिंगचे व्यवहार करणाऱ्या बँका वेगळ्या करण्यात आल्या. इन्शुरन्स कॉर्पोरेशन (एफ.डी.आय.सी.) स्थापन करण्यात आल्याने बँकांमधील ठेवींचा विमा करण्यात आला तसेच बँक संकटात आली तरी लोकांच्या ठेवी सुरक्षित राहिल्या. १९३३ च्या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख करावयाची होती आणि शेअर बाजारातील सर्व शंकास्पद व्यवहारांचा तपास करावयाचा होता. आयोगाने धिमे धिमे शेअर बाजाराचे शेअरचे साधारण व्यवहार करणाऱ्या एका बाजारात परिवर्तन केले. जमवलेला लोकांचा पैसा उत्पादक उद्योगांमध्ये गुंतवण्यास मदत करणे हा शेअर बाजाराचा खर उद्देश असतो. बँकांनी अल्प व्याजाने लोकांना कर्ज द्यावे असा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी यांनी स्थापन केलेल्या फेडरल रिझर्व बँकिंग सिस्टिम (एफ.आर.बी.सी.) या व्यवस्थेचा उपयोग केला.

**शेतकरी :**

अमेरिकन शेतकऱ्यांना १९२० च्या दशकातील समृद्धीचा फारसा फायदा मिळाला नव्हता. महामंदीच्या काळात इतराप्रमाणे त्यांचे देखील हाल झाले. त्यांना अनेक संकटांचा मुकाबला करावा लागला. त्यापैकी शेतमालाला मिळणारी कमी किंमत हे मुख्य संकट होते. शेतमालाची परदेशात विक्री करणे त्यांना शक्य नसल्याने अमेरिकन लोकांच्या गरजेपेक्षा अधिक शेतमालाचे उत्पादन होत गेले. महामंदीमुळे अमेरिकन शेतमालाच्या खरेदीसाठी जादा किंमत देणे शक्य नसल्याने त्यांच्या हालास पारावर उरला नाही. शेतमालाच्या किमती वाढवणे हा रूझवेल्ट यांचा मुख्य उद्देश्य होता. यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. त्यांच्या शेतजमिनी हिरावण्यात येऊ नयेत यासाठी सरकारने त्यांना कर्ज दिले. उजाड जमिनीची मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांचे अधिक सुपिक जमिनीवर पुनर्वसन केले. मात्र त्यांच्या समस्यावरील एकमेव परिणामकारक उपाय शेतमालाला वाजवी किंमत मिळवून देणे हाच होता. या उद्देशाने १९३३ मध्ये  फार्मर्स रिलीफ ॲक्ट (एफ.आर.ए) हा कायदा करण्यात आला. काही प्रकारच्या शेतमालाचे सहकारी पद्धतीने पणन करण्यासाठी ॲग्रिकल्चरल ॲडजस्टमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (ए ए ए) ही संघटना स्थापन करण्यात आली.

munotes.in

ज्या शेतकऱ्यांना कापूस, तंबाखू, तांदूळ, गहू आणि सुकरे इत्यादींची बाजारपेठेत विक्री करता येत नसेल त्यांच्यासाठी सरकारने एक योजना तयार केली. या योजनेनुसार या शेतमालाचे उत्पादन काही प्रमाणात कमी करता येत असे. योजनेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना ए.ए.ए.शी एक करार करावा लागत असे. करारानुसार ठराविक पिकाचे उत्पादन त्याला कमी करता असे. पहिल्या वर्षी त्याचे पीक नष्ट करावे लागे तर नंतरच्या वर्षी त्या पिकाचे उत्पादन कमी करावे लागत असे. असे केल्याबद्दल सरकार तर्फे त्याला काही नुकसान भरपाई मिळत असे कारण उत्पादन झाल्यास त्या पीकाला जास्त भाव मिळत असे. शेतकऱ्यांना दिलेला नुकसान भरपाईचा पैसा पीक प्रक्रियेवरील करातून उभा करण्याची योजना होती. उदाहरणार्थ कापूस पिंजण्यावरील करातून कापसाच्या लागवडीखाली जमीन कमी करणे शक्य होत असे तर गव्हाच्या पीठाच्या गिरणीवरील करातून गव्हाच्या लागवडीखाली जमीन कमी करता येत असे. या योजनेला निसर्गाने साथ दिली; १९३४ आणि १९३६ ही आवर्षणाची वर्षे होती. तथापि, १९३६ ए.ए.ए. ही संघटना बेकायदेशीर असल्याचा निवडा सर्वोच्च न्यायालयाने दिला. प्रक्रियेवरील कर आकारणीला न्यायालयाने आक्षेप घेतला होता. यातून मार्ग काढण्यासाठी सरकारने सॉईल कॉन्झर्वेशन ॲक्ट (एस.सी.ए) हा कायदा केला. या नव्या कायद्यानुसार पूर्वीप्रमाणे लागवडीखालीजमीन कमी करण्यासाठी शेतकऱ्याची जमीन सरकार खंडाने घेत असे.

आवर्षण आणि बेदरकार मशागतीपासून अमेरिकन जमीन वाचण्याच्या समस्येकडे सॉईल कॉन्झर्वेशन ॲक्ट या कायद्याने लक्ष दिले. दक्षिण आणि पश्चिमेकडील राज्यातील तसेच धुळीच्या वाडग्यातील (डस्ट ब्राऊल) उध्वस्त झाली होती. धुळीच्या वादळाने तेथील सुपिक माती मध्य पश्चिमेकडील (मिड वेस्ट) प्रदेशात वाहून जात असे. अशा रितीने या कायद्याने अमेरिकेतील प्रचंड मोठ्या जमिनीचे वाळवंटीकरण रोखले होते; इराक आणि उत्तर आफ्रिकेतील मोठा प्रदेश एकेकाळी सुपिक असला तरी आता तेथे उजाड वाळवंट आहे. या सर्व प्रयत्नांचा परिणाम लवकरच दिसू लागला. १९३२ ते १९३७ या काळात अमेरिकन शेतकरी वर्गाचे उत्पन्न जवळपास दुप्पट झाले.

## ५.६ सिव्हिलियन कॉन्झर्वेशन कोअर

बेरोजगारांची वाढती संख्या हे महामंदीचे सर्वात वाईट वैशिष्टय होते. ही समस्या सोडवण्याचा एक प्रयत्न म्हणून रूझवेल्ट यांनी १९३३ मध्ये सिव्हिलियन कॉन्झर्वेशन कोअर या दलाची (सी. सी. सी.) स्थापना केली. या योजनेनुसार १८ ते ३५ वयाचे अविवाहित तरुण या दलाच्या छावणीत सहा महिन्यासाठी दाखल होऊ शकत असत. अशा छावण्या प्रामुख्याने पर्वतीय आणि वनामध्ये आयोजित केल्या जात असत. या छावण्यामधून हे तरुण वनीकरण, बंधारे बांधणे, वणव्यांचा मुकाबला करणे, पुराचे पाणी रोखणे आणि दुर्गम प्रदेशात दूरध्वनींचा तारा ठोकणे इत्यादी समाजोपयोगी कामे करत किंवा त्यांचे शिक्षण घेत असत. छावणीतील प्रत्येक तरुणाला दरमहा ३० डॉलर मिळत असत त्यापैकी २५ डॉलर त्याला त्याच्या कुटुंबाला पाठवावे लागत असत. सुरुवातीला ३ लाख तरुण दाखल झालेल्या या दलातील तरुणांची संख्या १९४० मध्ये २० लाखापर्यंत पोचली होती. दलातील अनेक तरुण ६ महिन्यांची मुदत संपल्यावर दलात परत दाखल होत असले तरी नंतर मात्र अशा तरुणांची संख्या रोडावत गेली. दलात सामील झालेल्या तरुणांना



munotes.in

रोजगार मिळणे सुलभ असे कारण छावणीतील प्रशिक्षणाने ते तरतरीत होत असत तसेच त्यांना तांत्रिक कौशल्ये संपादन करता येत असत.

नॅशनल इंडस्ट्रीयल रिकव्हरी ॲक्ट (एन.आर.ए) आणि वर्क्स प्रोग्रेस ॲडमिनिस्ट्रेशन (डब्ल्यू.पी.ए) एन.आर.ए. या कायद्याने महामंदीपासून अमेरिकन लोकांना वाचवण्याचा प्रयत्न रूझवेल्ट यांनी केला. अधिकाधिक लोकांना काम पुरवणे हा त्यांचा मुख्य हेतू होता. काम मिळाल्यावर त्यांना रोजगार मिळू लागला असता; त्यांना अधिक वस्तू खरेदी करता आल्या असत्या; कारखाने अधिक वस्तूंचे उत्पादन करू लागले आणि अर्थव्यवस्था पूर्वपदाला आलीअसती. कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारण्याचाही त्यांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी रोजगार वाढवला, कामाचे तास कमी केले आणि कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता दिली. बाल कामगारांना कामावर ठेवण्याची त्यांनी मनाई केली.

एन.आर.ए. कायद्याची तीन महत्वाची वैशिष्टये होती. १. या कायद्याने डब्ल्यू.पी.ए. या संघटनेची स्थापना केली, तिने सर्व प्रकारच्या सार्वजनिक कामांना प्रोत्साहन दिले. केंद्र सरकारने धरण, विमानतळ, आरमारी जहाजे, डाकघरे आणि अनेक प्रकारची सरकारी कार्यालये इत्यादींच्या बांधकामावर अनेकांना रोजगार दिला. त्याने राज्य राज्य सरकारांना आणि शहरांना रस्ते, पूल, इस्पितळे, शाळा आणि गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन इत्यादी कामांसाठी उसने पैसे दिले. डब्ल्यू.पी.ए. या संघटनेने लाखो लोकांना रोजगार दिला. २. या कायद्याने नॅशनल रिकव्हरी ॲडमिनिस्ट्रेशन (इन.आर.ए.) या संघटनेची स्थापना केली. ही संघटना उद्योग चालवण्यासाठी आवश्यक ते नियम करत असे. औद्योगिक कंपन्या स्वत: हे नियम बनवत असत आणि नंतर एन.आर.ए. संघटना ते मान्य करत असे. या नियमानुसार बाल कामगारांची पद्धत रद्द केली, कामाचे तास कमी केले, किमान वेतन ठरवून दिले आणि गैर वाजवी स्पर्धेला आळा घातला. पाच वर्षात अशा ५०० नियमावली बनवण्यात आल्या. मात्र अशा नियमावली बनवणे फार वेळखाऊ होते रे रूझवेल्ट यांना कारवाईची निकड परिणामी १९३३ मध्ये त्यांनी अशी पहिली आदर्श नियमावली बनवली. इच्छा असणाऱ्या सार्व उद्योगांना टी लागू होणार होती. या नियमावलीने बाल कामगारांची पद्धत रद्द केली, कामाचे ८ तास निश्चित केले आणि दर आठवडयाचे किमान वेतन १२.५ डॉलर निश्चित केले. सुमारे २० लाख कामगारांनी अशा नियमावलीची मागणी केली होती. यथावकाश १६ लाख कामगारांना ही नियमावली लागू करण्यात आली. ही नियमावली मान्य करणाऱ्या सर्व कारखानदारांना त्यांच्या मालावर निळे गरुड (ब्लु इगल) हे चिन्ह लावण्याची अनुमती दिली गेली. हे चिन्ह धारण करणाऱ्या मालाच्या उत्पादकांशी व्यवहार करावा यासाठी सरकारे सामान्य लोकांना उत्तेजन दिले. ३. या कायद्याने कामगारांना संघटना करण्याचा कायदेशीर अधिकार दिला.

**गरिबांना मदत :**

निकडीची गरज असणाऱ्या गरिबांना तातडीने रोख मदत देता यावी यासाठी राष्ट्राध्यक्ष हूवर यांनी रिकन्स्ट्रकशन फायनान्स कॉर्पोरेशन (आर.एफ.सी.) ही संस्था स्थापन केली होती. १९३३ मध्ये रूझवेल्ट यांनी फेडरल इमर्जन्सी रिलीफ ॲडमिनिस्ट्रेशन (एफ.इ.आर.ए.) ही संघटना स्थापन केली. या प्रशासकाच्या मार्फत केंद्र सरकारने देशभरातील गरिबांना थेट मदत दिली आणि स्थानिक धर्मदाय संस्थांना त्यासाठी मदतीचा

हात दिला. अशी मदत तात्पुरती आवश्यक असली तरी टी दीर्घकाळ रिकाम्या बसणाऱ्या गरिबांना अशी मदत करणे पुरेसे नव्हते. रिकाम्या हाताने बसणाऱ्या गरिबांना काम देण्याची आवश्यकता होती आणि असे काम देण्याचा रूझवेल्ट यांनी निश्चय केला होता. या उद्देशाने त्यांनी १९३३ मध्ये सिव्हिल वर्क्स ॲडमिनिस्ट्रेशन (सी.व्ही.ए.) ही संघटना स्थापन केली. या संघटनेचे सुमारे ४० लाख बेरोजगारांना काम पुरवले. झालेल्या कामापैकी फार मोठा भाग कुचकामी असल्याने १९३४ मध्ये ही योजना रद्द करण्यात आली. १९३५ मध्ये सरकारने त्यासाठी वर्क्स प्रोग्रेस ॲडमिनिस्ट्रेशन (डब्ल्यु.पी.ए.) ही अधिक चांगली संघटना स्थापन केली. या योजनेअंतर्गत लाखो स्त्री पुरुषांना समाजोपयोगी कामासाठी रोजगार देण्यात आला. सरकारतर्फे त्यांना मिळणारा रोजगार पुरेसा असला तरी तो नेहमीच्या कामात त्यांना मिळाला असता एवढया रोजगारासारखा नसे. या संघटनेने धरणे, विमानतळ, रस्ते, शाळा, इस्पितळे, समाज मंदिरे खेळाची मैदाने आणि तरण तलाव बांधले. देशाच्या सार्व भागामध्ये तिचे कार्य चालू होते. त्याशिवाय या संघटनेणे रिकाम्या अभिनेते,लेखक, संगीतकार आणि कलाकारांना काम पुरवले. उदाहरणार्थ फेडरल थिएटर प्रोजेक्ट या प्रकल्पातर्फे प्रवासी नाटक मंडळी देशाच्या विविध भागात नाट्यप्रयोग सादर करत असत तर कलाकार डाकघरे आणि अन्य सार्वजनिक इमारती सुशोभित करत असत. वर्क्स प्रोग्रेस ॲडमिनिस्ट्रेशन ही महागडी संघटना असली तरी तिने रिकामटेकडा लाखो लोकांना वाचवले होते. तिच्या मार्फत करण्यात आलेले बहुतेक काम अमेरिकेला कायम उपयोगी ठरले.

## ५.७ सामाजिक सुरक्षितता

१९३३ च्या पूर्वी अमेरिकेमदह्ये बेरोजगार किंवा आरोग्यसेवा किंवा वृद्धापकाळासंबंधी विम्याची कोणतीही योजना कार्यरत नव्हती. जर्मनी मध्ये अशी योजना १८८९ पासून तर ब्रिटन मध्ये १९०९ पासून कार्यरत होती. विस्कॉन्सिन या अमेरिकेतील एकमेव राज्यामध्ये बेरोजगारांना मदत करण्याची एक योजना १९३५ च्या पूर्वी कार्यरत होती. १९३५ मध्ये करण्यात आलेला सोढाल सिक्युरिटी ॲक्ट (एस.एस.सी.) हा न्यु डील कार्यक्रमामधील सर्वात महत्वाचा कायदा होता. या कायद्यानुसार वृद्ध नागरिकांना निवृत्तीवेतन देण्याची योजना केंद्र सरकार तर्फे राबवण्यात आली, त्यासाठी कामगार, नोकरदार आणि त्यांचे मालक अशा दोघांचे योगदान असे. या कायद्याने बेरोजगारीच्या विम्याची एक अन्य योजनाही तयार केली. या योजनेनुसार राज्यांनी त्यांच्या तपशीलवार योजना तयार करावयाच्या होत्या. अंध आणि लहान मुलांना आरोग्यसेवेच्या योजनांसाठी केंद्र सरकारतर्फे राज्यांना मदत केली जाई. समग्र योजना लाखो अमेरिक नागरिकांना वृद्धापकाळ आणि बेरोजगारापासून सुरक्षाकवच पुरवण्यासाठी तयार करण्यात आली होती.

## ५.८ कामगार संघटना

नॅशनल इंडस्ट्रीयल रिकव्हरी ॲक्ट या कायद्यातील एका कलमानुसार कामगारांना त्यांच्या संघटना स्थापन करण्याचा आणि मालकांशी सामुदायिक सौदेबाजी करण्याचा कायदेशीर हक्क मिळाला होता. हा कायदा कामगारांना उपयोगी असला तरी त्याची अंमलबजावणीअवघड होती. म्हणूनच १९३५ मध्ये त्याच्या ऐवजी वॅग्नर ॲक्ट हा नवा कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये बहुसंख्य कामगार सभासद असणाऱ्या कामगार

संघटनांना मान्यता देण्याचे आणि त्यांच्याशी वेतन आणि कामाचे तास या संबंधीच्य कोणत्याही प्रश्नाच्या वाटाघाटी करण्याचे बंधन मालकांवर घालण्यात आले. कामगारांच्या पसंतीच्या कोणत्याही संघटनेत सामील होण्याच्या त्यांच्या अधिकारामध्ये मालकांना हस्तक्षेप करता येत नसे. कायद्यान्वये नॅशनल लेबर रिलेशन्स बोर्ड हे मंडळ स्थापन करण्यात आले. कामगारांना या मंडळाकडे तक्रार करता येत असे आणि दोषी मालकांना शिक्षा करण्याचा अधिकार या मंडळाला होता. १९३८ च्या फेअर लेबर स्टँडर्ड ॲक्ट या कायद्यानुसार कमी रोजागारांच्या अनेक उद्योगामधील मानके सुधारण्यात आली, त्यासाठी तेथील कामाचे तास आणि किमान वेतन निश्चित करण्यात आले. न्यु.डील कार्यक्रमाने कामगार चळवळीला फार मोठी चालना दिली. १९३३ मध्ये फक्त ७.३ टक्के अमेरिकन संघटित झाले होते, १९३८ पर्यंत हे प्रमाण २१.९ टक्क्यांपर्यंत वाढले होते. १९३५ मध्ये काही कामगार संघटना जॉन लुई यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकन फेडरेशनल ऑफ लेबर (ए.एफ.एल.) या संघटनेमधून बाहेर पडल्या आणि त्यांनी उद्योगातील अकुशल कामगारांसाठी कमिटी ऑफ इंडस्ट्रीयल ऑर्गनायझेशन (सी.आय.ए.) ही नवी संघटना स्थापन केली. टी अतिशय यशस्वी झाली. १९३८ मध्ये या संघटनेचे जवळपास ४० सभासद होते. तेवढेच सभासद अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर या जुन्या संघटनेत होते. १९३७ मध्ये संघटनेने जनरल ,ओतर्स आणि युनायटेड स्टेस्ट्रस स्टील या अमेरिकेतील सर्वात मोठया कंपन्यामधील कामगारांचा संप यशस्वी केला. मात्र रिपब्लिक स्टील आणि बेथ्लेहेम स्टील या आणि अन्य कंपन्यातील संप मात्र अयशस्वी झाला. या संपाच्या दरम्यान शिकागो दरम्यान शिकागो शहरातील मेमोरियल डे च्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या संपावरील कामगारावर पोलिसांनी गोळीबार केल्याने ११ कामगारांचा मृत्यू झाला. हा संप मागे घ्यावा लागला असला तरी नॅशनल लेबर रिलेशन्स बोर्डाने दिलेल्या एका निर्णयानुसार या कंपन्यांना कामगारांचा सामुदायिक वाटाघाटी करण्याचा हक्क मान्य करावा लागला; बोर्डाच्या निर्णयावर नंतर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. १९३६-३७ मधील मोटर कारखान्यातील कामगार संपावर गेले. या वेळी केवळ निदर्शने करण्याच्या ऐवजी त्यांनी कारखान्यातच बसून राहण्याचा नवा मार्ग अवलंबला. त्याला सिट इन स्ट्राईक असे म्हणतात. कर्मठ विचारांच्या लोकांनी मात्र या नव्या प्रकारच्या संपावर टीका केली. खाजगी मालमत्तेच्या हक्काची ही पायमल्ली असल्याचे त्यांचे मत होते, नंतर १९३९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने संपाचा हा प्रकार बेकायदेशीर ठरवला.

संघटनेच्या सभासदांचा फायदा करण्याच्या प्रयत्नात काही वेळेस संघटनांनी देशाच्या हिताकडे दुर्लक्ष केले. त्यांच्यापैकी काहींनी तंत्रविज्ञान विषयक प्रगतीला विरोध करून कामगारांचा रोजगार वाचवण्याचा प्रयत्न केला होता. संघटना स्थापन केल्याशिवाय आपल्या न्याय मागण्या मान्य होणार नाहीत अशी कामगारांची पक्की समजूत होती आणि कामगार संघटनांच्या वाढीचे ते मुलभूत कारण होते. नंतरच्या काळात कामगार संघटनांनी अमेरिकेच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीओवनात महत्वाची भूमिका बजावली. हिलमन, ड्यूबिन्स्की, फिलिप मिने आणि वॉल्टर रुथर इत्यादी कामगार नेत्यांन विशेष प्रतिष्ठा होती. १९५५ मध्ये या दोन्ही संघटनांचे एकीकरण झाले, एकत्रित संघटनेच्या सभासदांची संख्या १ कोटी ६० लाख होती.

munotes.in

## ५.९ टेनिसी व्हॅली अथॉरिटी (टी.व्ही.ए.)

पहिल्या महायुद्धाच्या काळात सरकारने मसल्स शोल्स येथे टेनिसी नदीवर वीज निर्मितीसाठी एक धरण बांधले होते. या धरणातील पाण्यापासून निर्माण होणारी वीज टेनिसी नदीच्या खोर्यातील रहिवाशांना मिळावी यासाठी नेब्रास्का राज्यातील सिनेटर नॉरिस यांनी कॉंग्रेस मध्ये एक विधेयक मंजूर करून घेतले असले तरी कूलिज आणि हूवर या दोघ राष्ट्राध्यक्षांनी ते फेटाळून लावले. १९३३ मध्ये टेनिसी व्हॅली अथॉरिटी स्थापन करण्यात आली. तिच्या माध्यमातून सरकारने टेनिसी नदीच्या समग्र खोऱ्याच्या विकासाचा आणि लोककल्याणाचा एक कार्यक्रम हाती घेतला. ७ राज्यातील ४१,००० चौरस मैल क्षेत्राला त्याचा फायदा मिळणार होता. सोव्हिएट रशिया वगळता जगातील नियोजनाचा हा सर्वात मोठा प्रयोग होता. टेनिसी नदीच्या प्रवाहावर धरणे बांधून त्यामधून निर्माण होणारी वीज ७ राज्यांना विकली जाणार होती, खतांचे कारखाने उभे राहणार होते आणि पूर नियंत्रणाची आणि भू-संवर्धनाची उपाययोजना करण्यात येणार होती. त्यामुळे टेनिसी नदीच्या खोऱ्यातील लोकांच्या जीवनमानात लक्षणीय बदल झाला असता. टी.व्ही.ए. णे आपल्या सार्व कार्यक्रमासाठी स्वयंसेवी संघटनांचे सहकार्य स्वीकारले,स्थानिक शेतकरी आणि व्यावसायिक यांच्याशी थेट संपर्क साधला, राजकारणापासून दूर राहून वॉशिंग्टन येथून त्याचे नियंत्रण करण्याचे टाळले.

**भू-संवर्धन :**

टी.व्ही.ए. व्यतिरिक्त न्यु डील कार्यक्रमाने भू-संवर्धनावर अन्य मार्गानेही बराच मोठा खर्च केला. अनेक नैसर्गिक संकटांमुळे आपल्या नैसर्गिक साधनसंपत्ती विषयी नव्याने विचार केला नाही तर एक महान सत्ता या नात्याने अमेरिका फार काळ तग धरू शकणार नाही याची जाणीव अमेरिकन लोकांना झाली. वाणांची कापणी आणि जमिनीची धूप या मुळे पावसाचे पाणी जमिनीत शोषून घेतले जाण्याऐवजी नदीच्या खोऱ्यात वाहून जात असल्याने ओहिओ, मिसिसिपी आणि अन्य नद्यांना पूर येतो. वाऱ्यामुळे जमिनीवरची माती वाहून गेल्याने कान्सास राज्याच्या काही भागात आणि ओक्लोहामा राज्यात धुळीचे वाडगे (डस्ट बाऊल) तयार होऊन त्याचे वाळवंट बनते. टी.व्ही.ए. चे एक संचालक डेव्हिड लिलियेन्थल असा युक्तिवाद करतात की नव्याने वस्ती करू पाहणाऱ्यांच्या कुऱ्हाडींनी झाडांचा बळी घेतल्यापासून प्रथमच अमेरिकन लोकांनी पूर्वीच्या उधळपट्टी प्रमाणे निसर्गाला न जुमानता नव्हे तर मानव आणि निसर्ग एकाच आहेत याची जाणीव ठेऊन आणि त्याचप्रमाणे कृति करून निसर्ग जपण्याचा प्रयत्न केला.

१९३४ मध्ये सॉईल कॉन्झर्वेशन सर्व्हिस (एस.सी.एस.) ही सेवा सुरु केली. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे तालीकरण करण्यास प्रवृत्त करण्याचा तिने प्रयत्न केला तसेच भू-संवर्धनाच्या अन्य मार्गांचा वापर करण्याची सूचना केली. सरकारने वनीकरणाचा एक व्यापक कार्यक्रम हाती घेतला आणि सार्वजनिक जमिनीवरील गुरे चरण्याच्या पद्धतीवर काही बांधणे गतली. मदतकार्य आणि सार्वजनिक कामावरच बराचसा भाग भू-संवर्धनावर खर्च करण्यात आला.

munotes.in

## ५.१० अन्य तपशील

राष्ट्राध्यक्ष हूवर यांनी होम ओनर्स कॉर्पोरेशनची (एच.ओ.सी.) स्थापना केली होती. न्यु डीलच्या काळात तिच्या कार्यक्रमाचा विस्तार झाला. विकत घेतलेल्या घरांच्या कर्जाचे हप्ते न दिल्याने त्यांची घरे जप्त केली जात असत, या कार्यक्रमाने घर मालकांना या संकटापासून वाचवले.

१९३७ मध्ये स्थापन झालेल्या फेडरल हाऊसिंग अॅथॉरिटीणे (एफ.एच.ए.) ने शहर आणि ग्रामीण भागातील गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करून तेथे नवी घरे आणि सदनिका बांधल्या आणि त्या अल्प भाडयाने गरजूंना देणे सुरु केले. १९३८ मध्ये नॅशनल इलेक्ट्रिसिटी स्कीम (इन.इ.एस.) ही योजना सुरु केली गेली. १९३४ मधील नॅशनल रिसोर्सेस बोर्ड (एन.आर.बी.) या मंडळाने देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचे सर्वेक्षण केले.

सरकारने श्रीमंतांच्या उत्पन्नावर जादा दराने कर आकारणी केली. १९३९ मध्ये अतिरिक्त नफ्यावर कर आकारला जाऊ लागला. त्याच वर्षी रूझवेल्ट यांनी न्यास विरोधी कायद्यांच्या आधाराने न्यासांच्या विरोधात कारवाई सुरु केली. परराष्ट्र मंत्री कॉर्डेल हल यांनी अनेक देशांनी करार करून परदेशी व्यापार वाढवण्याचा प्रयत्न केला आणि त्यासाठी आयातीवरील जकात करत कपात केली.

रूझवेल्ट आणि सर्वोच्च न्यायालय आपल्या दुसऱ्या कार्यकालाच्या सुरुवातीला रूझवेल्ट यांनी न्यायपालिकेची सुधारणा करण्याची आवश्यकता नमूद केली. २ वर्षे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यु डीलच्या काही कार्यक्रमाला विरोध करत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या ९ न्यायाधीशांपैकी ४ न्यायाधीश अतिशय कर्मठ विचारसरणीचे होते. खाजगी मालमत्तेच्या अधिकाराला सर्वाधिक संरक्षण देण्याच्या हेतूने घटनेतील तरतुदींचा अर्थ लावत असत, १८८० च्या दशकात न्यायालयाने असा प्रघात पाडला होता. तीन न्यायाधीश उदारमतवादी होते. ते कायदेमंडळाच्या हेतूला अधिक महत्त्व देत असत आणि भाषण सातान्त्र्याची अधिक काळजी करत असत. १९३० मध्ये टॅफ्ट यांच्या जागी चार्ल्स इव्हान्स ह्यु सर-न्यायाधीशपदी आले. त्यांचा कल उदारमतवादाकडे होता आणि न्यायाधीश रॉबर्ट यांची भूमिका मध्यम मार्गी होती. १९३३ ते १९३६ या काळात सर्वोच्च न्यायालयाने न्यु डीलचे अनेक कार्यक्रम घटनाबाह्य ठरवले होते. १९३५ चा नॅशनल इंडस्ट्रीयल रिकव्हरी अॅक्ट आणि १९३६ चा अॅग्रिकल्चरल अॅक्ट हे त्यापैकी महत्वाचे कायदे घटनाबाह्य ठरले होते. त्यापैकी नॅशनल इंडस्ट्रीयल रिकव्हरी अॅक्ट एकमताने तर अॅग्रिकल्चरल अॅक्ट ५ विरुद्ध ४ मतांनी घटनाबाह्य ठरवण्यात आले होते. वयस्क आणि कर्मठ विचारांचे न्यायाधीश न्यु डीलचा कार्यक्रम अडवत होते. याचा एक अर्थ असा होता की न्यायाधीश रॉबर्ट जोपर्यंत कर्मठ विचारांच्या न्यायाधीशांच्या बाजूने मत देत होते तोपर्यंत केंद्र किंवा राज्य सरकारांना रोजगार आणि कामाचे तास नियमित करता येणार नाहीत.

रूझवेल्ट यांनी असा प्रस्ताव मांडला की वयाच्या ७० वर्षानंतर निवृत्त न होणाऱ्या प्रत्येक न्यायाधीशाच्या मदतीसाठी एक अतिरिक्त न्यायाधीश नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना असावा. सर्वोच्च न्यायालयाचे ६ न्यायाधीश वयाची ७० वर्षे पूर्ण केलेले

असल्याने न्यायाधीशांची एकूण संख्या १५ होईल. रूझवेल्ट यांच्या या योजनेला कर्मठ आणि उदारमतवादी अशा दोघांनी कडाडून विरोध केला. अनेक प्रागतिक विचारांच्या लोकांना असे वाटले की त्यामुळे न्यायपालिकेचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकेल. रूझवेल्ट यांनी आपला उद्देश साध्य करण्यासाठी अधिक सरळ मार्गाचा अवलंब करावा असे त्यांना वाटत होते. घटनेची दुरुस्ती करून त्यांचा हेतू साध्य होण्यासारखा होता. कॉंग्रेसमध्ये याविषयी दीर्घ आणि कडवट चर्चा झाली. ही चर्चा सुरु असताना रॉबर्ट या न्यायाधीशांचे मत बदलले, त्यांनी वॉशिंग्टन राज्याच्या किमान वेतनाच्या कायद्याला मान्यता दिली. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने वॅग्नर आणि सोशल सिक्युरिटी ॲक्ट या कायद्यांनाही मान्यता दिली. कर्मठ विचारांच्या न्यायाधीशांनी राजीनामा दिल्याने रूझवेल्ट यांना ह्युगो ब्लॅक यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती करता आली. या घडामोडीमुळे सर्वोच्च न्यायालयाची सुधारणा करण्याची गरज उरली नाही. तरीही शेवटी रूझवेल्ट यांचे उद्दिष्ट साध्य झाले. आपल्या दुसऱ्या आणि तिसर्या कार्यकालात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या ८ न्यायाधीशांची नियुक्ती केली. सर्वोच्च न्यायालय आता उदारमतवाद्यांचा बालेकिल्ला झाला. रूझवेल्ट यांच्या दुसऱ्या कार्यकालाच्या सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयापाशी त्यांचा झालेला वाद हा न्यु डीलच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा होता.

## ५.११ न्यु डीलचे परिणाम

रोजगाराच्या संधीचे आणि औद्योगिक उत्पादनाचे पुनरुज्जीवन करण्याचे न्यु डीलचे प्राथमिक उद्दिष्ट साध्य आले नाही. १९३७ मध्ये ७५ लाख अमेरिकन बेरोजगार होते आणि राष्ट्रीय कर्ज ७७.८० कोटी डॉलरचे झाले होते. ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादना वाढले असले तरी नव्या गुंतवणुकीचे प्रमाण अत्यल्प होते. समाजाची बचत व्यवहारात आणण्याचे काम पूर्वी खाजगी गुंतवणूकदार करत असत. गुंतवणुकीची जबाबदारी आता सरकारने आपल्या हाती घेतली. १९३७ मध्ये सरकारने आपला खर्च कमी केल्यावर आर्थिक व्यवहार मंदावले.

न्यु डील कार्यक्रमाने खाजगी उपक्रमशीलतेवर हल्ला केला, नोकरशाहीचे जाचक नियम वाढवले, राष्ट्रीय कर्ज वाढवले आणि कामगार वर्गाला अनेक खास अधिकार दिले, त्यामुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या वातावरणात उद्योगांची वाढ करणे अशक्य झाले असा युक्तीवाद न्यु डील कार्यक्रमाचे विरोधक करत असत.

दुसरीकडे न्यु डील कार्यक्रमाचे समर्थक हा कार्यक्रम अपुरा असल्याने तो अयशस्वी झाला होता असा दावा ते करत असत. सर्वसाधारण अमेरिकन माणसाची क्रयशक्ती वाढवण्यासाठी उत्पन्नाचे अधिक चांगले वाटप करण्याची गरज होती असे त्यांचे मत होते. खाजगी गुंतवणूक कमी होने प्रगल्भ अर्थव्यवस्थेचे अपरिहार्य असल्याचा युक्तीवाद ते करत असत.

न्यु डीलचा कार्यक्रम क्रांतिकारी असल्याचे वर्णन करणे अतिशयोक्तीचे होईल. मुलभूत आर्थिक उपक्रमांची मालकी आणि नियंत्रणात काहीच बदल झाला नव्हता. खरेतर १९२० च्या दशकात महाकाय कंपन्या जेवढया महाकाय होत्या त्यापेक्षा त्या त्या १९४० च्या

दशकात अधिक महाकाय झाल्या. न्यु डील कार्यक्रमाने आर्थिक व्यवस्थेमध्ये दोन मूलभूत बदल केले होते. १. कामगार आणि शेतकऱ्यांचे रक्षण करून या कार्यक्रमाने शेतकरी आणि कामगार यांचे संघटन केले आणि त्यामुळे महाकाय कंपन्या आणि उद्योगावर वाचक ठेऊ शकेल असा एक नवा वर्ग निर्माण झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) न्यु-डील कार्यक्रम कोणत्या राष्ट्राध्यक्षाने घोषित केला होता ?

२) न्यु-डील कार्यक्रमाचे परिणाम स्पष्ट करा.

## ५.१२ समारोप

न्यु डील कार्यक्रमाने पूर्वी पेक्षा केंद्र सरकारची जबाबदारी अधिक व्यापक केल्याने अर्थव्यवस्थेची तेजी मंदीवर नियमित करणे आणि गोरगरिबांचे अधिक चांगल्या प्रकारे रक्षण करून त्यांना सुरक्षाकवच पुरवणे सरकारला शक्य झाले. सारांश न्यु डील कार्यक्रमाने पूर्वीच्या समृद्धीचे पुनरुज्जीवन केले नसले तरी त्याने सार्वजनिक क्षेत्रात नवे चैतन्य निर्माण केले. त्याच्या भविष्यावर नजर ठेवण्याच्या उत्साही दृष्टिकोनामुळे अमेरिकन लोकांचे नीतिधैर्य उंचावले. उपासमार होणार्या गरिबांसाठी होणाऱ्या गरिबांसाठी सरकारने काम पुरवलेच पाहिजे असा आग्रह धरल्याने जागा आशेने घेतली. सार्वजनिक कार्यक्रम हाती घेऊन त्याने राष्ट्राच्या संपत्तीमध्ये प्रचंड वाढ केली. अर्थव्यवस्था सावरण्यासाठी न्यु डील कार्यक्रमाने थेट प्रयत्न केले असले तरी त्यापेक्षा कार्यक्रमाचे टी.व्ही.ए., धरण बांधणी, ग्रामीण विद्युतीकरण भू-संवर्धन आणि सांस्कृतिक उपक्रम असे अवांतर कार्यक्रम अधिक प्रभावी होते.

## ५.१३ प्रश्न

१. ९२९ च्या महामंदीची विविध कारणे नमूद करा.

२. न्यु डील म्हणजे काय ? महामंदीचा मुकाबला त्याने कसा आणि कितपत केला ?

३. न्यु डील कार्यक्रमाच्या विविध परिणामांची चर्चा करा.

## ५.१४ संदर्भ ग्रंथ

१. पार्क्स, हेन्री बामफरर्ड, द युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका : अ हिस्तारीम सायंटिफिक बुक एजन्सी, कोलकत्ता.

२. हिल, सी. पी. अ हिस्टरी ऑफ द युनायटेड स्टेट्स. अर्नाल्ड-हायनेमन इंडिया.

❖❖❖❖

# ६

# नागरी हक्क चळवळ
# (HUMAN RIGHTS MOVEMENT)

**घटक रचना**

६.० उद्दिष्टये

६.१ प्रस्तावना

६.२ नागरी हक्क चळवळ

६.३ समारोप

६.४ प्रश्न

## ६.० उद्दिष्टये

या घटकाचा अभ्यास करण्यासाठी पुढील उद्दिष्टये निश्चित केली आहे.

- अमेरिकन नागरी हक्क चळवळ समजून घेणे.
- अमेरिकन नागरिक चळवळीत मार्टिन ल्युथर किंगचे योगदान अभ्यासणे.

## ६.१ प्रस्तावना

अमेरिकन नीग्रो जे आता आफ्रिकन अमेरिकन या नावाने ओळखले जातात, स्त्रीया आणि कामगारांना समाजातील आपले स्थान मिळवण्यासाठी दीर्घ काळ संघर्ष करावा लागला. त्यांच्या काही मागण्या मान्य झाल्या असल्या तरी त्यांना अद्याप काही अन्याय सहन करावा लागतो. त्यांच्या पैकी प्रत्येकाला न्याय मिळवण्यासाठी जो संघर्ष  कराव लागला त्याचे थोडक्यात वर्णन या पाठात करण्यात आले आहे.

सामाजिक मूल्ये आणि प्रत्यक्ष व्यवहारामध्ये जेव्हा तफावत असते तेव्हा संघर्ष अपेक्षित असतो. अमेरिकन समाजातील समानतेच्या मूल्यावरून झालेला संघर्षाला हे याचे लक्षणिय उदाहरण होते. सर्व जण जन्मतः समान असतात आणि प्रत्येक व्यक्तीला तिचे व्यक्तीमत्त्व विकसित करण्याची आणि यश संपादन करण्याची समान संधी मिळाली पाहिजे ही अमेरिकन समाजाची परंपरागत धारणा आहे. तथापि, प्रत्यक्ष व्यवहारात संधीची समानता हे वास्तव नसून एक मिथक होते, कारण वंश आणि वर्ग या दोन्ही घटकांनी तिची अंमलबजावणी मर्यादित होत असे. वसाहतीच्या काळात निग्रोंना अमेरिकेत आणण्यात आले असले तरी त्यांना समाजातील उच्च वर्गात सामील होण्याची किंवा अमेरिकन समाजात पूर्णपणे एकरूप होण्याची संधी कधीच मिळाली नाही.

munotes.in

## ६.२ नागरी हक्क चळवळ

### ६.२.१ अमेरिकेतील नीग्रो :

२० व्या शतकाच्या सुरुवातीला ९० टक्के नीग्रो दक्षिणेतील राज्यात राहात होते आणि त्यापैकी ७५ टक्क्यापेक्षा जास्त शेतमजूर होते. समाजातून त्यांना अलग ठेवण्याचे धोरण कायद्यानुसार अवलंबण्यात येत असे. त्यांना अलग ठेवण्याचे आणि पक्षपाताच्या धोरणाला किंवा नियमांना जिम क्रो नियम असे नाव होते. जिम क्रो नियमानुसार सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक वाहनात आणि रोजगाराच्या संधीमध्ये त्यांच्या विषयी पक्षपात केला जात असे. तत्त्वतः श्वेत वर्णिय आणि कृष्ण वर्णिय (निग्रो) यांना शैक्षणिक आणि अन्य सुविधा समान असल्या तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र कृष्ण वर्णियांना मिळणाऱ्या सुविधा कमी दर्जाच्या असत. उदाहरणार्थ १९३० मध्येही दक्षिणेतील राज्ये प्रत्येकी श्वेतवर्णिय मुलाच्या सार्वजनिक शिक्षणावर ४५.६३ डॉलर तर प्रत्येक कृष्ण वर्णिय मुलाच्या सार्वजनिक शिक्षणावर फक्त १४.९५ डॉलर खर्च करत असत. उत्तरेतील राज्यात अलगतेचे धोरण आधिकृत रितीने अमलात येत नसले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र सामाजिक दबावामुळे त्याची अंमलबजावणी होत असे, विशेषतः रोजगाराच्या आणि राहत्या घरांच्या बाबतीत त्याची अंमलबजावणी अधिक प्रमाणात होत असे. शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या आणि राहत्या घरांच्या बाबतीत त्याची अंमलबजावणी अधिक प्रमाणात होत असे. शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या मर्यादित संधीमुळे कृष्णवर्णियांना अनेक आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत असे. दारिद्र्यासारख्या भौतिक समस्यांबरोबरच ज्या समाजात त्यांना श्वेत वर्णियांपेक्षा हीन दर्जाचे मानले जात असे त्या समाजाशी जुळवून घेण्याच्या कठीण भावनिक समस्येला तोंड द्यावे लागत असे.

### ६.२.२ कृष्णवर्णिय आणि २० शतक :

२० व्या शतकात कृष्ण वर्णियांची परिस्थिती बरीच सुधारली. त्यांच्या पैकी अनेकांनी, विशेषतः दोन महायुद्धाच्या काळात दक्षिणेतील राज्यातून उत्तरेकडील राज्यात आणि शेत जमिनीवरून शहरात स्थलांतर केले. शहरातील गलिच्छ वस्त्यामध्ये त्यांना राहावे लागत असले तरी त्यांच्या राहणीमानात आणि सांस्कृतीक दर्जामध्ये बरीच सुधारणा झाली. १९५० पर्यंत निम्म्यापेक्षा जास्त कृष्ण वर्णिय शहरात आणि १/३ पेक्षा जास्त दक्षिणेतील राज्यांच्या बाहेर राहत असत. उद्योग आणि वहातुक क्षेत्रामध्ये त्यांना नव्या रोजगारच्या संधी मिळू लागल्या; शैक्षणिक सोयीमध्ये वाढ झाली आणि निरक्षरतेचे प्रमाण १९१० मध्ये ३० टक्के होते, ते १९४० मध्ये १० टक्क्यापर्यंत खाली आले. कृष्ण वर्णिय व्यवसायिकांचा आणि व्यवसायाचा एक नाव वर्ग उदयाला आला आणि त्यांच्या पैकी काहींनी क्रिडा, करमणुक आणि कला या क्षेत्रामध्ये राष्ट्रीय पातळीवर नाव मिळवले. श्वेत वर्णियांच्या मदतीने काही कृष्ण वर्णियानी द नॅशनल असोसिएशन फॉर द अडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पिपल या सारख्या संघटना स्थापना केल्या. या संघटनेला घटनेने कृष्ण वर्णियांना  दिलेले दिलेले अधिकार मिळावेत या साठी चळवळ करत असत. दुसऱ्या महायुद्धानंतर रंगविषयक पूर्वग्रह अनेक श्वेत वर्णियांच्या सद्विविवेक बुद्धीला पटेनासा झाला. अमेरिकेमध्ये जोपर्यंत पक्षपाताचे धोरण राबवले जाते तोपर्यंत सर्व देशातील स्वातंत्र्याचा पुरस्कार आपण करतो या अमेरिकेच्या दाव्याविषयी लोकांच्या मनात शंका निर्माण होईल.

उत्तरेकडील राज्यातील अनेक कृष्णवर्णियांनी रिपब्लिकन पक्षाचा त्याग करून त्यांना मदत करेल अशा कोणत्याही पक्षाला अधिक जवळ केले.

सरकारी कामाचे ठेके घेणाऱ्या उद्योगातील पक्षपात समाप्त करण्यासाठी १९४१ मध्ये राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांनी फेअर एम्प्लोयमेंट कमिटी या समितीची नेमणूक केली. दक्षिणेतील काही राज्यांनी याच उद्देशाने काही कायदे केले. १९४० च्या दशकात दक्षिणेतील राज्यातील कृष्ण वर्णियांना प्राथमिक निवडणुकीत मतदानाचा, ज्युरीवर काम करण्याचा आणि ज्या ठिकाणी त्यांच्या साठी असणाऱ्या शैक्षणिक सोयी अपुऱ्या आहेत त्या ठिकाणी श्वेतवर्णियांच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याचा हक्क असल्याचे अनेक निवाडे सर्वोच्च न्यायालयाने दिले. दरम्यान एक कृष्ण वर्णिय सैन्यातील सेनापतीपदी नियुक्त झाला, डॉक्टर राल्फ बुंश युनायटेड नेशन्सच्या ट्रस्टीशिप खात्याचे संचालक झाले, अनेक कृष्ण वर्णिय महाविद्यालयीन प्राध्यापक झाले, अनेक कृष्णवर्णिय व्यावसायिक फूट बॉल संघात दाखल झाले. १९४८ मध्ये जॅकी रॉबिन्सन हा कृष्ण वर्णिय बेसबॉल खेळाडू ब्रुकलिन डॉजर्स या बेसबॉल सामील झाला. १९५२ आणि १९५६ च्या निवडणूकीत दहा लाखापेक्षा जास्त कृष्ण वर्णियांनी त्यांच्या मतदानाचा हक्क बजावला.

१९५० च्या दशकात केंद्र सरकारचा कार्यकारी विभाग आणि न्यायपालिका यांच्या मदतीने अनेक कृष्ण वर्णियांनी आपले नागरी हक्क मिळवण्यासाठी धडाधडीने प्रयत्न केले आणि पक्षपाताच्या विरोधात अनेक सुसंघटीत आणि शिस्तबद्ध निषेध मोर्चे आयोजित केले. आलाबामा राज्यातील मॉन्टेगोमरी येथील कृष्ण वर्णियांनी स्थानिक बस सेवेच्या विरोधात दीर्घ बहिष्कार आयोजित केला. एप्रिल, १९५६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक परिवहन सेवेमधील अलगीकरण बेकायदेशीर असल्याचा निवाडा दिला. सार्वजनिक शाळांमधील अलगीकरण हा वादाचा मुख्य मुद्दा होता. मे, १९५४ मध्ये शाळामधील अलगीकरण हे घटनेच्या १४ व्या दुरुस्तीने ग्वाही दिलेल्या समानतेच्या वैधानिक हक्काचा भंग असल्याचा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिला. अलगीकरणाची प्रक्रिया दीर्घकालीन आणि त्रासदायक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले असले तरी त्या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत असेही मत न्यायालयाने व्यक्त केले. पुढील ४ वर्षात फक्त डिस्ट्रिक ऑफ कोलंबिया राज्यातील अलगीकरण संपवण्यात आले. सप्टेंबर, १९५७ मध्ये आरकान्सा राज्यातील लिटिल रॉक येथील कृष्णवर्णिय मुलांना माध्यमिक शाळात प्रवेश मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारला हस्तक्षेप करावा लागला. १९६४- ६५ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांनी कृष्ण वर्णियांच्या नागरी हक्कांना जवळपास पूर्ण संरक्षण देणारी दोन विधेयके मंजूर केली.

१९५० आणि १९६० च्या दशकात कृष्ण वर्णियांच्या जहाल चळवळीत लक्षणीय वाढ झाली. चळवळीच्या नेत्यांना श्वेत वर्णियांच्या बरोबरीने हक्क हवे होते. सक्रिय चळवळ केल्याशिवाय आपली मागणी मान्य होणार नाही याची त्यांना कल्पना आली. त्यांनी निषेध मोर्चे आयोजित केले, पक्षपात थांबवण्यासाठी त्यांनी कायद्याची मदत घेतली आणि मोर्चे आणि निदर्शने करून आपली गाऱ्हाणी वेशीवर टांगली.

### ६.२.३ मार्टिन ल्युथर किंग :

१९२९ मध्ये जन्मलेल्या मार्टिन ल्युथर किंग या बॅप्टिस्ट धर्मगुरुनी नागरी हक्कांच्या चळवळीत महत्त्वाची कामगिरी केली. महात्मा गांधींच्या अहिंसा आणि सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानात त्यांना खास स्वारस्य होते. १९५४ मध्ये ब्राऊन विरुद्ध बोर्ड ऑफ एज्युकेशन या खटल्याचा निवाडा करताना सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक शाळातील सर्व प्रकारचे अलगीकरण घटनाबाह्य असल्याचे स्पष्ट केले. तथापि, श्वेतवर्णियांनी कृष्ण वर्णिय विद्यार्थ्यांना सार्वजनिक शाळातून प्रवेश मिळू नये यासाठी हिंसेचा अलवंब केला. १९५५ - ५६ मध्ये आलाबामा राज्यातील मॉन्टेगोमरी येथील सार्वजनिक परिवहन व्यवस्थेवर ३८१ दिवसाचा बहिष्कार आयोजित केला. नागरी हक्कांच्या चळवळीत तो महत्त्वाचा  टप्पा होता. त्यामुळे मॉन्टेगोमरी शहरातील सार्वजनिक परिवहन सेवेतील अलगीकरण पूर्णपणे थांबले होते. १९६३ मध्ये त्यांनी वॉशिंग्टन येथे १,५,००० कृष्णवर्णियांचा एक भव्य मोर्चा आयोजित केला. नागरी हक्कांच्या चळवळीवर या मोर्चाचा फार मोठा प्रभाव पडला. १९६४ मध्ये त्यांना शांततेचा  नोबेल पुरस्कार बहाल करण्यात आला. ४, एप्रिल, १९६८ रोजी मेम्फिस येथे त्यांचा वध करण्यात आला. १९६० च्या दशकाच्या मध्याला जहाल मतवाद्यांच्या एका गटाने कृष्ण वर्णियांच्या संघटनांचा ताबा घेतला, त्यांनी नागरी हक्क मिळवण्यासाठी अधिक जहाल कारवाईचा पुरस्कार केला. कृष्णवर्णियांच्या नागरी हक्कासाठी फक्त कृष्णवर्णियच लढा देऊ शकतील अशी त्यांची धारणा होती. स्टुडंट नॉन व्हॉएलन्स कमिटीचे अध्यक्ष स्टॉकले कारमायकेल आणि काँग्रेस फॉर रेशियल इक्वालिटीचे अध्यक्ष फ्लॉइड मॅककिसिक हे नेते या नव्या चळवळीचे नमुनेदार प्रवक्ते होते. कृष्ण वर्णियांनी आपली सांस्कृतिक आणि वांशिक ओळख जतन करावी असा त्यांचा आग्रह होता. हिंसक कारवाया त्यांना वर्ज्य नव्हत्या. *ब्लॅक पॉवर* ही त्यांची आवडती घोषणा होती.

१९६५ मध्ये कृष्णवर्णियांच्या दारिद्र्याचा आणि वंचितावस्थेचा अनेक हिंसक दंग्यामध्ये स्फोट झाला. ज्या संस्कृतीने आपल्याच कृष्णवर्णिय बांधवाना चरितार्थाची योग्य संधी पुरवली नाही त्या संस्कृतीच्या विरोधातील रागाची स्वाभाविक अभिव्यक्ती या दंग्यामध्ये झाली. लवकरच हे दंगे सर्वत्र पसरले. १९६८ मधील मार्टिन ल्युथर किंग यांच्या हत्येचे असेच दंगे सर्वत्र झाले.

**आपली प्रगती तपासा**

१. अमेरिकन निग्रो लोकांची पार्श्वभूमी लिहा.

२. मार्टीन ल्यूथर किंग यांच्यावर थोडक्यात लिहा.

## ६.३ समारोप

अमेरिकेमध्ये कृष्णवर्णीयांच्या न्याय हक्कासाठी चालविलेली महत्त्वाची चळवळ म्हणून नागरी हक्क चळवळीकडे बघितले जाते.

अमेरिकेमध्ये कृष्णवर्णीयांना समानतेचे अधिकार मिळत नव्हते. वर्णभेदामुळे अमेरिकन समाजात काळा-गोरा वाद मोठया प्रमाणात फोफावला होता. यासाठी अनेक वर्ष संघर्ष करावा लागला होता.

दुसऱ्या महायुद्धानंतर या चळवळीला अधिक गती येऊन यामध्ये मार्टिन ल्युथर किंग यांच्या सारख्या धर्मगुरूंनी नागरी हक्क चळवळीमध्ये कृष्णवर्णीयांना त्यांच्या न्याय हक्कासाठी महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानाच्या आधारे कार्य केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना १९६४ मध्ये शांततेसाठी नोबेल पुरस्कार बहाल करण्यात आला होता.

नागरी हक्क चळवळीमुळे तेथील वर्णभेदाच्या समस्येची तीव्रता कमी होण्यास मदत झाली होती.

## ६.४ प्रश्न

१. नागरी हक्क चळवळीची सविस्तर माहिती सांगा.

२. नागरी हक्क चळवळीमध्ये मार्टिन ल्यूथर किंग यांनी दिलेल्या योगदानाची चर्चा करा?

❖❖❖❖

munotes.in

७

# आधुनिक अमेरिका (कला, शिक्षण व साहित्य)

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टये

७.१ प्रस्तावना

७.२ अमेरिकन कला

७.३ अमेरिकन शिक्षण

७.४ अमेरिकन साहित्य

७.५ समारोप

७.६ प्रश्न

## ७.० उद्दिष्टये

- अमेरिकन कलेचा अभ्यास करणे.
- अमेरिकन शिक्षणपद्धती समजून घेणे.
- अमेरिकन साहित्याचे मूल्यमापन करणे.

## ७.१ प्रस्तावना

अमेरिकन समाजामध्ये अभिव्यक्ति पॉप कला, छायाचित्रणकला, नृत्य, संगीत, स्थापत्य इ. कलेच्या क्षेत्रांमध्ये मोलाची प्रगती झाली. २० व्या शतकातील अमेरिकन समाजामध्ये शिक्षणाच्या क्षेत्रातही चांगली प्रगती झाली व ती आधुनिक अमेरिकेच्या विकासात कारणीभूत ठरली. जसजसा शिक्षण व कला यांचा विकास होत गेला तसतशी लोकांची साहित्यातील रुचीही वाढू लागली आणि नवनवीन दर्जेदार साहित्यिक आपआपल्या कौशल्याने व अभिजात साहित्यिक प्रेरणांनी साहित्य क्षेत्रात भर घालू लागले.

## ७.२ अमेरिकन कला

एका नव्या कला प्रकारचा झालेला उदय ही दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील अमेरिकन सांस्कृतिक जीवनातील सर्वात महत्त्वाची आणि गाजलेली घटना होती, त्यामुळे अमेरिकन चित्रकला जगभरात विशेष प्रभावी ठरली. नामवंत टीकाकार आयर्विंग सँडलर तिला अमेरिकन चित्रकलेचा महान विजयक असे म्हणतात. १९४५ मध्ये अमूर्त चित्रकलेची

तथाकथित न्युयॉर्क शाखा निर्माण झाली तेव्हा पासून ते १९८० च्या दशकाच्या मध्यापर्यंत सुमारे ४० वर्षे अमेरिकन चित्रकलेचा हा प्रभाव टिकून होता. चित्रकलेच्या या नव्या अनेक नवे कला प्रकार आणि कलाकार पुढे आले.

### ७.२.१ अमूर्त अभिव्यक्तिवाद (एक्सप्रेशनिझम) :

चित्रकलेचा हा नवा प्रकार नकाराच्या एका मालिकेतून निर्माण झाला. चित्रकलेच्या अगदी शुद्ध घटकाचा अपवाद वगळून अन्य सर्व घटक नाकारण्यात आले. अमेरिकन सांस्कृतिक जीवनापासून अमूर्त अभिव्यक्तिवाद अतिशय दूरवर होता. नंतरच्या काळात कलेचा या प्रकारची टीकाकारांनी एका नव्या आणि कमी तीव्र नजरेने समिक्ष केली. अमूर्त अभिव्यक्तीमध्ये अनेक पैलू सामान्य जीवनापासून फटकून राहत असले तरी अमेरिकन जमिनीची रम्य चित्रे (लँडस्केप) आणि १९ व्या शतकातील जमिनीच्या रम्य चित्रकलेपासून (लँडस्केप पेंटिंग) तिने स्फूर्ती घेतली होती.

१९५० च्या दशकात अमेरिकन चित्रकारांच्या एका गटाने कलेवर आपले निर्विवाद वर्चस्व कायम ठेवले होते. त्यांनी आपल्या चित्रशाळा (स्टुडीओ) आणि रास्ता किंवा जनसामान्यांचे जीवन यांच्यातील संवादाचेस्वरूप बहाल केले. जॅस्पर जॉन्स या चित्रकाराने आपल्या चित्रांसाठी अमेरिकन जीवनातील अतिशय सामान्य आणि क्षुल्लक चिन्हांची निवड केली. उदाहरणार्थ, अमेरिकन संघराज्यातील ४९ राज्यांचे नकाशे आणि त्यांचे ध्वज इत्यादींची चित्रे काढली. रॉबर्ट रॉशेनबर्ग या त्यांच्या समकालीन चित्रकाराने हाच संवाद एका नव्या प्रकारे पुढे चालवला. त्यांच्या चित्रामध्ये पडद्यावरील चित्रांची छापील सरमिसळ (कोलाज) असे, ही चित्रे विविध संपर्क माध्यमांतून निवडलेली असत. वैयक्तिक उपयोगाच्या विविध वस्तू आणि चिन्हांचा त्यामध्ये समावेश असे. जोसेफ कॉर्नेल हे चित्रकार एकांतवासात कलेची साधना करत, त्यांच्या चित्रामध्ये दैनंदिन जीवनातील अनेक वस्तूमध्ये एक प्रकारची कवितेची जाणीव भरून राहिल्याचा भास होतो, त्यांच्या कवितेच्या या भावनेच्या अन्य चित्रकारांवर खोलवर परिणाम झाला.

### ७.२.२ पॉप कला :

१९६० च्या दशकात पॉप कला या नव्या कलाप्रकाराचा उदय झाला. सामन्यांची संस्कृती आणि चित्रकला यांचा समन्वय एवढा बेमालूम आणि स्पष्ट झालेला आढळतो की त्यांचा परिणाम निश्चितच खोलवर झाल्याशिवाय झाल्याखेरीज राहत नाही. अँडी वहॉल, रॉय लिचटेनस्टाइन आणि क्लेस ओल्डेनबर्ग इत्यादी चित्रकारांनी जनसामान्यांची संस्कृतीची शैली आणि त्यामधील विषय स्वीकारले; कॉमिक्स, लिपस्टिक इत्यादी विषय त्यांचे अतिशय गंभीरपणे चित्रण केले. असे गंभीर चित्रण पूर्वी फक्त धार्मिक मूर्तींचे केले जाई. ओल्डेनबर्ग यांनी आगीचा नळ, आईसक्रिमचा तुकडा केळी इत्यादी अतिसामान्य वस्तूंची चित्रे काढली. लिचटेनस्टाइन यांनी कॉमिक पुस्तकांतील चित्रांचे तंत्र वापरून आधुनिक चित्रकलेची नावाजलेली चित्रे संक्षिप्त स्वरुपात सादर केली.

फ्रॅन्क स्टेला यांच्यासारख्या चित्रकारांनी सध्या आणि टोकदार भूमिती आकारापासून करड्या अमूर्त कलेची परंपरा पुढे चालवली. काही अन्य कलाकारांनी रस्त्यातील मूर्ति आणि चित्रातून स्पुर्ती घेऊन आलेली चित्रकला सादर केली. मेरी मिम्स, ॲलिक्स

आयकॉक, जेम्स टरेल आणि रॉबर्ट इर्विन इत्यादी १९७० आणि १९८० च्या दशकातील काही चित्रकारांनी अमेरिकन कला आणि अमेरिकन जीवनातील दुरावा कमी करण्याचा प्रयत्न केला, या उद्देशाने त्यांनी सार्वजनिक ठिकाणी शिल्पे उभी केली. त्यांची कला सार्वजनिक कलाफ किंवा सार्वजनिक ठिकाणचे शिल्पक या नावाने ओळखली जाते. वैराण आणि उजाड ठिकाणी भव्य शिल्पे उभी करण्याच्या कल्पनेचा त्यांनी त्याग केला, त्या ऐवजी जेथे आपली कला येताजाता लोकांच्या नजरेस पडतील अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याचे पसंत केले.

### ७.२.३ छायाचित्र कला :

एक महत्वाची कला म्हणून छायाचित्र कलेला मान्यता मिळाली. २० व्या शतकाच्या प्रथमार्धामध्ये अमेरिकन छायाचित्रकारांनी आपली कला नेहमीच्या छायाचित्राच्या कल्पनेपासून दूर नेऊन तिला एखादा नेमका क्षण पकडणारी ललित कला बनवण्याचा प्रयत्न केला. त्यांची कला जुन्या चित्रकारांच्या परंपरेमध्ये शोभत असे. दुसऱ्या महायुद्धानंतर छायाचित्रकारांनी माध्यमांतील छायाचित्र आणि सुंदर वस्तू आणि कला वृत्तपत्रीय छायाचित्र कला यांच्यामधील अंतर ओलांडण्याचा प्रयत्न केला. रॉबर्ट मेपलथ्रोप, डायन अर्बस, रिचर्ड अव्हेडॉन आणि इर्विंग पेन या छायाचित्रकारांनी जुन्या पद्धतीची व्यक्तींची छायाचित्रे आणि आधुनिक फॅशनची छायाचित्रे या दोन्ही दगडावर पाय ठेवले. त्यांनी छायाचित्रे वस्तूसंग्रहालयात आणि मासिकांमध्ये प्रदर्शित केली जाई.

### ७.२.४ रंगभूमी :

मोठया प्रमाणातील पुनर्निर्मितीच्या तंत्राच्या शोधामुळे कलेच्या सर्व प्रकारामध्ये अमेरिकन रंगभूमीचे कदाचित सर्वाधिक नुकसान झाले होते. २० शतकाच्या सुरुवातीला ब्रॉन्सन हॉवर्ड, ऑगस्टस थॉमस आणि क्लाइड फिट्च या सारख्या कही नाटककारांनी काही दर्जेदार सामाजिक सुखांतिका (कॉमेडी) लिहिल्या होत्या. १९१५ मध्ये वॉशिंग्टन स्केअर प्लेयर्स, जी प्लेहाऊस ही २ हौशी नाटयमंडळे संघटित करण्यात आली. या नाटयमंडळातून युजिन ओफनिल या सारखे प्रथम दर्जाचे नाटककार पुढे आले. ग्ब्बाउंड इस्ट फॉर कार्डिफफही त्यांची पहिली नाटयकृती १९१६ मध्ये प्रॉव्हिन्सटाऊन प्लेहाऊस या नाटयमंडळाने रंगभूमीवर आणली.

१९२० च्या दशकात सिडने हॉवर्ड, एस. एन. बेहरमन, फिलिप बॅरी आणि जॉर्ज केली यांच्या सारखे काही सुखांतिकाचे आणि उपरोधिक नाटककार पुढे आले, उदारमतवाद हा त्यांच्या नाटयकृतींचा पाया होता. सामाजिक समस्या वास्तववादी पद्धतीने सादर करण्याचे आलेले अनेक प्रयोग हा त्या दशकातील प्रमुख विषय होता. १९३० च्या दशकातील जहाल मतवादामुळे क्लिफर्ड ओडेट्स हे प्रतिभावान नाटककार पुढे आले. त्यांनी आपल्या नाटयकृतीमधून मध्यम वर्गाच्या वैयर्थतेचे केलेले चित्रण त्यांच्या क्रांतीवर असलेल्या श्रद्धेपेक्षा अधिक वास्तववादी होते. १९४० आणि १९५० च्या दशकांत अनेक प्रतिभावान नाटककार पुढे आले. आर्थर मिलर यांनी आपल्या नाटयकृती मधून सादर केलेले अमेरिकन समाजाचे जहाल चित्र रंगवून अमेरिकन व्यक्तिवादाच्या अपयशाचे विश्लेषण केले. विल्यम इंज यांनी खुल्या लैंगिकतेचे उदात्तीकरण केले ; मध्यम वर्गीय समाजाच्या सर्व दोषांवर तो रामबाण उपाय असल्याचे त्यांचे मत होते. १९५० आणि १९६० च्या दशकांत ब्रॉडवे बाह्य

रंगभूमीचा आश्चर्यकारक उदय झाला. तुटपुंज्या साधन सामुग्रीवर चालत असलेल्या या रंगभूमीचे नाटय विषय आणि सादरीकरणाची नवी तंत्रे या संबंधी अनेक प्रयोग केले.

अशा रीतीने जनसामान्यांचे मनोरंजन करणे हे अमेरिकन रंगभूमीचे प्रमुख कार्य होते; संगीत सुखांतिका तिची प्रमुख अभिव्यक्ति होती. ब्रॉडवे या मुख्य रंगभूमीवर सादर केलेल्या संगीतिकांच्या बौद्धिक आणि सौंदर्यात्मक दर्जामध्ये झालेली सुधारणा हे रंगभूमीच्या इतिहासाचे सर्वाधिक आशादायक वैशिष्टय होते.

### ७.२.५ नृत्य :

रंगभूमीशी निगडित असलेल्या नृत्य या कलाप्रकाराचा लक्षणीय विकास झाला. २० व्या शतकाच्या सुरुवातीला इसाडोरा डंकन ही महान नृत्य दिग्दर्शिका उदयाला आली. लहरी, बेशिस्त आणि अहंमन्य इसाडोराच्या आयुष्याची शोकांतिका झाली. त्यांनी नृत्य या कलाप्रकाराला भावनेच्या उत्स्फूर्त अभिव्यक्तीचे साधन बनवून युरोप आणि अमेरिकेतील नृत्याच्या तंत्रामध्ये परिवर्तन केले होते. त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रयोगांमुळे बॅले हा अभिनव नृत्यप्रकार २० व्या शतकाच्या संस्कृतीमध्ये विकसित झाला.

२० व्या शतकाच्या मध्याला अमेरिकेमध्ये बॅले या नृत्यप्रकारात अमेरिकन प्रेक्षक अधिक स्वारस्य दाखवू लागले. मार्था ग्रॅहम, रुथ सेंट, डेनिस आणि टेड शॉन या नर्तकांचे अमेरिकन प्रेक्षकांना अतिशय भावात असे. ॲग्रेस डी मिल आणि जॉर्ज बॅलन्शिन या नृत्यरचनाकारांनी न्युयॉर्क सिटी बॅले ग्रुप या महान बॅले समूहावर आपले प्रभुत्व गाजवले. १९४८ मध्ये स्थापन झालेला हा बॅले समूह १९८३ मध्ये विसर्जित झाला. या समूहाने स्त्री आणि पुरुष नर्तकांसाठी सौंदर्याची नवी मानके निर्माण केली आणि अमेरिकेतील अनेक ठिकाणी पूर्वी अस्तित्वात नसलेला नृत्याचा प्रेक्षकवर्ग निर्माण केला.

### ७.२.६ वास्तुकला :

२० व्या शतकाच्या गरजेनुसार आणि पर्यावरणाशी सुसंगत अशा घरांची रचना वास्तुकलाकारांनी केली. आधुनिक तंत्रज्ञानाने उपलब्ध करून दिलेल्या बांधकामाच्या अनेक नव्या साधनांचा उपयोग त्यांनी केला. दुसऱ्या महायुद्धानंतरची २० वर्षाचा काल अमेरिकन वास्तुकलेच्या इतिहासातील उत्कंठावर्धक कालखंड होता. १९५० आणि १९६० च्या दशकात शहरी लोकसंख्येच्या लक्षणीय भागाचे नव्या घरात पुनर्वसन करण्यात आले. नवी घरे आणि कार्यालये एकसूरी आणि सैनिकी बराकी सारखी होती. अशा घरामध्ये पूर्वीच्या गलिच्छ वस्त्यापेक्षा अधिक रहिवाशांना सामावून घेण्यात आले होते. दरम्यान अभिजातवाद आणि कार्यवाद (फंक्शनॅलिझम)हा वाद अनिर्णितच राहिला. कही टीकाकारांनी कार्यवादाची मुलभूत अनुक्रमे नाकारली होती.

### ७.२.७ संगीत

अमेरिकेतील गंभीर संगीताचा इतिहास संगीताच्या आस्वादाच्या इतिहासापुरातच मर्यादित होता. २० च्या शतकाच्या या क्षेत्रामध्ये लक्षणीय प्रगती झाली. रेडिओ आणि ग्रामोफोन यांचा शोध लागल्याने उत्तम संगीत सामान्य माणसांच्या आवाक्यात आले. शाळा आणि महाविद्यालयांतील संगीताच्या आस्वादाच्या अभ्यास क्रमात वाढ झाली. १९३० च्या

दशकातील वर्क्स प्रोग्रेस ॲडमिनिस्ट्रेशन मधील संगीत प्रकल्पाने त्यामध्ये मोलाचे योगदान दिले. या प्रकल्पामध्ये संघटित केलेल्या बेरोजगार संगीतकारांच्या वाद्यवृंदांची संख्या फार कमी होती, १९४० च्या दशकात ती शेकड्यांनी मोजता येत असे.

## ७.३ अमेरिकन शिक्षण

आर्थिक विकास आणि शहरीकरणामुळे अमेरिकन सांस्कृतिक जीवनात फार मोठे बदल होऊ लागले. युरोपच्या अनेक भागांतून अमेरिकेमध्ये स्थलांतरितांचे लोंढे येऊ लागल्यामुळे वांशिक सरमिसळ होऊन समाज-सांस्कृतिक बदल होऊ लागले. त्याचा परिणाम शिक्षण विकासात, ग्रंथालये उगडण्यात, शाळा सुरु करण्यात व नाटयगृहे सुरु करण्यात झाला व त्यासाठी योग्य तेवढा निधी सुद्धा उपलब्ध करावा लागला.

### ७.३.१ शालेय शिक्षण :

बऱ्याच राज्यांमध्ये केवल तीन वर्षांचाच व्याकरण अभ्यासक्रम राबविला जात होता. पुढे त्यांची संख्या वाढविण्यात आली. त्यानंतर मात्र राज्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी स्वतःच उचलू लागले. इ.स.१८७० मध्ये माध्यमिक शाळांची संख्या ५०० होती ती इ.स.१८९० मध्ये २,५०० तर इ.स. १९१५ मध्ये १२००० पर्यंत गेली. नापासांचे प्रमाण १७% वरून ११% वर खाली आले.

सार्वजनिक शाळांचा विस्तार योजना वाढू लागल्यामुळे अमेरिकन समाजाची शिक्षण विषयक कळकळ दिसू लागली. राज्ये व शहरांतील अधिकाऱ्यांनी कडकपणे शिक्षकांवर बंधने लादली होती व त्यांच्यावर चांगलाच वाचक ठेवून होते. शिक्षकांचे पगार तसे कमीच होते. २० व्या शतकामध्ये श्रीमंत राज्यांमध्ये शिक्षणविषयक चांगलीच प्रगती झाली होती. परंतु अजूनही कॅलिफोर्निया आणि न्युयॉर्कसारख्या राज्यांमध्ये शिक्षकी पेशाला इतर व्यवसायांच्या तुलनेत कमीच वेतन मिळत होते. त्यामुळे शिक्षकाच्या पगारावर एखादे कुटुंब चालवणे तसे कठीण जात असल्यामुळे फार कमी लोक शिक्षकी पेशामध्ये येत असत. त्यामुळे पुरुष शिक्षकांचे प्रमाण इ.स.१८८० च्या ४३% वरून इ.स.१९०० मध्ये ३०% आणि इ.स.१९२० मध्ये १५% पर्यंत खाली आले.

अमेरिकेतील अनिवार्य शिक्षणपद्धती म्हणजे प्रत्येक मुलाला आवश्यक साहित्य आणि नागरिकत्वाचे शिक्षण मिळण्याची संधी देणे होय. त्यामुळे अमेरिकन ऐक्याभावना वाढीस लागून वर्ग व वंशभेद यांना काहीसा आळा बसला. या राज्यामध्ये स्थलांतरित कुटुंबातील मुळे अमेरिकन राहणीमानाचे शिक्षण घेऊ लागली व आपली कौशल्ये विकसित करू लागली.

### ७.३.२ महाविद्यालयीन शिक्षण

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात चांगलीच प्रगती झाली. त्याचे श्रेय मोरील ॲक्ट, १८६२ ला द्यावे लागते. त्याअन्वये अमेरिकेतील १३ लख एकर सार्वजनिक जमीन ही महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या विस्तारासाठी उपलब्ध करण्यात आली. पूर्वीपासून सुरु असलेली हार्वर्ड, येल आणि कोलंबिया महाविद्यालये ही विद्यापीठांमध्ये परावर्तीत करण्यात आली. त्याबरोबर शिकागो, कॉर्नेल, जॉन हॉपकीन्स, ड्यूक वेन्डरबिल्ट आणि स्टॅनफोर्ड सारख्या



munotes.in

नवीन शिक्षण संस्थांची उभारणी करण्यात आली. इ.स.१८६० च्या तुलनेत इ.स.१९०० पर्यंत अमेरिकेतील महाविद्यालयांची संख्या दुप्पट जवळजवळ ५०० पर्यंत पोचली. स्त्रियांना उच्च शिक्षणाचा हक्क देण्यात आला व त्यामुळे इ.स.१९०० पर्यंत त्यांच्यातील पदवीधरांची संख्या २५% टक्के पर्यंत गेली. जवळ जवळ ७० %महाविद्यालये संमिश्र (पुरुष-स्त्री एकत्र) प्रमाणात झाली. तसेच वस्सार, वेलस्ली, स्मिथ आणि ब्रिन मावर सारखी केवल महिला महाविद्यालये निर्माण झाली.

या महान शिक्षणसंस्था उदयास येण्यामागे विद्यापीठात प्रमुख असलेल्या चार्ल्स इलियट (कार्वार्द), जॉन हॉपकीन्समधील डॅनियल गिलमन, कॉर्नेलमधील अॅन्ड्रयू डीकसन, स्टॅनफोर्ड मधील डेव्हिड स्टार जॉर्डन आणि शिकागो येथील विल्यम रेनी हार्पर या विद्वानांचा व त्यांच्या नेतृत्व गुणांचा सहभाग होता. त्यांनी स्वतःच्या दाखल्यांनी विद्वत्ता सिद्ध केली होतीच पण आपल्या विद्यापीठांमध्ये सुद्धा विद्वान व असामान्य प्राध्यापकांची निवड केलेली होती. त्यामुळे आधुनिक जगातील बदलांप्रमाणे त्यांनी सतत अमेरिकन उच्च शिक्षणात बदल करून त्याला अद्यावत ठेवण्यात योगदान दिले.

### ७.३.३ व्यावसायिक शिक्षण :

आधुनिक अमेरिकेमध्ये तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणामध्येसुद्धा आमुलाग्र व शीघ्र गतीने वाढ झाली. बहुधा अनेक अमेरिकन लोकांना डॉक्टर, वकील आणि दंतवैद्य या व्यवसायांचे मिळत होते व ते नंतर आपला सदरहू व्यवसाय सुरु करीत असत. कारण फारच थोड्या प्रमाणात या विद्यार्थ्यांना व्याख्याने मिळत असत आणि प्रात्यक्षिक अनुभवाचाही अभाव असे. परंतु या क्षेत्रात कुलगुरू इलियट यांनी इ.स.१८७० च्या दशकात हार्वर्ड विद्यापीठात वैद्यकीय आणि कायदा विभाग सुरु करून त्यांचा विस्तार केला. त्यानुसार विद्यार्थ्यांना मुबलक प्रशिक्षण व प्रात्यक्षिक यांचा अनुभव मिळण्यासाठी तज्ञ प्राध्यापकांच्या नेमणुका करण्यात आल्या. त्यानुसार इतर राज्यातही विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. पुढे तर प्रत्येक राज्याने अपात्र वकील, डॉक्टर आणि दंतवैद्य यांच्या नेमणुका करणे व व्यवसाय करण्यावर कडक निर्बंध लादण्याविषयीचे कायदे कानून पारित केले. त्यामुळे कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण योगदान करण्याकडे अमेरिकन नागरिकांचा ओढ वाढू लागला.

### ७.३.४ प्रौढ शिक्षण :

वैज्ञानिक प्रगती आणि अनेक वांध धर्माची स्थलांतरित यामुळे अमेरिकन संस्कृती तयार होऊन अमेरिकन नागरिकांमध्ये नवीन ज्ञानाचा शिरकाव होऊ लागला. प्रौढ नागरिकांसाठी मुक्त ग्रंथालयाची निर्मिती केली गेली. इ.स.१९०० मध्ये कमीत कमी ३०० पुस्तकांचा चळवळीचे श्रेय अॅन्ड्रयू कार्नेजी यांना जाते. त्यांनी स्वतः जवळजवळ ६० लक्ष डॉलर्सचे योगदान केवल महानगपालिकांनी ती ग्रंथालये सांभाळण्याची जबाबदारी घेण्याच्या अटीवर ग्रंथालय चळवळीसाठी दिले.

प्रौढ शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये इ.स.१८७४ मध्ये उदयास आलेल्या चौतेक्श चळवळीचे योगदान मोलाचे आहे. ही चळवळ ज्या प्रौढांना शिकावयाचे आहे त्यांच्यासाठी एक राष्ट्रीय चळवळ बनली. त्यांनी त्यांच्या उन्हाळी शाळाही सुरु केल्या. तसेच त्यांच्या जोडीला अनेक

munotes.in

अभ्यास केंद्राची निर्मिती केली गेली. त्यामध्ये १,००,००० पेक्षा अधिक प्रौढांनी नोंदणी केली. त्यांच्यासाठी अनेक विद्वानांनी आपली व्याख्याने आयोजित केली त्यामध्ये विल्यम नेमस, जोसिया रोयर आणि विल्यम जेनिंग्स ब्रियन यांचा प्रामुख्याने समावेश होता.

याच काळात तत्त्वज्ञान आणि सामाजिक शास्त्रे विकसित झाली. विल्यम जेम्स, ज्यांनी हार्वर्ड विद्यापीठामध्ये पस्तीस वर्षे अध्यापन व संशोधनाचे काम केले त्यांनी 'प्रात्यक्षिक तत्त्व विचारासाठी' तत्त्वज्ञानाची संकल्पना अमेरिकन नागरिकांमध्ये लोकप्रिय केली. त्याचबरोबर साहित्य आणि अभिजात कला यांच्या मध्ये सुद्धा गोडी वाढविण्यात आली. अमेरिकन साहित्य क्षेत्रामध्ये मॅक ट्वाईन, होरॅटीक अल्जर, लेविस वॅलेस, हेन्री जेम्स, विल्यम डीन हॉवेल्स, वॉल्ट व्हिटमन, एमिली डिकिन्सन आणि स्टिफन करेन यांनी मोलाची भर घातली. अभिजात कलेच्या क्षेत्रात संगीत, स्थापत्य, शिल्पकला आणि चित्रकला यांनी अमेरिकन सांस्कृतिक जीवनात मोठा ठसा उमटवला.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकेमध्ये कोणत्या प्रकारचे शालेय शिक्षण दिले जाई ?

२) अमेरिकेतील व्यावसायिक शिक्षणावर टीप लिहा.

## ७.४ अमेरिकन साहित्य

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात अमेरिकन लेखकांनी अमेरिकन लोकांच्या एकमेकांच्या दुराव्यावर आणि भेदावर साहित्य निर्मिती केली. तथापि, अनेक अमेरिकन लोकांच्या लेखी वांशिक आणि धार्मिक भेदांना फारसे महत्त्व नव्हते. युद्धोत्तर काळातील अनेक लेखकांनी या भेदांवर आपले प्रश्न केंद्रीत करून त्याविषयी तटस्थ वृत्तीने लिखाण केले. १९४० आणि १९५० च्या दशकांच्या सुरुवातीला दक्षिणेच्या राज्यातील लेखक, यहुदी आणि कृष्णवर्णीय लेखकांनी काल्पनिक (फिक्शन) साहित्याला एक नवी दृष्टी दिली. या पैकी प्रत्येक गटाला अनिश्चिततेच्या भावनेने ग्रासले होते. त्यांच्या भावना मिश्र स्वरूपाच्या होत्या आणि त्यांच्या आशा आकांक्षाची कुचंबणा झाली होती. या मानसिकतेने या लेखकांनी अमेरिकेतील प्रचलित लिखाणातील अमेरिकन जीवनाकडे पाहण्याच्या सकारात्मक दृष्टीकोनाला एक प्रयायी दुष्टीकोन सादर केला होता.

### ७.४.१ काल्पनिक साहित्य साहित्य कृती (फिक्शन) :

यादवी युद्धापासून पराभव आणि अपयशाच्या उमद्या परंपरेने दक्षिणेतील राज्यांच्या लोकजीवनाचे वस्त्र विणले आहे. अशी विल्यम फॉकनर, युडोरा वेल्टी आणि फ्लानेरी ओफ्कॉनार या दक्षिणेतील राज्यांमधील लेखकांची धारणा होती. जेव्हा औपचारिक अमेरिका अंतहीन यशाचे आणि आशावादाचे गोडवे गात होती तेव्हा हे लेखक शोकात्म नियतीच्या कथा सांगत असत. शिकागोमधील यहुदी लेखक सॉल बेलो यांना १९७६ चा साहित्याचा नोबेल पुरस्कार देण्यात आला, फिलिप रॉथ आणि बर्नार्ड मेलामुड यांनी यहुदींच्या समृद्ध परागंदा अवस्थेमधील वरवरची समृद्धी आणि खोलवरची बेचैनी आणि आश्चर्याची भावना एकत्र सादर करून त्यांच्या देशवासीयांच्या समान बिकट अवस्थेचे तीव्र स्वरुपात वर्णन केले.

कृष्णवर्णियांना दिलेले अमेरिकन जीवनाचे आश्वासन कधीच पूर्ण झाले नाही. लांबणीवर टाकलेल्या स्वप्नाचे झाले काय ? असा प्रश्न लँग्स्टन ह्यु यांनी विचारला. अनेक कृष्णवर्णीय लेखकांनी या प्रश्नांचे उत्तर आपल्या कथांतून देण्याचा प्रयत्न केला; या कथांमध्ये अभिमान गोंधळ आणि संताप यांचे मिश्रण झाले होते. राल्फ एलिसन यांची द इन्व्हिजिबल मॅनफ (१९५२) ही कादंबरी २० व्या शतकातील कृष्णवर्णियांच्या साहित्यातील महानतम कलाकृती होती यात संशय नाही. १९७० च्या दशकापासून कृष्णवर्णीय स्त्री लेखकांनी मोठया प्रमाणात साहित्याची निर्मिती केली. टोनी मॉरिसन यांची द बिलव्हेडफ (१९८७), ॲन टायलर यांची द ॲक्सिडेंटल टुरिस्टफ (१९८५) आणि लुइझी एर्डीज शद लव्ह मशिनफ (९८४) या साहित्यकृती विशेष नावाजलेल्या होत्या.

कादंबरी हा काल्पनिक (फिक्शन) साहित्याचा एक प्रकार अमेरिकन जीवनाचे यथार्थ वर्णन करण्याचा उत्तम मार्ग नसल्याची अनेक लेखकांची धारणा होती. त्यांच्या लेखी अन्य साहित्य प्रकारापेक्षा कादंबरी हा साहित्य प्रकार खाजगी, व्यक्तिगत अभिव्यक्तीचा एक मार्ग होता, त्यामध्ये अमेरिकन जीवनातील विसंगती पुरेशा प्रमाणात व्यक्त होत नाही. एकेकाळी काल्पनिक साहित्याच्या निर्मितीसाठी जी निर्दोष शैली राखून ठेवण्यात आली होती त्याच शैलीमध्ये अनेक लेखकाने वृत्तपत्रीय लेखन केले. द न्युयॉर्करफ मासिकात ही काव्यात्मक शैली वापरण्यात येत असे. ए. जे. लायब्लिंग यांच्या द अर्ल ऑफ ऑफ लुइझियानाफ (१९६१) या कादंबरीचा त्या राज्यातील निवडणुका हा विषय होता. जेम्स ॲगी यांच्या दलेट अस नाऊ प्रेज फेमस मेनफ (१९४१) या कादंबरीत दक्षिणेतील राज्यातील शेअरक्रॉपर या खंडाने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जीवनाचे वर्णन आढळते. अन्य साहित्य प्रकारांना कवितेचे सौंदर्य आणि शाश्वतता बहाल करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

### ७.४.२ अन्य साहित्य

२० व्या शतकाच्या मध्याला काल्पनिक कल्पनारहित (नॉन-फिक्शन) साहित्य हा नवा साहित्य प्रकार विकसित झाला. अशा साहित्याला कल्पनारहित-कादंबरी असे नाव दिले जाते. या साहित्य प्रकाराने निरनिराळी रूपे धारण केली. ट्रुमन कपोटी यांची द इन कोल्ड ब्लडफ (१९६५) ही कादंबरी कान्सास राज्यातील हत्यासत्राचे वर्णन करते. टॉम वुल्फ यांची द राईट स्टफफ (१९७९) ही कादामाब्री अमेरिकन अवकाश कार्यक्रमाच्या सुरुवातीच्या दिवसांचे वर्णन करते, तर नॉर्मन मेलर यांची द आर्मिज ऑफ द नाईटफ १९६८ मधील राजकीय परिषदांचा स्मृती रेखाटण्यात आल्या आहेत. या प्रचंड सार्वजनिक कार्यक्रमांचे व्यक्तिगत संवेदनेने चित्रण केल्याचे आढळते.

कल्पना-रहित कादंबरीने अतिरेकी मनमोहकता आणि अतिशयोक्तीचा ध्यास धरल्याने अमेरिकन लेखनाच्या क्षेत्रामध्ये लघुकथेचा अनपेक्षित उदय झाला. व्यक्तिगत दृष्टी आणि खाजगी जीवनाला लघुकथेने आवाज बहाल केला. लघुकथेने एखादा अद्वितीय क्षण आणि काही अति खाजगी आणि नाजूक क्षणांवर दिलेला स्वाभाविक भर यामुळे तिला नवे प्राधान्य मिळाले. जे.डी. सॅलिंजर यांच्या द नाईन स्टोरिजफ (१९५३) आणि रेमंड कार्व्हर यांच्या द व्हॉट वी टॉक अबाऊट लव्हफ (१९८१) या लघुकथा संग्रहांनी लघुकथेचा जन्म झाल्याचे मानले जाते. अध्यात्मिक जीवनाचा गंभीरपणे घेतलेला शोध आणि मोहकता आणि करमणुक यांचा समन्वय लावता येतो अशी कल्पना करून सॅलिंजर यांनी एका पिढीला भारून टाकले होते. कार्व्हर यांनी मितभाषी अलिप्तता आणि अव्यक्त भावना यांच्या

माध्यमातून कार्व्हर यांनी नंतरच्या पिढीच्या अध्यात्मिकतेच्या अभावाची भावना निश्चित केली.

**आपली प्रगती तपासा :**

१) अमेरिकन साहित्यातील कोणत्याही दोन काल्पनिक साहित्यकृतींची नावे लिहा.

२) ट्रुमन कॅपोटच्या सुप्रसिद्ध कलाकृतींचे नाव काय होते ?

३) अमूर्त अभिव्यक्तीवादावर थोडक्यात लिहा.

४) २० व्या शतकाच्या मध्यातील कोणत्याही तीन अमेरिकन नर्तकांची नावे सांगा.

## ७.५ समारोप

२० व्या शतकामध्ये अमेरिकेचे परिवर्तन झाले. एक ग्रामीण आणि शेतीप्रधान राष्ट्र औद्योगिक महासत्ता बनले. पोलाद, कोळसा, रेल्वे आणि बाष्पशक्तीच्या पायावर ही महासत्ता उभी होती. एका नव्या देशाचा मिसिसिपी नदीच्या पश्चिमेला समुद्र किनाऱ्यापर्यंत आणि नंतर समुद्राच्या पलीकडील प्रदेशात विस्तार झाला. गुलामगिरीच्या प्रश्नावरून दुभंगलेला आणि यादवी युद्धाचा धक्का बसलेला देश एक जागतिक सत्ता बनला, तिचा जागतिक प्रभाव पहिल्या महायुद्धामध्ये सर्वांना जाणवला.

अमेरिकेसाठी २० वे शतक गडबडीचे आणि बदलाचे शतक होते. या काळात तिने तिच्या इतिहासातील सर्वाधिक वाईट आर्थिक महामंदीला तोंड दिले, दोस्त राष्ट्रांच्या सहाय्याने दूसरे महायुद्ध जिंकले, शीत युद्धाच्या काळात जागतिक नेतृत्व धारण केले आणि अमेरिकेमधील लक्षणीय सामाजिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक आणि तंत्रज्ञान विषयक परिवर्तन देखील याच काळात झाले. एके काळी अमेरिकेचे परिवर्तन होण्यासाठी शतकांचा काळ लागत असे तीच अमेरिका आता काही दशकांत नव्या स्वरूपामध्ये पुढे येते.

## ७.६ प्रश्न

१) विविध कलांमधील अमेरिकेच्या प्रगतीचे थोडक्यात वर्णन करा.

२) २० व्या शतकातील अमेरिकन साहित्यातील नव्या प्रवाहांचा आढावा घ्या.

३) कृष्णवर्णीय आणि यहुदी लेखकांच्या साहित्याची ठळक वैशिष्टये नमूद करा.

४) अमेरिकन शिक्षण यावर टीप लिहा.

❖❖❖❖

# ८

# मुक्ती चळवळ

**घटक रचना**


८.० उद्दिष्टये

८.१ प्रस्तावना

८.२ स्त्रीयांचे हक्क

८.३ लैंगिकतेविषयीचा नवा दृष्टीकोन

८.४ समाज

८.५ संस्कृती

८.६ समारोप

८.७ प्रश्न


## ८.० उद्दिष्टये

- अमेरिकेतील मुक्ती चळवळीचा अभ्यास करणे.
- अमेरिकेतील स्त्रियांच्या हक्काविषयी झालेल्या प्रगतीचा आढावा घेणे.

## ८.१ प्रस्तावना

युरोपातील कुटुंबव्यवस्था पितृप्रधान होती, पित्याचा त्याच्या बायकामुलांवर अनिर्बंध अधिकार चालत असे. पत्नीला मालमत्ता धारण करण्याचा अधिकार नव्हता तसेच तिला अन्य मूलभूत हक्क देखील नाकारले जात असत. सुरुवातीच्या काळातील अमेरिकेतील कौटुंबिक संबंधाविषयीचे कायदे इंग्लंड मधील कायद्यावर आधारित असले तरी लवकरच अमेरिकन रिवाज बदलू लागले. पित्याचे अधिकार कमी होत गेले तर पत्नी आणि त्यांच्या मुलांना अधिक स्वातंत्र्य मिळू लागले. अमेरिकेतील सीमावर्ती प्रदेशातील परिस्थितीमुळे सुरुवातीच्या काळात पत्नीच्या स्थानामध्ये बदल झाला असावा. नव्या देशातील संकटांना स्त्री आणि पुरुष अशा दोघांना सारखीच मेहनत करावी लागत असे आणि संकटांना जोडीने तोंड द्यावे लागत असे. परिणामी, स्त्रीयांना त्यांच्या युरोपियन भगिनींच्या प्रमाणे कायम सुरक्षित वातावरणात राहाता येत नसे तसेच कुटुंबातील तिचे स्थान नेहमीच दुय्यम राहाणे शक्य नव्हते. पाश्चात्य देशांपैकी अमेरिकेमध्ये ज्या स्त्रीया आपली काळजी घेण्यास समर्थ असत त्यांना नेहमीच वाखाणले जात असे. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेतील विविध राज्यांनी त्यांना काही कायदेशीर हक्क बहाल करण्यास सुरुवात केली असली तरी पूर्ण आर्थिक आणि राजकीय समानता मिळवण्यासाठी त्यांना दीर्घ संघर्ष करावा लागला होता.

munotes.in

## ८.२ स्त्रीयांचे हक्क

विविध सुधारणांच्या चळवळीमध्ये स्त्रीयांनी प्रमुख भूमिका बजावली. अमेरिकन स्त्रीयांना काही कायदेशीर अधिकार असले तरी त्यांना राजकीय अधिकार अजिबात नव्हते आणि तरी त्यांनी समाजातील वाईट चालीरीतीविषयी आपली मते हिरीहिने मांडण्यास सुरुवात केली. श्रीमती ल्युक्रेशिया मॉट्स आणि श्रीमती एलिझाबेथ कॅडी स्टँटन यांनी १८४८ मध्ये न्यूयॉर्क येथे एक सभा आयोजित केली. सभेने डिक्लरेशन ऑफ सेन्टिमेंट्स या नावाचा एक जाहीरनामा जारी केला. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या १८ तक्रारींची यादी सादर केली होती. श्रीमती स्टँटन आणि सुझन बी. ॲन्थनी या महिलांनी स्त्री-पुरुषातील समानतेसाठी अथक लढा दिला. अनेक वेळा त्यांना निंदानालस्ती आणि शिव्याशाप सहन करावे लागले. होते. विसाव्या शतकापर्यंत स्त्रीयांना मतदानाचा हक्क मिळाला नसला तरी यादवी युद्धाच्या पूर्वी स्त्रीयांचे कायदेशीर स्थान सुधारण्यासाठी अनेक कायदे केले होते. विवाहानंतर मालमत्ता धारण करण्याचा हक्क त्यांना मिळाला होता.

दरम्यान अनेक स्त्रीयांनी महिला दुर्बळ असल्याची कल्पना खोटी ठरवण्याचे प्रयत्न केले. काही उच्च शिक्षित महिलांनी व्यवसायिक जीवनक्रम स्वीकारले होते. एमा विलार्ड, कॅथरिन बीचर, मेरी ल्यॉन यांनी मुलींसाठी वेगळ्या प्रबोधिनी स्थापना केल्या. मार्गरेट फुल्लर, लायडिया मारिया चाइल्ड आणि सुझन जोसेफा हेल या महिला यशस्वी पत्रकार आणि मासिकांच्या संपादक होत्या. १९४८ मध्ये एलिझाबेथ ब्लॅकवेल या पहिल्या पूर्ण अर्हताप्राप्त डॉक्टर झाल्या होत्या. १९५३ मध्ये अन्त्वानेत ब्राऊन यांची धर्मगुरुपदाची दीक्षा देण्यात आली.

### ८.२.१ घटनेची १९ वी दुरुस्ती :

यादवी युद्धाच्या पूर्वी सुरु झालेली चळवळ १८८० नंतर अधिक प्रभावी होत गेली. त्या वर्षी नॅशनल अमेरिकेन सफरेज असोसिएशन या संघटनेची स्थापना झाली. कॅरी चॅपमन कॅट्ट आणि ॲना हॉवर्ड शॉ या स्त्रीया प्रमुख नेत्या होत्या. प्रागतिक चळवळीच्या काळात स्त्रीयांनी वाढत्या संख्येने सामाजिक सुधारणांसाठी सक्रिय प्रचार केला आणि त्यांच्यापैकी बहुतेकांनी राजकीय अधिकारांची मागणी केली होती.

कोलोराडो, वायोमिंग, आयडाहो आणि युटाह या पश्चिमेकडील राज्यांनी १९०० च्या पूर्वी स्त्रीयांना मतदानाचा हक्क बहाल केला. १९१४ पर्यंत मिसिसिपी नदीच्या पश्चिमेकडील ८ राज्यांनी त्यांचे अनुकरण केले. १९२६ मध्ये मोन्टाना राज्यातील जेनेट रॅन्किन काँग्रेसमध्ये निर्वाचित झालेल्या पहिल्या महिला होत्या. १९२० मध्ये एका घटना दुरुस्तीनुसार स्त्रीयांना मतदानाचा हक्क देण्यात आला.

## ८.३ लैंगिकविषयीचा नवा दृष्टीकोन

जुन्या काळात स्त्रीयावर लादण्यात आलेली काही बंधने १९२० च्या दशकात त्या झुगारून देऊ लागल्या. परिणामी, प्रतिष्ठीत आणि अनैतिक स्त्रीयांमधील सीमारेषा पुसट झाली होती. मुलींनी सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करू लागल्या, पूर्वी निषिद्ध असलेल्या विषयांची खुली चर्चा करू लागल्या आणि त्यांच्या कपडयांना लागणाऱ्या कापडाचे प्रमाणही कमी झाले.

एका अंदाजानुसार, १९१३ मध्ये स्त्रीयांच्या एका पोशाखासाठी १९.१ / ४ वार कापड लागत असे, १९२८ मध्ये फक्त ७ वारातच त्यांचा एक पोशाख तयार होऊ लागला. विवाह बाह्य संबंध अवैध किंवा पापी असल्याचे मानले जात नसे आणि लैंगिकतेविषयीची सर्व बंधने अपायकारक मानली जाऊ लागली. इंडियाना विद्यापीठाचे प्राध्यापक अल्फेड किन्से यांनी या नव्या दृष्टिकोनाविषयी संशोधन केले. त्यांनी असे संशोधन करण्यात आले ही गोष्टच बदलत्या मूल्याचे चिन्ह होते.

घटस्फोटाच्या प्रमाणात धोकादायक वाढ झाली. १९०० मध्ये दर हजारी घटस्फोटाचे प्रमाण ०.७ होते, १९४९ मध्ये ते दर हजारी २.६ पर्यंत वाढले होते. युद्धकालातील घाईगर्दीने केलेले विवाह मोडले गेले तेव्हा हे प्रमाण दर हजारी ४.३ पर्यंत गेले होते. अशा प्रकारे १९४० च्या दशकात दर ४ विवाहामधील एका विवाहाचे पर्यवसान घटस्फोटात होत असे. संततीनियमनाच्या साधनांच्या वाढत्या वापराने जन्मदरात घट होत गेली. ग्रामीण आणि कामगारांच्या कुटुंबियांच्या मुलांची संख्या मात्र अधिक असे. १९२१ मध्ये मार्गारेट सँगर यांनी बर्थ कंट्रोल लिग या संस्थेची स्थापना केली. अशा संस्था सर्वत्र स्थापना करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नाने १९५० पर्यंत अशा ८०० संस्था स्थापना झाल्या. व्यवसायिक वर्गापेक्षा गरिब वर्गातील जन्मदराचे प्रमाण अधिक असे. ही काळजी करण्याची बाब होती.

## ८.४ समाज

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या अमेरिकेमध्ये अनेक विसंगती आढळतात. एकीकडे उच्चप्रतिचे राहणीमान, सांस्कृतीक प्रगतीच्या आणि करमणुकीच्या विविध संधी अमेरिकन समाजाला पूर्वीपेक्षा अधिक व्यापक प्रमाणात उपलब्ध झाल्या. मानव वंशाच्या फार मोठया भागाचे नेतृत्व अमेरिकेने स्वीकारून अभूतपूर्व सत्ता आणि प्रतिष्ठा मिळवली होती तरी बदलती मूल्ये आणि आधुनिक जीवनातील तणाव यामुळे एक साधारण असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याने समाजाचे तुकडे पडण्याची चिन्हे दिसू लागली होती. १९६७ मधील अमेरिकन समाज निर्दोष नसला तरी त्याविषयी लिहिण्यात आलेल्या अनेक ग्रंथांनी सूचवल्यापेक्षा अधिक सदृढ होता. काही मूल्य बदलेली असली तरी अमेरिकन समाजाचा मूलभूत दृष्टीकोन आणि संस्था अद्याप शाबूत होत्या; या संस्थांच्या आणि दृष्टीकोनाच्या आधाराने उभ्या असलेल्या अमेरिकन समाजाची खास वैशिष्टये टिकून होती.

### ८.४.१ चर्च संघटना :

२० व्या शतकाच्या सुरुवातीला धर्म आणि जीवनाची विवेकवादी दृष्टी आणि नैतिकतेच्या संकल्पना यांच्यात मेळ नव्हता. १९३० च्या दशकापर्यंत अमेरिकन चर्च संघटनेचा तरुण पिढीवरील प्रभाव कमी होत चालल्याचे वाटत होते. मात्र १९३० आणि १९४० च्या दशकांतील आर्थिक आणि राजकीय समस्यांच्या चिंतेमुळे मूळ पापाचा सिद्धांत खरा असण्याची शक्यता बळावली होती. वैयक्तिक समस्या आणि संघर्ष यावर धार्मिक उपाय योजना सुचवणारे अनेक ग्रंथ हातोहात खूप लागले आणि चर्च संघटनेच्या सभासद संख्येमध्येही वाढ होत गेली. १९६४ पर्यंत अमेरिकन लोकसंख्येच्या निम्म्यापेक्षा थोडया जास्त म्हणजे १,२३,३१,७००० हजार लोक विविध चर्च संघटनांशी संलग्न होते.

### ८.४.२ प्रॉटेस्टंट पंथ :

जवळपास २/३ अमेरिकन विविध प्रॉटेस्टंट संघटनेचे सभासद होते; त्यापैकी मेथॉडिस्ट आणि बॅप्टिस्ट संघटनांच्या सभासदांची संख्या अधिक होती.

१९३० च्या दशकातील न्यु डिलच्या सामाजिक - आर्थिक नियोजनाने धार्मिक वागणुकीत परिवर्तन झाले. धर्मशास्त्रविषयक वादविवाद कमी झाले आणि एकीकरणाच्या देशेने प्रबळ रोख निर्माण झाला. ल्युदरन, कॉन्ग्रिगेशनॅशनलिस्ट आणि मेथॉडिस्ट संघटना एकत्र आल्याने १९५० मध्ये अमेरिकेतील प्रॉटेस्टंट चर्च संघटनांनी आपल्या शैक्षणिक आणि समाज कल्याणविषयक कार्यामध्ये समन्वय साधण्यासाठी नॅशनल कॉन्सिल ऑफ चर्चेसची स्थापना केली.

अमेरिकन  प्रॉटेस्टंट पंथामध्ये नव - कर्मठतावाद आणि परमेश्वराचा मृत्यू असे दोन झुकाव निर्माण झाले. आधुनिक जगाच्या आशावादाविरुद्धच्या प्रतिक्रियेमधून नव - कर्मठतावादाचा उदय झाला; हा वाद मार्टिन ल्युथर आणि जॉन काल्व्हिन यांच्या निराशावादी सिद्धांताची सुधारित आवृत्ती होती. परमेश्वराच्या मृत्यू या विचारानुसार ख्रिश्चन धर्मातील परमेश्वर आकाशातून खाली पृथ्वीवर उताराला नसून तो जगाशीच निगडित आहे आणि म्हणूनच पारंपारिक सिद्धांतांचे पुर्नपरिक्षण केले पाहिजे.

### ८.४.३ कॅथॉलिक पंथ :

स्थलांतरीतांची संख्या कमी झाली असली तरी कॅथॉलिक चर्चची संख्या मात्र वाढतच गेली. १९१० मध्ये अमेरिकेत १,६०,००० कॅथॉलिक चर्च होती, १९६४ पर्यंत त्यांची संख्या ४,५६,४१००० पर्यंत वाढली होती. कॅथॉलिक चर्चच्या शैक्षणिक आणि सांस्कृतीक संस्थांची संख्या धिमेपणाने वाढत होती, त्याबरोबर त्यांचा शहरी प्रशासन आणि कामगार संघटनावरील प्रभाव वाढत गेला. १९४० ते १९६४ या काळात कॅथॉलिक प्राथमिक शाळांची संख्या २४,००,००० पासून ६०,००,००० पर्यंत वाढली होती, त्याशिवाय उच्च शिक्षणाचा ३०० संस्था २,५०० माध्यमिक शाळा आणि १०,००० प्राथमिक शाळा कॅथॉलिक चर्चकडून चालवल्या जात असत, त्यामध्ये एकूण २,००,००० शिक्षक असत.

कॅथॉलिक पंथाने जगभरात सर्वत्र आंतर - धर्मिय संवाद सुरु केला. २० व्या शतकातील धिम्या सुरुवातीनंतर १९६० च्या दशकात पोप १८ वे जॉन यांचे हुकूम, पहिले आणि दुसरे व्हॅटिकन कॉन्सिल, चर्चच्या घटनेविषयीचे मंडळ इत्यादींनी त्याचा वेग वाढला होता. कॅथॉलिक - यदुही आणि कॅथॉलिक - प्रॉटेस्टंट यांच्यातील समन्वय आणि कर्मठपणासंबंधीचे विषय या संबंधी कॅथॉलिकांनी पुढाकार घेऊ नये असा हुकूम जारी करण्यात आला.

कॅथॉलिक आणि बिगर - कॅथॉलिक यांच्यातील मतभेदाचे दोन मुद्दे होते. एक, बिगर - कॅथॉलिकांना संतती नियमन, घटस्फोट, ग्रंथ, नाटके, टेलिव्हिजन आणि चित्रपट इत्यादी विषयांवरील कॅथॉलिक चर्चची भूमिका पसंत नव्हती. दुसरे, संकुचित विद्यार्थ्यांचा प्रवासाला किंवा अशा संघटनांना केंद्र सरकारने मदत करू नये अशी तरतूद घटनेमध्ये होती, बिगर - कॅथॉलिकांना हे मत मान्य होते.

२० व्या शतकाच्या अखेरीस मूलतत्त्ववादी ख्रिश्चनांचा एक मोठा गट नव्याने उदयाला आला. बायबल हा परमेश्वराचा थेट शब्द असल्याची या गटाची धारणा होती. गुन्हे आणि वाढत्या लैंगिक अनैतिकतेमुळे ते अतिशय बेचैन होते. १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला ङ्कमॉरल मेजॉरिटीफ हा राजकीय दृष्टीने परिणामकारक असलेला एक गट उदयाला आला, त्याचे नेतृत्व बॅप्टिस्ट धर्मगुरू जेरी फॅलवेल करत असत. पॅट रॉबर्टसन एका अन्य गटाच्या नेत्यांशी ख्रिश्चन कोॲलिशन ही संघटना बांधली. १९९० च्या दशकात रिपब्लिकन पक्षातील तिचा प्रभाव अतिशय वाढला होता. अशा इतर गटांप्रमाणे अमेरिकन जीवनात धर्माचे मध्यवर्ती स्थान असावे असे वाटत असे. फॅलवेल आणि रॉबर्टसन यांच्या सारख्या टेलिव्हिजनवरील धर्मप्रचारकांचे अनेक अनुयायी होते.

### ८.४.४ शिक्षण :

स्थानिक, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय कार्यक्रम आणि धोरणे यांच्यातील परस्पर संबंध शिक्षण क्षेत्रामध्ये विशेष जाणवतात. ऐतिहासिक दृष्टीने शिक्षण नेहमीच राज्यांच्या आणि स्थानिक संस्थांच्या अधिकाराखाली असे. अमेरिकेतील सुमारे ३,००० महाविद्यालये आणि विद्यापीठांपैकी काही मोजक्या सैनिकी प्रबोधिनी केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असत. १८६२ मध्ये केंद्र सरकारने ॲग्रिकल्चरल अँड मेकॅनिकल कॉलेजे(ए. अँड एम. कॉलेज) स्थापन करण्यासाठी सार्वजनिक जमिनी दिल्या होत्या; ही महाविद्यालये लँड - गँट कॉलेज या नावाने ओळखली जात असत. त्याशिवाय केंद्र सरकार शालेय विद्यार्थ्यांच्या भोजनाच्या कार्यक्रमाला मदत करत असे, मूलनिवासी इंडियन जमातींच्या शिक्षणाची सोय करत असे, विद्यापीठांना संशोधनासाठी अनुदान देत असे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देत असे, आणि निवृत्त सैनिकांच्या शिक्षणाला पैसा पुरवत असे.

प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी प्रामुख्याने स्थानिक संस्थांची असली तरी तिच्यावर राज्यांच्या आणि केंद्र सरकारचा प्रभाव वाढतच गेला. उदाहरणार्थ, १९६४ च्या सिव्हिल राइट्स ॲक्ट या कायद्यानुसार वांशिक भेदभाव पाळणाऱ्या शाळांना केंद्र सरकारची मदत मिळणार नव्हती. जेथे कृष्णवर्णिय रहिवाशांची संख्या जास्त असे तेथील कृष्णवर्णिय विद्यार्थ्यांना वंशभेद न पाळणाऱ्या दूरवरच्या शाळांमधून नेण्या आणण्याची सोय करावी लागत असे.

तथापि, एका गुंतागुंतीच्या समाजाच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी शैक्षणिक उपक्रम हाती घेण्यात आले. सार्वजनिक शिक्षण व्यवस्था, उन्हाळी आणि रात्रशाळा, अपवादात्मक मुलांसाठी शिक्षणाच्या खास सोयी आणि सांस्कृतिक दृष्टीने वंचित असलेल्या आणि वाम मार्गाला लागलेल्या मुलांच्या गरजा भागवण्यासाठी खास शैक्षणिक कार्यक्रम राबवण्यात आले. असे कार्यक्रम अंशतः यशस्वी झाले होते.

### ८.४.५ समानतेच्या समस्या :

२०व्या शतकातील अमेरिकन समाजाचे समाजशास्त्राच्या दृष्टीने विश्लेषण करण्यात आले होते. त्यावरून असे दिसते की अमेरिकन समाज वाटत होता त्यापेक्षा अधिक गुंतागुंतीचा आणि दृढ होता. अमेरिकन उद्योगपती आणि व्यावसायिक आणि कामगार या दोन वर्गांमध्ये कारकुनी काम करणाऱ्या नागरिकांचा एक माध्यम वर्ग होता, तसेच उद्योगपतींच्या वर्गांमध्ये

देखील अनेक उपवर्ग किंवा स्तर होते. पूर्वीपेक्षा उच्चवर्गीय आणि कनिष्ट वर्गियांमधील राहणीमानात कमी फरक असला तरी त्यांच्या दरम्यानचे अंतर सहज पार करता येत नसे. संपन्न कुटुंबातील मुलांना सुरुवातीला अनेक सोयी, शैक्षणिक आणि व्यवसायिक संधी मिळत असत. शिक्षणाच्या आणि व्यवसायाच्या अशा संधी गरीब मुलांच्या आवाक्याबाहेर असत. उद्योगपतींची बहुतेक मुले उच्च अधिकार पदावर असत तर कामगारांची मुले कामगारच राहत असत.

वांशिक आणि राष्ट्रीयत्वाला अधिक महत्त्व दिले जात असल्याने समानतेच्या स्वघोषित अमेरिकन आदर्शाचे पालन होत नसे. अशी समानता तात्पुरती असे, नव्याने दाखल होणाऱ्या स्थलांतरांच्या गटांना सुरुवातीला वैरभावाला तोंड द्यावे लागत असले तरी एक किंवा दोन पिढयामध्ये हे गट अमेरिकन समाजात मिसळून जात असत. २० व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकन समाजातील ९० टक्के निग्रो (ते आता आफ्रिकन - अमेरिकन या नावाने ओळखले जातात) दक्षिणेतील राज्यांमध्ये राहत असत आणि त्यापैकी ३/४ शेती करत असत. काही अपवाद वगळता त्यांना मताचा अधिकार नसे, ज्युरीवर काम करता येत नसे आणि त्यांना कायद्याने दूर ठेवले जात असे. दक्षिणेतील राज्यांतील त्यांची मुले वेगळ्या शाळात जात असत आणि त्यांना जिम क्रो या वंशभेदाच्या नियमानुसार वागवले जात असे. तत्त्वत: त्यांना आणि श्वेत वर्णिय मुलांना मिळणाऱ्या शैक्षणिक आणि अन्य सोयी समान असल्या तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्यांना मिळणाऱ्या सोयी अगदी कमी प्रतीच्या असत.

२० व्या शतकामध्ये कृष्णवर्णियांच्या परिस्थितीमध्ये बरीच सुधारणा झाली. त्यांच्यापैकी अनेक जण शेतीव्यवसाय सोडून शहरांमध्ये गेले. १९५० पर्यंत निम्मे कृष्णवर्णिय शहरांमध्ये राहत होते आणि त्यांच्या पैकी १/३ पेक्षा जास्त दक्षिणेतील राज्यांतून बाहेर गेले होते. श्वेतवर्णियांच्या विरोधाला न जुमानता उद्योग आणि परिवहन क्षेत्रामध्ये त्यांना रोजगारांच्या अनेक संधी मिळाल्या. कृष्णवर्णियांना अधिक शैक्षणिक सोयी मिळत गेल्याने त्यांच्या तील निरक्षरतेचे प्रमाण कमी झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आणि त्यानंतर त्यांना मिळणाऱ्या सोयी आणि सवलती झपाट्याने वाढत गेल्या. खुद्द अमेरिकेमध्ये जोपर्यंत भेदभाव पाळला जातो, तोपर्यंत स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असल्याचा आपला दावा पोकळ ठरतो असे अनेक अमेरिकन नागरिकांचे मत होते. परदेशातील लोकांनी त्यांच्यावर दांभिकपणाचा आरोप केला असता.

१९५० च्या दशकात कार्यकारी आणि न्यायपालिकेचे समर्थन मिळत गेल्याने कृष्णवर्णियांच्या नेत्यांनी नागरी हक्क मिळवण्याचे प्रयत्न जोमाने सुरु केले.

### ८.४.६ संक्रमणावस्थेतील समाज :

१८८० च्या दशकात अमेरिकन समाजाच्या रचनेतील बदल स्पष्ट दिसू लागले. लोकसंख्येचे स्वरूप आणि सर्वाधिक महत्त्वाच्या सेवा आणि त्यासाठी आवश्यक असलेली कार्यकुशलता यामध्ये बदल झाले. अमेरिकन अर्थव्यवस्थेमधील सेवाक्षेत्रातील वर्चस्व नाकारता येण्यासारखे नव्हते. १८४० च्या दशकापर्यंत गेल्या ५० वर्षातील कल प्रबळ झाला, ७५ टक्के नोकरदार वर्ग किरकोळ विक्रीतील कारकून, कार्यालयातील कारकून, शिक्षक, वैद्य आणि अन्य आरोग्य क्षेत्रातील व्यवसायिक, सरकारी नोकर, वकील आणि कायदा व आर्थिक क्षेत्रातील तज्ज्ञ इत्यादी सेवा क्षेत्रामध्ये काम करू लागले.

सेवा क्षेत्राला संगणकांचा वाढता वापर आणि त्यांची उपलब्धता यांची सेवा क्षेत्रातील कामकाजाला विशेष मदत झाली. आता माहिती तंत्रज्ञानाचे (आय. टी.) युग अवतरले, त्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक बाबतीतील प्रचंड माहिती (डाटा) साठवणे शक्य झाले. १९७० च्या दशकात मोटारीच्या गॅरेज मध्ये कॅलिफोर्नियातील दोन तरुण उद्योजकांनी घरगुती उपयोगासाठी आणि बाजारात मोठा खप असणाऱ्या ॲपल नावाच्या संगणकाची जुळवणी केली. ही संगणक क्षेत्रातील क्रांतीची सुरुवात झाली. १९८० च्या दशकात लाखो संगणक अमेरिकन घरात आणि व्यवसायांत वापरण्यात येऊ लागले.

लोकसंख्येचे स्वरूप देखील बदलले. दुसऱ्या महायुद्धानंतर जन्म दर मोठया प्रमाणात वाढला, तो बेबी बूमफ या नावाने ओळखला जातो. १९४६ ते १९६४ हा वाढता दर कायम राहिला. त्यानंतर लोकसंखेच्या एकूण वाढीचे प्रमाण कमी झाले आणि वयस्क लोकांची संख्या वाढत गेली. कुटुंबसंस्थेची रचना देखील बदलली. १९८० मध्ये गृहस्थाश्रमी कुटुंबाच्या टक्केवारीत घट झाली. सर्व गटातील २५ टक्के गटांचा गृहस्थाश्रमी नसलेल्या कुटुंबात समावेश होऊ लागला. अशा गटांत नातेसंबंध नसलेल्या दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र राहत असत. नव्या स्थलांतरितांनी अन्य प्रकारे अमेरिकन समाजाच्या स्वरुपात बदल घडवून आणला. १९६५ मधील स्थलांतराच्या नव्या धोरणाने पश्चिम युरोपावर लक्ष केंद्रित न करता आशियायी आणि लॅटिन अमेरिकेतील स्थलांतरितांना अमेरिकेत स्थलांतर करण्यास उत्तेजन दिले. १९८० मध्ये ८.०८ ००० स्थलांतरित अमेरिकेत कायमच्या वास्तव्यासाठी आले; गेल्या ६० वर्षातील स्थलांतरितांचा हा उच्चांक होता. जगभरातील लोक अमेरिकेकडे आकर्षित होऊ लागेल.

१९८० च्या दशकात समाजामधील अन्य गटही संधीची समानता मिळवण्याच्या संघर्षामध्ये सामील झाले. समलिंगी संबंध ठेऊ इच्छिणाऱ्या काही गटांनी नागरी हक्काच्या चळवळीच्या काही तंत्रांचा वापर करून आपल्याशी होणारा भेदभाव नष्ट व्हावा यासाठी प्रयत्न केले. अशा दबावाचा काही वेळा उपयोग होत असे. उदाहरणार्थ, १९७५ मध्ये अमेरिकन सिव्हिल सर्व्हिस कमिशनने समलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्तींवरील बंदी उठवली. अनेक राज्यांनी पक्षपाताला आळा घालणारे अनेक कायदे केले. या विरुद्ध काही वेळा तीव्र प्रतिक्रिया उमटली आणि समलिंगी संबंध ठेऊ इच्छिणाऱ्या अनेक व्यक्तींच्या विरोधात हिंसाचार झाला.

१९८१ मध्ये एड्स (अक्वायर्ड इम्युनिटी डेफिशियन्सी सिंड्रोम) या भयावह रोगाचा शोध लागला, त्याचा शरिरातील प्रतिकार शक्तीवर विपरीत परिणाम होत असे. लैंगिक संबंध आणि रक्तामधून या रोगाची बाधा होत असे. अमेरिकेमध्ये समलिंगी संबंध ठेऊ इच्छिणारे स्त्री - पुरुष त्याचे बळी होत असत. १९९२ पर्यंत या रोगाने अमेरिकेमध्ये १,५०,००० जणांचे बळी घेतले. आणि त्या रोगाची बाधा झालेल्यांचा आकडा अंदाजे ३००,००० ते १०,००,००० होता. या रोगाची साथ अमेरिकेपुरती मर्यादित नव्हती. या रोगावरील उपचार पद्धती शोधण्यासाठी आणि वैद्यकीय संशोधक एकत्र आले. अमेरिका आणि फ्रान्स यांच्या संयुक्त संशोधनातून एड्सचे विषाणू सापडले, त्यांच्या रक्तामधील प्रवेश रोखण्यासाठी काही चाचण्या करण्यात आल्या.

**आपली प्रगती तपासा :**

१. इ. स. १८४८ च्या न्यूयॉर्क येथील सभेने कोणता जाहीरनामा जारी केला ?

२. लैंगिकतेविषयीचा अमेरिकन दृष्टीकोन कसा होता ते स्पष्ट करा.

## ८.५ संस्कृती

अन्य देशातील संस्कृती प्रमाणे अमेरिकन संस्कृती भाववाचक शक्तींमुळे नव्हे तर अद्वितिय प्रतिभेचे लेणे लाभलेल्या स्त्री - पुरुषांनी घडवलेली आहे आणि अशा प्रतिभावंत कलाकारांपैकी अनेकांनी जनसामान्यांच्या दैनंदिनी जीवनाच्या वास्तवापासून फटकून राहण्याचे पसंत केले आहे. १९२० च्या दशकात अनेक अमेरिकन कलाकारांनी त्यांचे आधुनिक जीवनाच्या स्वरूपा विषयी असमाधान व्यक्त करण्यासाठी कुटुंब आणि धर्मावर आपले लक्ष केंद्रित केले. त्या काळात एक वृद्धिंगत शहरी, धर्मनिरपेक्ष समाज आणि जुनी ग्रामीण परंपरा यामध्ये संघर्ष निर्माण झाला होता. उदाहरणार्थ, बिली संडे हे व्यवसायिक बेसबॉल खेळाडू मूलतत्त्ववादी धर्मप्रचारक बनले, त्यांनी पूर्वीच्या साध्या जीवनशैली आत्मसात करण्याची अनेकांची जी इच्छा होती ती व्यक्त केली.

या भावनेचे दृश्यस्वरूप मूलतत्त्ववादी धर्मयुद्धामध्ये दिसून येते, त्यामध्ये बायबलचे अर्थबोधन आणि प्राणीजीवनाच्या उत्क्रांतीचा डार्विनचा सिद्धांत एकमेकाच्या विरोधात समोरासमोर उभे राहिले. १९२० च्या दशकात अमेरिकेतील मध्य - पश्चिम आणि दक्षिणेतील राज्यांच्या कायदेमंडळांमध्ये उत्क्रांतीवादावर बंदी घालण्याचे प्रस्ताव सदर करण्यात आले होते. १९२५ मध्ये या वादाला तोंड फुटले. टेनेसी राज्यातील अमेरिकन सिव्हिल लिबर्टी युनियन या संघटनेने देशातील पहिल्या उत्क्रांती विरोधी कायद्याला आव्हान दिले. जॉन स्कोपस या माध्यमिक शालेतील तरुण शिक्षकावर विद्यार्थ्यांना उत्क्रांतीचा सिद्धांत शिकवल्याबद्दल खटला भरण्यात आला. त्याला शिक्षा झाली असली तरी काही तांत्रिक कारणाने त्याची सुटका झाली. संस्कृती संघर्षाचे एक अन्य उदाहरण दारूबंदीच्या कायद्याचे होते. या कायद्यान्वये अल्कोहोलयुक्त पेयांची निर्मिती, वहातुक आणि विक्री यावर बंदी घातली गेली. दारूबंदीचे उदिष्ट व्यसनमुक्त समाज निर्माण करण्याचे असले तरी त्यामुळे दारूचे हजारो बेकायदेशीर गुत्ते निर्माण झाले, ते स्पिकेझीफ्फ या नावाने ओळखले जात असत. अखेरीस १९३३ मध्ये दारूबंदी रद्द करणारा एक कायदा करावा लागला.

त्या काळातील सामाजिक आणि बौद्धिक जीवनशैलीच्या विरोधातील प्रतिक्रियेने मूलतत्त्ववादी धर्म आणि दारूबंदी या भिन्न समस्यांना एकत्र आणले. १९२० च्या दशकातील ही अतिरेकी जीवनशैली जाझ एज या नावाने ओळखली जात असे. अमेरिकन तरुणांच्या, विशेषतः महाविद्यालयीन तरुणांच्या चालीरीती, नैतिकता आणि शैलीतील बदलांनी अनेक अमेरिकन नागरिकांना धक्का बसला. एच. एल. मेन्केन या पत्रकारांनी अमेरिकन जीवनातील या दंभ आणि दृष्टाव्यावर कडाडून टिका केली. त्यांच्या टिकेमुळे त्यांना अमाप प्रसिद्धी मिळाली. एफ. स्कॉट फिट्सजिरल्ड या लेखकाने आपल्या कथा कादंबऱ्यातून या दशकातील अमेरिकन मनाची घालमेल, उर्जा आणि भ्रमनिरास यांचे यथार्थ चित्रण केले आहे. त्यांची द *ग्रेट गट्स्बीफ* ही कादंबरी विशेष गाजली होती.

त्या काळातील लेखक आणि बुद्धिवाद्यांच्या एका छोटया, परंतु प्रभावी चळवळीत फिट्सजिरल्ड सहभागी झाले होते, ही चळवळ *लॉस्ट जनरेशनफ* या नावाने ओळखली जात असे. पहिल्या युद्धातील नरसंहाराचा या चळवळीला उबग आला होता, अमेरिकेन जीवनातील अतिरेकी भौतिकता आणि अध्यात्मिक वैयर्थ या विषयी ही चळवळ नाराज होती. त्याच वेळी कृष्णवर्णिय साक्षरता आणि कलाविषयक चळवळीने परंपरागत मध्यम वर्गिय साहित्य प्रकार टाकाऊ ठरवले तसेच अमेरिकन जीवनातील सत्याला देखील ही चळवळ सामोरी गेली. कृष्णवर्णियांची ही चळवळ *हार्लेम रेनेसांफ* या नावाने ओळखली जाते.

१९५० च्या दशकात अमेरिकन समाजात सर्वत्र सारखेपणाची भावना पसरली होती. व्यक्तीगत प्रयत्न करण्याऐवजी तरुण आणि वयस्क या दोन्ही गटांनी आपल्या गटाची प्रमाणे स्वीकारली होती. सर्वांनाच सारखेपणाची भावना वाटत असे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्त्री - पुरुषांना रोजगाराच्या नव्या पद्धती स्वीकाराव्या लागल्या असल्यातरी एकदा युद्ध संपल्यानंतर ते आपल्या पारंपारिक भूमिकेमध्ये स्थिरावले होते. कुटुंबप्रमुख या नात्याने पुरुषांनी आपल्या कुटुंबियांच्या चरितार्थाची सोय करावी अशी अपेक्षा होती आणि नोकरी करणाऱ्या स्त्रीयांनी देखील गृहिणीची भूमिका मोठया आनंदाने स्वीकारली होती. तरुण आणि वयस्क या दोन्ही गटांना टेलिव्हिजनच्या कार्यक्रमांनी सर्वसामान्य सामाजिक पद्धती आत्मसात करण्यास भाग पडल्याने या कार्यक्रमांनी एकजिनसीकरण्याच्या प्रक्रियेला चालना दिली होती.

मात्र सर्व अमेरिकनांनी असे समान नमूद स्वीकारले नाहीत. अनेक लेखकांनी प्रचलित मूल्यांविरुद्ध बंड केले. हे बंडखोर लेखक *बिट जनरेशनफ* या नावाने ओळखले जात असत. त्यांनी उत्स्फूर्तता आणि अध्यात्मिकतेवर अधिक भर दिला, त्यांनी विवेकवादाऐवजी अंर्तज्ञान आणि संस्थापक धर्माऐवजी पौर्वात्य अध्यात्मिकतेला अधिक पसंत केले. बिट लेखकांनी प्रतिष्ठेच्या सर्व कल्पनांना आव्हान देण्याचा प्रयत्न करून संस्कृतीला जबरदस्त धक्का दिला. त्यांच्या साहित्यकृतीमध्ये त्यांच्या स्वातंत्र्याच्या भावनेची प्रचिती येते. जॅक केरुआक यांनी *ऑन द रोडफ* ही आपली पूर्ण कादंबरी ७५ मिटर लांबीच्या कागदाच्या भेंडोळ्यावर लिहिली होती. या विरामचिन्ह आणि पॅरारहित कांदबरीने मुक्त जीवनाच्या सर्व शक्यतांचे उदात्तीकरण केले होते.

संगीतकार आणि कलाकारांनीही बंडाचा झेंडा उभा केला होता. टेनिसी राज्यातील एल्व्हिस प्रिस्ले या गायकाने *रॉक अँड रोलफ* हा संगीताचा प्रकार लोकप्रिय केला. आपली विचित्र केशभूषा आणि लचकत्या कंबरेने केलेल्या नृत्याचे सर्व गंभीर अमेरिकनांना धक्का दिला होता. त्याशिवाय कृष्णवर्णियांचे संगीत श्वेतवर्णियांमध्येही लोकप्रिय असल्याचे सिद्ध करून एल्व्हिस प्रिस्ले आणि अन्य *रॉकफ* गायकांनी अमेरिकन संस्कृतीच्या एकात्मतेला चालना दिली होती. जॅक्सन पोलॉक या चित्रकाराने चित्रकाराच्या फळ्याचा वापर न करता जमिनीवर आपले कॅन्व्हास पसरले, त्यावर अनेक रंग, वाळू आणि चित्रकलेच्या अन्य साधनांचा गडद छटा रंगवल्या. त्यांचे ही चित्रकृती १९६० च्या दशकातील व्यापक आणि खोलवर रुजलेल्या सामाजिक क्रांतीचे प्रतीक मानली गेली .

१९७० आणि १९८० च्या दशकात प्रतिक्रांतीची सर्व लक्षणे स्पष्ट दिसत होती. पुरुष लांब केस आणि दाढी राखू लागले. विजारी, शर्ट, कोट आणि टाय यांची जागा निळ्या जिन्स आणि टी शर्ट्स यांनी घेतली. बेकायदा मादक आणि अमली पदार्थांचे सेवन अधिक प्रमाणात होत असल्याने गतकालीन बंधनापासून मन मुक्त करण्याचा प्रयत्न केला गेला. बिटल्स , रोलिंग स्टोन्स आणि अन्य ब्रिटिश संगीतकारांच्या समुहांनी सर्वत्र एकच खळबळ उडवून दिली. संगीताचा *हार्ड रॉकफ* हा प्रकार लोकप्रिय झाला. राजकीय आणि सामाजिक भाष्य करणारी बॉब डिलन या सारख्या गीतकारांची गीते सर्वदूर ऐकण्यात येत असत. १९६० चा दशकाच्या मध्यावरच्या नागरी हक्कांच्या चळवळीने अमेरिकन समाजातील प्रतिक्रांतीला चालना दिली होती.

## ८.६ समारोप

पारंपारिक अमेरिकन समाजामध्ये स्त्रियांना विशेष अधिकार नव्हते, मुक्ती चळवळीच्या माध्यमातून अमेरिकेमध्ये महिलांच्या विविध कायदेशीर अधिकारासंदर्भात आवाज उठविण्यात आला, त्यानुसार त्यांना मतदानाचा अधिकार १९२० मध्ये मिळाला. तसेच विवाहानंतर मालमत्ता धारणेच्या अधिकारासह अनेक समानतेचे अधिकार हळूहळू विविध कायद्यांच्या माध्यमातून देण्यात आले होते. मुक्ति चळवळीच्या परिणामामुळे अमेरिकन स्त्रियांना असमानतेचे अधिकार मिळण्यास मदत झाली.

## ८.७ प्रश्न

१) अमेरिकेतील स्त्रीयांच्या हक्कांचा आढावा घ्या.

२) अमेरिकेतील समाज व संस्कृतीवर सविस्तर टिपा लिहा.

❖❖❖❖

munotes.in

# ९

# अमेरिकन कामगार संघटना, स्थलांतर आणि वांशिकता

**घटक रचना :**

९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ कामगार संघटना

९.३ कामगार संघटनांची सुरुवात

९.४ कामगार आणि न्यायालये

९.५ कामगार आणि न्यु डिल कार्यक्रम

९.६ स्थलांतर

९.७ वांशिकता

९.८ समारोप

९.९ प्रश्न

## ९.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेवले आहे.

- अमेरिकेतील कामगार संघटनांच्या स्थापनेचा अभ्यास करणे.
- अमेरिकेतील कामगार न्यायालय आणि न्यु-डील कार्यक्रमाचे महत्त्व समजून घेणे.

## ९.१ प्रस्तावना

१८३० च्या दशकापर्यंत शेतमजूरामध्ये स्त्रीया आणि लहान मुलांचाही समावेश होत असे. लहान मुलांना प्रथम सुती कापडाच्या गिरण्यात कामावर ठवले जाई. द बॉस्टन मनुफॅक्चरिंग कंपनीने सर्व प्रथम तरुणींना रोजगार पुरवण्यास सुरुवात केली. त्यांच्या सोयीसाठी कंपनीने वसतीगृहे बांधली, त्यांच्या नितीमत्तेवरही देखरेख केली, त्यांनी आपल्या सांस्कृतीक आवडींची जोपासना करावी यासाठी त्यांना उत्तेजन दिले, चर्चमधील प्रार्थनेला त्यांनी नियमित हजर राहावे यावर त्यांच्या कटाक्ष असे, या नियमांचा भंग करणाऱ्यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट केले जाई. वॉल्थॅम सिस्टीमया नावाने हे नियम ओळखले जात असत. १८३१ मध्ये न्यु इंग्लंड प्रदेशातील सुतीकापडाच्या गिरण्यातील

४/५ कामगार स्त्रीया होत्या. १८३० च्या दशकात आयर्लंडमधील स्थलांतरित मोठया संख्येने अमेरिकेत येऊ लागले, त्यांनी न्यु इंग्लंड प्रदेशातील मूळ रहिवाशांचा रोजगार हिरावून घेतला. लवकरच सुती कापडाचा उद्योग अडचणीत आला, रोजगार कमी झाला आणि उत्पादनाची प्रक्रिया जलद गतीने होऊ लागली. परिणामी वॉल्थॅम सिस्टीम पुरेशी आकर्षक राहिली नाही. मुली सुती कापडाच्या गिरण्यात काम करेनाशा झाल्या, त्यांची जागा आयरिश कामगारांनी घेतली.

औद्योगिक क्रांतीच्या पूर्वी अमेरिकेमधील कायमस्वरूपी कामगार वर्ग फारसा मोठा नव्हता. कारखाना पद्धतीचा विस्तार होत गेल्याने शहरी विभागांची झपाटयाने वाढ होत गेली, कामगारांना तेथील गलिच्छ वस्त्यामध्ये राहाणे भाग पडत असे. अर्थात अशा गलिच्छ वस्त्यामध्ये आरोग्य किंवा अन्य सेवांचा पूर्ण अभाव असे. शेतमजूरांना मिळणारा रोजगार अधिक असला तरी त्यांचे जीवन अधिक कष्टकारक होते. अर्थव्यवस्थेमधील तेजी आणि मंदीची आवर्तने नियंत्रित करता किंवा त्यांचे विपरित परिणाम कमी करता येणार नाहीत अशी समजूत समग्र १९ व्या शतकात प्रचलित होती. परिणामी कामगारांचे रोजगार सुरक्षित नसत.

## ९.२ कामगार संघटना

सुरुवातीच्या कामगार संघटना औद्योगिक कामगारांच्या नसून त्या मोची, (त्याकाळी ते कॉर्डविनर्स या नावाने ओळखले जात असत), टोप्या बनवणारे, सुतार आणि छपाई कामगार अशा कुशल कारागिरांच्या होत्या. हे कुशल कारागिर पूर्वी स्वतंत्र असले तरी आता ते व्यापारी भांडवलदारांचे सेवक झाले होते. ढासळत्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना संघटित व्हावे लागले. अकुशल कामगारांना मात्र संघटित होणे शक्य नव्हते. फिलाडेल्फिया शहरातील मोच्यांनी १७९९ मध्ये वेतनवाढीसाठी संप केला होता. मात्र सुरुवातीच्या कामगार संघटना अल्पायुषी होत्या. ठराविक गाऱ्हाणी दूर करण्यासाठी त्या संघटित होत असत आणि गाऱ्हाणी दूर झाल्यावर त्या नामशेष होत असत.

१६२८ ते १८३७ या काळात कामगार संघटनांची झपाटयाने वाढ झाली. फिलाडेल्फिया येथील कारागिरांनी त्यांची मेकॅनिक्स सेंट्रल असोसिएशन या नावाची मध्यवर्ती संघटना स्थापन केली. अन्य १३ शहरातही असा संघटना स्थापन झाल्या. १८३४ मध्ये त्यापैकी ६ संघटनांच्या प्रतिनिधींना एकत्र येऊन नॅशनल ट्रेड युनियन या कामगार संघटनेची स्थापना केली. १८३३ - १८३७ या काळात १७५ संप झाले. सुरुवातीला न्यायालयांनी ते बेकायदेशीर ठरवले. १८४२ मधील कॉमनवेल्थ हंट या खटल्याचा निवाडा करताना मॅसाच्युसेट्स न्यायालयाने कामगारांचा संघटित होण्याचा हक्क पूर्णतः मान्य केला. अन्य राज्यांतील न्यायालयांनी या युगप्रवर्तक निवाडयाचे अनुकरण केले. कामगारांना दर रोज तास १० तासापेक्षा जास्त काम करावे लागू नये ही कामगार संघटनांची मुख्य मागणी होती. बॉस्टन शहरातील सुतारांनी प्रथम ही मागणी केली आणि १९३५ पर्यंत या मागणीने राष्ट्रीय स्वरूप धारण केले, अनेक संपाचे उद्दिष्ट तेच होते. कुशल कारागिरांची ही मागणी मान्य झाली होती. त्याशिवाय, त्यांच्या कामाक्षी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या अनेक सुधारणामध्ये कामगार संघटनांनी स्वारस्य दाखवले. मतदानाच्या हक्कासाठी मालमत्तेची

अट रद्द करावी, लोकशाही प्रक्रिया अधिक व्यापक करावी, मोफत शिक्षण दिले जावे आणि कर्जधारकांना तुरुंगात डांबू नये इत्यादी मागण्या कामगार संघटनांनी केल्या.

## ९.३ कामगार संघटनांची सुरुवात

२० व्या शतकाच्या पूर्वी ज्या व्यवसायात कुशल कारागिरांची गरज असे ते व्यवसाय वगळता अन्य क्षेत्रात कामगार संघटनांची फारशी प्रगती झाली नव्हती. हे कारागिर सशक्त भूमिकेतून सौदेबाजी करु शकत असत कारण त्यांच्या ऐवजी अन्य कारागिरांची नियुक्ती सहज करणे शक्य नव्हते. यादवी युद्धाच्या पूर्वी अनेक कारागिर संघटना स्थापन झाल्या परंतु त्या सर्वांची एक समान संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न मात्र अयशस्वी झाला. १८६५ मध्ये विल्यम सिल्वीस यांनी नॅशनल लेबर युनियन संघटित केली, १८६७ पर्यंत आपले ६००,००० सभासद असल्याचा तिचा दावा होता. तथापि, विविध राजकीय सुधारणांचा पुरस्कार करण्यात तिने आपली शक्ती खर्च केल्याने ती लवकरच नामशेष झाली. १८६९ मध्ये युरिया स्टिफनस या फिलाडेल्फिया शहरातील एका शिंप्याने नाईट्स ऑफ लेबर ही संघटना स्थापना केली. मात्र तिलाही वास्तवाचे भान राहिले नाही. संघटनेने सर्व प्रकारच्या लोकांना संघटनेत सामील केले. सहकारी सोसायट्या स्थापन करून आणि कायदे करून तिने आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला, मालक वर्गाशी संघर्ष करण्यात तिला स्वारस्य नव्हते. टेरेन्स पावडरले हे पेनसिल्व्हानियातील एक यंत्रकामगार होते. १८७९ मध्ये त्यांनी संघटनेची सूत्रे आपल्या हाती घेतली, त्यानंतर तिची प्रगती झपाट्याने होत गेली. १८८६ पर्यंत संघटनेच्या सभासदांची संख्या ७,००,००० होती. परंतु पावडरले आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्याकडे संघटना कौशल्याचा अभाव होता आणि ते कामगारांना योग्य मार्गदर्शन करू शकले नाहीत. परिणामी १९०० पर्यंत ती संघटना जवळपास नामशेष झाली.

१८८१ मध्ये न्यु यॉर्क मधील सॅम्युएल गॉम्पर्स या एका सिगार कारखानदाराने साधी आणि सरळ कामगार संघटना सुरु केली. अति महत्त्वाकांक्षी आणि दूरवरच्या उद्दिष्टांची हाव न करता तात्काळ मिळू शकणाऱ्या फायद्यावर तिने आपले लक्ष केंद्रित केले. १८८६ मध्ये संघटनेने अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर हे नवे नाव धारण केले. धिमी आणि संथ गतीने वाढत गेलेल्या या संघटनेच्या सभासदांची संख्या १९०० पर्यंत ५,५०,००० झाली होती. १९२४ मध्ये गॉम्पर्स यांचा मृत्यू झाला, तो पर्यंत ते या संघटनेचे अध्यक्ष होते.

या नव्या प्रकारच्या संघटनेने कडक शिस्तीवर आणि संघटनेची वर्गणी नियमित देण्यावर भर दिला. संघटनेवर केंद्रिय नेतृत्वाचे नियंत्रण असे आणि पगारी अधिकारी संघटनेवर लक्ष ठेवत असत. संपकाळात उपयोगी पडेल असा एक राखीव कोश त्यांनी उभा केला. त्यामधूनच कामगारांना विम्याचा लाभ मिळत असे. सामुदायिक सौदेबाजी स्थापन करण्याचे संघटनेचे उद्दिष्टये होते आणि शक्य तेथे क्लोज्ड शॉप पद्धत अवलंबण्याचा संघटनेचा विचार होता. या पद्धतीनुसार काही प्रकारच्या कामावर कामगार संघटनेच्या सभासदांची नियुक्ती होत असे. गॉम्पर्स यांचे कौशल्य, धूर्तपणा आणि प्रभावी व्यक्तीमत्व यामुळे अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर या संघटनेला अमेरिकन समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले. संप आणि अन्य मार्गांनी संघटनेने अनेक मालकांना सामुदायिक सौदेबाजी स्वीकारण्यास भाग पाडले. मात्र या संघटनेने आपल्या सभासदांचे वेतनमान वाढवले असले

आणि कामाचे तास कमी केले असले तरी बहुसंख्य अमेरिकन कामगारांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न तिने केला नाही. कुशल कारागिरांच्या उच्च वर्गाचे प्रतिनिधित्व ही संघटना करत असे. अन्य मूलभूत उद्योगामध्ये मात्र तिला प्रवेश करता आला नाही.

## ९.४ कामगार आणि न्यायालये

कामगार संघटनाच्या वाढीतील न्यायालयांचा दृष्टीकोन हा महत्त्वाचा अडथळा होता. न्यायालये अनेक वेळा मालकांच्या बाजूने पक्षपात करत असत. संप आणि निदर्शने करण्याला प्रतिबंध केला जाई. प्रतिबंधांचा भंग करणाऱ्या कामगारांना न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल शिक्षा केली जात असे.

## ९.५ कामगार आणि न्यु डिल कार्यक्रम

न्यु डिल कार्यक्रमाने कामगारांचा भरीव फायदा झाला. नॅशनल लेबर रिलेशन्स ॲक्ट या कायद्यान्वये कामगारांचे वेतन वाढले आणि कामाचे तास कमी झाले तसेच कामगार संघटनांच्या चळवळीला चालना मिळाली. जुलै, १९३५ मध्ये काँग्रेसने वॅग्नर ॲक्ट हा कायदा करून कामगारांच्या संघटना करण्याच्या आणि सामुदायिक सौदेबाजीच्या हक्काचा पुनरुच्चार केला. १९३८ मध्ये काँग्रेसने फेअर लेबर स्टँडर्ड ॲक्ट हा कायदा केला, कायद्यानुसार किमान वेतन आणि कामाचे कमाल तास निश्चित करण्यात आले आणि विविध राज्या दरम्यानच्या वाणिज्यामध्ये गुंतलेल्या उद्योगांमध्ये बाल कामगारांना कामावर ठेवण्याची मनाई करण्यात आली. .

न्यु डिल कार्यक्रमाने कामगार चळवळीला पाठिंबा दिल्याने कामगार चळवळीने काही जहाल कार्यक्रम हाती घेतला. १९२४ मध्ये गॉम्पर्स मरण पावल्या नंतर काही जहाल कामगार नेत्यांनी कमिटी फॉर इंडस्ट्रीयल ऑर्गनायझेशन ही संघटना स्थापना केली. आता कामगारांच्या संघटना अमेरिकेच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात महत्त्वाची भूमिका बजावू लागल्या. डिसेंबर, १९५५ मध्ये अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर आणि कमिटी फॉर इंडस्ट्रीयल ऑर्गनायझेशन या संघटना एकत्र आल्या, या एकत्रित संघटनेची सभासद संख्या डिसेंबर, १९५५ मध्ये १६,००,००० होती. अनेक वेळा कामगार संघटनांच्या नेत्यांची सत्ता फारच मोठी होती, काही वेळेस त्यांनी या सत्तेचा दुरुपयोग केला. अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबरच्या काही शाखांचे नेतृत्व गुंडांच्या हाती होते तर कमिटी फॉर इंडस्ट्रीयल ऑर्गनायझेशनचे नेतृत्व काही साम्यवादी नेते करत होते. त्यांच्यापैकी काही नेत्यांनी संघटनेच्या फायद्यासाठी राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष केले तर काही वेळा आपल्या सभासदांची नोकरी टिकवण्यासाठी तंत्रज्ञानाच्या प्रगती मध्ये अडथळे आणले. काही जहाल चळवळ केली नाही तर आपले न्याय हक्क आपल्याला मिळणार नाहीत अशी कामगारांची खात्री होती आणि कामगार संघटनांच्या वाढीचे तेच मूलभूत कारण होते.

**आपली प्रगती तपासा**

१. फिलाडेल्फिया येथील कारागिरांनी कोणती संघटना स्थापन केली ?

२. कामगारांच्या बाबतीत अमेरिकेतील न्यायालयांचा दृष्टीकोन कसा होता ?

## ९.६ स्थलांतर

जगातील अन्य कोणत्याही देशाचा स्थलांतराशी अमेरिकेसारखा जवळचा संबंध आला नाही. २० व्या शतकाच्या पहिल्या १५ वर्षातच १.३ कोटी स्थलांतरीतांनी अमेरिकेत प्रवेश केला होता. अनेकांनी एलिस बेटाच्या मार्गाने प्रवेश केला होता. न्युयॉर्क बंदरातील केंद्र सरकारचे स्थलांतरितांचे हे केंद्र १८६२ मध्ये स्थापन करण्यात आले होते. आता या केंद्रांचे कामकाज थांबले असले तरी १८९२ मध्ये अमेरिकेत आलेल्या लाखो स्थलांतरितांचे एक स्मारक म्हणून त्याची पुनर्स्थापना करण्यात आली होती.

१७९० मधील पहिल्या सरकारी जणगणनेमध्ये अमेरिकेची लोकसंख्या ३९,२९,२१४ होती. त्यापैकी सुमारे निम्मी लोकसंख्या मूळच्या १३ वसाहतीमधील इंग्लिश लोकांची होती. अन्य लोकांत स्कॉट् - आयरिश, जर्मन, डच, फ्रेंच, स्वीडिश, वेल्श आणि फिन्नीश होती, त्यापैकी बहुतेक प्रॉटेस्टंट पंथीय होते. २० टक्के आफ्रिकन निग्रो गुलाम होते. सुरुवातीपासूनच स्थलांतरीतांकडे स्वस्त मजूरांचा एक स्रोत या दृष्टीने पाहिले जात असे. परिणामस्वरूपी १९२० पर्यंत स्थलांतर करू इच्छिणाऱ्या लोकांच्या संख्येवर काही मर्यादा घातली गेली. स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येने आपली संस्कृती धोक्यात आल्याची अमेरिकनांची भावना झाली. थॉमस जेफरसन यांच्या सारखे सुरुवातीचे नेते सर्वांचेच अमेरिकेत स्वागत करण्याविषयी सांशक होते. ज्या देशात राजेशाही हा राज्यप्रकार प्रचलित आहे आणि ज्या देशातील राजेशाहीची जागा झुंडशाहीने घेतली आहे अशा देशातील स्थलांतरितांच्या हाती अमेरिकन लोकशाही कितपत  सुखरूप राहील याची त्यांना शंका वाटत होती. तथापि, मनुष्यबळाची मोठी कमतरता असल्याने मोजक्या नेत्यांनी अमेरिकेची दारे स्थलांतरितांसाठी कायमची बंद ठेवण्याची कल्पना मान्य केली नाही.

१८ आणि १९ व्या शतकातील युरोपामधील युद्धामुळे अटलांटिक महासागर पार करणे अवघड झाले, तसेच युरोपियन सरकारांनी सैन्य भरतीस योग्य अशा तरुणांची संख्या कमी होऊ नये या उद्देशाने स्थलांतरावर काही निर्बंध लादले. त्यामुळे अमेरिकेत येऊ इच्छिणाऱ्या स्थलांतरितांच्या संख्येत घट झाली. वैद्यकीय क्षेत्रातील वाढत्या सोयी आणि सार्वजनिक आरोग्यातील सुधारणांमुळे १७५० नंतर युरोपियन देशांतील मृत्यूचे प्रमाण कमी झाले. मशागतीच्या सुधारित पद्धती आणि रासायनिक खतांचा वापर यामुळे शेतमालाच्या उत्पादनात वाढ झाली. तरीही तेवढयाच जमिनीची वाढत्या संख्येने शेतकरी मशागत करू लागल्याने जमीनधारणेचे प्रमाण येवढे कमी झाले की त्यावर शेतकरी कुटुंबाचा चरितार्थ जेमतेम चालत असे. औद्योगिक क्रांतीतील यांत्रिक उत्पादनाने कुटिरोद्योगाचा बळी घेतला. हजारो कारागिर रोजगाराच्या अभावी बेकार झाले.

१८९० ते १९२१ या काळात १.९ कोटी स्थलांतरित अमेरिकेत दाखल झाले. त्यापैकी बहुतेक इटली, रशिया, पोलंड, ग्रीस आणि बाल्कन प्रदेशातील होते. आशियातील जपानी,

munotes.in

उत्तरेतील कॅनेडियन आणि दक्षिणेतील मेक्सिकन हे बिगर - युरोपियन होते. १९२० च्या दशकाच्या सुरुवातीला रोजगाराविषयी जागरूक असलेला संघटित कामगारांचा वर्ग आणि *कुक्लुस क्लॅन व इमिग्रेशन रिस्ट्रीक्शन लिग* या सारख्या वांशिक किंवा धार्मिक कारणांवरून स्थलांतरावर नियंत्रण आणू इच्छिणाऱ्या संघटना एकत्र आल्या. १९२४ च्या जॉन्सन - रीड इमिग्रेशन ॲक्ट या कायद्यान्वये स्थलांतरावर कायमचे निर्बंध लादण्यात येऊन प्रत्येक देशाला स्थलांतरितांचा कोटा निश्चित करून देण्यात आला, १९६८ पर्यंत अमेरिकेच्या स्थलांतराच्या धोरणाचे हे वैशिष्ट्य होते.

या कोटा पद्धतीमुळे आग्नेय युरोपियन देशातील स्थलांतरितांचे प्रमाण एकदम कमी झाले, तर वायव्य युरोपियन देशांविषयी या पद्धतीने पक्षपात केला होता. या पद्धतीनुसार ब्रिटन, आयर्लंड आणि जर्मनी या देशांना ७० टक्क्यापेक्षा जास्त कोटा देण्यात आला होता. या देशांनी दिलेला कोटा कधीच पूर्ण केला नाही. १९३० च्या आर्थिक महामंदीने स्थलांतरितांचा ओघ आणखी कमी झाला. अमेरिकन लोकमत स्थलांतराच्या, अगदी गांजलेल्या युरोपियन अल्पसंख्यायिकांच्या स्थलांतराच्या विरोधात असल्याने १९३३ मध्ये ॲडॉल्फ हिटलर जर्मनीमध्ये सत्तेवर आल्यानंतर तुलनेने कमी लोकांना अमेरिकेत स्थलांतर करता आले. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात अमेरिकेने स्थलांतराची कोटा पद्धत राबवली होती. १९५२ मधील मॅककरन - वॉल्टर ॲक्ट या कायद्याच्या समर्थकांनी असा युक्तीवाद केला की कोटा पद्धत शिथिल केल्यास पूर्व युरोपातील मार्क्सवादी क्रांतिकारक अमेरिकेत एकच गर्दी करतील.

डिसेंबर १९६५ मध्ये कोटा पद्धत शिथिल करण्यात आले. १९६८ मध्ये तिची जागा जो पहिला येइल तो पहिला (अमेरिकेत) येइल या धोरणाने घेतली. पश्चिम गोलार्धातील देशांसाठी दर वर्षी १,७०,००० स्थलांतरितांना अमेरिकेत येण्याचा परवाना (व्हिसा) देण्याचा निर्णय घेण्यात आला, मात्र कोणत्याही एका देशाला २०,००,००० पेक्षा जास्त परवाने मिळणार नव्हते. १९७८ मध्ये गोलार्धातील कोटयाऐवजी जाग जगभरातील स्थलांतरितांचा कोटा २,९०,००० निश्चित करण्यात आला; १९८० चा रेफ्युजी ॲक्ट हा कायदा पारित झाल्यावर ही मर्यादा २,७०,००० एवढी कमी करण्यात आले. १९७० च्या दशकाच्या मध्यापासून अमेरिकेमध्ये येऊ इच्छिणाऱ्या स्थलांतरितांची संख्या वाढतच गेली. आशिया आणि लॅटिन अमेरिकन देशातील लोक जास्त प्रमाणात स्थलांतर करू लागले. त्यामुळे अमेरिकेतील समाज जीवनात परिवर्तन झाले.

अमेरिकेत नव्याने येऊ इच्छिणाऱ्या स्थलांतरितांविषयी खुला दृष्टीकोन स्वीकारल्याने निर्वासितांच्या विषयी वाटणारा संशय कमी झाला. पूर्व युरोप, कॅरिबियन, मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील देश आणि आशिया मधील जुलमी राजवटीपासून सुटका करू पाहणाऱ्या लोकांची संख्या वाढतच गेली. व्हिएटनामी लोकांविषयीच्या सहानुभूतीपोटी वांशिक हेवेदावे कमी झाले. ज्या प्रकारे हे सर्वजण अमेरिकन जीवनात सामावले गेले त्यावरून हे धोरण सुज्ञ असल्याचे सिद्ध होते.

स्थलांतर आणि निर्वासितांचा कोटा मागणीपेक्षा कमी असल्याने बेकायदा स्थलांतराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. १९६८ मध्ये बेकायदेशीर अमेरिकेत दाखल झालेल्यांना रीतसर स्थलांतरितांचा दर्जा दिला गेला आणि त्याच बरोबर विनापरवाना अमेरिकेत

कोणीही दाखल होणार नाही याची खबरदारी घेण्यात आली. १९६८ मध्ये देशागणिक देण्यात येणारी कोटा पद्धत कालबाह्य झाल्याने कौटुंबिक मंडळींना स्थलांतराचा परवाना देण्याची पद्धत अंमलात आली. नव्या कायद्यान्वये युरोपियन लोकांच्या ऐवजी आशियाशी लोकांना अग्रक्रम देण्याची पद्धत अंमलात आले. ताज्या अंदाजानुसार दरवर्षी सुमारे ६,००,००० नवागत कायदेशीरपणे अमेरिकेत प्रवेश करतात.

"अमेरिका खुणावते पण अमेरिकनांची घृणा वाटते अशा अर्थाची म्हण पूर्वी प्रचलित होती. नवे स्थलांतरित अमेरिकेच्या आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतीक मुख्य प्रवाहात सामील होत असल्याने स्थलांतराचा वाद अधिक तीव्र झाला आहे. बहुतेक अमेरिकनांनी अशी खात्री आहे की स्वातंत्र्यदेवीची (स्टॅच्यु ऑफ लिबर्टी) पुतळा खरोखरच अमेरिका स्वातंत्र्य सर्वजणांचे स्वागत करते. ही श्रद्धा आणि त्यांचे पूर्वज एकेकाळी स्थलांतरीतच होते या जाणीवेने अमेरिका एक अद्वितीय देश झाला आहे."

## ९.७ वांशिकता

'वांशिकता' हा शब्दप्रयोग नव्याने दाखल झालेल्या स्थलांतरितांच्या वंशजांच्या संदर्भात वापरला जात असला तरी त्याचा खरा अर्थ सांस्कृतिक वारसा आणि नव्या जगातील अनुभव या समान सूत्राने बांधले गेलेले सर्व गट असा आहे. नव्याने प्रस्थापित झालेल्या वांशिक गटांनी जास्त प्रमाणात ऐक्यभावना आणि बाह्यस्वरूप जोपासले आहे. खरेतर १९७० आणि १९८० च्या दशकांमध्ये 'वांशिकता' हा शब्द पोलिश, इटालियन, लिथुआनियन, बोहिमियन, स्लोव्हाकियन आणि अन्य वंशिय अमेरिकनांसाठी वापरला जाऊ लागला. त्यापैकी बहुतेक लोक उत्तर आणि मध्य - पश्चिमेतील राज्यातील शहरात वास्तव्य करतात. ते मध्यमवर्गीय रोमन कॅथॉलिक आहेत.

बहुतेक कामगार कारखान्यांत काम करतात किंवा कनिष्ठ दर्जाची कारकूनी कामे करतात. ज्या वस्त्यांमधून त्यांचे वास्तव्य असते त्या वस्त्यांचे मूळ ङ्कलिटल इटलीफ किंवा ङ्कपोलिश हिल्सफ अशा मूळ स्थलांतरितांनी स्थापन केलेल्या वस्त्यामध्ये आढळते. त्यांचा जीवन पद्धतीमध्ये त्यांचे वांशिक बंध प्रकर्षाने जाणवतात. त्यांचे जीवनसाथी, मित्र, शेजारी, एकाच धर्माचे अनुयायी आणि अगदी त्यांच्या बरोबरीने काम कामगारही पोलिश, इटालियन किंवा स्लोव्हाकियन असतात. त्यांचा वांशिक गट हा परिचय प्रचंड प्रमाणातील स्थलांतराच्या काळापासून जपण्यात आलेला नाही. तो समान सांस्कृतिक वारसा तसेच समान हितसंबंध, गरजा आणि सध्याच्या अमेरिकन जीवनात त्यांना भेडसावणाऱ्या समस्यावर आधारित आहे.

हे वांशिक गट जसे अधिक वाचाळ झाले तसे जनसामान्यांना शहरी वांशिक अल्पसंख्यायिकच्या समस्या आणि चिंतांची जाणीव होऊ लागल्याने त्यांना ङ्कवंशवादीता किंवा ङ्कअशिक्षितता असे हिणवण्याचे प्रकार थांबले. सरकारच्या समाजकल्याणाच्या कार्यक्रमाचे नियोजन आणि प्रशासनात वांशिक गटांचा समावेश होऊ लागला. आता वांशिक परिचय ही अमेरिकाविरोधी किंवा शरमेची बाब मानली जात नाही. ङ्कवांशिकतापणा आता वैध मानाला जातो.

munotes.in

**९.७.१ कृष्णवर्णिय :**

१९६० च्या दशकाच्या सुरुवातीच्या नागरी हक्कांच्या जोदार चळवळीने कृष्णवर्णियांच्या शोचनिय परिस्थितीविषयी देशाची सद्सदविवेक बुद्धी जागृत झाली. ते दीर्घकाळ प्रथम दर्जाच्या नागरिकत्वापासून दूर राहिले होते. २० व्या शतकाच्या अखेरिस दारिद्रय निर्मूलनाचा सरकारी कार्यक्रम आणि शिक्षण, रोजगार आणि निवास या विषयी समान संधीचा कायदा असूनही कृष्णवर्णिय अमेरिकन समाजात पूर्णतः सामावले गेले नव्हते. श्वेतवर्णियांपेक्षा त्यांचे उत्पन्न आणि शिक्षण कमी आहे. कृष्णवर्णियांची बेरोजगारी सरासरीने जास्त आहे. अशा परिस्थितीतही त्यांनी नेत्रदीपक प्रगती केली आहे. उच्च वेतनश्रेणीच्या नोकऱ्या, त्यांचे सरासरी उत्पन्न आणि महाविद्यालयिन शिक्षणातील त्यांचा सहभाग यात निश्चित वाढ झाली आहे.

अमेरिकन समाजात आपले न्याय हक्क मिळवण्यासाठी जहाल कृष्णवर्णियांनी केलेली चळवळ हा एक महत्त्वाचा घटक आहे. या जहाल मतवाद्यांनी अमेरिकन संस्कृतीचा मुख्य प्रवाह नाकारला, ते कृष्णवर्णियांच्या अभिमानाची भाषा बोलतात. ज्या राजकीय संघटना त्यांना सौदा करण्याची आणि कृष्णवर्णिय समाजावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती देतील अशा संघटना विकसित करण्यावर त्यांनी अधिक भर दिला आहे. नागरी हक्कांच्या जुन्या परंपरा अद्याप सशक्त आहेत, अधिक व्यापक व्यवसायिक आणि औद्योगिक संधी मिळाल्याने त्या सुदृढ आहेत. शिकागो, लॉस एंजलिस, क्लिव्हलँड, बाल्टिमोर, अटलांटा आणि वॉशिंग्टन (डी.सी.) या शहरांतील कृष्णवर्णिय महापौर श्वेतवर्णियांच्या पाठिंब्याने निर्वाचित झाले आहेत. त्यावरून अमेरिकन राजकीय व्यवस्था खुली असल्याचे स्पष्ट होते. सर्व स्तरावरील सरकारी कार्यक्रमांनी वंचितांची परिस्थिती सुधारण्याचे आश्वासन दिले आहे. त्यापेक्षाही जास्त म्हणजे मार्टिन ल्युथर किंग (ज्युनियर) यांच्या हौतात्म्यानंतरही त्यांचा शांतीचा संदेश अद्याप टिकून आहे. कृष्णवर्णियांची अलगता नाकारणाऱ्या कार्यक्रमावर जेसी जॅक्सन यांनी राष्ट्रध्यक्ष पदाच्या निवडणुकीची मोहिम राबवली होती.

**९.७.२. हिस्पॅनिक लोक :**

अमेरिकन लोकसंख्येपैकी ७ टक्के लोक स्पॅनिश भाषक असले तरी त्यांचा गट एकसंबंध नाही. त्यांच्यापैकी बहुतेक मूळचे मेक्सिकन आहेत. टेक्सास, ॲरिझोन, न्यु मेक्सिको आणि कॅलिफोर्निया या मूळच्या मेक्सिकन प्रदेशात त्यांचे वास्तव्य असे. अन्य काही मेक्सिको आणि अमेरिकेची सीमा पार करून बेकायदेशीरपणे अमेरिकेत दाखल झाले आहेत. मूळ पोर्टोरिकन असलेले हिस्पॅनिक आणि मेक्सिकोन - अमेरिकन यांच्यातील साम्य भाषेपुरतेच मर्यादित आहे. पोर्टोरिकन लोक अमेरिकेचे नागरिक असून जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी ते आपली गजबजलेली मातृभूमी सोडून अमेरिकेमध्ये येतात. स्थलांतर त्यांच्यासाठी नित्याची बाब आहे. त्याप्रमाणे अमेरिकन लोक चांगली संधी मिळताच तेथे जाण्याची घाई करतात.

कृष्णवर्णियांची चळवळ आणि वाढता आत्मविश्वास यामुळे मेक्सिकन - अमेरिकन आणि पोर्टोरिकन लोकांनी राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या मार्फत आपल्या गटाचा प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय स्तरावरील एखादी संघटना उभी करण्यास आवश्यक असलेली एकतेची भावना त्यांच्यामध्ये दिसून येत नाही. मात्र त्यांचे स्थानिक गट एकत्र

येऊन अधिक चांगली आरोग्यसेवा, राहती घरे आणि नगरपालिकांच्या सेवा, त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाच्या अधिक चांगल्या सोयी आणि द्वीभाषिक शाळा मिळवण्यासाठी चळवळ करत असतात.

### ९.७.३ आशियायी अमेरिकन :

आशियायी - अमेरिकन लोकांचा गट अमेरिकन जीवनाशी एकरूप होणार नाही हा कयास त्यांनी खोटा ठरवला आहे. सुरुवातीला आलेले चिनी आणि नंतर आलेलेल जपानी यांना वंशवादाचे चटके बसले होते. १९२४ मधील एका कायद्यान्वये त्यांच्या स्थलांतरावर निर्बंध घालण्यात आले. त्या पूर्वी आलेल्यांना १९२३ च्या एका कायद्याने नागरिकत्वापासून दूर ठेवण्यात आले, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४२ मध्ये संशयास्पद एकनिष्ठेच्या कारणावरून अनेक जपानी नागरिकांनी देशाच्या विविध भागातील छावण्यातून स्थानबद्ध करण्यात आले होते. त्यांच्यापैकी काहींचा जन्म अमेरिकेत झाला असल्याने ते अमेरिकन नागरीकच असले तरी त्यांच्या देशभक्तीची शंका घेण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धानंतरची परिस्थिती मात्र बदलली आहे. आशियायी लोकांच्या विरोधातील पूर्वग्रह कमी झाला आहे. व्हिएटनामी लोकांच्या प्रमाणे आशियायी - अमेरिकन लोकांनीही परिस्थितीशी जमवून घेतले असले तरी त्यांच्या विरोधात स्थानिक स्वरूपाचे उद्रेक होत असतात.

### ९.७.४ मूलनिवासी इंडियन्स :

मूलनिवासी इंडियन लोकांना साधारण अर्थानेच एक वेगळा वांशिक गट असे संबोधण्यात येते. वास्तविक त्यांच्या असंख्य जमाती असून त्यांच्यामध्ये भाषिक, सांस्कृतीक वारसा आणि जमवून घेण्याचा अनुभव इत्यादीमध्ये व्यापक अंतर असते. पूर्वेकडील राज्यामधील श्वेतवर्णियांशी अनेक वर्षाच्या सह - जीवनामुळे उभयतामध्ये रोटी - बेटी व्यवहार होत असत. ते एकमेकांशी मिसळून गेले असून त्यांच्या जमवून घेण्याच्या स्थायी पद्धती तयार झाल्या आहेत.

पश्चिमेतील प्रदेशात शेतीचे झपाट्याने वाढ झाल्याने मूलनिवासी इंडियनांना घाईने राखीव वसाहतीमध्ये कोंबण्यात आले, या राखीव वसाहती विषयीचे केंद्र सरकारचे धोरण कधी त्यांना अमेरिकन समाजात सामावून घेण्याच्या बाजूला तर काही वेळा त्यांची भिन्न सांस्कृतीक ओळख टिकवण्याकडे झुकत असे; त्याचे परिणाम अनिष्ट होत. इंडियनांच्या राखीव वसाहती अतिशय दारिद्रय आणि सामाजिक संकटांची बेटे असत. साधारण इंडियन कुटुंबाचे सरासरी उत्पन्न राष्ट्रीय सरासरी उत्पन्नापेक्षा कमी असे, त्यांच्यातील बालमृत्यूचे प्रमाण राष्ट्रीय प्रमाणापेक्षा जास्त असे आणि अन्य लोकसंख्येपेक्षा इंडियन जमातीमधील मृत्यूचे सरासरी वय कमी असे.

या राखीव वसाहतींचा भौतिक आणि सामाजिक अलगतेने इंडियन जमाती संस्कृतीक दृष्टीने मागे पडल्या ; शहरीकरण झालेल्या तांत्रीक अमेरिकेमध्ये सहभागी होण्यास ते शैक्षणिक आणि सांस्कृतीक दृष्टीने लायक नव्हते. दारिद्रय आणि निराशेपोटी अनेक इंडियन लोक शिकागो आणि लॉस एंजलिस सारख्या शहरात कायमच्या वस्तीसाठी गेले. शहरी वातावरणात तग धरण्यासाठी आवश्यक ती कार्य कौशल्ये किंवा सांस्कृतीक पार्श्वभूमी

त्यांच्याकडे नसे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या माहितीनुसार त्यांची कुटुंब व्यवस्था लवकर मोडकळीला येत असे, दारूचे व्यसन आणि आत्महत्येचे प्रमाणही जास्त असे. इंडियन जमातीच्या काही कार्यकर्त्यांनी राजकीय आणि कायद्याच्या मार्गांने त्यांची परिस्थिती सुधारण्याचे आणि त्यांच्यामध्ये बदल घडवून आणण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत.

### ९.७.५ क्युबन स्थलांतरित :

क्युबामध्ये १९५९ मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखाली क्रांती झाल्यावर काही क्युबन नागरिकांनी त्यांच्या मुलाबाळासकट अमेरिकेत आश्रय घेतला. अमेरिकन समाजातील त्यांचा वांशिक गट वेगळा आहे. त्यामधील व्यवसायिक आणि मध्यमवर्गीयांचे प्रमाण जास्त आहे. स्पॅनिश भाषक असूनही त्यांचा सामाजिक आणि राजकीय दृष्टीकोन मेक्सिकन - अमेरिकन आणि पोर्टोरिकन यांच्यापेक्षा वेगळा आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१. अमेरिकेतील संस्कृतीविषयी माहिती लिहा.

२. इ. स. १९९० च्या जणगणनेनुसार अमेरिकेची लोकसंख्या किती होती.

## ९.८ समारोप

नवोपक्रम कायद्याने कामगारांचे हित जोपासले गेले. त्यामुळे कामगार चळवळींची शीघ्र गतीने वाढ झाली. या कामगार चळवळींनी अमेरिकेने आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनात महत्त्वाची भूमिका बजावली. डिसेंबर १९५५ मध्ये अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर अॅन्ड कमिटी ही एकत्रित आली व त्यांची सदस्य संख्या १६ लाखांपर्यंत पोहोचली. त्यामुळे हे कामगार नेते आपली ताकद आजमावून तीचा गैरवापरही करू लागले. काही गट हे केवळ भ्रष्टाचारी पैसा उकळवणारे होते तर काही साम्यवादी होते. आपल्या कामगार संख्येच्या जोरावर हे कामगार नेते बऱ्याच वेळेस राष्ट्रीय हितही लक्षात न घेता तांत्रिक व औद्योगिक प्रगतीत अडथळा निर्माण करीत असत.

२० व्या शतकाच्या अखेरीस अमेरिकेसमोर अंतर्गत आणि परदेशातील आव्हाने उभी राहिली. बदल हा एकमेव कायमचा घटक होता. शीतयुद्ध समाप्त झाले. संगणक आणि दूर संचार क्रांतीने अमेरिकन अर्थव्यवस्था आणि जीवन पद्धतीमध्ये परिवर्तन झाले. स्थलांतरितांच्या नव्या ओघाने अमेरिकन समाज पूर्वी कधी नव्हता एवढा बहुरंगी झाला आहे. एका टीकाकाराच्या मते अमेरिका खरे ङ्गजागतिक राष्ट्र आहे. १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला अमेरिकन समाजाच्या रचनेतील बदल स्पष्ट दिसू लागले. लोकसंख्येची रचना आणि अमेरिकन समाजातील अति महत्त्वाचा नोकऱ्या आणि व्यवसाय कौशल्ये या मध्येही फार मोठा बदल झाला.

## ९.९ प्रश्न

१. नागरी हक्क चळवळ म्हणजे काय ? तिच्या विकासातील विविध टप्पे स्पष्ट करा.

२. अमेरिकन स्त्रियांच्या चळवळीचा आढावा घ्या.

३. अमेरिकन कामगार चळवळीचा उदय व विकास स्पष्ट करा.

४. दुसऱ्या महायुद्धानंतर चर्च, धर्म आणि शिक्षण या मध्ये कोणते बदल झाले ?

५. अमेरिकन समाजाची महत्त्वाची वैशिष्टये नमूद करा.

६. विविध वंशांचे स्थलांतरित अमेरिकन समाजाशी कितपत एकरूप झाले आहेत ?

७. समानतेचा समस्यांशी चर्चा करा.

❖❖❖❖

munotes.in

# १०

# अमेरिका आणि दुसरे महायुद्ध

**घटक रचना :**

१०.० उद्दिष्टये

१०.१ प्रस्तावना

१०.२ अमेरिकेचा युद्ध विषयक दृष्टीकोन

१०.३ हस्तक्षेप विरुद्ध अलिप्ततावाद

१०.४ रूझवेल्ट परत अध्यक्षपदी येतात

१०.५ जपानचा पर्ल हार्बरवरील हल्ला

१०.६ अमेरिका युद्धात पदार्पण करते

१०.७ जपानची शरणागती

१०.८ शांततेचे नियोजन

१०.९ समारोप

१०.१० प्रश्न

## १०.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी समाजातील.

- अमेरिकेच्या युद्धाविषयक दृष्टीकोनाचे मुल्यांकन करणे.
- अमेरिकेच्या दुसऱ्या युद्धपदार्पणानंतरच्या घडामोडींचा अभ्यास करणे.
- युद्धोत्तर जागतिक शांतता प्रक्रियेत अमेरिकेची भूमिका समजून घेणे.

पहिले महायुद्ध ज्या तणावातून निर्माण झाले त्याच तणावातून दुसरे महायुद्ध देखील उद्भवले. परंतु दोन महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात जर्मनी मध्ये नाझीवाद आणि इटलीमधील फॅसिस्ट विचारसरणीच्या उदयामुळे हा तणाव अधिक तीव्र झाला होता. हिट्लर आणि मुसोलिनी या दोघांनी आक्रमक पराष्ट्रीय धोरणाचा अवलंब केला. परिणामी महत्त्वाचे आणि गंभीर प्रश्न निर्माण झाले होते. केवळ सत्तेच्या संतुलनाचे रक्षण करण्यासाठीच नव्हे तर नाझी आणि फॅसिस्ट विचारसरणी पासून पाश्चिमात्य संस्कृतीची पारंपारिक मूल्ये जतन करण्यासाठी अमेरिकेने युद्धात पदार्पण केले. ज्या परिस्थितीमध्ये अमेरिकेने युद्धात पदार्पण केले त्या परिस्थितीचा आणि युद्ध जिंकण्यासाठी अमेरिकेने दिलेल्या योगदानाचा आढावा या पाठात घेण्यात आला आहे.

## १०.१ प्रस्तावना

महायुद्धाच्या मार्गावर : १९३० च्या दशकात सर्व युरोपियन देश युद्धाच्या विध्वंसक मार्गाने आश्चर्यकारक वेगाने वाटचाल करत होते. १९३१ मध्ये जपन्यांनी मांचुरिया काबीज केला तेव्हा लिग ऑफ नेशन्सला त्यांना रोखता आले नाही. १९३५ मध्ये मुसोलिनीच्या इथियोपियावरील आक्रमणाविरुद्ध ब्रिटन आणि फ्रान्स यांनी काही अर्धवट उपाययोजना करून इटलीवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचा निष्प्रभ प्रयत्न केला. १९३५ मध्ये हिटलरने जर्मनीला शस्त्रसज्ज करण्यास सुरुवात केली. १९३६ मध्ये त्याने ऱ्हाईनलँड मध्ये जर्मन सैन्य तैनात केले. १९३६ मध्ये जनरल फँकोने हिटलर आणि मुसोलिनी यांच्या मदतीने स्पेनमधील लोकशाही मार्गाने निर्वाचित झालेल्या डाव्या सरकारविरुद्ध उठाव केला. त्याच वर्षी जर्मनी आणि जपानने आपसात बर्लिन - टोक्यो करार केला, १९३७ मध्ये इटली त्या करारात सामील झाला. १९३८ मध्ये हिटलरने ऑस्ट्रिया काबीज करून नंतर, म्युनिक कराराचा एक भाग म्हणून झेकोस्लोव्हेकियाचा बराच मोठा भाग व्यापण्याची परवानगी त्याला देण्यात आली. १९३९ मध्ये त्याने प्राग काबीज केले, नंतर त्याचे लक्ष पोलंडकडे वळले. एप्रिल १९३९ मध्ये ब्रिटिश पंतप्रधान चेम्बरलेन यांनी जर्मन आक्रमणाविरुद्ध पोलंडला मदत करण्याचे वचन दिले. त्यामुळे महायुद्ध अपरिहार्य झाले. १ सप्टेंबर, १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले आणि ३ सप्टेंबर, १९३९ रोजी ब्रिटन आणि फ्रान्स या दोन्ही देशांनी जर्मनी विरुद्ध युद्ध सुरु केले.

## १०.२ अमेरिकेचा युद्ध विषयक दृष्टीकोन

प्रत्यक्ष युद्धाची सुरुवात होण्यापूर्वी २ वर्षे रूझवेल्ट आणि त्यांचे परराष्ट्र मंत्री कॉर्डेल हल युद्ध टाळण्याचा प्रयत्न करत होते. जर्मनीच्या संदर्भातील अनुनयाचे धोरण व्यर्थ असल्याची जाणीव त्यांना असली तरी तटस्थतेचा कायदा आणि अमेरिकेतील अलिप्ततावादी लोकमत या मुळे त्यांचा नाइलाज झाला होता. एकदा चेम्बरलेन यांनी अनुनयाच्या धोरणाचा त्याग केल्यावर त्यांनी काँग्रेसला तटस्थतेच्या कायद्यांचा नव्याने विचार करण्याची केलेली विनंती कॉंग्रेसने फेटाळली. प्रत्यक्ष युद्ध सुरु झाल्यावर मात्र अमेरिकन लोकमत बदलू लागले. नोव्हेंबर, १९३९ मध्ये काँग्रेसने तटस्थतेचा नाव कायदा केला. या कायद्यानुसार युद्धामध्ये गुंतलेल्या देशांना रोखीने शस्त्रास्त्रे विकण्याची परवानगी सरकारला मिळाली. मात्र अमेरिकन व्यापारी जहाजांना युद्धक्षेत्रात जाण्याची मनाई करण्यात आली होती. या कायद्यान्वये ब्रिटन आणि फ्रान्स यांच्याकडे पूरेसे पैसे आणि स्वतःची व्यापारी जहाजे असल्याचा त्यांना अमेरिकन शस्त्रास्त्रे विकत घेता आली असती.

एप्रिल, १९४० मध्ये जर्मन सैन्याने डेन्मार्क आणि नॉर्वे काबीज केले, मे, १९४० मध्ये त्याने हॉलंड आणि बेल्जियमवर नियंत्रण स्थापन करून फ्रेन्च सैन्याचा दणदणित पराभव केला. २५ जून रोजी मार्शल पेतॉ यांनी जर्मन सैन्याशी शस्त्रसंधीचा करार करून फ्रान्स मधील फार मोठया भागावरील जर्मन नियंत्रण मान्य केले. दरम्यान इटलीने युद्धात पदार्पण केले आणि बॅटल ऑफ ब्रिटन या ब्रिटनच्या जीवन मरणाची लढाई सुरु झाली. हिटलरला ब्रिटन काबीज करता आल्यास पूर्व अटलांटिक महासागर जर्मनीच्या नियंत्रणाखाली येऊन त्याला आरमारी वर्चस्वासाठी अमेरिकेशी स्पर्धा करता आली असती, आफ्रिकाही जिंकून,

तेथून दक्षिण अमेरिकेकडे आपला मोर्चावळवता आला असता. त्यानंतर मात्र अमेरिकेला दक्षिण अमेरिकेचे रक्षण करता आले नसते.

जपानची नजर पश्चिम पॅसिफिक प्रदेशाकडे वळली असल्याने अमेरिका आणि कॅरिबियन प्रदेशावरच अमेरिकन सरकारचे नियंत्रण राहिले असते. जागतिक परिस्थितीच्या या दृष्टीकोनाचा अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणावर निश्चितच प्रभाव पडला होता.

## १०.३ हस्तक्षेप विरुद्ध अलिप्ततावाद

फ्रान्सचा पाडाव झाल्यावर अमेरिकेच्या इतिहासातील एक महान चर्चा सुरु झाली. ही चर्चा फक्त काँग्रेस आणि वृत्तपत्रातच नव्हे तर संपूर्ण देशातील नागरिकांत आणि होत राहिली. लोकमतावर विशेष प्रभाव असणाऱ्या संघटनांपैकी दोन संघटना अतिशय उच्च दर्जाच्या होत्या. कमिटी टू डिफेंड अमेरिका बाय एडिंग द अलाइज या संघटनेचे प्रमुख एम्पोरिया गॅझेट या प्रतिष्ठित वृत्तपत्राचे संपादक विल्यम ॲलन व्हाइट होते. अमेरिका फर्स्ट कमिटी अलिप्ततावादी होती. अमेरिकन लोकांच्या सुरक्षिततेसाठी हिटलरचा पाडाव होणे आवश्यक असल्याने अमेरिकने युद्धात प्रत्यक्ष पदार्पण न करता ब्रिटनला सर्वतोपरी मदत करणे आवश्यक आहे असा युक्तीवाद हस्तक्षेपवादी करत असत. दुसरीकडे जिंकलेला प्रदेश हिटलरच्या ताब्यात कायमचा रहाणार नाही आणि युद्धात त्याचा विजय झाला तरी त्याच्याशी तडजोड करता येऊ शकेल. कोणत्याही परिस्थितीमध्ये अमेरिकेवर प्रत्यक्ष हल्ला होणार नाही असा युक्तीवाद अलिप्ततावादी करत असत.

या चर्चेच्या फलनिष्पती अद्याप अनिर्णित आहे. बहुसंख्य अमेरिकन लोक तटस्थेच्या बाजूने होते आणि रूझवेल्ट यांना आपली सत्ता टिकवायची असल्याने आणि न्यु डिल कार्यक्रमाचे अपयश झाकण्यासाठी त्यांनी अमेरिकेला लोकमाता विरुद्ध युद्धात पदार्पण करण्यास भाग पाडले असे मत अनेकांचे होते. अमेरिका फर्स्ट या कमिटीचे अनेक सभासद देशभक्त असले तरी काही प्रतिक्रियावादी गटांनी तिला पाठिंबा दिला होता, त्यांच्या मते हिटलर न्यु डिल कार्यक्रमापेक्षा चांगला होता. फॅसिस्ट प्रवृतीचे आणि अनेक यहूदी द्वेष्टे गट कमिटीला पाठिंबा देत असत. कोणत्याही प्रकारचा उदारमतवाद हा साम्यवादाचा एक प्रकार आहे असे या गटांचे मत होते. यथावकाश लोकमत रूझवेल्ट यांच्या धोरणाच्याबाजूने झुकले. विमान उद्योगाने दर वर्षी ५०,००० विमानांचे उत्पादन केले पाहिजे असे त्यांनी जाहीर केले; प्रत्यक्षात १९४४ पर्यंत विमानांचे उत्पादन दुपटीने झाले. ऑक्टोबर, १९३९ मध्ये काँग्रेसने १७६९.२ कोटी डॉलर संरक्षण खात्यासाठी मंजूर केले. सप्टेंबर, १९३९ मध्ये प्रथमच शांततेच्या काळातील सक्तीची सैन्य भरती सुरु झाली. दरम्यान इटलीने युद्धात पदार्पण करू नये आणि फ्रान्सने शस्त्रसंधी मान्य करू नये यासाठी अमेरिकेने केलेले राजनैतिक प्रयत्न निष्फळ झाले. फ्रान्सचा पाडाव झाल्यावर संरक्षण खात्याने अतिरिक्त बंदूका आणि विमाने ब्रिटनला विकली. अमेरिकेने न्युफाऊलंड आणि वेस्ट इंडीज या ब्रिटिश प्रदेशातील काही सैनिकी तळ भाडेपट्टीने घेतले आणि त्यांच्या बदली ब्रिटनला ५० युद्धनौका दिल्या. पश्चिम गोलार्धातील ज्या वसाहती जर्मनी ताब्यात घेण्याची शक्यता होती त्या आपल्या नियंत्रणाखाली आणण्याची एक योजना अमेरिकेने तयार केली होती त्या आपल्या नियंत्रणाखाली आणण्याची एक योजना अमेरिकेने तयार केली होती. जुलै, १९४० मधील हवाना परिषदेने या निर्णयाला संमती दिली. पश्चिम गोलार्धातील ऐक्याचा

अद्याप पर्यंतचा प्रभावी निवेदन परिषदेने जारी केले, पश्चिम गोलार्धातील ऐक्याचा अद्याप पर्यंतचा प्रभावी निवेदन परिषदने जरी केले, पश्चिम गोलार्धातील एखाद्या देशावर गोलार्धाच्या बाहेरच्या एखाद्या देशाने आक्रमण केल्यास ते सर्व देशांवरील आक्रमण मानले जाईल असा एक प्रस्ताव परिषदेमध्ये मंजूर करण्यात आला. अशा प्रकारे अमेरिकन तटस्थतेच्या धोरणाचा निश्चित त्याग केला होता. या नंतरच्या काळात हिटलरचा पाडाव करण्याचे धोरण अमेरिकन सरकारने स्वीकार केले होते.

## १०.४ रूझवेल्टची राष्ट्राध्यक्षपदी पुनर्नियुक्ती

१९४० मधील निवडणूकीत रूझवेल्ट अध्यक्षपदी परत निवडून आले असले तरी त्यांना मिळालेली मते थोडी कमी होती. संकटकाळी एखाद्या अनुभवी व्यक्तीच्या हाती देशाची सूत्रे असावीत असा सुज्ञपणाचा विचार अमेरिकन लोकांनी केल्याने त्यांची फेर- निवड झाली होती. ब्रिटनला सर्वतोपरी मदत करण्याचा जनादेश असा या निवडणुकीचा अर्थ रूझवेल्ट यांनी लावला. अमेरिका लोकशाहीची शस्त्रागार असावी अशी त्यांची इच्छा होती. ब्रिटनची शस्त्रास्त्राची गरज तिच्या आर्थिक कुवतीच्या बाहेरची असल्याने न्युट्रालिटी ॲक्ट मधील रोखीच्या व्यवहाराची तरतूद रद्द करण्याची आवश्यकता होती. ही समस्या सोडवण्यासाठी रूझवेल्ट यांनी उधार- उसनवार (कॅश अँड कॅरी ) ही नवी कल्पना अमलात आणली. ब्रिटनला पैशाच्या ऐवजी मालाची मदत करावी. युद्ध समाप्त झाल्यानंतर हा माल परत दिला जाईल अशी अपेक्षा होती. शेजाऱ्याचे घर अग्नीच्या भक्षस्थानी पडत असताना जशी आपण बागेतली पाण्याची नळी आपण त्याला उसनी देतो तसे अमेरिकेने केले पाहिजे असे ते सांगत असत. मार्च, १९४१ मध्ये अमेरिकन काँग्रेसने ही अतिशय महान आणि नामी कल्पना मोठया बहुमताने मंजूर केली. ज्या देशाचे रक्षण करणे अमेरिकेसाठी आवश्यक आहे असे राष्ट्राध्यक्षांना वाटत होते त्या देशाला त्याच्या गरजेचा माल या योजनेनुसार दिला जाणार होता. माल वाहून नेण्याची समस्या अधिक गुंतागुंतीची होती. पहिल्या महायुद्धाप्रमाणे या वेळेसही जर्मन पाणबुडया ब्रिटिश मालवाहू जहाजे एकामागून एक बुडवत होत्या. युद्धोपयोगी मालाची वहातूक अटलांटिक महासागरातून अमेरिकन जहाजांनी केल्यास संपूर्ण अटलांटिक महासागरात युद्ध भडकले असते आणि रूझवेल्ट हीच गोष्ट टाळण्याचा प्रयत्न करत होते. एप्रिल, १९४० मध्ये अमेरिकन आरमारी जहाजे आणि हवाई दलाची विमाने अटलांटिक महासागरावर टेहेळणी करून जहाजांच्या संशयास्पद हालचालींची माहिती ब्रिटिश अधिकाऱ्यांना देऊन त्यांना सावध करू लागले. जुलै पर्यंत अमेरिकन सैन्याने ग्रीनलँड आणि आइसलँड बेटे काबीज केली आणि अमेरिकन आरमारी जहाजे त्या बेटापर्यंत ब्रिटिश मालवाहू जहाजांना सोबत करू लागली. लवकरच संघर्षाला तोंड फुटले. सप्टेंबर मध्ये *ग्रीअर* या अमेरिकन युद्धनौकेवर जर्मन जहाजांनी हल्ला केला, ऑक्टोबर मध्ये अन्य दोन युद्धनौकांवर असाच हल्ला करण्यात आला, त्यापैकी एक *रुबेन जेम्स* हे जहाज तर बुडवण्यात आले. त्यानंतर मात्र काँग्रेसने उरलेला न्यूट्रालिटी ॲक्ट बाजूला ठेवला आणि व्यापारी जहाजांना शस्त्रसज्ज करण्याची आणि त्यांना प्रत्यक्ष युद्धक्षेत्रात प्रवेश करण्याची अनुमती दिली. अशा रितीने उत्तर अटलांटिक महासागरात अमेरिका अघोषित युद्धामध्ये सामील झाली.

ऑगस्ट, १९४१ मध्ये न्यु फाऊंडलंड नजिकच्या किनाऱ्यावर एका युद्धनौकेमध्ये रूझवेल्ट आणि चर्चिल यांची भेट झाली. उभयतांनी ब्रिटनच्या युद्धोपयोगी मालाच्या पुरवठयाची चर्चा

केली. भेटीनंतर त्यांनी अटलांटिक चार्टर ही सनद जारी करून आपली युद्धविषयक उद्दिष्टये स्पष्ट केली. १. अन्य कोणत्याही देशाचा प्रदेश काबीज करण्याची त्यांची इच्छा नव्हती. २. सर्व लोकांना त्यांच्या पसंतीच्या शासनप्रकाराची निवड करण्याचे स्वातंत्र्य असावे. ३. लोकांच्या इच्छेविरुद्ध कोणत्याही प्रकारचा प्रादेशिक बदल करण्याची त्यांची इच्छा नव्हती. ४. सर्व देशांना कच्चा माल उपलब्ध व्हावा आणि त्यांना एकमेकांशी मुक्तपणे व्यापार करत यावा. ५. आर्थिक विकास, सामाजिक सुरक्षा, शांतता आणि दारिद्र्याचे निर्मूलन यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याची त्यांची इच्छा होती. ६. सर्व आक्रमक देशांचे नि: शस्त्रीकरण करण्याची त्यांची इच्छा होती.

दरम्यान ब्रिटन काबीज करणे अशक्य झाल्याने नाझी सैन्याने आपला मोर्चा पूर्वेकडे वळवला. त्यांनी हंगेरी, रुमानिया आणि बल्गेरिया हे देश सहज काबीज केले. १९४१ च्या सुरुवातीला त्यांनी ग्रीस आणि युगोस्लाव्हिया हे देशही आपल्या नियंत्रणाखाली आणले. २२ जुन,१९४१ रोजी नाझी सैन्याने रशियावर आक्रमक केले. अन्य कोणत्याही विचार न करता हिटलरचा पराभव करणे अधिक महत्त्वाचे असल्याची ब्रिटन आणि अमेरिका यांची खात्री झाली. परिणामी त्यांनी युद्धोपयोगी साधन सामुग्री तातडीने सोव्हिएट रशियाकडे रवाना केली. जगभरातील सर्व साम्यवादी संघटना तोपर्यंत जर्मनीला पाठिंबा देत असत, आता त्यांनी जर्मनीच्या विरोधात युद्ध करणे आवश्यक असल्याचा प्रचार सुरु केला.

## १०.५ जपानचा पर्ल हार्बरवरील हल्ला

दरम्यान जपानचे फारच थोडे सैन्य चीनमधील युद्धामध्ये गुंतले असल्याने त्याला आग्नेय आशिया काबीज करणे सहजशक्य होते. सप्टेंबर महिन्यात जपान आणि जर्मनी यांनी आपसात एक करार केला, त्याप्रमाणे त्यांच्यापैकी एकावर अमेरिकेने हल्ला केल्यास दुसरा त्याला मदत करणार होता. दरम्यान अमेरिकेतील जपानी राजदूत किचिसाबूरो नोमुरा आणि त्यांचे सहाय्यक साबूरो कुरुसू यांनी अमेरिकन परराष्ट्र मंत्री कॉर्डेल हल यांच्याशी वाटाघाटी केल्या. जपान इंडोनेशियावर हल्ला करणार नसल्याचे वचन देण्याची त्यांची तयारी होती, त्याबदली अमेरिकेने जपानला  चीनमध्ये कारवाई करण्याची परवानगी द्यावी आणि व्यापारावरील सर्व नियंत्रणे रद्द करावीत अशी सूचना त्यांनी केली. परंतु चीनला वाऱ्यावर सोडण्यास किंवा अमेरिकेच्या परंपरागंत मुक्त द्वार धोरणाचा त्याग करण्यास रूझवेल्ट तयार नव्हते. परिणामी उभयतांमधील वाटाघाटी निष्फळ ठरल्या. ७ डिसेंबर, १९४१ रोजी जपानी हवाई दलाच्या विमानाची पर्ल हार्बर बंदरावर अचानक हल्ला करून तेथील सर्व आरमारी जहाजे बुडवली. पर्ल हार्बरवरील या हल्ल्याने लोकांमध्ये पूर्वी कधीच नव्हती एवढी ऐक्याची भावना निर्माण झाली. युरोप आणि आशियातील संघर्ष एकत्र आल्याने खरे जागतिक युद्ध सुरु झाले.

## १०.६ अमेरिकेचे दुसऱ्या महायुद्धात पदार्पण

जर्मनी आणि जपानच्या पराभावातील अमेरिकेचे योगदान सर्वाधिक होते. अमेरिकन उद्योगांची कामगिरी जवळपास अविश्वसनिय होती. एकूण राष्ट्रीय उत्पादन १२५ टक्क्यानी वाढले असल्याने १९४४ पर्यंत अमेरिकन प्रशासनाने युद्धावर जो खर्च केला तो शांतताकालीन कोणत्याही वर्षातील खर्चापेक्षा अधिक होता. अमेरिकन मुख्यतः ब्रिटन आणि सोव्हिएट रशियाला उधार - उसनवारी कार्यक्रमालाही ४,९०० कोटी डॉलरचा माल पुरवला तसेच अमेरिकेने प्रबळ आरमार, सैन्य आणि हवाईदल निर्माण केले, ते एवढे प्रबळ होते की त्याला एकाच वेळेस युरोप आणि आशियातील युद्धात भाग घेता आला. ग्राहकोपयोगी वस्तुंच्या उत्पादनात फार थोडी घट झाली असली तरी राहात्या घरांच्या सारख्या काही मोजक्या गोष्टींची गंभीर टंचाई निर्माण झाली होती. वास्तविक सर्व सामान्य लोकांचे जीवनमान सुधारले होते. सुमारे १ कोटी २० लाख सुदृढ तरुण सैन्यदलात सामील झाले होते. १९३९ च्या सुरुवातीपासूनच युद्धाचे तयारी सुरु झाली असली तरी एक वर्षापर्यंत फारसे काम झाले नाही. ७ सभासदांची एक सल्लागार समिती संघटित करण्यात आली असली तरी तिला पुरेसे अधिकार देण्यात आले नव्हते. डिसेंबर, १९४० मध्ये ऑफिस ऑफ प्रॉडक्शन मॅनेजमेंट ही संघटना स्थापन झाली, जनरल मोटर्स कंपनीचे विल्यम नुडसेन आणि युनायटेड क्लोदिंग वर्कर्सचे सिडने हिलमन या संघटनेचे संयुक्त नियंत्रक होते. अखेरिस, जानेवारी, १९४२ मध्ये जेम्स एफ. बार्नेस यांची ऑफिस ऑफ द इकॉनॉमिक स्टाबिलायझेशन या संघटनेच्या प्रमुखपदी नियुक्ती झाली. १९४३ मध्ये फ्रेड एम. विल्सन यांच्या अधिकारखाली ऑफिस ऑफ वॉर मोबिलाझेशन या संघटनेची स्थापना झाली. सप्टेंबर, १९४० च्या सिलेक्टीव्ह ट्रेनिंग अँड सर्व्हिस ॲक्ट या कायद्यानुसार वयाच्या १८ ते ३५ पर्यंतचे तरुण सक्तीच्या सैनिकी सेवेसाठी लायक असले तरी नंतर मात्र वयोमर्यादा ४५ पर्यंत वाढवली. गेली. मात्र वयाच्या ३८ पेक्षा अधिक तरुणांना कदाचितच सैन्यात दाखल केले जाई. १ कोटी २० लाख तरुण सैन्यात दाखल झाल्याने श्रमशक्तीची गंभीर कमतरता निर्माण झाली असती, परंतु त्यांची जागा स्त्रीया, वयाच्या १८ वर्षाखालची मुले आणि निवृत्त लोकांनी घेतली १९४० मध्ये ५ कोटी लोकांना रोजगार मिळाला होता आणि अन्य ४० लाख लोक रोजगार शोधात होते.

### १०.६.१ किमती, वेतन आणि कर आकारणी :-

राष्ट्रीय उत्पन्न १९,८०० कोटी डॉलर पर्यंत वाढले होते, (१९३९ मध्ये ते ७,२०० कोटी होते ) त्यामुळे उपलब्ध वस्तुंच्या तुलनेत क्रयशक्ती प्रचंड प्रमाणात वाढली असल्याने किमतीवर नियंत्रण ठेवेणे आवश्यक झाले. एप्रिल, १९४२ मध्ये ऑफिस ऑफ प्राइस ॲडमिनिस्ट्रेशन या संघटनेची स्थापना झाली असली तरी तिला वस्तुंच्या किमती नियंत्रित करता आल्या नाहीत कारण शेकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी जास्त किंमत हवी होती. १९४२ मध्ये चलन फुगवटयाच्या गंभीर संकटाची शक्यता निर्माण झाली. ऑक्टोबर, १९४२ मध्ये कॉंग्रेसने स्टॅबिलायझेशन ऑफ द कॉस्ट ऑफ लिव्हिंग ॲक्ट हा कायदा केला, या कायद्यान्वये ऑफिस ऑफ द प्राईस ॲडमिनिस्ट्रेशन या संघटनेला सप्टेंबर, १९४२ च्या पातळीवर किमती स्थिर करण्याचा अधिकार दिला. त्यानंतर या संघटनेला किमतीची पातळी स्थिर ठेवण्यात लक्षणीय यश मिळाले होते. १९३९ ते १९४५ च्या दरम्यान लोकांच्या राहणी मानाचा खर्च ३१ टक्क्यानी वाढला होता. या संघटनेने जीवनोपयोगी काही जरुरीच्या वस्तुंचे रेशनिंग सुरु केले असले तरी त्याचा गंभीर परिणाम फक्त पेट्रोलच्या वापरावरच झाला होता. वाढत्या क्रयशक्तीचा काही भाग जादा करांच्या



munotes.in

रूपाने सरकारी खजिन्यात जमा झाला असला तरी त्यापैकी बहुतेक भागाची युद्धोत्तर काळासाठी बचत करण्यात आली होती. त्यामुळेच १९४५ - १९४९ या काळातील लक्षणीय तेजी शक्य झाली.

नॅशनल लेबर बोर्डाने कामगारांच्या तंटयामध्ये मध्यस्थी करून १९४२ मध्ये त्यांच्या वेतनात १५ टक्के वाढ केली. त्यानंतर मात्र युद्ध काळात तिला कामगारांचे वेतन स्थिर राखणे शक्य झाले होते. कामाचे तास ४५ पर्यंत वाढवण्यात आले असले तरी ४० तासानंतरच्या कामासाठी त्यांना जास्त वेतन दिले जाई. जवळपास सर्वच कामगार संघटनांनी सरकारशी सहकार्य केले होते, कोळसा खाणीमधील कामगारांचा अपवाद होता. या कामगारांचा संप टाळण्यासाठी १९४३ मध्ये सरकारला हस्तक्षेप करावा लागला होता.

१९३९ ते १९४५ या काळात सरकारने युद्ध प्रयत्नासाठी ३०,००० कोटी डॉलर खर्च केला होता, त्यापैकी २/५ भाग करापोटी वसूल झाला. त्यासाठी कर आकारणीची पातळी वाढवावी लागली. १९३९ मध्ये आयकर देणाऱ्यांची संख्या ४० लाख होती, १९४३ मध्ये ती ३ कोटी झाली. युद्ध संपेपर्यंत राष्ट्रीय कर्ज २४,७०० कोटी झाले असले तरी त्यामुळे धोका निर्माण झाला नाही आणि त्यावर उपाय सहज होण्यासारखा होता.

**१०.६.२ नागरी स्वातंत्र्ये :-** असहिष्णुतेचा अभाव हे त्या काळातील सर्वाधिक समाधानकारक वैशिष्टय होते. नागरी हक्कामध्ये सरकारचा हस्तक्षेप फारच कमी होता, याचे एक कारण असे होते की जहाल विचारांचे लोकही जर्मनी आणि जपानच्या पराभवासाठी उत्सुक होते. सरकारने ऑफिस ऑफ वॉर इन्फर्मेशन या संघटनेची स्थापना केली असली तरी तिने युद्धज्वर निर्माण केला नाही. लोकमत शांत होते आणि सरकारचे टीकाकार आपली मते मुक्तपणे मांडत राहिले. जपानी वंशाच्या अमेरिकन लोकांना मिळालेली वागणुक हा या काळात घडलेला एकच विपरीत प्रकार होता. जपानी वंशाचे १,१०,००० अमेरिकन लोक अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर स्थायिक झाले होते. त्यापैकी अनेक अमेरिकेत जन्मलेले अमेरिकन नागरिक होते. त्या सर्वांना देशाच्या विविध भागातील छावण्यात हलवण्यात आले. असे असूनही त्यापैकी बहुतेक जण अमेरिकेशी एकनिष्ठ राहिले. युद्धकाळात जहाजे आणि विमानांची गरज खास महत्त्वाची होती. १९४० मध्ये ६ लाख टन वजनांच्या नव्या व्यापारी जहाजांचे उत्पादन झाले तर १९४४ मध्ये १ कोटी ९० लाख टन वजनांच्या नव्या व्यापारी जहाजांचे उत्पादन झाले. १९३९ मध्ये ३८० नव्या युद्धनौका बांधण्यात आल्या तर १९४४मध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या युद्धनौकांची संख्या ११०० पर्यंत वाढली. १९३९ मध्ये नव्याने उत्पादन झालेल्या विमानांची संख्या २,१०० होती, ती १९४४ मध्ये ९६,३५८ पर्यंत वाढली. रणगाडे, बंदुका आणि युद्धोपयोगी अन्य वस्तुंच्या उत्पादनात झालेली वाढ आश्चर्यकारक होती. कृत्रीम रबर तयार करण्याच्या आणि इतर अनेक नव्या उद्योगांची स्थापना झाली. मशागती खालच्या जमिनीत थोडी वाढ झाली असली तरी शेत मजूरांचा पुरवठा १० टक्क्यानी कमी झाला. तरीही मशागतीच्या नव्या तंत्रांचा वापर करून अमेरिकन शेतकऱ्यांनी शेत मालाचे उत्पादन ३३ टक्क्यानी वाढवले. अन्य देशांना अमेरिका धान्याचा पुरवठा करत असे, त्यासाठी अमेरिकन शेतकऱ्यांनी उत्पादन केलेले धान्य पूरेसे होते.

संपूर्ण युद्ध काळात अमेरिका आणि ब्रिटन यांच्या दरम्यान सर्व स्तरावर सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. रूझवेल्ट आणि चर्चिल यांच्यातील संबंध जवळचे होते. ६ परिषदात ते सहभागी झाले, उभयतांच्या दरम्यान नेहमी संपर्क असे. युद्धकालीन उत्पादन आणि नियोजन यांच्यात समन्वय साधण्यासाठी एका खास मंडळाची स्थापना करण्यात आली होती. निरनिराळ्या युद्ध क्षेत्रामध्ये अमेरिकन आणि ब्रिटिश सेनापतींची नियुक्ती करण्यात आली होती. जागतिक नेतृत्व मात्र स्थापन करता आले नाही. रशिया आणि चिनी सैन्याने आपल्या मोहिमा स्वतंत्र्यपणे चालवल्या.

### १०.६.३ युद्धातील नंतरच्या घडामोडी :-

पर्ल हार्बर वरील हल्ल्यानंतर ५ महिने जपानी सैन्याची यशस्वी घोडदौड चालू होती तर जनरल मॅकऑथर यांच्या नेतृत्वाखाली सैन्याची एक लहान तुकडी फिलिप्पिन्सचे रक्षण करत होती. १९४२ मध्ये जनरल मॉटगोमरी यांनी जर्मन सैन्याच्या अल एलामिनच्या लढाईत पराभव केला होता. नोव्हेंबर, १९४२ पर्यंत जर्मन  सैन्याला रशियाकडून माघार घ्यावी लागली. दोस्त राष्ट्रांनी अद्याप युद्ध जिंकले नसले तरी जर्मनी आणि जपानचा पराभव झाला होता. १९४३ मध्ये जनरल मॉटगोमरी आणि आयसेनहॉवर यांनी उत्तर आफ्रिकेची मुक्तता केली होती. १७ ऑगस्ट मध्ये त्यांनी सिसिली बेटे काबीज केली. नोव्हेंबर, १९४३ मध्ये त्यांचे सैन्य दक्षिण इटलीच्या भूमीवर उतरले. जर्मनीवर प्रत्यक्ष आक्रमण करावे लागेल हे लवकरच स्पष्ट झाले.

६ जुन, १९४४ हा मुक्ती दिन (डी डे ) निश्चित केला गेला. त्यादिवशी ब्रिटन आणि अमेरिकेचे सैन्य नॉर्मंडीच्या किनाऱ्यावर उतरले. ऑगस्ट  मध्ये फ्रान्सची मुक्तता करण्यात आली. फेब्रुवारी, १९४५ मध्ये रशियन सैन्याने ओडर नदी पार करून बर्लिनवर स्वारी करण्याच्या बेतात होते. दरम्यान दोस्त राष्ट्रांच्या सैन्याने ऱ्हाईन नदी पार करण्यास सुरुवात केली. त्यानंतर जर्मन सैन्याचा प्रतिकार ढासळत गेला. एप्रिल, १९४५ च्या अखेरीस हिटलरने आत्महत्या केली त्यानंतर काही दिवसांनी जर्मनीने बिनशर्त शरणागती स्वीकारण्याचे मान्य केले. ७ मे, १९४५ रोजी युरोपातील युद्धाची औपचारिक समाप्ती झाली.

## १०.७ जपानची शरणागती

जर्मनीच्या शरणागतीनंतर दोस्त राष्ट्रांचे सैन्य जपानच्या मुख्य भूमीवर हल्ला करण्याचा विचार करू लागले असले तरी त्याची काहीच गरज उरली नाही. अमेरिकेने विकसित केलेलं २ अणुबॉम्ब हिरोशिमा आणि नागासाकी या जपानी शहरावर अनुकमे ६ आणि १० ऑगस्ट रोजी जपानने बिनशर्त शरणागती पत्करण्याचे मान्य केले. १४ ऑगस्ट रोजी पॅसिफिक प्रदेशातील युद्धाची समाप्ती झाली.

महायुद्धाच्या सुरुवातीच्या काळातच अमेरिकन प्रशासनाने शांततेच्या योजनेचा आराखडा तयार करण्यास सुरुवात केली होती. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्राध्यक्ष विल्सन यांची अशा प्रकारची योजना अमेरिकन लोकांनी धुडकावून लावली असली तरी आता मात्र त्या प्रकारची उजळणी होणार नसल्याचे स्पष्ट झाले. १९४३ मध्ये काँग्रेसच्या दोन्ही साभगृहांनी अमेरिकेने जागतिक संघटनेचे सभासदत्व स्वीकारावे असा ठराव मोठया बहुमताने मान्य

केला. नंतरच्या काळात परराष्ट्र खाते आणि सिनेट मधील दोन्ही पक्षाचे सभासद यांच्या सहकार्याने उभय पक्षाना मान्य होईल असे परराष्ट्रीय धोरण निश्चित करण्यात आले. अलिप्ततावाद मागे पडला नसला तरी त्याने अनेक प्रकारच्या आर्थिक सहकार्याचे स्वरूप धारण केले होते.

विल्सन यांच्या अनुभवाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी रूझवेल्ट आणि त्यांचे परराष्ट्र मंत्री हल यांनी युद्ध काळातच शांतता व्यवस्थेला दोन्ही पक्षांनी मान्यता मिळावी असा प्रयत्न केला. शत्रू सत्तांवर लादण्याच्या अटी आणि नव्या जागतिक व्यवस्थेचे नियोजन या दोन प्रश्नांची त्यांनी गल्लत केली नाही. जानेवारी, १९४३ मधील कासाब्लँका परिषदेत जर्मनी आणि जपान यांनी बिनशर्त शरणागती पत्करली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान दोस्त राष्ट्रांतील युद्धकालीन सहकार्य कायम राहिल त्याचे एका स्थायी संघटनेमध्ये रुपांतर होईल अशी आशा व्यक्त करण्यात आली.

दुसऱ्या महायुद्धाने सत्तेच्या संतुलनात केलेला बदल पहिल्या महायुद्धाच्या नंतर झालेल्या सत्ता संतुलनातील बदलापेक्षा अधिक व्यापक होता. १९१४ मध्ये ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली, ऑस्ट्रिया - हंगेरी, रशिया, अमेरिका आणि जपान अशी ८ राष्ट्रे होती, त्यापैकी फक्त ऑस्ट्रिया - हंगेरी नाहिसे झाले होते. परंतु, दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस फक्त सोव्हिएट रशिया आणि अमेरिका या दोन प्रथम दर्जाच्या महासत्ता उरल्या होत्या, अन्य युरोपियन देशांची पूरी दमछाक झाली होती. युरोप आणि आशिया या खंडामध्ये रशिया प्रमुख सत्तेचे केंद्र उरले असले तरी शांततेचे रक्षण करण्यासाठी सोव्हिएट रशिया अमेरिकेशी सहकार्य करण्याची शक्यता नव्हती. युद्धकालातही रशिया सहकार्य करण्यास राजी नव्हती. रशियन सेनापती मिळालेल्या सैनिकी माहितीचे आदान प्रदान करण्यास तयार नसत, उधार - उसनवार कार्यक्रमाखाली १,१०० कोटी डॉलरची अमेरिकन केलेली मदत मान्य करण्याची रशियाची तयारी नव्हती. रशियाने युगोस्लाव्हिया आणि पोलंड या देशात हद्दपार झालेल्या अधिकृत सरकारांना मान्यता देण्याऐवजी साम्यवादी गटांना मान्यता दिली. तथापि, रशियाच्या मागण्या मान्य करण्यासाठी रूझवेल्ट यांची वाटेल ते करण्याची तयारी होती. भिती पोटी रशिया सहकार्य करत नाही आणि मैत्री आणि सदिच्छा यामुळे ही भिती नाहिशी होऊ शकेल असा युक्तीवाद ते करत असत. हा एक जुगार होता, आणि अखेरिस तो फसला होता. सोव्हिएट रशियाचे धोरण भितीवर नसून स्टॅलिनच्या आक्रमक धोरणावर आधारित असल्याचे स्पष्ट होते. साम्यवाद मूळातच भांडवलशाही पेक्षा श्रेष्ठ असून अखेरिस जगभरात साम्यवादच यशस्वी होईल अशी त्याची खात्री होती. मात्र या विषयी रूझवेल्ट यांना दोष देता येत नाही कारण बहुसंख्य अमेरिकन लोकांची अशीच धारणा होती, सोव्हिएट रशिया अमेरिकेशी सहकार्य करेल अशी त्यांना वाटत होती. स्टॅलिनच्या धोरणाचे समर्थन करण्यासाठी ते काहीतरी कारण शोधत होते. शिवाय अमेरिकेने सोव्हिएट रशियाचे सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न केला नसता तर जागतिक लोकमताने अमेरिकेला दोष दिला असता.

## १०.८ शांततेचे नियोजन

शांततेच्या नियोजनाची तयारी सर्वोच्च पातळीवर १९४३ मध्ये सुरु झाली. अमेरिकन परराष्ट्र मंत्री हल, ब्रिटनने ॲन्थनी इडन आणि रशियाचे मॉलॉटॉव्ह यांची मॉस्कोमध्ये एक सभा झाली, त्यामध्ये जारी केलेल्या एका जाहीरनाम्यामध्ये त्यांनी कायमस्वरूपी सहकार्य

करण्याचे आणि सर्व शांतताप्रिय देशांच्या सार्वभौम समानतेवर आधारित एका साधारण आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्याचे आश्वासन दिले गेले. त्यानंतर ऑक्टोबर, १९४३ मध्ये कैरो येथे रूझवेल्ट, चर्चिल आणि चियांग काय शेक यांची तर रूझवेल्ट, चर्चिल आणि स्टॅलिन यांची तेहरान येथे परिषद भरली. १८९४ पासून जपानने बळकावलेला सर्व प्रदेश तिच्या कडून हिरावून घेण्याचा निर्णय कैरो परिषदेमध्ये घेण्यात आला तर १९३९ - १९४० पासून रशियाने जो प्रदेश बळकावला होता त्यापैकी निदान काही प्रदेश तर तिला देण्याचा निर्णय तेहरान परिषदेने घेतला.

### १०.८.१ याल्टा आणि पॉट्सडॅम :-

१९४४ मध्ये मॉस्कोमध्ये आश्वासन देण्यात आलेले सहकार्य नाहिसे झाले होते. रशियन सैन्याने जर्मन फौजांना पोलंड आणि युगोस्लाव्हियामधून हुसकावून लावल्यानंतर तेथे अमेरिका आणि ब्रिटनशी सल्लामसलत न करता साम्यवाद्यांच्या नियंत्रणाखालची सरकारे स्थापन केली. दरम्यान, ब्रिटनने ग्रीस मध्ये हस्तक्षेप करून तेथे कर्मठ सरकारची स्थापन केली. या मुळे फेब्रुवारी, १९४५ मध्ये याल्टा परिषदेमध्ये रूझवेल्ट यांनी रशियाशी समझोता करण्याचा शेवटचा प्रयत्न केला. ब्रिटन, अमेरिका आणि रशियाचे सर्वोच्च नेते परिषदेला हजार होते. परिषदेने जर्मनीचे ४ भाग पाडून त्यापैकी प्रत्येकी एक अमेरिका, ब्रिटन, रशिया आणि फ्रान्स यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा निर्णय घेतला. युद्धकालीन नुकसानाची भरपाई म्हणून जर्मनीने काही खंडणी देखील द्यायची होती. जर्मनी, इटली आणि जपानच्या नियंत्रणाखालच्या छोटया देशात व्यापक लोकशाही प्रातिनिधीक सरकारची स्थापना केली जाणार होती. या देशात नंतर खुल्या निवडणुका घेण्यात येणार होत्या. पोलंडचा पूर्व प्रांत हिरावून घेण्यात आला होता, त्याच्या नुकसान भरपाई पोटी पोलंडला पूर्व जर्मनीतील काही प्रदेश देण्यात येणार होता. एका गुप्त करारान्वये रशियाने जपानच्या विरोधातील युद्धात पदार्पण करण्याचे मान्य केले, त्याच्या बदली जपानने काबीज केलेला तीचा प्रदेश तिला परत मिळणार होता, तसेच मांचुरियामधील तिचे पूर्वीचे महत्त्वाचे स्थान तिला परत दिले जाणार होते. अमेरिकन सेनापतींच्या विनंतीवरून रूझवेल्ट रशियाला अशा सवलती देण्यास तयार झाले. रशियाने युद्धात पदार्पण केल्यास अनेक अमेरिकन सैनिकांचे प्राण वाचतील अशी त्यांना खात्री वाटत होती. चियांग काई शेक या चिनी नेत्याशी मैत्रीचा करार करण्यास रशिया तयार झाल्याने पूर्व आशियात कायम शांतता स्थापन होण्याची शक्यता होती.

जुलै, १९४५ मध्ये पॉट्सडॅम येथे युद्धकाळातील शेवटची परिषद भरवण्यात आली होती, तिने याल्टा येथे घेतलेल्या निर्णयातील रिकाम्या जागा भरण्याचे काम केले. जर्मनीतील ४ भागांचे धोरण एका केंद्रिय नियंत्रक समिती कडून निश्चित केले जाणार होते, जर्मनीचे निःशस्त्रीकरण करून लोकशाहीला प्रोत्साहन देण्याची साधारण कल्पना होती. पोलंडची पश्चिम सीमा तात्पुरती निश्चित करण्यात आली तर कोनिसबर्ग हे जर्मन शहर रशियाच्या हवाली केले जायचे होते. पोलंड आणि युगोस्लाव्हिया लोकशाही आणि खुल्या निवडणुकीचे आश्वासन कधीच पाळण्यात आले नाही, जर्मनीतील धोरण निश्चित करण्यात समन्वय साधण्यात आला नाही. रशियाच्या हवाली करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये साम्यवादी व्यवस्था स्थापन करण्याची सुरुवात तिने प्रथमपासून सुरु केली. याल्टा आणि पॉट्सडॅम करारांनी अमेरिकेची नैतिकता कमी झाली असली तरी सत्ता मात्र कमी झाली नाही. रशियन

सैन्याने पूर्व युरोप पहिलेच आपल्या नियंत्रणाखाली आणला होता आणि रूझवेल्ट यांनी जो प्रदेश रशियाला देऊ केला तो तिने कसाही मिळवला असता.

**आपली प्रगती तपासा**

१. 'नागरी स्वातंत्र्ये' यावर थोडक्यात लिहा.

२. याल्टा व पॉट्सडॅम या परिषदेची माहिती सांगा.

३. अमेरिकेचा युद्ध विषयक दृष्टीकोन स्पष्ट करा.

४. अमेरिकेचा अलिप्ततावाद कसा होता ?

५. 'कॅश अँड कॅरी' ही रूझवेल्ट यांची संकल्पना कशी होती ?

६. २. जपानने केलेल्या पर्ल हार्बरवरील हल्याविषयी माहिती लिहा.

## १०.९ समारोप

जागतिक सर्वच आदर्शवाद्यांना जागतिक घडामोडींना नियमांत बांधण्यासाठी उत्सुक होते. युनोसुद्धा काही प्रमाणात मर्यादित संघटना होती. कारण त्याच्या सदस्य राष्ट्रांच्या पाठिंब्याशिवाय तोही कोणताही निर्णय घेऊ शकत नव्हता. सुरुवातीला अलिप्ततावादी असलेल्या अमेरिकेने पर्लहार्बर घटनेनंतर मात्र दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली आणि युद्धाचे पारडे फिरले. शेवटी जपान व जर्मनीचा पराभव होऊन दोस्त राष्ट्रांचा विजय झाला. शेवटी पॅरिस याल्टा व पॉट्सडॅम येथे शांतता नियोजनासाठी परिषदा घेण्यात आल्या.

## १०.१० प्रश्न

१. अमेरिकेने महायुद्धात पदार्पण करण्यात पर्यवसान झालेला घटनाक्रम नमूद करा.

२. दुसरे महायुद्ध जिंकण्यातील अमेरिकेच्या योगदानाची चर्चा करा.

❖❖❖❖

# ११

# अमेरिका आणि आर्थिक पुनर्रचना

**घटक रचना :**

११.० उद्दिष्ट्ये

११.१ प्रस्तावना

११.२ संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना

११.३ बृहद् अमेरिकन संबंध

११.४ सैन्य बरखास्ती आणि पुन:रूपांतर

११.५ टुमन समोरील आव्हाने

११.६ ८० वी अमेरिकन काँग्रेस

११.७ सुधारित उपक्रम

११.८ आयसेन हावरचा कार्यकाल

११.९ केनेडी यांचा कार्यकाल

११.१० राष्ट्रध्यक्ष लिंडन जॉन्सन

११.११ रिचर्ड निक्सन आणि आर्थिक संकट

११.१२ रेनॉल्ड रेगन

११.१३ गेराल्ड फोर्ड यांचे काळजीवाहू सरकार

११.१४ जिमी कार्टर यांची कारकीर्द

११.१५ समारोप

११.१६ प्रश्न

## ११.१ उद्दिष्ट्ये

- दुसऱ्या महायुध्दानंतरची अमेरिकन आर्थिक पुर्नरचना प्रक्रीया समजून घेणे.
- राष्ट्राध्यक्ष टुमन यांच्या सुधारित उपक्रम कार्यक्रमाचा अभ्यास करणे.
- अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या पुर्नरचना कार्यक्रमांचा आढावा घेणे.

munotes.in

## ११.१ प्रस्तावना

एप्रिल १९४४ मध्ये लिग ऑफ नेशन्सच्या इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनची पुर्नरचना करण्यात आली. जुलै, १९४४ मध्ये आर्थिक समयंवर विचार विनिमय करण्यासाठी ब्रेटन वूड्स, न्यु हॅम्पशायर, येथे एक परिषद भरवली गेली, त्या परिषदेने मागसलेल्या देशांना आर्थिक मदत करण्यासाठी इंटरनॅशनल बँक ऑफ रिकन्स्ट्रक्शन तसेच चलनव्यवस्था स्थिर राखण्यासाठी इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. या फंडात सहभागी होणाऱ्या देशांना संबंधित समितीच्या संमतीशिवाय आपल्या चलनाचे मूल्य बदलता येणार नव्हते. सार्वभौम सत्तेचा त्याग करणाऱ्या या तरतुदीचे सर्वांनी स्वागत केले. युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक, सोशल अँड कल्चरल ऑर्गनायझेशन, इंटरनॅशनल रेफ्युजी ऑर्गनायझेशन आणि वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन या संस्थांची देखील स्थापना करण्यात आली.

## ११.२ संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना

शांततेचे रक्षण करण्यासाइी एका सुरक्षा संघटनेची निर्मिती करणे ही युनायटेड नेशन्सच्या संघटकांच्या समोरी मुख्य समस्या होती. जुलै आणि ऑगस्ट मध्ये चीन, रशिया, ब्रिटन आणि अमेरिका यांचे प्रतिनिधी डिसट्रिक्ट ऑफ कोलंबिया येथील डम्बार्टन ओक्स येथे जमले. त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावांची तपशीलवार चर्चा करण्यासाठी सान फ्रान्सिस्को येथे २५ एप्रिल ते २६ जुन या काळात भरलेल्या एका परिषदेला ५० देशांचे प्रतिनिधी हजर होते. त्यांनी सूचवलेल्या प्रस्तावात अनेक बदल केले होते. दरम्यान रुझवेल्ट यांचे निधन झाले तर हल यांनी प्रकृती अस्वास्थाच्या कारणावरुन आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

सन फ्रान्सिस्को परिषदेने मान्य केलेल्या युनायटेड नेशन्सच्या सनदे मध्ये सर्व देशांच्या सभासदांच्या जनरल ॲसेम्ब्ली या सर्वसाधारण मंडळाची तरतूद होती, या मंडळाची दर वर्षी किमान एक बैठक भरणार होती. सिक्युरिटी कॉन्सिल या कायमस्वरुपी समितीचे ११ सभासद असतील, त्यापैकी ५ कायम आणि ६ तात्पुरते सभासद असतील. कायमच्या सभासदांना नकाराधिकार वापरता येत असे. या सभासदांचे एकमत झाल्याशिवाय महत्वाच्या कोणत्याही विषयावर निर्णय घेता येत नसे. जनरल ॲसेम्ब्ली मार्फत सिक्युरिटी कॉन्सिलच्या ६ तात्पुरत्या सभासदांची २ वर्षाच्या मुदतीसाठी निवड केली जात असे.

युध्दात पर्यवसान होईल अशा कोणत्याही तंटयाची चौकशी करुन आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार कॉन्सिलला देण्यात आला होता. आपसातील सर्व तंटे शांततेच्या मार्गाने सोडविण्याचे आणि सनदेनुसार संघटनेने घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीत सहकार्य करण्याचे आश्वासन सर्व सभासद देशांना दयावे लागत असे. १८ सभासदांचे इकॉनॉमिक अँड सोशल कॉन्सिल सर्व घटनांवर नियंत्रण ठेवणार होते. वसाहती मधील शासनावर देखरेख ठेवण्यासाठी ट्रस्टीशिप कॉन्सिल, इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टिस एक आंतरराष्ट्रीय सचिवालय इत्यादींची तरतूद युनायटेड नेशन्सच्या सनदेमध्ये करण्यात आली होती. स्थानिक तंटे सोडवण्यासाठी स्थानिक संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देण्यात आले होते. वैयक्तिक किंवा सामुदायिक संरक्षणाचा हक्क सर्वांना असून तो युनायटेड नेशन्सच्या सनदेतील कोणत्याही तरतूदीमुळे हिरावून घेण्यात येणार नव्हता.

## ११.३ बृहद् अमेरिकन संबंध

पश्चिम गोलार्धात स्थापन झालेली स्थानिक संस्था अशा प्रकारची एकमेव संस्था होती. दुसऱ्या महायुध्दामध्ये अमेरिकन देश पूर्वी कधीही नव्हते येवढे एकत्र आले होते. रिओ द जानिएरो येथे भरलेल्या पॅन अमेरिकन परिषदेमध्ये जर्मनी, इटली आणि जपानशी राजनैतिक संबंध तोडण्याची शिफारस करण्यात आली होती. चिली आणि अर्जेन्टिना वगळता अन्य सर्व देशांनी तिची अमंलबजावणी केली होती. पर्ल हार्बर नंतर काही महिन्यांनी ब्राझील, मेक्सिको आणि अन्य छोटया देशांनी महायुध्दात पदार्पण केले होते. इटालियन मोहिमेमध्ये ब्राझीलने आपल्या सैन्याची एक तुकडी तैनात केली होती आणि मेक्सिकोच्या हवाईदलाच्या एका तुकडीने जनरल मॅकआर्थर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या फिलिप्पिन्स वरील हल्यात भाग घेतला होता. लॅटिन अमेरिकन देशातील सहकार्य ३ प्रकारे उपयोगी होते. १.त्यामुळे हेरगिरीच्या केंद्रांना आळा बसला २. अमेरिकेला दक्षिण अमेरिकेच्या प्रदेशात आरमारी आणि हवाई दलाचे तळ स्थापन करता आले. ३. अत्यावश्यक कच्चा माल तेथून सहज मिळू शकला. दुदैवाने पश्चिम गोलार्धातील देशांची एकी अर्जेन्टिनामुळे भंगली, अर्जेन्टिना नेहमीच अमेरिकेला विरोध करत असे.

फेब्रुवारी, १९४५ मध्ये मेक्सिको मधील कापूल्टपेक येथे एक अन्य पॅन-अमेरिकन परिषद भरली. अर्जेन्टिनाने जर्मनीशी युध्द पुकारल्यास भूतकालीन सर्व गोष्टी विसरण्याचे आश्वासन अमेरिकेने या परिषदेमध्ये दिले. अर्जेन्टिनाने नंतर संपत आलेल्या युध्दात पदार्पण केले. ज्या देशांनी या जाहिरनामा मान्य केला आहे अशा पश्चिम गोलार्धातील किंवा इतरत्र एकाही अमेरिकन देशावर झालेला हल्ला सर्व देशावरील हल्ला मानला जाईल असा एक ठराव या परिषदेने मंजूर केला. अशा रितीने पश्चिम गोलार्धातील शांतता राखण्यासाठी पॅन-अमेरिकन सुरक्षा संघटना अस्तित्वात आली. १९४७ मध्ये रिओ द जानिएरो येथील परिषदेने आक्रमणाविरुध्द सामुदायिक प्रतिकार करण्याच्या धोरणाचा पुनरुच्चार केला. १९४८ मध्ये बोगोटो परिषदेने युनायटेड नेशन्सच्या अंतर्गत ऑर्गनायझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स ही संघटना स्थापन केली.

## ११.४ सैन्य बरखास्ती आणि पुनःरुपांतर

युध्द समाप्तीचा स्पष्ट पुरावा म्हणून इ.स. १९४५ च्या दरम्यान घरच्याप्रमाणे सैन्यामध्ये जे १२ दशलक्ष स्त्री व पुरुष काम करीत होते त्यांची संख्या कमी करण्याची मागणी बहुतेक अमेरिकन वासीयांची होती. ट्रुमन यांना या मागणीपुढे नमत घ्यावे लागले. इ.स. १९४६ च्या मध्यास नाविक दलाची संख्या ४ दशलक्षावरुन १ दशलक्षापर्यंत कमी केली तर लष्कराची संख्या ८ दशलक्षावरुन २ दशलक्षापर्यंत आणली. इ.स. १९४८ मध्ये तर अमेरिकेची एकूण लष्कर संख्या फक्त १.५ दशलक्ष होती.

मात्र सैन्य कपातीच्या केलेल्या घाईने अमेरिकांना चिंताग्रस्त केले. कारण काही काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या मते, युध्दात रक्तपात करणाऱ्यांना रक्ताची चटक लागेल व ते पुन्हा स्वकीयांविरोधात तसे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून त्यांना सैन्यातून बरखास्त करण्याअगोदर त्यांचे पध्दतशीर पुनर्वसन करणे गरजेचे होते. तशातच अनेक मासिकांनी या पुनर्वसनाच्या व समायोजनच्या समस्येवर प्रकाश टाकला. इ.स. १९४५

मध्ये ५ लाखांपेक्षा जास्त स्त्रियांनी लष्करी अधिकाऱ्यांपासून घटस्फोट घेतला होता. तशातच बऱ्याच जणांना निवासाची समस्या भेडसावू लागली.

लष्करी अधिकारी पुन्हा सामान्य नागरीक झाल्यावर बेकारी व आर्थिक महामंदीची भीती वाटू लागली. जपानने शरणागती पत्करल्यानंतर अमेरिकन सरकारने ताबडतोब ३५ अब्ज डॉलर्सची युध्द तरतूद रदद् केली. दहा दिवसातच लाखो लष्करी कामगार बेकार झाले. इ.स. १९४५ मधील ७६ अब्ज डॉलर्सचा युध्दखर्च इ.स. १९४६ मध्ये केवळ २० अब्जापर्यंत खाली आला. त्यामुळे महामंदी ऐवजी आर्थिक विकास वाढीस सुरुवात झाली. आर्थिक उलाढाल इ.स. १९३९ मध्ये ९१ अब्ज डॉलर्सवरुन इ.स. १९४६ मध्ये २०० अब्जावर तर तीच इ.स. १९५० मध्ये ३१८ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली. याचे कारण युध्दजन्य उत्पादनावरुन आर्थिक लक्ष्य ग्राहकोपयोगी उत्पादनांकडे दिले गेले होते.

इ.स. १९४४ चा नोकरदार पुनर्समायोजन कायदा, १९४४ चा लष्करी अधिकारी हक्क विधेयक (General Bill of Rights) म्हणून प्रसिद्ध झाला, त्यामुळेच आर्थिक वाढीला चालना मिळाली. या कायदयामुळे इ.स. १९४५-५० दरम्यान जवळजवळ २.३ दशलक्ष लष्करी अधिकारी विविध महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेत होते. शिक्षणासाठी त्यांना १५ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम खर्च झाली. तसेच तद्नंतर वैद्यकीय उपचार, गृहकर्ज, शेतीखरेदी किंवा नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी त्यांना आर्थिक मदत करण्यात आली. युध्दकालीन कर सवलत दिल्यामुळे अतिरिक्त नफा उदयोगपतींनी नवीन व्यवसाय व उदयोगांत गुंतविला.

असाम्यवादी राष्ट्र म्हणून अमेरिकेचा आर्थिक सत्ता म्हणून उदय होईल याची चिन्हे इ.स. १९४४ च्या न्यूहॅम्पशायर येथील दोस्त राष्ट्रांच्या सरकारांच्या 'ब्रेटॉन वुड्स करारांच्या' सभेमध्ये दिसू लागली होती. या सुधारित करारान्वये जगातील चलनांचे मूल्य अमेरिकन डॉलर्सवर निर्धारित करण्याचे ठरले. तसेच अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची निर्मिती व्यापार व अर्थपुरवठा यांवर नियंत्रणासाठी करण्यात आली. उदा. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), गॅट (General Agreement on Tariffs & Trade-GATT), जागतिक बँक (IBRD) इ.. इ.स. १९६० च्या दशकापर्यंत 'ब्रेटॉन वुड्स' पध्दती अत्यंत सुरळीत चालू होती.

## ११.५ ट्रुमनसमोरील आव्हाने

नवोपक्रम (न्यू डील) सुधारणांमुळे अमेरिकन जनतेया उधळपट्टीस काहीसा लगाम बसला. अमेरिकेच्या ७९ व्या कॉंग्रेसमध्ये १९४६ चा रोजगार कायदा ही एकमात्र ठळक योजना ट्रुमनच्या कारकिर्दीत झाली. त्यामुळे अमेरिकन सरकारला आर्थिक वाढीचे आश्वासन दयावे लागले. त्यासाठी 'आर्थिक सल्लागार परिषद' स्थापन करुन तिच्यामार्फत अध्यक्षांना कमाल रोजगार उत्पादन आणि क्रयशक्ती वाढवण्यास मदत करण्याचे ठरले. परंतु कॉंग्रेसने ते विधेयक पारित केले नाही किंवा राष्ट्राध्यक्षांना त्यासाठी अधिकारही बहाल केले नाहीत. त्याचबरोबर कॉंग्रेसने ट्रुमन यांच्या योजनासुध्दा रोखल्या. उदा. सार्वजनिक निवारा, उच्चतम मजूरी, सामाजिक सुरक्षा विस्तार, स्थायी फेअर एम्प्लॉयमेन्ट प्रॅक्टसेस कमिशन, दरडोई कर विरोधी विधेयक, केंद्रीय शिक्षण निधी,आणि शासकीय वैद्यकीय विमा.

युध्दकालीन नियंत्रणे हटविण्याच्या घाईमध्ये काँग्रेसला स्थिर राष्ट्राध्यक्ष आणि चलन पुरवठा यावर प्रशासनाचे नियंत्रण मिळविण्यात अपयश यांची अडचण येत होती. ग्राहकांची मागणी वाढल्यामुळे युध्दोत्तर महागाई वाढू लागली. युध्दकालीन किंमत निर्धारण कार्यालयाने किंमत नियंत्रणाचे प्रयत्न केले. परंतु अन्नप्रक्रिया उदयोगांनी व किरकोळ व्यापाऱ्यांनी लगेचच किंमत नियंत्रण करण्यास विरोध दर्शविला. बऱ्याच अमेरिकन ग्राहकांना युध्दकालीन किंमत निर्धारण कार्यालयाचे उपाय आवडले. परंतु काहींनी आपण आता युध्दातून बाहेर यावे अशी टिकाही केली. या विरोधाभासी मागण्यांमुळे इ.स. १९४६ रोजी काँग्रेसने सदर युध्दकालीन किंमत निर्धारण कार्यालयाचे अधिकार कमी करण्याबाबतच विधेयक पारित केले. ट्रुमनने सदर बिलास 'नकाराधिकार' वापरला व किंमती नियंत्रण ताब्यात घेतले. परंतु आठवडयाच्या आतच खादयान्नाच्या किंमती १६% पेक्षाही वाढल्या.

आता मात्र काँगेसने महागाई नियंत्रणाचे पण जर कमजोर विधेयक पुन्हा पारित केले व त्यावर ट्रुमनने सही केली. परंतु शेतकरी व मांस उत्पादकांनी बाजारामध्ये उत्पादन न पाठविण्याची धमकी दिली. ट्रुमननी नोव्हेंबर १९४६ च्या अगोदर खादयान्नाच्या किंमतीवरील नियंत्रण उठविले. त्यांच्या पक्षास निवडणुकांत थोडाफार फायदा झाला. परंतु डेमोक्रॅटीक उमेदवारांना फारशी मते मिळाली नाहीत. निवडणुकांचा निकाल पाहिल्यावर टुमननी संपूर्णपणे किंमत नियंत्रण उठविले. परंतु तो पर्यंत युध्दबंदीनंतर ग्राहक निर्देशार्क २५% नी वाढला होता आणि खादयान्नाच्या किंमती त्याहीपेक्षा अधिक दराने वाढल्या होत्या.

दरम्यान किंमती वाढल्याने संघटीत क्षेत्रातील कामगारांनी आपली रोजगारवाढीची मागणी अधिक तीव्र केली. महागाईबरोबरच युध्दकालीन भत्ता, जादा काम भत्ता बंद झाले आणि मालकांनी सुध्दा पगारवाढीस नकार दिल्यामुळे कामगारांची अवस्था बिकट झाली. त्यामुळे कामगारांनी अनेक वेळा संप केले. जानेवारी १९४६ मध्ये ३% कामगार वर्ग संपावर होता व त्यातील पुरुष व स्त्री कामगारांची संख्या ४.५ दशलक्षांवर पोहोचली. त्यामध्ये ‘संयुक्त खाण कामगार’ या बलशाली कारखान्यातील कामगारांचा समावेश अधिक होता. हा संप ४० दिवस चालल्यानंतर ट्रुमनने खाणींवर सरकारी नियंत्रण स्थापण्याचा आदेश दिला. परंतु एका आठवडयानंतर ट्रुमनने कामगारांच्या बहुतेक मागण्या मान्य केल्या व कामगार कामावर पुन्हा रुजू झाले. सहा महिन्यांनी कामगारांनी पुन्हा संप केला व सरकारने पुन्हा त्या खाणी ताब्यात घेतल्या.

इ.स. १९४६ मध्ये रेल्वे अभियंते आणि मोटारमननी संप केला व अमेरिकेच्या रेल्वे इतिहासात पहिल्यांदाच रेल्वेवाहतूक पूर्णपणे बंद झाली. २५ मे १९४६ रोजी ट्रुमनने काँग्रेसकडे संपाविरोधात अधिकार देण्याची मागणी केली. परंतु रेल्वेच्या अभियंता व मोटारमननी संप मागे घेतल्यावर सिनेटने ट्रुमनचा प्रस्ताव फेटाळला. त्यांच्या या मागणीने कामगार नेते दुखावले गेले.

## ११.६ ८० वी अमेरिकन काँग्रेस

जानेवारी १९४७ रोजी भरलेल्या अमेरिकन काँग्रेसने, १९४६ च्या निवडणूका म्हणजे 'नवोपक्रम' सुधारणा मागे घेण्यासाठी जनतेने दिलेला कौल असे मानले. रिपब्लिकन पक्षाचे वर्चस्व असलेल्या काँग्रेसने धनाढय वर्गाच्या हितरक्षणाचे करप्रणाली कायदे पारित केले आणि किमान रोजगार वाढीचा प्रस्ताव फेटाळला. रिपब्लिकन आणि दक्षिणेतील परंपरावादी डेमोक्रेटिक नेत्यांनी शिक्षणासाठी केंद्राची मदत आणि सर्वसमावेशी गृहयोजना कार्यक्रमांना विरोध केला. परंपरावादी (Conservative) आणि राष्ट्राध्यक्ष यांच्यामध्ये मतभेदाचे मुख्य कारण नवोपक्रम सुधारणांमध्ये असलेला कामगार संघटना धार्जिणा 'वॅग्नर कायदा, १९३५' हा होता.

कामगार संघटनांचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने प्रसारमाध्यमांनी असे चित्र तयार केले की, युध्दानंतरचे संप घडविणारे नेते हे कामगार धार्जिणे आहेत व ते संप करुन उगाचच जनतेस वेठीस धरत आहेत. इ.स. १९४७ मध्ये २० पेक्षा अधिक राज्यांनी कामगार संघटनांच्या कारवायांवर बंधने लादणारे कायदे पारित केले आणि त्याच वर्षी काँग्रेसनेसुध्दा 'कामगार व्यवस्थापन संबंध कायदा म्हणजे ‘ताफ्त-हार्टले ॲक्ट’ पारित केला. या नवीन कायदयाने ‘वॅग्नर ॲक्टमध्ये’ सुधारणा केल्या व कामगार संघटनांच्या संपाच्या कारवायांना बेकायदेशीर ठरविले. तसेच जे संप राष्ट्रीय सुरक्षा व आरोग्य यांबाबतीत धोकादायक असणारे संप पुढे ढकलता यावेत म्हणून राष्ट्राध्यक्षांना 'साठ दिवसांचा संप स्थगिती' करण्याचा अधिकार प्रप्त झाला. परंतु या कायदयाने कामगार संघटनांची गळचेपी झाली आणि असंघटीत कामगारांना संघटीत करणे कठीण होऊ लागले. म्हणून कामगार नेत्यांनी त्याची संभावना 'गुलामी कामगार विधेयक' अशी केली. तसेच ट्रुमनंनी आपला नकाराधिकार वापरुन सदर कायदा रदद् करावा अशीही मागणी केली.

ट्रुमनंनी आपल्या या अधिकाराची काँगेसला चाहूल दाखविली. इ.स. १९४८ च्या निवडणुका समोर ठेवून त्यांनी सदर कायदा हा कामगार हिताविरोधी असल्याची टिका केली. परंतु काँग्रेसने मात्र त्यांच्या या नकाराधिकाराची दखल घेतली नाही.

## ११.७ सुधारित उपक्रम

खरे पाहता इ.स. १९१६ पासून ट्रुमन यांना निम्म्यापेक्षा कमी जनतेचा कौल मिळत असे व त्यांचा निसटता विजय होत असे. तरीही उदार मतवादी धोरणासाठी जनतेने दिलेला कौल अशी धारणा ट्रुमन यांची होती. त्यांच्या इ.स. १९४९ च्या भाषणात त्यानी एका सामाजिक व आर्थिकदृष्टया महत्वाकांक्षी कार्यक्रमाचे सूतोवाच केले व त्याला ‘सुधारित उपक्रम’ म्हणून संबोधले. त्याने काँग्रेसला 'नवोपक्रम' सुधारणांचा विस्तार करण्यास सांगितले. त्यामध्ये आर्थिक सुरक्षा जतन, गृह यांशिवाय फ्रँकलीन डी. रुझवेल्ट यांनी सुरु केलेले नागरी हक्क, राष्ट्रीय आरोग्य विमा, शिक्षणास केंद्र सरकारची मदत आणि कृषी अनुदान या योजनांचासुध्दा विस्तार करण्यास सांगितले.

नवीन ८१ व्या काँग्रेसने सदर कार्यक्रमांचा विस्तार करण्यास प्रतिसाद दिला. त्यामुळे किमान वेतन ताशी पंचाहतर सेंट ठरविण्यात आले, सामाजिक क्षेत्र विस्तारित करण्यात आले. भूमी सुधार, मृदासंधारण, पूर नियंत्रण आणि झोपडपट्टी निर्मूलन करुन ८,१०,०००



munotes.in

अल्प उत्पन्न गटासाठी अनुदानित घरे बांधण्यात आली. काँग्रेसने राष्ट्रीय विज्ञान न्यास स्थापन केला. तसेच ४,००,००० पेक्षा अधिक निर्वासितांना अमेरिकेत आश्रय देण्याचा कायदा पारित केला. तरीही अमेरिकन काँग्रेसने सदस्यांनी ट्रुमनच्या काही सूचना मान्य केल्या नाहीत. उदा. केंद्राची शिक्षणविषयक मदत-अनुदान, सर्वसमावेशी राष्ट्रीय आरोग्य विमा आणि पिक-अनुदान ज्यामुळे शेती उत्पन्न स्थिर राहून खादयान्नाच्या किंमती कमी होतील या बाबींचा समावेश होता. दक्षिणेकडील सदस्यांनी (डेमोक्रॅटीक) परंपरावादी रिपब्लिकन नेत्यांच्या मदतीने ट्रुमनचा नागरी हक्क कायदा पारित करण्याचा प्रयत्न हाणून पाडला.

जरी 'नवोपक्रम' सुधारणांना पाठिंबा कायम राहिला तरी ट्रुमन यांना आपल्या विस्तारीत 'सुधारित उपक्रम' कार्यक्रमास पाठिंबा मिळविता आला नाही. तशातच शीत-युध्दास प्ररंभ व त्यानंतरचे कोरियन युध्द यामध्ये ट्रुमन यांना आपला वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्च करण्यास लागल्यामुळे अंतर्गत सुधारणांकडे फारसे लक्ष देता आले नाही.

## ११.८ आयसेन हॉवरचा कार्यकाल

राष्ट्रीय आकांक्षांनुसार जर कोणी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष झाला असेल तर तो ड्वाईट डेविड आयसेनहावर होय. अमेरिकन जनतेला शांती व स्थैर्य हवे होते आणि ते आयसेनहावरने आपल्या काळामध्ये दिले. त्याने राष्ट्राला नेहमी युध्दापासून दूर ठेवले व वैभव प्रप्त करुन दिले. तरीही आयसेनहावरच्या मवाळ धोरणांमुळे स्थितीवादी व उदारमतवादी नेत्यांच्या पदरी निराशा आली व ती अमेरिकन जनतेला अपेक्षित होती.

देशाला व्यापारीदृष्टया सुदृढ बनविण्यासाठी आयसेनहावरनी आपल्या प्रशासनात निष्णात खाजगी अधिकार्यांना नेमणुका दिल्या. आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी त्याने काँग्रेसबरोबर मिळून कृषी किंमती, अनुदान कमी करणे, सरकारी कर्मचारी कपात करणे आणि केंद्रीय खर्च कमी करणे इ. कामे केली. त्यांनी जलविद्युत व अणुउर्जा यांबाबतीत खाजगी उदयोगांना प्रोत्साहन दिले. तसेच किनारपट्टीच्या तेलसमृध्दराज्यांच्या बाबतीतील विधेयक काँगेसकडून पारित करुन घेतले.

प्रामुख्याने आयसेनहावर प्रशासन मध्यममार्गावर चालत होते. त्याने आपल्या प्रशासनास खाजगी उदयोगांप्रमाणे दिलेले स्वरुप व यामुळे कोणतीही टोकाची भूमिका घेतली नाही. आदशर्वादी असण्यापेक्षा ते प्रत्यक्षवादी होते. त्यामुळे त्यांनी शासकीय खर्च कपात, महागाई नियंत्रण आणि कुशल प्रशासन यावर भर दिला. दबावगटास तोंड देतानाच इ.स. १९५४ नंतर डेमोक्रॅटीक पक्षाचे बहुमत झाल्यावर त्यांनी कामगार संघटना आणि समाजकल्याण यांच्या कामात झोकून दिले.

मंदी टाळण्याच्या उत्सुकतेपोटी स्थितीवादी रिपब्लिकन सिनेटर रा@बर्ट तापोत यांच्या आर्थिक सल्लागार परिषद रदद् करण्याच्या मागणीस आयसेनहावरनी नकाराधिकार वापरला. आर्थर बर्न ज्याने आर्थिक घडी नीट बसविण्याचा पुरस्कार केला त्याच्या नेतृत्वाखाली आर्थिक सल्लागार परिषद एक महत्वाची संस्था म्हणून उदयास आली. आर्थिक व ऋण नीती मध्ये बदल करणे, कर संरचनेमध्ये दुरुस्त्या करणे आणि सार्वजनिक बांधकामांची गती वाढविणे या व अशासारख्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या प्रत्येक

सांघिक सरकारच्या उपयांचा आयसेनहावरनी पुरस्कार केला. जेव्हा इ.स. १९५३ व १९५७ मध्ये मंदी आली त्यावेळी आयसेनहावरनी समतोल अर्थसंकल्पाऐवजी विकासाचा वेग सुरु ठेवण्यासाठी जास्त खर्चाचे (तुटीचा अर्थसंकल्प) अंदाजपत्रक सादर केले.

ज्यावेळी सामाजिक सुरक्षेचा विस्तार करण्यात आला व त्याचा सात दशलक्ष अमेरिकन जनतेला फायदा झाला. किमान वेतन ७५ सेंट वरुन ताशी एक डॉलर वाढविण्यात आले, बेकारी भत्यासाठी आणखी ४ दशलक्ष लोक पात्र ठरले आणि अल्प उत्पन्न गटांना केंद्र सरकार पुरस्कृत गृहयोजना विस्तारीत करण्यात आली त्यावेळी आयसेनहावर काँग्रेसच्या सोबत गेले. त्यांनी सेंट लॉरेन्स सागरीमार्ग अटलांटीक महासागराला महासरोवर जोडणे, तसेच आरोग्य खाते निर्मिती, शिक्षण व जनकल्याण यांची निर्मिती करण्यास त्यांनी मान्यता दिली. इ.स. १९५६ मध्ये आयसेनहावर यांनी अमेरिकन इतिहासातील सर्वात मोठा व खर्चिक असा सार्वजनिक क्षेत्रातील कार्यक्रमास मान्यता दिली. त्यामध्ये ४१००० मैलांच्या आंतरराज्य द्रुतगती महामार्ग कायदयाचा समावेश होता. मुक्तमार्गांच्या अमेरिकेतील जाळयांमुळे उपनगरांची वाढ झाली, अमेरिकन जनतेची मोटारगाडया व मालवाहू गाडया यांवर भिस्त वाढली. राष्ट्रीय रेल्वे वाहिन्यांचे महत्व कमी झाले, केंद्रीय शहरांचा र्हास होऊ लागला. गॅसोलिनचा वापर वाढल्यामुळे हवाप्रदूषणात भर पडली.

आपला कार्यकाल संपण्याच्या तीन दिवस अगोदर आयसेनहावरनी अमेरिकन जनतेला आपला संदेश दिला. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले की, 'अमेरिकेच्या अनुभवामध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या मागणीमुळे लष्करी अर्थकारणाचे आरोग्य हे लष्करी खर्चावर अवलंबित झाले आहे. पुढे अनेक विद्यापीठांतील विद्वान आणि संशोधन संस्था, राजकीय नेते आणि अमेरिकन खाजगी उदयोग यांसाठी लष्करी करार हा त्यांच्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. या सर्व हितसंबंधांच्या गुंतागुंती झाल्या आहेत. आयसेनहावरनी स्थानिक सरकारच्या कार्यकुशलतेवर विश्वास व्यक्त केला आणि अमेरिकन जीवनात लष्काराला दुय्यम स्थान देण्याची धमकी दिली.

## ११.९ केनेडी यांचा कार्यकाल

केनेडी यांना काँग्रेसमध्ये बहुमत नसल्यामुळे आपल्या सुधारणांना त्यांना पुढे रेटता येत नव्हते. कारण रिपब्लिकन व दक्षिणेकडील स्थितीवादी डेमोक्रॅटीक सदस्यांनी ट्रुमनच्या सुधारणांना (सुधारित उपक्रम) देखील विरोध केलेला होता.

त्याऐवजी जॉन एफ केनेडी यांनी आर्थिक सुधारणांना अधिक प्रधान्य दिले. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी त्यांनी वाढत्या संरक्षण व अंतराळ खर्चाबाबतीत खाजगी उदयोजकांना गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी इ.स. १९६१ मध्ये संरक्षण खर्च किमान २०% वाढविण्यासाठी काँग्रेसचा पाठपुरावा केला. त्यामध्ये पाचपट अधिक सामर्थ्यशाली आंतरखंडीय क्षेपणास्त्रे, मध्यम-पल्ल्याच्या क्षेपणांस्त्रांचा विस्तार, धृवीय क्षेपणास्त्रांनी सुसज्ज अणु पाण बुडयांचा समावेश होता. पुढे त्यांनी अमेरिकेची मर्यादित पारंपारिक युध्द क्षमता वाढविण्यास सुचविले आणि इ.स. १९६१ मध्ये त्याद्वारे 'अमेरिकेने नेहमीचा अपमान सहन करण्यापेक्षा अणुशस्त्रास्त्र कारवाई करण्याचा पर्याय उपलब्ध करुन दिला. साम्यवाद पुरस्कृत तिसऱ्या जगामध्ये (अविकसित) सुरु असलेल्या राष्ट्रमुक्तीच्या नावाखालील चळवळींना दडपून टाकण्यासाठी केनेडी यांनी पारंपारिक लष्कराला बळकट

केले व गनिमी काव्याचे प्रशिक्षण दिलेले 'विशेष दल' (हरित टोपी) तयार केले. अर्थव्यवस्थेला उत्तेजन देण्यासाठी व अमेरिकेची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्यांनी इ.स. १९६९-७० च्या दरम्यान चंद्रावर मानवाला उतरविण्याचे लक्ष्य ठेवून अब्जावधी डॉलर्सचा कार्यक्रम मंजूरीसाठी काँग्रेसचा पाठपुरावा केला. त्यामुळेच १९ जुलै १९६९ रोजी नील आर्मस्ट्राँग आणि एडविन ऑल्ड्रिन यांनी चंद्रावर पाऊल ठेवले व त्या मोहिमेसाठी अमेरिकेस (नासा) २५ अब्ज डॉलर्स एवढा खर्च आला.

आर्थिक वाढीच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून असंतुलित अर्थसंकल्प झाला म्हणून केनेडी यांनी गुंतवणूक सूट आणि उदार घसारा खर्च म्हणून कमी व्यापारी कराचा प्रस्ताव पुढे केला. तरीही बरेच व्यापारी गट केनेडींच्या नीतीबदद्ल साशंक होते व त्यामुळेच ज्यावेळी शेअर बाजार कोसळला जाई तेव्हा ते अध्यक्षांच्या धोरणांना दोष देत असत. एप्रिल १९६२ मध्ये महागाई रोखण्यासाठीचा उपाय म्हणून रोजगार व किंमती याबाबतची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्राध्यक्षांना पूर्ण लष्करी संरक्षणाची तरतूद केली तेव्हा तर या व्यापारी वर्गाची अस्वस्थता अधिकच वाढली. पोलाद उदयोगाने पोलादाच्या किंमती टनामागे ६ डॉलर्सनी वाढविल्यानंतर केनेडी यांनी त्याविरोधात तीव्र प्रतिक्रिया नोंदविली. त्यांनी पोलाद कामगार संघटनांना किमान वेतन वाढीबाबतचे करार स्विकारण्यासाठी दबाव टाकला होता. त्यांनी पोलाद कंपन्यांचा निषेध केला व त्यांना विश्वासघाताविरोधी खटल्याची धमकी दिली आणि सरकारशी झालेले करार रदद् केले जातील असे सांगितले. तसेच केंद्रीय व्यापारी आयोगास आणि केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागास पोलाद उदयोगांचे किंमतीबाबतचे करार मदार यांची चौकशी करण्याच्या कामास लावले. त्यानंतर अमेरिकन पोलाद कंपन्यांनी किंमतवाढ रदद् केली. या व्यापारी वर्गाने केनेडी यांनासुध्दा आपले कठोर धोरण मागे घेण्यास लावले. परंतु ज्यावेळी नंतर या कंपन्यांनी पोलादाच्या किंमती वर्षातून दोनदा वाढविल्या त्यावेळी केनेडी फक्त त्याविरोधात बोलले परंतु कृती करु शकले नाहीत. नंतर जानेवारी १९६३ मध्ये जेव्हा आर्थिक वाढ करण्याची त्यांनी घोषणा केली त्यावेळी सामाजिक कार्यक्रमांवर निधी वाढविण्याचा प्रस्ताव त्यांनी फेटाळून लावला. त्याऐवजी खाजगी गुंतवणूक व खर्च यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांनी खाजगी व औद्योगिक कर कमी करुन केंद्रीय खर्च कायम ठेवण्याच्या नीतीचा पुरस्कार केला.

केनेडी प्रशासनाचा इ.स. १९६३ च्या नोव्हेंबर मध्ये दुःखद शेवट झाला तरीही त्यांचे करकपात धोरण काँगेसने तसेच ठेवले. त्यांच्या अर्थव्यवस्थापनामुळे आर्थिक वाढीचा दर हा दुपटीपेक्षा अगोदरच अधिक झाला होता. बेकारीचे प्रमाण कमी झाले होते आणि चलनवाढीचा दर प्रतिवर्षी केवळ १.३% पर्यंत राहीला. त्यांचा कार्यकाळ म्हणजे अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या कारकिर्दीतील सर्वात विनाअडथळा असलेली आर्थिक वाढ होती. अजूनही उदार टीकाकारांनी आयसेनहावरच्या काळाची आठवण करुन दिली. त्यांनी केनेडी यांच्या उत्पन्नाचे पुनर्वाटप करण्यातील अपयश व विस्तारीत कर पध्दतीचा फक्त श्रीमतांना झालेला फायदा यांवर टीका केली. उदयोजकांना वाढलेला पाच पट नफा आणि व्यक्तिगत उत्पन्न कमी तसेच समाजकल्याणाच्या निधीचा लष्करी खर्चासाठी झालेला वापर यांबाबतीत त्यांनी खेद व्यक्त केला. विशेषतः त्यांनी केनेडी यांनी सार्वाजनिक क्षेत्राकडे केलेल्या दुर्लक्षाबाबत कडक निषेध नोंदविला.

जॉन एफ केनेडी यांचा खून झाला व ज्या विमानाने त्यांचा मृतदेह अमेरिकेत आणण्यात आला त्याच विमानाने त्यांचे वारस लिंडन जॉन्सन हे प्रवास करीत होते.

## ११.१० राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन

राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांची पहिली दोन वर्षे अधिकच यशस्वीपणे पार पडली. त्यांनी सत्तांतर प्रक्रिया अतिशय बारकाईने हाताळली व इ.स. १९६४ मध्ये विजयी झाले. इ.स. १९६५ मध्ये त्यांनी काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली अमेरिकेच्या इतिहासातील महत्वाच्या सामाजिक सुधारणाविषयक विधेयक पारित करुन अमंलात आणले.

जॉन्सन यांनी जॉन केनेडी यांच्या स्मृती प्रित्यर्थ कर कपात आणि नागरी हक्क विधेयक पुन्हा सुरु केले. फेब्रुवारी १९६४ मध्ये उत्पन्न कर १० अब्ज डॉलर्सपर्यंत कमी करणारे विधेयक काँग्रेसकडून पारित करुन घेतले. त्यामुळे ग्राहकखर्च वाढून व बेकारी कमी होऊन आर्थिक वाढीला चालना मिळाली. इ.स. १९६४-१९६६ च्या दरम्यान अर्थसंकल्पीय तूट ६ अब्ज डॉलर्सवरुन ४ अब्ज डॉलर्सपर्यंत कमी झाली.

जॉन्सन यांनी उचलेले सर्वात धाडसी पाऊल म्हणजे त्यांनी विनाशर्त अमेरिकेची गरीबी दूर केली हे होय. जनमताने त्यांच्या या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले व त्याचे श्रेय मायकल हॅरिंग्टन यांनी इ.स. १९६२ रोजी लिहिलेल्या 'दुसरी अमेरिका' (The Other America) या पुस्तकाला दिले. कारण सदर पुस्तकामध्ये त्याने २० ते २५% अमेरिकन जनता दारिद्रयात जीवन जगत आहे याबाबत पुरावे दिलेले होते. हॅरिंग्टन यांच्या मते वैभवशाली व चैनी अमेरिकेमधील जवळजवळ ४० दशलक्ष लोक हे दिसत नसले तरी दारिद्रयात जीवन जगत आहेत. त्यामध्ये निराधार वरिष्ठ नागरीक, विभक्त शेतकरी, निग्रेंच्या शहरातील स्वतंत्र वस्त्या, बेरीओ मध्ये राहणारे हिस्पॅनिक्स आणि स्थलांतरीत कामगार छावण्या, आरक्षित भारतीय, अप्पलाचिया येथील खाण कामगार तसेच स्त्रीप्रमुख कुटुंबे यांचा समावेश होता. ते अत्यंत निकृष्ट निवार्यात व कुपोषित जीवन जगत होते. समाज कल्याण विभागाकडून त्यांना थोडीफार मदत मिळत होती व ते या आशेमध्ये होते की, गरीबी संस्कृती कमी होण्यास वेळ लागेल. ते शिक्षणापासून, आरोग्य सुविधांपासून, नोकऱ्यांपासून वंचित होते. बहुतेक अमेरिकन नागरिकांना याबाबत आशा वाटत होती.

त्यासाठी अध्यक्ष जॉन्सन यांनी अनेक कार्यक्रम प्रस्तावित केले. त्यासाठी एक अब्ज डॉलर्सची तरतूद केली. ऑगस्ट १९६४ मध्ये काँग्रेसने पारित केलेल्या या व्यावसायिक कौशल्यांमध्ये तरुणांना प्रशिक्षण देण्यात येऊ लागले व त्यासाठी त्यांना आर्थिक निधी उपलब्ध केला गेला. 'विस्टा' (VISTA- Valunters in Service to America) नावाच्या संघटनेमार्फत दारिद्री असलेल्या क्षेत्रात काम करणारे तरुण वर्ग होते. 'प्रोजेक्ट हेड स्टार्ट' तर्फे शिक्षणापासून वंचित कुटुंबातील मुलांना शाळापूर्व शिक्षण देण्यात आले. गरीबांच्या समस्यांशी संबंधित कार्यक्रमांमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासाठी 'कम्युनिटी ॲक्शन प्रोग्राम' सुरु केला. तसेच सार्वजनिक कामे व प्रशिक्षण संस्था सुरु केल्या.

पुढील एकोणनव्वदच्या काँग्रेसचे वर्णन अध्यक्षांनी 'कार्यपूर्ती काँग्रेस' असे केले तर विरोधकांनी 'स्वच्छंदी काँग्रेस' असे केले. मात्र तिने गरीबी हटविण्याबाबतचा कार्यक्रम युध्दपातळींवर सुरु केला. काँग्रेसने वृध्दांसाठी आरोग्यविमा लागू केला व गरजूंना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी केंद्रीय अनुदान दिले. स्थानिक नेत्यांनी छोटया शिशु वर्गापासून पदवी पर्यंत शालेय मदत करण्यासाठी केंद्रे स्थापन केली. तसेच स्थानांतर कायदा शिथिल

केला. स्वसुरक्षेला प्रोत्साहन दिले. नवीन वाहतूक विभाग आणि गृह व शहरी विकास मंडळ स्थापन केले.

एवढे प्रयत्न करुन अमेरिकन समाजाची प्रगती (विशेषता गरीब वर्गाची) हे स्वप्नच राहिले. तरीदेखील त्यांच्या काही योजनांमुळे राहणीमानाचा दर्जा सुधारला खरा. जॉन्सन यांची गरीबी दूर करण्याची उत्कट इच्छा व सर्वांना आर्थिक विकासाची संधी पुरविण्याची धडपड अत्यंत महत्वाची होती. मार्टीन ल्युथर ज्युनियर यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास "जॉन्सन व्हिएतनामच्या युध्दभूमीवर मारले गेले" असे म्हणता येईल. कारण इ.स. १९६६ मध्ये जॉन्सन हे गरीबी निर्मूलन कार्यक्रमापेक्षा २० पट अधिक रक्कम व्हिएतनामच्या युध्दावर खर्च करीत होते. जॉन्सन यांचे गरीबी हटाव कार्यक्रमावरुन युध्द कार्यक्रमाकडे वळलेले लक्ष व त्यामुळेच सार्वत्रिक एकमत ते हरवून वसले व लाखो गरीबांच्या मनातून कायमचे उतरले.

## ११.११ रिचर्ड निक्सन आणि आर्थिक संकट

लिंडन जॉन्सन यांनी व्हिएतनाम युध्दावर केलेला खर्च, कर न वाढविल्यामुळे आर्थिक नीतीवर विपरित परिणाम झाले होते. तशातच रिचर्ड निक्सन यांनी राष्ट्राध्यक्षाचा कार्यभार ताब्यात घेतला. त्यावेळेस २५ अब्ज डॉलर्सची आर्थिक तूट आणि ५% चलनवाढ झालेली होती. इ.स. १९६९ मध्ये राहणीमान खर्च ७% पेक्षा अधिक वाढला आणि ऊर्जा, खाद्यान्न आणि कच्च्या मालाच्या किंमतींनी भरमसाठ चलनवाढीची शक्यता निर्माण झाली. चलनवाढ रोखण्याच्या उत्सुकतेपोटी निक्सनने रोजगार व किंमती व्यवस्थापनाचा प्रस्ताव नाकारला. त्याऐवजी त्यांनी शासकीय खर्च कपात केला आणि व्याजदर लागू करण्याची जबाबदारी फेडरल रिझर्व बोर्डाकडे सोपविली.

चलनवाढ कमी करण्याचा एक उपाय म्हणून निक्सनने व्यापार व्यवसाय व ग्राहकखर्चाला आळा घालण्याचे काम केले. औद्योगिक उत्पादनात घट झाली. बेरोजगारी ६% वाढली आणि आर्थिक मंदी पसरुन चलनवाढ अधिकच होत गेली. डेमोक्रॅटीक नॅशनल कमिटीच्या प्रमुखाने निक्सनच्या आर्थिक नीतीला 'निक्सॉनॉमिक्स' म्हणून संबोधले. शेअर बाजार, खाजगी उदयोगांचा नफा, वास्तविक खर्चयोग्य उत्पन्न हे वाढले पाहिजे आणि बेरोजगारी, वस्तूंच्या किंमती, व्याज दर यांमध्ये घट झाली पाहिजे असे त्यांनी म्हंटले. इ.स. १९७१ च्या सुरुवातीस निक्सनने "मी आता केनेसियन (अथशास्त्रज्ञ केनचा अनुयायी) आहे" असे जाहिर करुन अमेरिकन जनतेला आश्चर्याचा धक्काच दिला. सदर नीतीचे राजकीय परिणाम त्यांना माहित होते व चलनवाढीने दिसणारी भरभराट कूचकामी आहे हे त्यांच्या निर्दशनास आले होतेच. म्हणून त्यांनी आर्थक घडी नीट बसविण्यासाठी 'तूटीचा खर्च' हे केन्सचे अर्थशास्त्राचे तत्व अवलंबिण्याचा प्रयत्न केला. म्हणून त्यांनी हेतुपुरस्करपणे आर्थिक नुकसान भरुन काढण्यासाठी असंतुलित केंद्रीय अर्थसंकल्पाचा प्रस्ताव ठेवला. तशातच त्यांनी अजूनही रोजगार व किंमती नियंत्रणाचे प्रयत्न सुरुच ठेवले होते.

इ.स. १९७१ च्या ऑगस्टमध्ये निक्सनने आपले धोरण पुन्हा बदलले. त्याचवेळी वाणिज्य विभागाने अशी घोषणा केली की, इ.स. १८९० पासून पहिल्यांदाच अमेरिका निर्यातीपेक्षा आयातच अधिक करीत आहे व त्यामुळे फार मोठी व्यापारी तूट निर्माण झाली आहे.

त्यावेळी राष्ट्राध्यक्षांनी आर्थिक स्थिरीकरण आणि व्यापार संतुलन राखण्यासाठी नवीन सुधारणांचे उपाय योजले. स्वदेशी वस्तूंचा वापर वाढण्यासाठी त्यांनी आयात वस्तूंवर १% अतिरिक्त अधिभार लावला. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकन मालाच्या किमती अधिक स्पर्धात्मक राहण्यासाठी निक्सन यांनी अशी घोषणा केली की, यापुढे डॉलरचे मूल्य इतर देशांच्या चलनांच्या मूल्यांबरोबर निश्चित केले जाणार नाही. येथून पुढे आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारामध्ये डॉलरची तरलता त्याच्या मूल्यावर आधारित असेल. तसे पाहिल्यास इ.स. १९४४ च्या न्यू हॅम्पशायर येथील ब्रेटनवूडस येथे आर्थिक व्यवस्थापनासाठी प्रमुख पाश्चिमात्य राष्ट्रांच्या भरलेल्या आर्थिक परिषदेमध्ये हा निर्णय झाला होता.

शेवटी पूर्वीच्या आपल्या रोजगार व किंमत निर्णयास दिलेला नकार निक्सन यांनी मागे घेतला आणि रोजगार दर, किंमती व भाडे नियंत्रण यावर नव्वद दिवसांची स्थिरीकरण बंधने लागू केली. त्यानुसार रोजगार दर ५.५% आणि किंमती व भाडे २.५% दरसालापेक्षा अधिक वाढणार नाहीत असे केंद्रीय नियंत्रण त्यांनी लागू केले. त्यांच्या या नवीन आर्थिक नीतीमुळे अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात चालना मिळाली आणि डाऊ जोन्स निर्देशांक त्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एक हजार अंकांच्या वर गेला. तसेच चलनवाढ कमी होऊन व्यापारी तूटसुध्दा कमी झाली.

जानेवारी १९७३ मध्ये अध्यक्ष निक्सन यांनी पुन्हा आपली आर्थिक नीती बदलली व त्यामध्ये रोजगार दर व किंमती स्थिरीकरण बदलून शिफारशी निर्देशानुसार ऐच्छिक बंधने लागू केली. त्यावर्षी चलनवाढ ९% झाली आणि पुढील दशकभर तीची डोकेदुखी राहीली.

## ११.१२ रेनॉल्ड रेगन

रिचर्ड निक्सन यांच्या गच्छंतीनंतर अमेरिकेस कोणी वाली व दिशादर्शक नव्हता. त्यांच्यानंतर आलेले गेराल्ड फोर्ड व जिमी कार्टर यांना अंतर्गत व परराष्ट्रीय अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. पेट्रोलिय निर्यातदार देशांच्या संघटनेने (OPEC) तेलांच्या किमती वाढविल्यामुळे अमेरिकन अर्थव्यवस्था चलनवाढ, बेकारी आणि मंदी यांसारख्या समस्यांना बळी पडली. आर्थिक वाढ आणि अमेरिकन सरकारच्या आर्थिक समस्या सोडविण्यावरील मर्यादांचे भाकीत केल्यामुळे अमेरिकन जनतेच्या समस्या अधिकच वाढल्या.

इ.स. १९८० मध्ये अध्यक्षीय उमेदवार म्हणून अमेरिकन मतदारांनी आर्थिक समस्यांवर तोड काढू शकेल अशा रोनाल्ड रेगन यांच्याकडे कल दिला. व्हिएतनाम युध्दामुळे गर्भगळीत झालेल्या अमेरिकन राष्ट्राला रेगन यांच्या अविचलित देशभक्तीने एक आवाहन केले. व्यापारी व्यवसायिक मंदी आणि चलनपुरवठा यांच्या संयुक्त परिणामांनी (Stageflation) तयार झालेल्या परिस्थिती व त्याचे मुख्य कारण 'कर व खर्च', ही निती मागे घेण्याचे आश्वासन निक्सन यांनी अमेरिकन जनतेला दिले. त्यांनी नवोपक्रम, सुधारित उपक्रम आिाण् महान सोसायटी यांसारख्या योजनांवर केलेल्या कडक टीकेमुळे पश्चिमी राष्ट्रांत मोठया प्रमाणात निष्क्रीयविरोधी कल निर्माण झाला.

राष्ट्राध्यक्ष म्हणून रेगन यांनी राष्ट्रीय आत्मविश्वास व गर्व पुनरुज्जीवित केले. त्यांच्या आर्थिक धोरणांनी मंदी निर्माण झाली परंतु अतिमत: चलनवाढ कमी झाली आणि ग्राहकखर्च व गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळाले. त्यांच्या पश्चात याच धोरणांनी आर्थिक व्यवस्थेमध्ये काही अत्यंत गंभीर समस्यांची सुरुवात झाली. दरम्यान वॉशिंग्टनमध्ये एका राष्ट्राध्यक्षांनतर व प्रशासनानंतर दुसरे येऊ लागले तसतसे दूरगामी सामाजिक बदल व संरचनात्मक बदल अर्थव्यवस्थेमध्ये येऊ लागले. त्याचबरोबर गुंतागुंती वाढून त्याचे परिणाम अमेरिकन राष्ट्रावर होऊ लागले.

## ११.१३ गेराल्ड फोर्ड यांचे काळजीवाहू सरकार

९ ऑगस्ट १९७४ रोजी गेराल्ड फोर्ड यांनी अध्यक्षपदाची सुत्रे काळजीवाहू अध्यक्ष म्हणून हाती घेतली. त्यांनी सर्वात अधिक लक्ष आर्थिक समस्यांवर केंद्रीत केले. अरब तेल उत्पादक व निर्यात कंपन्यांनी तेलाच्या किंमती वाढविल्यामुळे अमेरिकेवरही त्याचा परिणाम झाला. कारण अमेरिका ७५% तेल आयात करीत होती. त्याचा परिणाम स्वरुप अमेरिकेत गॅसोलिन, स्वयंपाकाचा गॅस आणि इतर तेल संबंधित उत्पादनांच्या किंमती वाढल्या. इ.स. १९७४ मध्ये वस्तूच्या किंमती १२% ते इ.स. १९७५ मध्ये ११% वाढल्या. ऑक्टोबर १९७४ मध्ये फोर्ड यांनी 'व्हीप इन्फ्लेशन नाऊ' (WIN) नावाचा चलनवाढ दूर करण्याचा कार्यक्रम जाहिर केला. त्यांनी अध्यक्षीय कार्यक्रमांमध्ये सदर नीतीचा नेहमी आवर्जून उल्लेख केला. तरीही किंमती वाढतच गेल्या. त्यांनी केंद्रीय खर्च कमी केला आणि सवलतीचा दर वाढवून फेडरल रिझर्व बोर्डाच्या आर्थिक चलनवाढीच्या उपायांना मान्यता दिली.

त्यानंतर अत्यंत गंभीर आर्थिक मंदी निर्माण झाली. इ.स. १९७४-७५ मध्ये देशाची अर्थव्यवस्था जणू काही थांबली गेली. इ.स. १९७४ मध्ये बेकारीचे प्रमाण ८-९% झाले तर इ.स.१९७५ मध्ये ते ११% पर्यंत वाढले. व्यापारी मंदीमुळे कर प्राप्ती-सुध्दा कमी झाली. केंद्रीय आर्थिक तूटीने कमाल मर्यादा ओलांडली. फोर्ड यांनी कर कपातीचा प्रस्ताव ठेवला आणि ग्राहक व्यय वाढण्यासाठी काही उपाय केले परंतु आर्थिक डोकेदुखीने त्यांच्या प्रशासनाला शेवटपर्यत सोडले नाही.

तेलाच्या किंमतवाढीने निर्माण झालेल्या महागाईन अमेरिकेच्या वाहन उदयोगास अवकळा आली. गॅसच्या किंमती जेव्हा गगनाला भिडल्या तेव्हा अनेक वर्षे डेट्रॉईट विकत असलेली गॅसवर चालणारी उपकरणे पण सध्या अकार्यक्षम झालेली, अमेरिकन जनतेने खरेदी करणे बंद केले. इ.स. १९७४ मध्ये जनरल मोटर्स, फोर्ड आणि क्रिस्लर्स या मोटर वाहन कंपन्यांनी २,२५००० पेक्षा अधिक कामगारांना कामावरुन कमी केले. छोटया परंतु अधिक इंधन-कार्यक्षम वाहनांची आयात अमेरिकन बाजारात इ.स. १९७० मध्ये १७% वरुन इ.स. १९८० मध्ये ३३% वाढली.

फोर्ड यांच्या काळात अंतर्गत समस्यांमध्ये बाहय समस्यांनी देखील भर टाकली. ज्यावेळी अमेरिकेने इ.स. १९७६ च्या निवडणुकीच्या वर्षात प्रवेश केला आणि ते वर्ष अमेरिकन राष्ट्राच्या स्वातंत्र्य दिनाला दोनशे वर्षे साजरे करण्याचे होते तरीही अमेरिकन जनता तेवढी आनंदी व उत्साही नव्हती. कारण त्यांच्यापुढे आर्थिक समस्यांवर योग्य उपाययोजना करणाऱ्या पक्षास सत्तास्थान बहाल करण्याची खरी मोठी समस्या होती.

## ११.१४ जिमी कार्टर यांची कारकीर्द

कार्टर व्हाईट हाऊसमध्ये आल्यावर आर्थिक मंदीला सामोरे जाताना त्यांनी पहिल्याच वर्षी कर कपात आणि सार्वजनिक कामांची योजना राबविली. त्याच्या परिणामस्वरुप इ.स. १९७८ मध्ये बेकारीचे प्रमाण ५% नी कमी झाले. परंतु त्याची फळे समाज कल्याण योजनांमध्ये मिळाली नाही आणि केंद्रीय खर्चावर नियंत्रण मिळविता आले नाही.

आपल्या तार्कीक तंत्रज्ञानी दृष्टीकोनाचा चांगला वापर केल्यामुळे कार्टर यांनी नागरी सेवा आणि शासकीय कार्यकारी विभागांमध्ये प्रशासकीय सुधारणा लागू केल्या. परंतु काँग्रेसबरोबर त्यांचे संबंध तितकेसे सलोख्याचे नसल्यामुळे त्यांच्या त्या योजनांना शह बसला. राष्ट्रीय आरोग्य विमा प्रोत्साहन कार्यक्रम, समाज कल्याण योजना आणि उत्पन्न करप्रणालीमधील पळवाटा शोधून काढून सुधारणे यांसारख्या योजनांना तितकेसे यश मिळाले नाही. मात्र एक महत्वाचा बदल त्यांनी न्यायिक प्रशासनात केला आणि तो म्हणजे स्त्रियांच्या आणि अल्पसंख्यांक गटांच्या न्यायाधिश पदी अधिकाधिक केलेल्या नेमणूका होत.

चलनवाढ अगोदरच असल्यामुळे महागाई वाढतच गेली. इ.स. १९७९ आणि १९८० मध्ये वस्तूंच्या किंमती १३% पेक्षा अधिक वाढल्या याचे खरे प्रथमिक कारण वीज दर वाढ होते. दशकातील दुसरी तेलवाढ इ.स. १९७९ मध्ये केली गेली. तेल निर्यातदार कंपन्यांनी (OPEC) तेलाच्या किंमती दर बॅरलमागे ३० डॉलर्सनी वाढविल्या. अमेरिकन जनतेला गॅसोलीनच्या एका गॅलन मागे एक डॉलर्स किंमत अधिक मोजावी लागली. गॅस स्टेशनांमध्ये रांगा लागल्यामुळे मागणीचा कल एकदम भडकला. इंधनसंबधी वस्तूंच्या किंमती वाढू लागल्या. केवळ इ.स. १९७९ मध्ये अमेरिकन ग्राहकांना इंधन दरवाढीशी संबंधित वस्तूंच्या किंमतीपोटी १६.४ अब्ज डॉलर्स अधिक मोजावे लागले. फोर्ड यांच्याप्रमाणेच जिमी कार्टर सुध्दा ऐच्छिक चलनकपातीवर विसंबून होते. त्यांनी सुरु केलेल्या रोजगार आणि किंमत स्थिरीकरण परिषदेमुळे कामगार व उत्पादकांना धीर धरण्यास सांगितले. परंतु सततच्या इंधन दरवाढीमुळे त्यांच्या प्रयत्नांना फारसे यश आले नाही.

फेडरल रिझर्व बोर्डाने सवलत दर अधिकाधिक वाढवित नेल्यामुळे बँक दर इ.स. १९८० मध्ये २०% पर्यंत अनपेक्षितपणे वाढत गेला. तारण व बाजारी कर्जे आवाक्यापलीकडे गेल्याने आर्थिक कार्यक्रम अपूर्ण राहीले व मंदीयुक्त चलनवाढ (Stagflation) निर्माण झाली. कर महसूलाचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने आर्थिक निधी वाढविला खरा परंतु व्याजदर अधिकच वाढू लागले.

इंधन दरवाढीच्या समस्येपासून कार्टर यांनी धडा घेण्याचे ठरविले म्हणून त्यांनी भूगर्भइंधन संसाधनांचे संवर्धन करण्याचे सुचविले. कार्टर यांच्या मते, अमेरिकन आर्थिक वाढ घडवायाची असल्यास स्वस्त व अमर्याद ऊर्जा उपलब्ध होणे आणि परदेशी स्पर्धेचा अभाव या गोष्टींवर केवळ अवलंबून असणे गरजेचे नाही. त्यांच्या मते, अमेरिकन जनतेने 'शून्य मूल्य समाजाचा' स्विकार करणे शिकले पाहिजे. म्हणूनच त्यांनी अमेरिकन समाजावर बंधनयुक्त नीतीचा अवलंब करण्याचा प्रयत्न केला.

munotes.in

इ.स. १९७५ मध्ये काँग्रेसने वाहन उदयोगांसाठी इंधन कार्यक्षमता मानके निर्धारित केली होती व राष्ट्रीय वेगमर्यादा ताशी ५५ मैल घालून दिली होती. परंतु कार्टर यांना ती अधिक वाढवायची होती. इ.स. १९७७ मध्ये कार्टर यांनी ऊर्जा विभागाची स्वतंत्रपणे स्थापना केली आणि इंधन करांची विविधता वाढविली. त्यामध्ये गॅसोलिन व्यय कर, संवर्धन उपायांसाठी सवलत कर, आणि पर्यायी ऊर्जा स्त्रोतांमध्ये संशोधनास प्रोत्साहन दिले. इ.स. १९७८ मध्ये काँग्रेसने ऊर्जा विधेयक पारित केले.

परंतु कार्टर यांच्या मर्यादा या त्यांच्या शक्तीस्थानापेक्षा अधिक होत्या. त्यांनी अत्यंत कळकळीने पुढील अनेक वर्षे प्रभावकारी राहतील असे प्रश्न ओळखले व त्यांचा पाठपुरावा केला. त्यांमध्ये ऊर्जा धोरण, कर सुधारणा, आरोग्य सुधार, अमेरिकेची जागतिक पातळीवरील भूमिका निश्चित करणे इ. मुद्यांचा समावेश होता. परंतु त्यांच्याकडे राजकीय डावपेचांचा अभाव होता आणि त्यामुळे सदरच्या प्रश्नांची ते तेवढी यशस्वीपणे सोडवणूक करु शकले नाहीत. आपल्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षात आपल्या काही उणिवांमुळे आणि एका विरोधी गटाच्या कारवायांमुळे कार्टर हे एकाकी पडले आणि त्यांना कोणीही पाठींबा देऊ शकला नाही. दरम्यान अमेरिकन जनतेने त्यांचे योग्य मूल्यमापन करण्याऐवजी जानेवारी १९८१ मध्ये जेव्हा त्यांनी आपले पद सोडले त्यावेळी त्यांना निरोप देण्यासाठी फारच कमी लोक पुढे आले. आता अमेरिकन जनतेची खरी कसोटी कार्टर यांच्या नंतर अमेरिकन आर्थिक समस्या सर्व बाजूंनी सोडवू शकेल अशा राष्ट्राध्यक्षाची निवड करण्यात लागणार होती.

## ११.१५ समारोप

दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेचा विजय झाल्यानंतर अमेरिकेस अनेक प्रकारच्या आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागले. आपली आर्थिक पुर्नरचना करण्यासाठी अमेरिकेने अनेक प्रकारच्या प्रभावशाली उपाययोजना केल्या आणि म्हणूनच सुरक्षा संघटनेची बांधणी केली. अमेरिकेने सर्व-अमेरिका तत्वांन्वये अमेरिकननिष्ठ राष्ट्रांना आर्थिक मद पुरविण्यास सुरुवात केली. ट्रुमन यांच्या कार्यकाळात अनेक समस्या होत्या. केनेडी यांनी आपले सर्वतोपरी प्रयत्न केले आणि ते बऱ्या प्रमाणात यशस्वी झाले. निक्सन व त्यांचे वाटरगेट प्रकरण यामुळे गेराल्ड फोर्ड यांच्यासमोर अनेक समस्या निर्माण झाल्या पुढे जिमी कार्टर यांनी आपले कसोशीचे प्रयत्न केले. परंतु अमेरिकेचे आर्थिक पुर्नरचना ही सतत चालणारी प्रक्रीया झाली होती.

## ११.१६ प्रश्न

१. अमेरिकेच्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाअंतर्गत नवोपक्रम कार्यक्रमापर्यंतच्या आर्थिक उपायांची चर्चा करा.

२. केनेडी यांची कारकीर्द स्पष्ट करा.

३. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकेच्या आर्थिक पुनर्रचनेसाठी कोणते उपाय योजण्यात आले?

४. बृहद् अमेरिकन धोरणाचे मार्ग कोणते होते?

५. कोणत्याही तीन आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची नावे सांगा.

६. सुधारित उपक्रम कसा होता?

७. मायकल हेरिंग्टन यांनी कोणते पुस्तक लिहीले होते?

८. 'स्टॅगफ्लेशन' म्हणजे काय?

९. जिमी कार्टर यांच्यावर थोडक्यात टीप लिहा.

१०. टीपा लिहा.

i) बृहद्-अमेरिकन संबंध

ii) सुधारीत उपक्रम

iii) जिमी कार्टर यांची कारकीर्द

❖❖❖❖

munotes.in

# १२

# आधुनिक अमेरिका: विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती

**घटक रचना :**


१२.० उद्दिष्टये

१२.१ प्रस्तावना

१२.२ वैज्ञानिक प्रगती

१२.३ तंत्रज्ञानातील प्रगती

१२.४ समारोप

१२.५ प्रश्न


## १२.० उद्दिष्ट्ये

- २० व्या शतकातील अमेरिकेची वैज्ञानिक प्रगती समजून घेणे.
- आधुनिक अमेरिकेच्या तंत्रज्ञानातील प्रगतीचा अभ्यास करणे.

## १२.१ प्रस्तावना

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक घडामोडींवर अमेरिकेचे वर्चस्व होते. या महान संघर्षात विजयी झालेल्या अमेरिकन भूमीला महायुद्धाची कोणतीही झळ सहन करावी लागली नाही. देशामध्ये आणि आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपले विहित कर्तव्य पार पाडू असा आत्मविश्वास तिला वाटत होता. ज्या अमेरिकन लोकशाही रचनेचे रक्षण करण्यासाठी तिने एवढी जबरदस्त किंमत मोजली होती तिचे रक्षण करण्याची आणि समृद्धीची फळांचे शक्य तेवढे व्यापक वाटप करण्याची अमेरिकन नेत्यांची इच्छा होती. एका बाजूला १९४५ नंतर सुरु झालेल्या शीत युद्धामध्ये खंबीर भूमिका घेण्याची गरज असल्याचे त्यांनी मान्य केले होते आणि दुसऱ्या बाजूला शासनाचे अधिकार वाढवून कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारण्याची त्यांची तयारी होती. महायुद्धानंतरच्या समृद्धीने अमेरिकेतील निर्माण केलेल्या प्रचंड संपत्तीचा उपभोग त्यांनी घेतला. ही समृद्धी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील तसेच कला आणि साहित्य या क्षेत्रांतील अभूतपूर्व प्रगतीने शक्य झाली होती. या समृद्धी आणि प्रगतीच्या साहाय्याने अमेरिकेने तिच्या इतिहासातील आधुनिक युगामध्ये प्रवेश होता.

munotes.in

## १२.२ वैज्ञानिक प्रगती

२० व्या शतकामध्ये मानवी जीवनात वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानात महानतम बचत झाले. हे बदल झपाटयाने झाले होते आणि त्यांचा समाजाच्या विविध भागांवर प्रभाव पडला होता. १९ व्या शतकातील वैज्ञानिक शोशांच्या आधाराने वैज्ञानिक, संशोधक आणि अभियंते यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढवली होती. १९०० मधील सामान्य अमेरिकन माणसाच्या संपर्क, परिवहन आणि शेतीच्या कामांचे स्वरूप स्थानिक होते, परंतु २००० मधील सामान्य अमेरिकन माणूस अंतर्गत संबंधाने जोडल्या गेलेल्या जागतिक समाजाचा एक घटक झाला होता. त्याकाळातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनामध्ये वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानातील हे बदल महत्वाचे ठरले. आर्थिक महामंदी, जागतिक महायुद्धे आही शीतयुद्ध, नागरी हक्कांची चळवळ आणि स्त्री मुक्तीची चळवळ या सर्वांवर विद्यापीठे आणि उद्योगामध्ये झपाटयाने झालेल्या वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानविषयक प्रगतीचा दुरगामी आणि खोलवर परिणाम झाला होता.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकन विज्ञानाला आकार देण्यात वैज्ञानिक प्रगतीच्या अंतर्गत तर्कशास्त्राने भौतिक परिस्थितीवर वरताण केली होती. आघाडीच्या सर्व अमेरिकन विद्यापीठांनी संशोधनाला प्रोत्साहन दिले, या संशोधनासाठी विविध औद्योगिक कंपन्यांनी, प्रतिष्ठानांनी आणि केंद्र सरकारने भरपूर आर्थिक मदत केली. परिणामस्वरूपी, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये अमेरिका जगाचे नेतृत्व करू लागली. १९३३ नंतर युरोपातील अनेक देशात एकाधिकारशाहीचा उदय झाल्याने तेथील अतिशय प्रतिभावंत बुद्धीजीवी अमेरिकन विद्यापीठांमध्ये आसरा लागल्यानंतर ही प्रक्रिया अधिकच जोमदार झाली.

अल्बर्ट मिचेलसन यांना १९०७ मध्ये भौतिकी विज्ञानामधील संशोधनासाठी मिळाला होता तर १९१४ मधील रसायन शास्त्रातील नोबेल पुरस्कार थिऑडॉर डब्ल्यू. रिचर्डस यांना मिळाला होता. १९२० पर्यंत या दोनच अमेरिकन वैज्ञानिकांना विज्ञानाच्या नोबेल पुरस्काराचा सन्मान मिळाला होता. ब्रिटिश आणि जर्मन वैज्ञानिक या बाबतीत आघाडीवर असले तरी आता अमेरिकन वैज्ञानिक देखील या स्पर्धेमध्ये सामील झाले होते आणि त्यांनी आघाडी मिळवण्याचा निश्चय केला होता. अमेरिकन वैज्ञानिकांनी मिळवलेल्या नोबेल पुरस्कारांच्या संख्येवरून अमेरिकेच्या विज्ञानातील अग्रेसर स्थानाची कल्पना येते. १९३० ते १९५० या काळातील विज्ञानातील ३० टक्के नोबेल पुरस्कार अमेरिकन वैज्ञानिकांना मिळाले होते; १९०१ ते १९२९ या काळातील नोबेल पुरस्कार प्राप्त अमेरिकन वैज्ञानिक फक्त ६ टक्के होते, ब्रिटिश आणि जर्मन वैज्ञानिकांना अन्य ३० टक्के नोबेल पुरस्कार आणि बाकीचे अन्य देशातील वैज्ञानिकांना मिळाले होते. या वरून अमेरिकन वैज्ञानिकांनी या क्षेत्रामध्ये मिळवलेल्या आघाडीची कल्पना येते. सिद्धांत आणि प्रायोजित विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या वाढत्या परस्पर अवलंबत्वामुळे अमेरिकन विज्ञानाला लोकांचा पाठींबा वाढत्या प्रमाणात मिळू लागला. उच्च शिक्षणाचा विस्तार आणि त्याचे लोकशाहीकरण यामुळे वैज्ञानिकांची संख्या वाढत गेली.

munotes.in

### १२.२.१ भौतिकशास्त्रातील प्रगती

सिद्धांत आणि त्यांचा प्रायोजित उपयोग यांच्यातील महत्त्वाच्या घडामोडी भौतिक विज्ञानामध्ये झाल्या. नवी प्रायोगिक माहिती आणि नवी अनुमाने या मुळे मानवी समाजाला विश्वाविषयीच्या आपल्या प्रचलित समजुतींमध्ये क्रांतिकारी बदल करावे लागले. सापेक्षतावादाच्या सिद्धांताने पारंपारिक गृहीतकारांना जोरदार धक्का दिला, वस्तुला (मॅटर) अधिक प्राधान्य मिळाले, कार्यकारणाच्या नियमांचा स्वीकार अधिक मर्यादित झाला. नव्या भौतिक विज्ञानाने धार्मिक श्रद्धांना पुष्टी मिळते या काही वैज्ञानिकांचा युक्तीवाद समर्थनिय नसला तरी त्यामुळे १९ व्या शतकात प्रचलित असलेल्या लोकप्रिय असलेल्या दूराग्रही भौतिकवादाच्या कल्पना अधिक कमजोर झाला यात शंका नाही. त्यांच्या प्रायोजित उपयोगाची समस्या अधिक कमजोर झाला यात शंका नाही. त्यांच्या प्रायोजित उपयोगाची समस्या मात्र निकडीची होती, तिच्यापासून सुटका नव्हती कारण नव्या भौतिक थेट अणू बॉम्बचा शोध लागला होता.

पहिल्या महायुद्धात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा काही उपयोग होण्यासारखा असल्याने शासन आणि नागरिकांना त्यामध्ये स्वारस्य निर्माण झाले. नंतर स्थापन झालेल्या संस्था फारसे काही कार्य करू शकल्या नसल्या तरी नॅशनल रिसर्च कॉन्सिल (१९१६) या संस्थेने युद्धोत्तर काळामध्ये शिष्यवृत्तीचे वाटप केले होते. नॅशनल ॲडव्हायजरी बोर्ड फॉर एरॉनॉटिक्स (१९१५) या संस्थेचे नंतर १९५९ मध्ये नॅशनल एरॉनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (नासा) या संस्थेमध्ये परिवर्तन झाले होते.

१९२० च्या दशकात विज्ञानाला मिळणारी खाजगी मदत सर्वाधिक होती. विविध प्रकारच्या संशोधनासाठी निरनिराळ्या प्रतिष्ठानांनी दिलेल्या अनुदानांमध्ये वाढ झाली होती. राष्ट्राध्यक्ष हर्बर्ट हूवर यांच्या प्रशासनातील वाणिज्य खात्याने औद्योगिक क्षेत्रांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले होते. अमेरिकन तंत्रज्ञानाने पाश्चात्य संस्कृतीच्या मनाला भूरला घातली होती. गणितातील अध्ययनामुळे झालेल्या क्रांतिकारी घडामोडींने अमेरिकन अमेरिकेतील भौतिक वैज्ञानिक उल्हसित झाले. अर्नेस्ट लॉरेन्स यांनी सायक्लोट्रॉनचा शोध लावल्याने भौतिक विज्ञानाला मोठ्या विज्ञानावाचक दर्जा प्राप्त झाला.

बहुतेक नवी अनुमाने युरोपियन संशोधकांनी सादर केली असली तरी रॉबर्ट ए.मिलिकन, हेरॉल्ड सी. युरे, आर्थर कॉम्प्टन, अर्नस्ट लॉरेन्स आणि रॉबर्ट वॅन डी ग्राफ इत्यादी वैज्ञानिकांनी, विशेषत: प्रायोगिक बळकटीच्या क्षेत्रामध्ये (एक्स्प्रीमेंटल व्हॅलीडेशन) महत्वाची भर घातली.

ज्या सिद्धांताच्या साहाय्याने अणुबॉम्बचा शोध लागला ते सिद्धांत सादर करण्यात अर्धा डझन देशांच्या वैज्ञानिकांचा हातभार लागला होता. साधन संपत्ती आणि अर्थ पुरवठा, व्यावहारिक ज्ञान आणि परिणामकारक संघभावनेवर आधारित कार्यपद्धती संघटित करण्याची क्षमता इत्यादीमध्ये अमेरिकेचे योगदान विशेष होते. राडार, प्रॉक्झिमिटी फ्युज फ्युज आणि अणुबॉम्ब इत्यादी शस्त्रास्त्रे युद्धापूर्व काळात लागलेल्या शोधांतूनच विकसित झाली होती. मुलभूत विज्ञान किंवा मुलभूत संशोधनाने नव्हे तर प्रायोजित तंत्रज्ञानाने दुसऱ्या महायुद्धाचे भवितव्य निश्चित केले. महायुद्धाच्या अखेरीस लागलेल्या अणुबॉम्बच्या भयप्रद शोधाने अमेरिकेची खात्री झाली की विज्ञानाने युद्ध जिंकता किंवा टाळता येईल.

### १२.२.२ वैद्यक शास्त्रातील प्रगती :

विज्ञानाच्या मदतीने हत्या करने सोपे झाले असले तरी त्याच्या साहाय्याने मानवाला दीर्घायुष्य मिळण्याची शक्यता वाढली होती. वैद्यक शास्त्रामध्ये सर्वाधिक महत्वाची कामगिरी करण्यात आली होती. १०२० ते १९६० या दशकांत ओषधांची एक नवी श्रेणी विकसित करण्यात आली, संसर्गजन्य रोगावर ती विशेष प्रभावी ठरली, अनेक पौष्टिक घटकांचा शोध लागला आणि मानसिक-शारीरिक व्याधीमधील मानसिक घटकांचे महत्त्व लक्षात येऊ लागले. कर्करोग आणि हृदयरोग यासारख्या मध्यवयीन आणि वृद्धापकाळातील व्याधींच्या उपचारात फारशी प्रगती झाली नसली तरी बहुतेक संसर्गजन्य रोग आता नियंत्रणाखाली आले.

वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे नवी उपचार पद्धती गरिबांना आणि अन्य उत्पन्नाच्या गटांना उपलब्ध करण्याची व्यावहारिक समस्या तीव्र झाली. वैद्यकीय सेवेचा सक्तीच्या विम्याचा राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांच्या प्रस्तावाला वैद्यकीय व्यवसायाच्या कर्मठ प्रवक्त्यांनी तो समाजवादी वळणाऱ्या असल्याच्या कारणाने विरोध केला होता. तथापि, खाजगी विमा योजनांमुळे आजारपणाच्या संकटांची समस्येची तीव्रता जराशी कमी झाली. अनेकांना वैद्यकीय सेवा परवडण्यासारखी नसली तरी वैद्यकीय ज्ञानातील प्रगती आणि सार्वजनिक आरोग्य खात्याच्या कार्याला लक्षणीय यश मिळाले होते. १९०० मध्ये दर हजारी मृत्यूचे प्रमाण १७.२ होते लोकांचे सरासरी वयोमान २२.९ वरून ३०.१ पर्यंत वाढले होते.

### १२.२.३ अन्य शस्त्रे :

सोव्हिएट-अमेरिकन स्पर्धेमुळे सरकारने प्रायोजित केलेल्या प्रचंड संशोधन आणि विकास कार्यक्रमाला गति मिळाली. कोरियन संघर्ष (१९५०-५३), १९५७ मध्ये रशियाने अंतराळात प्रक्षेपित केलेल्या पहिल्या स्फुटनिकने बसलेला धक्का आणि व्हिएटनामचे युद्ध (१९६४-७३) यामुळे ही स्पर्धा वेळोवेळी अधिक तीव्र होत गेली. स्फुटनिकच्या प्रक्षेपणाने बसलेला धक्का सहन ना झाल्याने १९५८ मध्ये नॅशनल डिफेन्स ॲक्ट हा कायदा करण्यात आला, त्यामुळे वैज्ञानिक शिक्षणाचा पाया अधिक दृढ होऊन नासा या संघटनेने १९६९ मध्ये चंद्रयानाचे यशस्वी प्रक्षेपण केले. त्यानंतर शीत युद्धाचा एक भाग म्हणून अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्या दरम्यानची शास्त्रांची अधिक तीव्त झाली आणि संशोधन आणि विकासाच्या अनेक संघटनांनी युद्धकालीन ऑफिस ऑफ सायंटिफिक रिसर्च फाऊंडेशन आणि नॅशनल इन्स्टिटयुट्स ऑफ हेल्थ या संघटनांची जागा घेतली.

केंद्र सरकारच्या आर्थिक मदतीने उच्च उर्जा भौतिकी विज्ञान, खगोल विज्ञान आणि जैव-औषध इत्यादी अन्य विज्ञानातील संशोधन कार्याला चालना मिळाली. त्याचे पर्यवसान १९९० च्या दशकातील हब्बल टेलिस्कोप, मानवी जिनोम रचना प्रकल्प आणि सुपरकडक्टिंग सुपरकोलायडर यामध्ये झाले. हे सर्व अतिशय भव्य होते, त्यांची नावे देखील तशीच होती. अन्य विज्ञानांप्रमाणे भौतिक विज्ञानातील देखील प्रगती होतच राहिली. १९८० च्या दशकाच्या अखेरीस जगभरात प्रकाशित झालेल्या वैज्ञानिक शोध निबंधापैकी १/३ शोध निबंध अमेरिकन वैज्ञानिकांचे होते.

**१२.२.४ अवकाश कार्यक्रम :**

१९५७ मध्ये सोव्हिएट रशियाने अवकाशात स्फुटनिक हा कृत्रिम ग्रह प्रक्षेपित केल्यावर अवकाश संशोधनामध्ये सोव्हिएट रशिया आणि अमेरिका यांच्या दरम्यान स्पर्धा सुरु झाली. हा उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करून सोव्हिएट रशियाने अमेरिकेवर आघाडी घेतली असल्याने अमेरिकेला खाली मान घालावी लागली. या उपग्रहातून अणुबॉम्ब अवकाशात नेणे सहज शक्य होते. १९५८ मध्ये अमेरिकेने पहिला एक्सप्लोअरर हा उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करता आला होता. १९६१ मध्ये सोव्हिएट रशियाने अवकाशात मानवी यान प्रक्षेपित केल्यावर अमेरिकेला परत एकदा मान खाली चालावी लागली. राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी यांनी १९६० चे दशक संपण्यापूर्वी चंद्रावर पहिला मानव पाठवून त्याला परत पृथ्वीवर आणण्याचे वचन दिले.

ऑगस्ट १९६२ मध्ये मरक्युरी प्रकल्पाचा एक भग म्हणून जॉन एच. ग्लेन या अंतराळ वीराला अवकाशात पाठवण्यात आले. १९६० च्या दशकाच्या मध्याला जेमिनी कार्यक्रमाचा एक भाग म्हणून अवकाशात दीर्घ काळ अवकाशयानात राहण्याचा मानवी शरीरावर होणारा परिणाम निश्चित केला गेला. जेमिनीफ या लॅटिन शब्दाचा अर्थ जुळे असा आहे. त्याप्रमाणे दोन अंतराळ वीरांना अवकाशात पाठवण्यात आले. या पूर्वीच्या मरक्युरी मालिकेमध्ये फक्त एकाच अंतराळ वीराला अवकाशात पाठवण्यात आले होते. नंतरच्या अपोलो अवकाशयानात त्यापेक्षा अधिक अंतराळ वीरांना अवकाशात पाठवण्यात आले होते. जेमिनी कार्यक्रमाने अनेक उच्चांक प्रस्थापित केले होते. ऑगस्ट, १९६५ मध्ये पाठवलेले अवकाशयान ८ दिवस अवकाशात राहिले होते, हा अवकाशात राहण्याचा एक उच्चांक होता. नोव्हेंबर, १९६६ मधील अवकाशयानाने पृथ्वीच्या वातावरणामध्ये आपोआप प्रवेश करून एक अन्य उच्चांक प्रस्थापित केला होता. नंतरच्या काळात अवकाशात अंतराळवीर काही वेळ अवकाश यांच्या बाहेर राहिले आणि दोन अवकाशयाने एकमेकांना जोडली गेली.

'अपोलो प्रकल्पानेफ केनेडी' यांचे उद्दिष्ट पूर्ण केले. जुलै, १९६९ मध्ये हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने निल आर्मस्ट्राँग या पहिल्या मानवाने चंद्रावर पाय ठेवले. नंतर अनेक अवकाशयाने प्रक्षेपित करण्यात आली असली तरी लवकरच अमेरिकन लोकांनी अवकाशात उपग्रह प्रक्षेपित करण्याच्या कार्यक्रमासमोर प्रश्न चिन्ह उभे केले. १९७० च्या दशकात अन्य प्राधान्यक्रम पुढे आल्याने अमेरिकेने अवकाश संशोधनाचे कार्य काहीसे कमी केले. स्कायलॅब या नावाचे फक्त एकच अवकाश यान करण्यात आले.

१९८१ मध्ये अमेरिकेने 'कोलंबियाफ' नावाचे वारंवार वापरता येईल असे असे अवकाश यान अवकाशात प्रक्षेपित केले. १९८१ ते १९८५ या काळात या बहुगुणी अवकाश याने अनेक प्रकारचे प्रयोग केले. अंतराळ वीरांनी काढलेली छायाचित्रे, अवकाशयानाची दुरुस्ती करणे इत्यादींचा समावेश होता. जानेवारी, १९८६ मधील एका दुर्घटनेत चॅलेंजरफ हे अवकाश यान प्रक्षेपित झाल्यावर ७३ सेकंदातच जाळून खाक झाले. त्यामधील सहा अंतराळवीर आणि अवकाशात प्रथमच जाणाऱ्या एका अमेरिकन शिक्षकाचा तात्काळ मृत्यू झाला. अवकाशात जाणारा हा सर्वप्रथम साधारण नागरिक होता. त्यानंतर अवकाशयानाचे प्रक्षेपण अनिश्चित काळ थांबविण्यात आले, नासा संघटनेने सुरक्षेच्या दृष्टीने अवकाश

यानाची रचना बदलली. १९८८ च्या अखेरीस डिस्कव्हरीफ हे अवकाश यान प्रक्षेपित करण्यात आले तो पर्यंत यानाच्या व्यवस्थेत आणि कॉम्प्युटर कार्यप्रणालीमध्ये ३०० पेक्षा जास्त बदल करण्यात आले होते.

**१२.२.५ संगणकीय क्रांती** :

युद्धोत्तर काळातील संगणकीय क्रांतीमध्ये अमेरिकन वैज्ञानिक आघाडीवर होते, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या संयोगाने ही क्रांती शक्य झाली. संगणकाने त्याच्या पूर्वसुरींना एक युगप्रवर्तक शक्तीचे आणि विविध प्रकारचे कार्य करणारे साधन उपलब्ध करून दिले होते. संगणकाचा सैद्धांतिक विकास ब्लैस पास्कल, चार्लस बॅब्बेज आणि विल्यम थॉम्सन या युरोपियन गणिततज्ज्ञांनी केला असला तरी अमेरिकन वैज्ञानिकांनी १९४० च्या दशकात संगणकाचे डिजिटल यंत्रामध्ये परिवर्तन केले. पहिल्या स्वयंचलित प्रचंड डिजिटल संगणकाची कल्पना हारवर्ड विद्यापीठातील हॉर्वर्ड ऐकेन यांनी १९३७ मध्ये केली, १९४४ पर्यंत हा संगणक तयार झाला. १९४३-१९४५ या काळात जे. प्रेस्पेर एकर्ट, जॉन डब्ल्यु. मौकले, हर्मन एच.गोल्डस्टाइन, आणि जॉन जी. ब्रेनर्ड या सैनिकी अधिकाऱ्यांच्या एका गटाने एनियाफ या नावाचा विविध कामे करणारा पहिला इलेक्ट्रॉनिक संगणक विकसित केला होता. या काळात एनियाक गटामध्ये जॉन वॉन न्युमान सामील झाले. या गटाने संगणकाच्या पुढील विकासासाठी आवश्यक असणारी स्टोअरर्डे प्रोग्राम, रँडम ॲक्सेस मेमरी इत्यादी मुलभूत उद्दिष्टये विकसित केली. या संकल्पनांच्या प्रायोजित उपयोगामध्ये अमेरिकन वैज्ञानिक आघाडीवर होते.

१९५१ पर्यंत एकर्ट आणि मॉकले यांनी बाजारात उठाव होईल अशा संगणकाची पहिली श्रेणी विकसित केली. संगणकाचा वेग आणि शक्ति वाढवण्यामागे अमेरिकन उद्योगांनी भूनिका प्रमुख होती. १९५० आणि १९६० च्या दशकातील सॉलिड स्टेट तंत्रज्ञान, विशेषत: ट्रांझिस्टर आणि इंटिग्रेटेड सर्किट्स मधील प्रगतीमुळे संगणकाचा आकार लहान झाला, त्यांची किंमत कमी झाली आणि त्यांची विश्वसनीयता आणि वेग प्रचंड वाढला. १९७० आणि १९८० च्या दशकांत सुक्ष्मीकरणाची ही प्रक्रिया पुढे विकसित करण्यात आल्याने संगणकाची मालिका फारच पुढे जाऊ शकली. या नया साधनांची विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची व्याप्ती आणि शक्ति वाढवली होती. खगोल विज्ञान, हवामान, विज्ञान आणि भौतिकी विज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि अन्य विज्ञानांतील प्रचंड मोठया आकड्यांची माहिती (डाटा) संग्रहित करून त्याचे अर्थबोधन करने, अवकाशातील निरीक्षणास मदत करणे, छायाचित्रे प्रक्षेपित करणे, त्यांचा आकार वाढवणे आणि कापाकाप न करता वैद्यकीय चाचण्या करणे इत्यादी कामांत संगणकांचा वापर अनिवार्य झाला.

संगणकाच्या साहाय्याने उद्योगांतील स्वयंचलिकरण, औद्योगिक रचना, व्यापारी व्यवहार, कालिटी कंट्रोल, रेल्वे आणि हवाई वाहतूक, शेअर बाजारांचे कामकाज आणि अर्थशास्त्रीय प्रारूपे तयार करणे इत्यादीसाठी संगणकांचा वाढता वापर होऊ लागला. वैयक्तिक संगणकामुळे मजकूर लिहिणे, व्हिडीओ गेम्स आणि घरगुती उपकरणे वापरता येऊ लागली.

अशा रीतीने २० व्या शतकातील दैनंदिन अमेरिकन जीवनातील क्रांती आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या दरम्यान अतूट संबंध निर्माण झाला. २० व्या शतकात वाहतूक क्षेत्रामध्ये रेल्वे ते मोटर गाडी आणि विमान असे परिवर्तन झाले. मोटर गाडयांचे प्रचंड उत्पादन आणि

हमरस्ते आणि महामार्ग बांधले गेल्याने अमेरिकन लोकांना देशभरात मोटर गाड्यातून प्रवास करणे शक्य झाले. संपर्क क्षेत्रामध्ये रेडीओ आणि दूरदर्शन यामुळे घर बसल्या बातम्या कळू शकल्या. करमणुक होत राहिली आणि २० व्या शतकाच्या अखेरीस वर्ल्ड वाइड वेब मुळे वैयक्तिक संगणकामुळे सामान्यजनांना घरबसल्या बातम्या कळू लागल्या आणि त्यांची करमणूकही होऊ लागली. २० व्या शतकात अमेरिकन शेती वैज्ञानिक पद्धतीने होऊ लागली. प्राणी आणि वनस्पती निर्माण करण्याची तंत्रे आणि उत्पत्तीविज्ञानाची सांगड घालून पीकांच्या आणि प्राण्यांच्या अधिक उत्पादन आणि प्रजनन करणाऱ्या जाती शोधून काढण्यात आल्या. या नव्या जाती ग्राहकांच्या सोयीच्या होत्या.

## १२.३ तंत्रज्ञानातील प्रगती

### १२.३.१ कृषी विकास :

औद्योगिक विकासाबरोबरच शेती हा देशाचा व्यवसाय होता. शेती व्यवसायात क्रांतीस सुरुवात झाली. शेतीची काम हातांनी करावी लागत असत. परंतु यादवी युध्दानंतर झालेल्या तत्रंज्ञानातील प्रगतीमुळे शेती व्यवसायात नवीन यंत्रांचा वापर होऊ लागला आणि व्यापारी तत्वावर शेती करण्यात येऊ लागली इ.स. १८६०-१९१० दरम्यान अमेरिकेतील शेतजमीनीचे क्षेत्र तिपटीने वाढले म्हणजेच ते २ दशलक्ष हेक्टर वरुन ६ दशलक्ष हेक्टर झाले. तर प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्र दुपटीने वाढले. इ.स. १८६० ते १८९० दरम्यान मूलभूत पिके गहू, मका, कापुस यांचे उत्पन्न पूर्वीपेक्षा अनेक पटीनी वाढले. त्याचकाळात देशाची लोकसंख्या दुपटीपेक्षा जास्त वाढली आणि शहरी भागात ती अनेक पट वाढली. परंतु त्यासाठी अमेरिकन शेतकर्याने पुरेशा प्रमाणात धान्य व कापसाचे उत्पन्न काढले. मांस खाण्यासाठी गाई व डुकराचे पालन केले आणि अतिरिक्त उत्पादन काढण्यासाठी शेतीतील कामगारांना व त्यांच्या कुटुंबियाना उबदार कपडे मिळण्यासाठी लोकरीचे उत्पादन वाढविले.

ही असामान्य उत्पादन क्षमता वाढण्यामागे पश्चिमेकडील देशांची विस्तारवादी प्रवृत्ती सुध्दा कराणीभूत होती. तसे शेतीमध्ये यंत्रांचा वापर सुध्दा कारणीभूत होता. इ.स. १८०० साली अमेरिन शेतकरी साध्या विळ्याचा साहाय्याने एक हेक्टर गव्हाच्या पीका पैकी संपूर्ण दिवसात केवळ २०... पीक कापू शकत होता. तो शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे (Cradle) ३० वर्षानी जवळजवळ ८०... गव्हाचे पिक कापू लागला. पुढे कापलेल्या पिकाची बांधणी करण्यासाठी स्वयंचलित दोर, मळणी यंत्र आणि त्याच्याही पुढे कापणी व मळणी एकाच वेळी करणारे (Reaper-thresher) यंत्र यांचा वापर शेती व्यवसायात होऊ लागला. लागवड यंत्र,कापणी यंत्र, सोलणी यंत्र (huskersand shellers) यांचाही शोध लागला. पुढे मलई विलग यंत्र, खत पेरणी यंत्र, बटाटा लागवड यंत्र, गवत सुकवणी यंत्र, अंडी उबवणी यंत्र आणि यांसारखी शेकडो शेतीसंबंधीत यंत्रे विकसित करण्यात आली.

इ.स. १८६० रोजी मोमिल लँड ग्रँट कॉलेज ॲक्ट नुसार प्रत्येक राज्याला कृषी व औद्योगिक महाविद्यालये स्थापन करण्यासाठी शासकीय जमीन देण्यात आली. यामागे शैक्षणिक संस्था स्थापनेबरोबर वैज्ञानिक शेती संशोधन करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा उद्देश होता. अमेरिकन काँग्रेसने कृषी संशोधन केंद्रे देशभर निर्माण करण्यासाठी आणि कृषी

महाविद्यालयांमध्ये संशोधन करण्यासाठी पुरेशा आर्थिक निधीची तरतूद केली. २० व्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकेमधील बरेसचे वैज्ञानिक शेती संशोधन प्रकल्पावर काम करीत होते. परंतु ज्या यांत्रिकीकरणामुळे शेतकर्यानी शेती उत्पादन वाढवले व शेतीमालाचा अतिरिक्त पुरवठा केला. त्यामुळे शेती मालाच्या किमतीमध्ये घसरण होऊन शेतकर्याच्या हाती निराशा आली.

अमेरिकन कृषी शास्त्रज्ञांपैकी मार्क कार्लटन याने रशियाच्या कृषी विभागास भेट दिली. त्या ठिकाणी त्यास आज अर्ध्यापेक्षा अधिक अमेरिकेत ज्या रबी गव्हाची लागवड केली जाते व जो अवर्षणयुक्त जमिनीतसुध्दा चांगले उत्पादन देतो त्याची माहिती मिळाली. दुसरे एक कृषी शास्त्रज्ञ मरियन डॉर्क्ट यांनी डुकरांचा कॉलरा कायमचा बरा करण्याचे औषध शोधले तर जॉर्ज मोहलर याने हुक अँड मंथ ह्या रोगास अटकाव केला. दुसऱ्या एका संशोधकाने उत्तर आफ्रिकेतून काफीर कार्न ही मक्याची जात आणली. तर दुसऱ्या एकाने तुर्कस्तानातून अल्फ्रेड हा गवती चारा आयात केला. ल्युथर बुरबँक यांने कॅलिफोर्नियामध्ये नवीन फळे व भाजी पाल्याच्या जातीची लागवड केली. विस्कॉन्सीन स्टीफन बॅबकॉक याने दुधातील मावा तपासण्याचे यंत्र विकसित केले. अल्बामा येथील टस्कजी संस्थेमधील आफ्रो अमेरिकन शास्त्रज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर याने भूईमुग, रताळे आणि सोयाबीन यांच्यापासून शेकडो वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची निर्मिती केली.

### १२.३.२ औद्योगिक विकास :

विशेषत: अमेरिकेच्या औद्योगिक विकासाची दोन ठळक वैशिष्टे सांगता येतील. त्यामध्ये एक म्हणजे मोठ्या क्षेत्रातील व्यापारी संघटनांचा विकास करुन विशाल उत्पादन तंत्राचा अवलंब केला आणि दुसरे म्हणजे अमेरिकन लोकसंख्यावाढीबरोबर उद्योगांचा विकासाचा समतोल राखला गेला. अब्रहम लिंकन यांच्या मृत्यूनंतर (इ.स.१८६५) २५ वर्षाच्या आतच अमेरिका औद्यागिक दृष्ट्या जगातील प्रथम क्रमांकाचे राष्ट्र बनले. त्यामुळे इंग्लडला ही प्रगती गाठायला जेव्हा एक शतक लागले होते तेवढे औद्यागिक उत्पादन अमेरिकने केवळ अर्धशतकातच पूर्ण केले होते.

### १२.३.३ अमेरिकेच्या औद्यागिक विकासाची कारणे :

१) रशिया सोडल्यास अमेरिकेमध्ये जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा मुबलक कच्चा माल उपलब्ध होता.

२) कच्चा मालाचे पक्व्या मालामध्ये रुपांतर करण्यासाठी नवीन शोध व तंत्र यांचा अचूक व जलद वापर.

३) विस्तारित अर्थ व्यवस्थेसाठी जल व रेल्वे वाहतुकीचे पुरेशा प्रमाणात उपलब्ध जाळे.

४) स्वदेशी व परदेशी बाजारपेठांची नियमित वाढ.

५) स्थलांतराद्वारे नियमित कामगार वर्गाची उपलब्धता आणि

६) राज्याराज्यातील जकात गुंतागुतीचा अभाव, परदेशी मालाशी स्पर्धा करण्यासाठी प्रकाशित मजदूर आणि आर्थिक सवलती.

अमेरिकन सरकारने छोट्या उद्योजकांऐवजी विशाल उद्योग उभारणीवर भर दिला. त्यामुळे १९ व्या शतकाच्या शेवटी जवळजवळ ७५... औद्यागिक उत्पादन हे विशाल उद्योग समुहाकडून केले गेले. तेल, लोह, पोलाद, तांबे, शिसे, साखर आणि कोळसा यांचे उत्पादन याच विशाल उद्योग समूहाच्या ताब्यात होते. त्यामुळै छोट्या उद्योगांना याचा फटका न बसता त्यांचा ताबा या बड्या उद्योग समूहानी घेतला व त्यांचे बाजारपेठांवर वर्चस्व निर्माण होऊन किंमत निश्चिती करण्यात येऊ लागली.

त्यामुळे स्पर्धात्मक वातावरण नष्ट होऊन नवीन अर्थव्यवस्थेचा उगम झाला. स्पर्धात्मक वातावरण नष्ट करण्यासाठी १९ व्या शतकानंतर मोठ मोठ्या उद्योगसमूहांनी एकत्र येऊन आपल्या संसाधनांचा परस्परांच्या मदतीसाठी उपयोग करुन घेतला. त्यामुळे व्यक्तिगतदृष्ट्या नफेखोरीला त्यामुळे चांगलाच आळा बसला.

अमेरिकन मालामध्ये अंतर्गत स्पर्धा पूर्णपणे नष्ट झाली. नवीन उत्पादन पध्दतीमध्ये भली मोठी भांडवल गुंतवणूक करावी लागत असल्यामुळे मोठे उद्योगसमुह संख्येने कमी होते आणि म्हणूनच किंमती निश्चित करण्यासाठी त्यांच्यामध्ये सहमती लगेच होत असे. त्यामुळे स्पर्धा निर्माण करायची झाल्यास दुसऱ्या एका मोठ्या उद्योगसमुहाची निर्मिती करणे आवश्यक होते. परंतु गुंतवणुकदार आपल्याला भविष्यातील नफा मिळण्याची खात्री मिळाल्याशिवाय नवीन उद्योगसमूहात गुंतवणूक करण्यास तयार नव्हते.

उद्योगधंद्याच्या विस्तार व विकास करणे ही तशी गुंतागुंतीची प्रकीया होती. यादवी युध्दानंतर भविष्यातील युध्दाच्या तयारीसाठी उत्पादन प्रकीयेस गती मिळाली. त्यामुळे लोह, पोलाद, जल विद्युत आणि विद्युतशक्ती यांच्या उत्पादनावर भर दिला गेला व त्यासाठी विज्ञानाचा उपयोग आणि नवीन शोध यांना चालना मिळाली. इ.स. १८६० पूर्वी अमेरिकन शासनाने ३६,००० उत्पादन अधिकार पत्र (Paूाहूे) दिले होते. परंतु पुढच्या ३० वर्षामध्ये त्यांची संख्या ४,४०,००० झाली आणि २० व्या शतकाच्या पहिल्या २५ वर्षात त्यांची संख्या दहा लाखांच्याही वर गेली. काही प्रमुख उद्योगातील प्रगती पुढीलप्रमाणे:

### १) पोलाद उद्योग :

देशाची सर्वात महत्वाचा लोह-पोलाद उद्योग उच्च जकात लागू करुन संरक्षित करण्यात आला. देशातील पोलादाच्या उत्पादनावर इतर उद्योगांतील बदलसुध्दा अवलंबून असल्यामुळे त्याचे उत्पादन पुरेसे होणे आवश्यक होते. रेल्वेच्या जाळ्याने दळणवळण अधिक सुकर झाल्याने रेल्वे, यंत्र, मोटारी आणि इतर साहित्यासाठी पोलादाची मागणी वाढली. मिशिगन आणि मिनेसोटा येथून सर्वात जास्त कच्चा माल पुरवठा केला जात होता. त्यामुळे पोलाद उद्योजकांनी पोलादाच्या वेगवेगळ्या सुट्या भांगाचे उत्पादन सुरु केले.

पोलाद उत्पादनवाढीसाठी ॲन्ड्र्यू कार्नेजी यांचे योगदान मोलाचे आहे. आपल्या लाहनपणी स्कटलंडमधून अमेरिकेत आला होता आणि सूत गिरणीत काम करुन नंतर टेलीग्राफ कार्यालयात त्याने नोकरी केली. त्यानंतर त्यांनी पेनसिल्वानियातील रेल्वेबांधणीमध्ये काम केले. परंतु त्यांनी अत्यंत दूरदृष्टीने उद्योगामध्ये गुंतवणूक केली होती व इ.स. १८६५ मध्ये त्याने पोलाद उद्योगावर चांगलाच जम बसवला. त्यांनी पुढे पुल बांधणी, रेल्वे बांधणी आणि रेल्वेइंजिनबांधणी करणाऱ्या उद्योगांचे भाग खरेदी केले. त्यानंतर दहा वर्षानी

munotes.in

पेनसिल्वानियातील मोनोंगाहेला नदीजवळ त्यांनी देशातील सर्वात मोठा पोलाद कारखाना उभारला. त्यामुळे इतरही अनेक सहउद्योजकांना प्रेरणा मिळून अमेरिकेने औद्यागिक उत्पादन क्षेत्रात मोलाची प्रगती केली.

नवीन उद्योजकांनी कार्नेजीला एक स्पर्धा निर्माण केली व त्यानेही पूर्वीपेक्षाही मोठे कारखाने उभारणीकडे लक्ष दिले खरे परंतु त्यानंतर एक मोठ्या सर्व समावेशक उद्योगसमूहाने विलीनीकरणासाठी त्याचा पाठपुरावा केला व अनेक उद्योगाचे एकत्र विलीनीकरण झाले. पोलाद महामंडळ पुढे ३० वर्षे चालू होते. परंतु अतिउत्पादनामुळे पोलादाच्या किंमती कमी होऊन नफासुध्दा कमी होण्याची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे महामडंळातील उद्योजक फुटून जाऊ नयेत म्हणून उत्पादन व बाजारपेठ या दोहोंवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात येऊ लागले.

**२) तेलउद्योग :**

अमेरिकेतील औद्यागिक विकासाचे दुसरे उदाहरण म्हणजे तेलाचे उत्पादन व त्याच्या शुध्दीकरणाचे कारखाने होत. सुरुवातीच्या काळात या उद्योगावर लहान सहान उद्योजक काम करीत होते. परंतु इ.स १८६२ मध्ये जॉन डी. रॉकफेलर यांच्या आगमनाने या उद्योगावर दूरगामी परिणाम झाले. त्याने यंत्रचालकाची नोकरी सोडून तेलशुध्दीकरण कारखान्यावर आपले लक्ष केंद्रीत केले. त्याने उत्पादनाची सर्वात कार्यक्षम पध्दतीचा वापर केला व त्या क्षेत्रातील इतर उद्योजकांशी हातमिळवणी करुन तेल उद्योगावर आपली मक्तेदारी स्थापन केली. त्यांनी तेलाच्या किंमती उतरवून आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना दुर केले.

इ.स. १८७० मध्ये रॉकफेलर व त्याच्या सहकार्यांनी ओहिवो येथे स्टॅन्डर्ड ऑईल कंपनी स्थापन केली आणि क्लिव्हलॅन्ड भागामध्ये तेलशुध्दीकरण क्षेत्रात आपली मक्तेदारी निर्माण केली. पुढे त्याने आंतरराष्ट्रीय तेल उद्योजकांबरोबर सहकार्याचे करार केले आणि इ.स. १८८० मध्ये अमेरिकेतील जवळजवळ ९०... तेल उद्योगावर नियंत्रण प्रस्थापित केले. इ.स १८८२ मध्ये त्याने महामंडळाचे भाग नियंत्रणासाठी नऊ विश्वस्तांचे एक विश्वस्तमंडळ तयार केले व उद्योग क्षेत्रात एक नवीन संकल्पना आणली. त्यानंतर या विश्वस्तमंडळाने रेल्वेमार्ग, लोह-पोलाद, तांब्याच्या खाणी, सार्वजनिक उपयुक्तता व इतर अनेक उद्योगांवर मालकी हक्क मिळविले.

**३) विद्युत उत्पादन :**

अमेरिकन उद्योगक्षेत्रातील दुसरा एक उद्योग म्हणजे विद्युत उत्पादन होय. ही विद्यूत प्रकाश, ऊर्जा आणि संदेशवहन या क्षेत्रांसाठी वापरात होती. वीजेचा वापर प्रकाश देण्यासाठी १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच केला जात असला तरीही तिचा सार्वत्रिक वापर इ.स. १८७९ पासुनच होऊ लागला. कारण थॉमस अल्वा एडिसन याने समाधानकारक व उच्च तापमानला टिकणारा असा सुक्ष्मतंतूचा शोध लावला. इ.स. १८८२ मध्ये प्रकाश, ऊर्जा मिळवताना विद्यूत प्रवाह पुरवठा करण्यासाठी न्युयार्क शहरामध्ये एडिसन इलेक्ट्रीक कंपनीने विद्यूत केंद्र उभारले इ.स. १८८७ मध्ये रिचमंड याने दळणवळणासाठी वीजेचा वापर सुरु केला व पहिल्या विद्युत मोटारीची निर्मिती केली. दूरध्वनी आणि तारायंत्र

यासाठी सुध्दा विजेचा वापर केला जाऊ लागला. बहुतेक विद्युत उपकरणे एडिसन विद्युत कंपनी बनविली जात होते. पुढे त्या कंपनीचे रुपांतर सर्वसामान्य विद्युत उपकरणे कंपनीमध्ये झाले.

**४) रेल्वे उद्योगाचे जाळे:**

अमेरिकेतील उद्योगक्षेत्राला रेल्वेमार्गाच्या जाळ्यांनी चालना मिळाली. इ.स. १८८४ मध्ये रेल्वेमार्गानी आंतरखंडीय जाळे निर्माण करुन अटलांटिक व प@सिफीक महासागराना जोडले गेले होते. या रेल्वेमार्गाच्या जाळ्याने शेतकर्यास त्यांची अवजारे पोहचविली जात आणि त्यांचा शेतीमाल पूर्वेकडील शहरांच्या बाजारपेठेत पोहचविला जात असे. तसेच त्यांची जीवंत जनावरे शिकागो शहरात नेली जाऊ लागली. मांसाच्या शीतपेट्या न्यूयार्क आणि फिलाडेल्फीया शहरामध्ये पोहचविल्या गेल्या.

## १२.३.४ इतर उद्योग:

वरील उद्योगधंद्याप्रमाणेच अनेक यंत्रांचा शोध कृषी विकासासाठी लावण्यात आला. शीतकरण आणि खाद्यान्न हवाबंद करण्याच्या तंत्रज्ञानामुळे तर लोकांच्या आहाराच्या सवयी बदलून गेल्या. इ.स. १८४४ मध्ये विद्यूत तारायंत्रामुळे व्यापार व्यवसायात विलक्षण वाढ झाली त्यानंतर १८६७ मध्ये छपाई यंत्र, इ.स. १८७६ मध्ये दुरध्वनी , इ.स. १८८८ मध्ये बेरीज यंत्र आणि इ.स. १८९७ मध्ये रोकड नोंदी यांच्या शोध लागल्याने व्यापार व्यवसायात विलक्षण वाढ झाली. पुढे एकातासात २,४०,००० वर्तमानपत्रांची पाने मुडीत करता येऊ लागली. ध्वनीयंत्र किंवा बोलणारी यंत्र थॉमस एडीसनाने तयार केले व पुढे जॉर्ज इस्टमन यांच्या बरोबर विकसित करुन चलत चित्र निर्मिती केली गेली. त्यामुळेच सवच क्षेत्रामध्ये नवनवीन शोध लागले गेले आणि त्यांचे प्रत्यक्ष जीवनात आणि व्यवहारात उपयोजन केले जाऊ लागले.

इ.स. १८७५ नंतर मांस बंद करुन त्याचे निर्यात करण्याचे उद्योग फार मोठया प्रमाणात निर्माण झाले आणि ते शिकागो शहरातच अधिक प्रमाणात केंद्रीत झालेले होत. त्याबरोबर पीठ गिरणी, पेय तयार करणे, शेती उपयुक्त यंत्राची निर्मिती आणि लाकडाच्या वखारीसुध्दा उद्योगात मोडू लागल्या. दक्षिण अमेरिकेत तर सुत गिरण्यांनी बाजीच मारली आणि नव दक्षिण जॉर्जिया आणि अलाबामा या राज्यांचे सूतगिरण्या म्हणजे एक वैशिष्ट्यच बनले. इ.स. १९०० पर्यंत अमेरिकेतील जवळजवळ २५... सूत गिरण्या दक्षिणेतच केंद्रीत झाल्या व इंग्लडंबरोबर स्पर्धा करु लागल्या.

**आपली प्रगती तपासा:**

१) तेल उद्योगाचा विकास यावर भाष्य करा.

२) अमेरिकेमध्ये वीज उत्पादन कसे केले जाई?

३) २० व्या शतकातील दोन अमेरिकन नोबेल पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञांची नावे सांगा.

४) इ. स. १९५८ मध्ये अमेरिकेने अवकाशात सोडलेल्या उपग्रहाचे नाव काय होते?

## १२.४ समारोप

२० व्या शतकादरम्यान आणि आधुनिक काळापर्यत अमेरिकेने विज्ञानाच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र अवकाश विज्ञान, संगणक शास्त्र इ. क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली. अमेरिकन शास्त्रज्ञांचा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय वैज्ञानिक योगादनाबद्दल नोबेल पुरस्कार देऊन गौरव करण्यात आाला. वैज्ञानिक प्रगतीच्या बरोबरीनेच अमेरिकेने तंत्रज्ञानाचा क्षेत्रातही मोलाचे शोध लावले व अमेरिकन व एकंदरीतच जागतिक जीवनमानात तत्रंज्ञानाचा उपयोग केला. तसेच याच तत्रंज्ञानाला उद्योगांच्या विकासासाठी उपयोगात आणले व औद्योगिक उत्पादनात विलक्षण प्रगती केली. या सर्वामुळे अमेरिकन जीवनात आमुलाग्र बदल घडून आलेले आपणांस दिसून येतात.

## १२.५ प्रश्न

१) अमेरिकेतील वैज्ञानिक प्रगतीच्या आढावा घ्या.

२) अमेरिकेने कोणकोणत्या क्षेत्रात तंत्रज्ञानात्मक प्रगती केली? विश्लेषण करा.

३) थोडक्यात टीपा लिहा.

अ) वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती.

ब) अवकाश कार्यक्रम

क) शेती व तंत्रज्ञान

ड) रेल्वेचे जाळे

❖❖❖❖

# १३

# अमेरिकेचे परराष्ट्र धोरण : पहिले महायुद्ध

**घटक रचना :**


१३.० उद्दिष्ट्ये

१३.१ प्रस्तावना

१३.२ साम्राज्यवादाची वाढ

१३.३ अमेरिकन विस्तारवाद

१३.४ थिओडोर रुझवेल्ट यांचे धोरण

१३.५ राष्टाध्यक्ष वुड्रो विल्सन यांचे परराष्ट्र धोरण

१३.६ अमेरिकेचा पहिल्या महायुद्धात प्रवेश

१३.७ पॅरिस शांतता परिषद

१३.८ समारोप

१३.९ प्रश्न


## १३.० उद्दिष्ट्ये

- अमेरिकन विस्तारवादाचा अभ्यास करणे.
- अमेरिकेची युध्द्प्रवेश पूर्व तयारी समजून घेणे.
- राष्ट्राध्यक्ष विल्सन यांच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणे.
- पॅरिस शांतता परिषदेमधील अमेरिकेची भूमिका समजून घेणे.

## १३.१ प्रस्तावना

अमेरिकेने गृहयुध्दानंतर आपले लक्ष अंतर्गत विकासावर अधिक केंद्रित केले होते व त्या मानाने परराष्ट्र संबंधांवर कमी केले होते. परंतु १९ व्या शतकाच्या शेवटी तिला ही अलिप्तता सोडणे भाग पडले. इ.स. १८९० च्या दशकात अमेरिकेने 'लॅटिन अमेरिका आणि पूर्व आशिया' यांच्या कारभारामध्ये लक्ष घातले आणि जागतिक सत्ता म्हणून मान्यता मिळण्याच्या दृष्टिने संबंध निर्माण केले. संपूर्ण अलिप्त राहणे तिला शक्य झाले नाही. त्यामुळे जागतिक घडामोडींचा अमेरिकन जीवनमानावर परिणाम होणे क्रमप्राप्त होते. परंतु बहुतेक

munotes.in

अमेरिकन जनतेला हे जागतिक राजकारणात अमेरिकेचे लुडबूड करणे पसंत नव्हते. त्यांच्या मते, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष व त्यांचे सेक्रेटरी यांनी केलेल्या घोडचूकांमुळेच सरसकट अमेरिकन जनतेच्या जीवनमानावर त्याचा परिणाम होतो. परंतु पाश्चिमात्य जगातील आर्थिक बदलसुध्दा अलिप्तता धोरण सोडून देण्यास तेवढेच जबाबदार होते. तंत्रज्ञानातील प्रगतीने सर्व जग जवळ येत होते आणि जगातील राष्ट्रांचे एकमेकांवर अवलंबित्व सतत वाढत होते. त्यामुळेच अमेरिकेने अलिप्तता धोरणाचा त्याग करणे म्हणजे जागतिक एकीकरणाच्या दिशेने ते टाकलेले एक पाऊल होते. तसेच कोणताही देश अधिक काळ जागतिक राजकारणापासून अलिप्त राहू शकत नव्हता.

## १३.२ साम्राज्यवादाची वाढ

१९ व्या शतकाच्या शेवटी जगातील, विशेषतः पाश्चिमात्य औद्योगिकदृष्ट्या विकसित राष्ट्रांना परकीय बाजारपेठांची नितांत आवश्यकता होती. उदयोजकांना आपल्या देशात उपलब्ध नसलेला कच्चा माल, देशात तयार झालेल्या मालास ग्रहक आणि अतिरिक्त भांडवल गुंतवणुकीसाठी संधी यांची गरज होती. इंग्लड, फ्रांस, जर्मनी आणि इतर विकसित राष्ट्रांनी आपल्या वसाहतींवर कडक नियंत्रण केले आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये वसाहती निर्माण करण्याची स्पर्धा लागली. इंग्लडने भारतावर नियंत्रण मिळवले आणि तिच्या इतरही वसाहती असल्यामुळे शर्यतीमध्ये इंग्लड सर्वात पुढे होती. इ.स. १८८० ते १९०० या दरम्यान आफ्रिकेच्या वाटणीबाबत (प्रभाव क्षेत्रांविषयी) इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी यांच्यामध्ये तिहेरी शत्रुत्व निर्माण झाले. ही स्पर्धा अधिक तीव्र झाल्यावर युध्द टाळणे अशक्य होऊ लागले आणि शेवटी युरोप खंडाची विभागणी दोन शत्रूगटांत झाली. जर्मनीच्या गटामध्ये ऑस्ट्रिया, हंगेरी तर दुसर्या बाजूला इंग्लंड, फ्रांस आणि रशिया असे दोन गट निर्माण झाले.

अशा परिस्थितीमध्ये अमेरिकेला आपली सुरक्षितता पूर्वीपेक्षा कमी झाल्याचे वाटू लागले आणि त्यामुळे तिला आपले अलिप्ततावादी धोरण सोडून द्यावे लागले. संपूर्ण १९ व्या शतकामध्ये नाविक शक्तीवर विशेषतः अटलांटिक समुद्रावर इंग्लंडचेच वर्चस्व राहिले होते. पॅसिफीक समुद्रावर अजून नियंत्रण नव्हते. परंतु साम्राज्यवादी राष्ट्रांच्या जीवघेण्या स्पर्धेमुळे सर्वत्र युरोप खंडामध्ये युध्दाचे ढग तयार झाले आणि इ.स. १९१० च्या दशकात अमेरिकन जनता त्यामुळे अधिकच विचलीत झाली. कारण जर्मनी आणि जपानच्या सामर्थ्यांने सत्ता संतुलनास भितीदायक परिस्थिती निर्माण झाली.

## १३.३ अमेरिकन विस्तारवाद

अशा परिस्थितीमध्ये अमेरिकन प्रवृत्तीसुध्दा साम्राज्यवादाकडे झूकू लागली. अमेरिकन उदयोगास नवीन बाजारपेठांची आवश्यकता भासू लागली व अतिरिक्त भांडवलांची त्यांनी कॅनडा, मेक्सिको आणि क्यूबा यांसारख्या शेजारील देशांमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. अमेरिकन साम्राज्य निर्माण करण्याची कल्पना सामाजिक डार्विनवादी आणि रुडयार्ड किपलींसारख्या युरोपियन साम्राज्यवादी लेखकांनी उचलून धरली व अमेरिकेने जागतिक स्तरावर नेतृत्व करावे असे सुचविले. त्यामुळे १९ व्या शतकाच्या शेवटी झालेला अमेरिकन साम्राज्यविस्तार हा आर्थिक घटकांपेक्षा संरक्षणात्मक योजना ध्यानात ठेवून केलेला होता.

आल्फ्रेड टी. महान यांच्या लिखाणामुळे आणि त्यांच्या इ.स. १८९० च्या 'इतिहासावर सामुद्रीक सामर्थ्यांचा परिणाम' या पुस्तकाच्या प्रभावामुळे अमेरिकेने आपल्या नाविक सामर्थ्यावर भर दिला. इ.स. १८८० च्या दशकात अमेरिकन नाविक दल मोठया प्रमाणात वाढले व त्याचे आधुनिकीकरण केले गेले. इ.स. १८९० च्या नौदल कायदयाद्वारे हे स्पष्ट करण्यात आले की, अमेरिकन नौदल आता बचावात्मक धोरण सोडून आता आक्रमक धोरणासाठी सज्ज झाले आहे. यापुढे अमेरिकन परराष्ट्र धोरणावर प्रमुख प्रभाव सामरिक सज्जतेवर राहील अशी भूमिका घेतली गेली.

इ.स. १८६७ रोजी अमेरिकन सेक्रेटरी सीवर्ड यांनी अलास्का हे बेट २,००,००० डॉलर्सना खरेदी करण्यासाठी रशियाबरोबर तहाची बोलणी केली. त्याचवेळी त्यांनी मधली बेटेही आपल्या प्रभावात विलीन केली. इ.स. १८७८ च्या समोआ तहानुसार अमेरिकेने पॅगो पॅगो येथे नाविक तळ उभारला. इ.स. १८८७ मध्ये तिने हवाई बेटांवरील पर्लहार्बर नाविक तळ उभारण्यासाठी हक्क मिळविले. इ.स. १८८९ मध्ये वॉशिंग्टन येथे बृहद् अमेरिकन परिषद भरविली. त्याद्वारे बृहद्-अमेरिकन संघटनेची स्थापना होऊन ती संकल्पना व माहितीचे माहेरघर बनली. इ.स. १८९५ मध्ये व्हेनेझुएला आणि गिनी या ब्रिटीश वसाहतीमध्ये सीमावाद उद्भवला. त्यामुळे मन्रो सिध्दांताचा हवाला देऊन अमेरिकन सेक्रेटरीने एक चिथावणीखोर निवेदन दिले की, अमेरिकन खंडावर अमेरिकेची सार्वभौम सत्ता असून येथील प्रजेवर आमचाच कायदा लागू आहे. स्पॅनिश युध्दामध्ये विजय मिळाल्यानंतर शांतता तह झाला आणि अमेरिकेस क्यूबा, फिलीपाईन्स, प्युर्टो रिको आणि गुआम हे पॅसिफिक महासागरातील छोटे बेट यांचा ताबा मिळाला.

### १३.३.१ अमेरिकेचे 'मुक्तद्वार' धोरण आणि चीन :

अमेरिकेचे चीनमधील मुक्तद्वार धोरण हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख तत्व होते. अनेक युरोपियन देशांच्या प्रभावक्षेत्राखाली चीनचे वाटे होण्यापेक्षा सर्व देशांना सारख्या प्रमाणात व्यापारीदृष्टया चीनमध्ये मुक्तसंचार मिळावा अशी प्रमुख भूमिका यामागे होती. या धोरणानेच केवळ अमेरिकन नागरिक व व्यापारी यांना चीनमध्ये व चीनी बाजारपेठांमध्ये खात्रीशीर प्रवेश मिळत होता. दुसरे म्हणजे चीनचे स्वातंत्र्यसुध्दा त्यामुळे राहणार होते. तरीसुध्दा कोणतीही युरोपिय सत्ता (इंग्लंडसह) हे मुक्तद्वार धोरण स्विकारण्यास तयार नव्हती. दुसरे असे की, चीन जरी युरोपिय सत्तांमध्ये विभागला गेलेला नसला तरी तो अमेरिकेच्या प्रभावामुळे नव्हता. कारण एकटी अमेरिकाच फक्त चीनचे सार्वभौमत्व व स्वातंत्र्य अबाधित राखण्यास समर्थ नव्हती. ती फारशी पूर्व आशियामध्ये रस दाखवू इच्छित नव्हती. अशाप्रकारे मुक्तद्वार धोरण हे जरी उदात्त असले तरी त्यास अनेक देशांचा पाठिंबा नव्हता.

## १३.४ राष्ट्राध्यक्ष थिओडोर रुPवेल्ट यांचे धोरण

इ.स. १९०१ मध्ये रुझवेल्ट अमेरिकेचे अध्यक्ष झाले. त्यांचे धोरण (परराष्ट्र) हे समर्थ व सशस्त्र लढाईवर भर देणारे होते. पनामा कालवा बांधण्याचे काम त्यांच्या या धोरणाचा उत्तम भाग आहे व त्यातून त्यांचे आक्रमक परराष्ट्र धोरण प्रतिबिंबित होते.

## १३.४.१ अमेरिका आणि पनामा कालवा :

स्पेनबरोबरच्या युध्दाने अमेरिकेस अधिक सुरक्षा केंद्रित बनवले.त्या पनामा कालव्याची आवश्यकता सर्व अमेरिकन जनतेला वाटत होती. कारण अमेरिकेस एवाहाना दोन नौदले उभारावी लागली असती व त्यातील एक अटलांटीक आणि दुसरे पॅसिफिक महासागरात तैनात करावे लागले असते. इ.स. १९०३ मध्ये हे-हॅरन तहानुसार कालव्याचा एक भाग वार्षिक २,५०,००० डॉलर्सवर कोलंबियास भाडयाने देण्यास अमेरिका तयार झाली होती. परंतु कोलंबियन सिनेटरने त्यास नकार दिला. अशा परिस्थितीत अमेरिकेस नवीन करार करणे किंवा कालव्यास बांधण्यासाठी पर्याय शोधणे आवश्यक होते. यापैकी रुझवेल्ट यांनी काहीच केले नाही. याउलट त्यांनी पनामी जनतेला ते कोलंबियापासून स्वतंत्र होणार असल्यास त्यांना अमेरिका पाठिंबा देईल अशी चिथावणी दिली. त्यामुळे पनामाने आपले स्वतंत्र प्रजासत्ताक घोषित केल्यावर अमेरिकेने ताबडतोब त्यास मान्यता दिली. तसेच अमेरिकन युध्द्नौका कोलंबियास पनामावर पुन्हा आपला कब्जा रोखण्यासाठी रवाना करण्यात आली. अमेरिकेने मग कालव्याच्या भाडयासाठी पनामाबरोबर कराराही करुन टाकला. दरम्यान कालव्याचे बांधकाम सुरु झाले आणि इ.स. १९१४ मध्ये प्रथमच त्यातून जहाज वाहतूक सुरु झाली.

## १३.४.२ 'मन्रो सिध्दांताला' पर्याय 'रुझवेल्ट उपसिध्दांत' :

पनामा कालव्याच्या निर्मितीमुळे अमेरिकेस कॅरीबियन समुद्रावर नियंत्रण ठेवणे आणि त्या परिसरात शत्रूराष्ट्रांना कोणतेही सैनिकी तळ उभारण्यापासून रोखणेसुध्दा अत्यंत आवश्यक झाले. त्यामुळेच इ.स. १९०४ मध्ये मन्रो सिध्दांताचाच एक उपसिध्दांत रुझवेल्ट यांनी जाहिर केला आणि त्याला रुझवेल्ट उपसिध्दांत (Roosevelt Corollary) असे नाव मिळाले. बहुतेक छोटे-छोटे कॅरीबियन आणि मध्य अमेरिकन प्रजासत्ताक देश यांवर हुकुमशहांचे शासन होते आणि त्यामुळेच त्या देशांत सतत क्रांती व उठाव चालू असायचे व त्यामुळे परदेशी नागरीकांचे जीवन धोक्यात येत होते. युरोपियन कर्जदात्यांनी दिलेले कर्ज ते व्यवस्थितपणे फेडू शकत नव्हते. अशा परिस्थितीत युरोपियन देशांनी तेथील नागरिहक्कांचे संरक्षण करण्यासाठी लष्करी वापर करुन हस्तक्षेप करण्याचा दावा केला. शेवटचा उपाय म्हणून आंतरराष्ट्रीय कायदयाने त्यास मान्यताही मिळाली. परंतु त्यामध्ये एक छुपा धोका असा होता की, नागरीहक्कांचे संरक्षण करण्याच्या सबबीखाली हीच राष्ट्रे तेथील प्रदेशावर कब्जा करण्याची शक्यता होती किंवा तेथील राजकीय सत्तेवर नियंत्रण करणार होती.हा धोका टाळण्यासाठी रुझवेल्ट यांनी असे ठरविले की, जेव्हा कधी हस्तक्षेप करावा लागेल तो केवळ अमेरिकाच करील. यालाच 'रुझवेल्टचा उपसिध्दांत' म्हणतात. परंतु बहुतेक लॅटिन अमेरिकन राष्ट्रांनी रुझवेल्ट यांच्या या सिध्दांताविरुध्द तीव्र प्रतिक्रीया नोंदविली. त्यांच्या मते, इतर युरोपियन देशांपेक्षा अमेरिकाच जास्त धोकेदायक होती. इ.स. १९०३ मध्ये लुई ड्रॅगो या अर्जेन्टीनाच्या परराष्ट्र मंत्र्यांने असे स्पष्ट केले की, कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप हा सार्वभौम राज्याच्या अधिकारांचे उल्लंघन आहे. पुढच्या पिढीतील लॅटिन अमेरिकन जनतेमध्ये अशी भावना पसरली की, अमेरिकेने हा उपसिध्दांत साम्राज्यवादी दृष्टीकोनातून सादर केला असून तो फक्त लष्करी प्रतिकारानेच थांबविला जाऊ शकतो.

हा 'रुझवेल्ट उपसिध्दांत' सर्वप्रथम डॉमिनिकन प्रजासत्ताकाने कर्जफेड न केल्यामुळे तेथील आर्थिक नियंत्रणावर अमेरिकेने हस्तक्षेप करुन अंमलात आणला. त्यामुळे परदेशी कर्ज कमी करण्यात आले व ते युरोपियन ऐवजी अमेरिकेकडे हस्तांतरीत केले गेले. अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी कर जमा केला आणि त्याची अर्धे कर्ज आणि अर्धे सरकारला अशी विभागणी केली. इ.स. १९०९ मध्ये क्रांतीकारी चळवळींच्या गोंधळामुळे तेथे अमेरिकन फौजा पाठविल्या गेल्या.

### १३.४.३ राष्ट्राध्यक्ष तापोंत (Taft) व परराष्ट्र धोरण (डॉलर नीती) :

इ.स. १९०९ मध्ये अध्यक्षपदी आलेल्या तापोंत आणि त्यांचे राज्यसचिव नॉक्स यांना ही पध्दती डॉमिनिकनपासून इतरही देशात राबवायची होती. त्यामुळे अमेरिकेची सामाईक आणि आर्थिक हितसंबंध जोपासले जावून कॅरीबियन देशांत सुव्यवस्था आणि विकासाला चालना मिळणार होती. म्हणूनच त्यांनी तेथे अमेरिकन गुंतवणुकीस चालना दिली. त्यास 'डॉलर नीती' असे म्हटले जाते. परंतु तापोंत यांना तेवढे मुत्सद्दीपणे ते जमत नव्हते. इ.स. १९११ मध्ये अमेरिकन अर्थपुरवठादारांनी निकाराग्वा देशाचे आर्थिक नियंत्रण मिळविले व इ.स. १९१२ मध्ये तेथील उठाव दडपण्यासाठी अमेरिकन लष्करही तेथे दाखल झाले व पुढील २५ वर्षे तेथे राहून तेथील सरकारशी चांगले संबंध विकसित केले. तरीही बहुतेक निकाराग्वा नागरीकांनी या धोरणाचा निषेध केलेला होता व स्वातंत्र्याची मागणी करीत होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) रुझवेल्ट उपसिध्दांत म्हणजे काय?

२) अमेरिकन विस्तारवादावर थोडक्यात टिप लिहा.

## १३.५ राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांचे परराष्ट्र धोरण

राष्ट्राध्यक्ष विल्सन साम्राज्यवादाचे कट्टर विरोधक होते. अमेरिका अन्य देशांची एक इंच भूमि काबीज करणार नाही आणि तिचे परराष्ट्रीय धोरण भौतिक हितसंबंधावर आधारित असणार नाही हे त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र उदात्त विचार व्यक्त करुनही त्यांच्या कार्यकालात परदेशात अमेरिकेने जे हस्तक्षेप केले त्यांची संख्या रुझवेल्ट आणि टॅफ्ट यांनी केलेल्या हस्तक्षेपाच्या एकूण संख्येपेक्षा जास्त होती. पहिल्या महायुध्दाच्या अखेरीस निकाराग्वा, हैती, डोमिनिकन प्रजासत्ताक आणि क्युबा या ४ नाममात्र स्वतंत्र देशावर अमेरिकेचे नियंत्रण होते. या काळात कॅरिबियन प्रदेशात सर्वाधिक आर्थिक गुंतवणूक झाली. महायुध्दानंतर मात्र अमेरिकेने हस्तक्षेपाच्या धोरणाचा त्याग करुन लॅटिन अमेरिकेतील शेजारी देशांशी नव्याने संबंध स्थापन करण्याचा प्रयन्त केला. नवे धोरण बलप्रयोगापेक्षा सहाकार्यावर आधारित होते.

### १३.५.१ मेक्सिकोमधील राज्यक्रांती :

अमेरिकेचा निकटचा शेजारी देश मेक्सिकोची समस्या अधिक गुंतागुंतीची होती. पोर्फिरिओ डियाझ १८७६ ते १९११ या काळात मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष होते. परकीय भांडवलाच्या गंतवणुकीस प्रोत्साहन देण्याचे त्यांचे मुख्य धोरण होते. सुमारे १०५० कोटी डॉलरची

परकीय गुंतवणूक रेल्वेमार्ग, सार्वजनिक सुविधा, मळे, खाणी आणि कच्च्या तेलाच्या विहिरीत करण्यात आली होती. त्यापैकी सुमारे २/५ गुंतवणूक अमेरिकन नागरिकांनी केली होती. पश्चिम गोलार्धातीला महान मुत्सद्दी म्हणून त्यांना नावाजण्यात आले असले तरी त्यांच्या धोरणाचा फायदा फक्त छोटया उच्च वर्गालाच झाला होता. सामान्य जनतेच्या प्रक्षोभाचा उद्रेक शेवटी क्रांतीमध्ये झाला, या क्रांतीचे तेथील समाजावर दूरगामी परिणाम झाले असते. १९११ मध्ये डियाझ यांना हद्दपार करुन त्यांच्या जागी फ्रान्सिस्को मडेरा यांची राष्ट्राध्यक्षपदी नियुक्ती झाली होती. नव्या राष्ट्राध्यक्षांना परकीय भांडवलाविषयी फारशी आपुलकी नव्हती. अनेक अमेरिकन व्यवसायिकांना तेथे क्रांती व्हावी असे वाटत होते आणि ती क्रांती घडवून आणण्यात मेक्सिकोमधील अमेरिकन प्रतिनिधी हेन्री लेन विल्सन यांनी मदत केली होती. फेब्रुवारी, १९१३ मध्ये मडेराना पदच्युत करुन लवकरच त्यांची हत्या करण्यात आली.

विल्सन अधिकारपदी आले तेव्हा मेक्सिकोमध्ये यादवी युध्द सुरु झाले होते. मेक्सिकन जनतेला त्यांचे भवितव्य स्वतःच निश्चित करण्याची संधी मिळाली पाहिजे असा त्यांचा निश्चय होता. मेक्सिकोमधील परिस्थितीवर बारीक नजर ठेवण्याचे सबुरीचे धोरण त्यांनी अवलंबले. १९१४ मध्ये एक जर्मन जहाज व्हेरा क्रुझ या मेक्सिकोतील बंदराच्या दिशेने निघाले. त्याच सुमारास त्यांनी मेक्सिकोच्या समस्येवर विचारविनिमय करण्यासाठी भरवलेल्या एका परिषदेला लॅटिन अमेरिकेतील आघाडीचे नेते हजर होते.

### १३.५.२ युरोपमध्ये युध्दास सुरुवात :

ऑगस्ट १९१४ रोजी जेव्हा युरोपमध्ये युध्दास सुरुवात झाली तेव्हा बहुसंख्य अमेरिकन जनता युध्दापासून अलिप्त राहू इच्छित होती. जवळ जवळ तीन वर्षांपर्यंत अमेरिका युध्दापासून अलिप्तच राहिली. पण त्यानंतर अमेरिकेची भूमिका बदलत गेली कारण अमेरिकेची इंग्लंड व फ्रांसबरोबर भावनिक व आर्थिक नाळ जोडली गेली होती. तसेच वुड्रो विल्सन यांच्या अलिप्त तत्वांचे जर्मनीने उल्लंघन केलेले होते. त्यामुळे हळूहळू अमेरिकन जनता मानसिकदृष्ट्या युध्दात सामील होण्याचा विचार करु लागली.

### १३.५.३ पहिल्या जागतिक महायुध्दाबाबत अमेरिकेची प्रतिक्रीया :-

युरोपात युध्दास तोंड फुटल्यानंतर अध्यक्ष विल्सन यांनी असे जाहिर केले की, अमेरिका विचार व कृती या दोन्हींबाबत युध्दापासून अलिप्त राहील. बहुसंख्य जनतेने त्यांच्या या भूमिकेला पाठिंबा दिला. कारण युध्दभूमी व अमेरिका यांच्या दरम्यान ३००० मैलांचा समुद्र होता. विल्सन यांच्या भूमिकेचा अनेक अमेरिकनांनी जरी पुरस्कार केलेला असला तरी वैचारिक दृष्टया ते काहिसे कठीण होते. अमेरिका व इंग्लंड यांच्यामध्ये आर्थिकदृष्टया घनिष्ठ संबंध होते. बरेचसे अमेरिकन हे वांशिक दृष्टया (विल्सन स्वतःसुध्दा) ब्रिटनशी संबंधित होते व त्यामुळे भावनिक नाते होते. ऑगस्ट १९१४ च्या सुरुवातीला विल्सन यांनी आपल्या मेव्हण्याजवळ अशी भावना व्यक्त केली की जर लष्करवादी जर्मनी विजयी झाल्यास सर्व जगासच धोका निर्माण होईल. असंख्य अमेरिकन लोक इंग्लंडमध्ये राहत होते. अमेरिकन इतिहास व संस्थांचा वारसा इंग्लंडकडून मिळाल्याचे अमेरिकन पाठयपुस्तकांमध्ये नमूद केलेले होते. इंग्रजी भाषा ही चॉसर, शेक्सपीअर, डिकीन्स आणि

किंग जेम्स यांची बायबलची आवृत्ती यांबाबत अमेरिका व इंग्लंड यांच्यामध्ये एक समान भावनिक सूत्र होते. त्यामुळे ब्रिटीश सरकारने अमेरिका-ब्रिटीश संबंधाचा प्रचार सुरु केला.

परंतु सर्वच अमेरिकन जनता काही ब्रिटीश मूळाशी संबंधित नव्हती. त्यातील लक्षावधी जनता जर्मनीशी संबंधित होती व त्यामुळेच त्यांची जर्मनीशी सहानभूती होती. आयरिश-अमेरिकनांना जर्मनी जिंकल्यास ब्रिटनपासून आर्यलंडला स्वातंत्र्य मिळेल असे वाटत होते. काही स्कँडीनेव्हियन-अमेरिकनसुध्दा इंग्लंडपेक्षा जर्मनीशी अधिक सहानुभूती ठेवून होते.

वरील प्रमाणेच काही वेगवेगळे सांस्कृतिक प्रवाह अमेरिकन मुददयांविषयक भूमिकेवर आपला प्रभाव पाडीत होते. परंतु सुरुवातीस अलिप्ततेच्या धोरणापासून ते दूर जाऊ शकत नव्हते. त्यामुळे सर्व अमेरिकन जनतेस आणि प्रमुख्याने विल्सन प्रशासनास अमेरिकेस युध्दापासून शक्यतो अलिप्त ठेवणे हेच महत्वाचे होते.

### **१३.५.४ अलिप्ततेचे धोके :**

इ.स. १९१४ मध्ये युध्दापासून अलिप्त भूमिका ठेवणारी अमेरिका इ.स. १९१७ मध्ये जनतेच्या पाठींब्याने युध्दामध्ये सक्रीय सहभागी होण्यामागे काय कारणे होती?

सर्वात प्रथम विल्सन यांची अलिप्ततावादी मते ही अमेरिकन राजकीय व आर्थिक मूल्यांवर आधारित होती. त्यांची स्वतःची आंतरराष्ट्रीय व्यवस्थेविषयीची मते ही उदारमतवाद लोकशाही आणि स्वातंत्र्य यांनी प्रभावित होती. कारण जर्मनी सारख्या साम्राज्यवादी देशात अमेरिकन भांडवलशाही वाढण्यास ही परिस्थिती योग्य नव्हती. त्याहीपुढे विल्सन यांना अशी खात्री झाली की युध्दोत्तर वाटाघाटींमध्ये अमेरिकेच्या सहभागाशिवाय दोस्त राष्ट्रांचा विजय झाला तरी उदारमतवादी व लोकशाही शांतता शक्य होणार नाही. अमेरिकेस जर शांततेची घडवणूक करायची असेल तर अमेरिकेने युध्दामध्ये दोस्तांना मदत करणे आवश्यक आहे.

विल्सन यांच्या या वैश्विक दृष्टिकोनामुळे अमेरिका युध्दविषयक सहभागाबाबत द्विधा मनस्थितीत आली. त्यामध्ये अलिप्त राष्ट्रांच्या हक्कांचे काय असा मुख्य प्रवाह होता.युध्दास प्रारंभ झाल्याच्या थोडयाच दिवसात अमेरिकेचे जर्मनीला जाणारे मालवाहू जहाज इंग्लंडने मध्येच अडवून ठेवले कारण त्यामुळे जर्मनीच्या युध्दप्रयत्नांना मदत मिळणार होती. परंतु विल्सन यांनी त्याचा निषेध केला होता.

नोव्हेंबर १९१४ मध्ये जेव्हा इंग्लंडने उत्तर समुद्र विभाग युध्द क्षेत्र म्हणून घोषित केला आणि त्या क्षेत्रात स्फोटके पेरुन ठेवली तेव्हा विल्सन यांनी इंग्लंडचा तीव्र निषेध केला. जर्मनीची अंतर्गत आयात (समुद्रमार्गे) उदा. खादयान्न, इंग्लंड जर्मनीला नमवू पाहात होती. मार्च १९१५ मध्ये इंग्लंडने सर्व जर्मन बंदराची नाकेबंदी केली. तेव्हासुध्दा अमेरिकेने व्यर्थ निषेध व्यक्त केला. अमेरिकन जनमत दुखावले गेले असले तरी इंग्लंड आपले सर्व नाविक बळ पणाला लावून त्याचा सर्वंकष उपयोग करु पाहत होती.

परंतु अमेरिकेच्या अलिप्तता तत्वांचा उल्लंघन करणारी इंग्लंड नव्हती तर जर्मनी होती व त्यामुळेच युध्दात उतरावे लागले. ब्रिटनचे नाविक बळ बलाढय असले तरी जर्मनीचे पाणबुडयांच्यामार्फत सागरावर वर्चस्व होते. फेब्रुवारी १९१५ मध्ये बर्लिनने जाहीर केले

की इंग्लंडच्या सागरी प्रभावाभोवतालचे क्षेत्र हे युध्दक्षेत्र असून अलिप्त राष्ट्रांसह सर्व राष्ट्रांच्या जहाजांना त्याची ताकीद दिली. तेव्हा सुध्दा विल्सन यांनी निषेध केला. त्याचवेळी त्यांनी असे जाहिर केले की, अमेरिकन जहाजांच्या किंवा मानवी हानीस जर्मनीस जबाबदार धरले जाईल. पुढील काही महिन्यांत जर्ननीच्या 'यु' बोटींनी इंग्लंडची जहाजे व अमेरिकन टॅन्कर बुडविले. त्यामुळे अनेक अमेरिकन मृत्यूमुखी पडले.

१ मे १९१५ रोजी अमेरिकन वर्तमानपत्रात एक छोटीशी घोषणा प्रकाशित झाली. त्यामध्ये जर्मन दूतावासाने अमेरिकन जनतेस ब्रिटीश किंवा फ्रेंच जहाजांमधून प्रवास न करण्याची खबरदारी घेण्यास सांगितले होते. पुढील सहा दिवसांनी जर्मन 'यु' बोटींनी इशारा न देता लुसिटानिया नावाचे जहाज आर्यलँडच्या किनाऱ्यावर बुडविले आणि ११९८ लोकांना जलसमाधी मिळाली. त्यामध्ये १२८ अमेरिकन नागरिकांचा समावेश होता. वर्तमानपत्रांनी या बातमीस ठळक अक्षरांत मुखपृष्ठांवर छापले आणि क्षणातच अमेरिकन जनमत जर्मन-विरोधी बनले. पुढे असे उजेडात आले की, लुसिटानिया जहाजामध्ये इंग्लंडला दारुगोळा व युध्दसाहित्य नेण्यात येत होते.

विल्सन यांनी सदर घटनेनंतर जर्मनीला कडक सूचना दिल्या आणि विनाअट हे पाणबुडी-युध्द बंद करण्यास सांगितले. त्यानंतर काही दिवसांनी लष्करी वापर न करता अलिप्त तत्वांना मान्यता देण्यासाठी पाठपुरावा करण्यास सांगितले. परंतु लुसिटानिया दुर्घटनेनंतर अमेरिकन जनमत दुभंगले. त्यापैकी काही जणांच्या मते, जर्मनीबरोबर युध्द आवश्यक झाले आहे तर काहींनी उपरोधिकपणे विल्सनच्या भाषणबाजीवर ताशेरे आढले. नोबेल पुरस्कार विजेते अध्यक्ष थिओडोर रुझवेल्ट हे युध्दाचे ढोलच बडवित होते आणि विल्सन यांच्या कमकुवत व भित्रेपणाबदद्ल टिका करीत होते. युध्दतयारी करणाऱ्या संघटनांनी उदा. अर्थसंस्था व उदयोजक यांनी तर राष्ट्रीय सुरक्षा संघाची बैठक बोलविली आणि देशभक्तीचा प्रचार केला. तसेच शस्त्रसज्जता आणि सार्वत्रिक लष्करी प्रशिक्षणास प्रोत्साहन दिले. राष्ट्रीय सुरक्षा संघाने 'युध्दसज्जता' कवायती (न्यूयॉर्कमध्ये) सुरु केल्या. इ.स. १९१५ च्या शेवटी विल्सनने स्वतः लष्करी सज्जतेविषयी तयारी करण्यास घेतली.

जर्मन-अमेरिकन व विल्सन यांच्या अलिप्तता युक्त भाषणांनी प्रभावित झालेल्या शांतीवादी लाखो गटांनी युध्द करण्याकडे संमती दर्शविली. काही प्रसिध्द स्त्रिवादी व सामाजिक न्याय सुधारकांनी असा इशारा दिला की, या लष्करी युध्दाने सर्व मानवी मूल्ये पायदळी तुडवली आहेत. जेम्स ॲडम्स यांनी सांगितले की, बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्यासाठी आंतरराष्ट्रीय चळवळ ही या युध्दामुळे विखुरली गेली आहे. विल्सन यांच्या प्रशासनामध्येच या मतभेदांनी गंभीर स्वरुप धारण केले होते. लुसिटानिया दुर्घटनेचा अंत्यत कडक इशाऱ्याने विल्सन यांनी केलेला निषेध हा अलिप्त तत्वाचे उल्लंघन करणारा वाटल्याने त्यांचे प्रशासनिक सचिव ब्रियान यांनी जून १९१५ मध्ये राजीनामा दिला. त्यांच्या जागी आलेल्या रॉबर्ट लासिंग यांनी विल्सन यांनी स्वतःच्या मतांप्रमाणेच काम करावे अशी भूमिका घेतली.

काही अलिप्तता तत्वज्ञांनी असे मानले की, जर युध्दादरम्यान अमेरिकन नागरीक युध्दग्रस्त क्षेत्रातून प्रवास करु लागले तर लुसिटानिया सारख्या घटना घडणे अनिवार्य आहे. इ.स. १९१६ च्या सुरुवातीस एका काँग्रेस सदस्य व सिनेटर यांनी अशा प्रवासास बंदी

घालण्याचा ठराव मांडला जो 'गोर-मॅक्लीमोर ठराव' म्हणून प्रसिध्द आहे तो ठराव विल्सन यांनीच कडक विरोध केल्यामुळे पारित होऊ शकला नाही.

काही वेळ विल्सन यांची भूमिका प्रत्यक्ष रुप धारण करीत होती. त्याचवेळी जर्मनीने विल्सन यांच्या लुसिटानिया निषेधास औपचारिक उत्तर दिले नाही. परंतु गुप्तपणे 'यु' बोटींना प्रवासी जहाजांवर हल्ला न करण्याचे आदेश दिले आणि लुसिटानिया दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या अमेरिकन नागरिकांना नुकसान भरपाई देण्याचे कबूल केले. ऑगस्ट १९१५ मध्ये जेव्हा 'यु' बोटींनी पुन्हा एका ब्रिटीश प्रवासी जहाजावर हल्ला करुन आदेश उल्लंघन केले तेव्हा दोन अमरिकी प्रवाशांचा मृत्यू झाला. जर्मनीने अशा घटनांची पुनरावृत्ती न होण्याचे आश्वासन दिले. मार्च १९१६ मध्ये जर्मन पाणबुडीने 'ससेक्स' हे फ्रेंच प्रवासी जहाज इंग्लिश खाडीमध्ये बुडविले आणि अनेक अमेरिकन प्रवासी जखमी झाले हे पुन्हा एकदा जर्मन आश्वासनाचे उल्लंघन झाले. त्यामुळे विल्सन यांनी जर्मनीस परराष्ट्र संबंध तोडण्याची धमकी दिली. त्यासाठी पुन्हा जर्मनीने पूर्वईशाऱ्याशिवाय व्यापारी जहाजांवर हल्ला न करण्याची प्रतिज्ञा केली पण अमेरिकेने इंग्लंडला आंतरराष्ट्रीय कायदयाचे पालन करण्यास भाग पाडावे असेही सांगितले विल्सन यांनी अमेरिकेच्या मागण्या जर्मनीने स्विकारल्याचे जाहिर केले व पुढे इ.स. १९१६ मध्ये या अलिप्त तत्वाचे बर्यापैकी पालन झाले.

अलिप्त तत्वाच्या अर्थाविषयी वादविवाद चालू होता. कारण अमेरिका युध्दग्रस्त राष्ट्रांना आर्थिक मदत करीतच होती. युध्दास प्ररंभ झाल्यानंतर ताबडतोब अर्थपुरवठा बँक जे.पी. मॉर्गन यांनी फ्रांसला आर्थिक कर्ज देण्याची परवानगी मागितली तेव्हा अमेरिकेचे राज्य सचिव ब्रियान यांनी त्यांची विनंती नाकारली व हे अलिप्ततेच्या तत्वात बसणारे नाही असे सांगितले. परंतु ही आर्थिक मदत लुसिटानिया दुर्घटनेनंतर मात्र कायम राहिली. ऑगस्ट १९१५ मध्ये ट्रेझरी सचिव (कोष सचिव) विल्यम जी. मॅकअडू यांनी विल्सन यांना गंभीर इशारा दिला. कारण आपली भरभराट राखण्यासाठी आपणांस दोस्त राष्ट्रांना मदत करणे गरजेचे आहे.

अशा वादग्रस्तमतांनी गोधंळलेल्या विल्सन यांचा दृष्टिकोन दोस्त राष्ट्रांशी व्यक्तिगत दृष्टया सहानूभूतीचा होता. त्यामुळे विल्सन यांनी मॉर्गन बँकेस ब्रिटन व फ्रांस सरकारला ५०० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज देण्याची परवानगी दिली. एप्रिल १९१७ पर्यंत अमेरिकन बँकांनी दोस्त राष्ट्रांना २.३ अब्ज डॉलर्स तर त्याउलट जर्मनीस केवळ २७ दशलक्ष डॉलर्स आर्थिक मदत केली होती. तसेच जर्मन राष्ट्रांशी अमेरिकेचा व्यापार कमी होऊन दोस्त राष्ट्रांशी तो फारच कमी वाढला होता. इ.स. १९१४-१७ दरम्यान तो चारपट झाला होता. त्यामुळे अमेरिकेच्या बाजारपेठेवर त्यांचे अवलंबित्व अधिकाधिक वाढले होते. आतापर्यंत अमेरिका युध्दापासून अलिप्त राहिल्यामुळे विलसन यांनी दोस्त राष्ट्रांच्या गरजांचा पुरेपूर फायदा उठवून अमेरिकेचा व्यापार वाढवून जागतिक अर्थव्यवस्थेत अमेरिकेची आर्थिक बाजू बळकट बनविली.

इ.स. १९१६ च्या निवडणुकांमध्ये वुड्रो विल्सन थोडयाफार मतांच्या फरकाने विजयी झाले व दुसऱ्यांदा अध्यक्ष बनले.

## १३.६ अमेरिकेचा पहिल्या महायुध्दात प्रवेश

इ.स. १९१७ च्या सुरुवातीला जर्मनीने पुन्हा पाणबुडी युध्द सुरु केले. तशातच इ.स. १९१४ पासून जर्मनीमध्ये अंतर्गत वाद विवाद चालू होता. त्यामध्ये जर्मनीचे चान्सलर थिओबाल्ड वोन बेथमन होलवेग यांना अमेरिका युध्दापासून अलिप्त राहील एवढया पुरताच 'यु' बोटींचा वापर करावा असे मत होते तर उच्च लष्करी अधिकाऱ्यांना सदर बोटींचा अधिकाधिक वापर करावा असे वाटते होते. त्यामुळे जर्मनीचा विजय जवळ आलेला असतानाच चान्सलर बोथमन यांचे स्थान अस्थिर होऊ लागले. एवढेच नव्हे तर ज्यावेळी अमेरिकेने युध्दात सहभागी झाल्याची घोषणा केली त्यावेळी उच्च लष्करी अधिकाऱ्यांनी असा वाद घातला की, आपल्या 'यु' बोटीच आपल्याला अमेरिकन सैन्य युध्दभूमीवर येण्या अगोदरच विजय मिळवून देतील. त्यांच्या मते, अमेरिकेच्या औपचारिक युध्दघोषणेत काही अर्थ नाही. एक जर्मन नौदल अधिकाऱ्याने पुढे जाऊन अमेरिकेच्या घोषणेचा परिणाम केवळ 'शून्य, शून्य आणि शून्य' आहे असे म्हटले.

त्यामुळे जर्मन लष्करी अधिकाऱ्यांच्या म्हणण्याप्रमाणे ९ जानेवारी १९१७ रोजी 'यु' बोटींचा अमर्याद वापर सुरु झाला आणि शेवटी अमेरिकेचा महायुध्दात प्रवेश निश्चित झाला. आता युध्द अतिशय गतिमान झाले व पाणतीर लढाऊ बोटींनी आपले लक्ष्य जलद गतीने साधण्यास सुरुवात केली व तशी घोषणा जर्मनीने ३१ जानेवारीस केली. त्यानंतर तीन दिवसांनी विल्सन यांनी जर्मनीबरोबर परराष्ट्र संबंध तोडले. फेब्रुवारी ते मार्च दरम्यान जर्मनीच्या 'यु' बोटींच्या हल्यांना पाच अमेरिकन जहाजे बळी पडली. २४ फेब्रुवारी रोजी ब्रिटीश गुप्हेरांच्या मार्फत अमेरिकेस जर्मनीची एक गुप्तपणे पाठविलेली तार माहिती झाली. ती तार जर्मनीचे परराष्ट्र सचिव आल्फ्रेड झिम्मरमन यांनी मेक्सिकोमधील जर्मन राजदूतास पाठविली होती. त्या तारेमध्ये असे लिहिले होते की, अमेरिका जर्मनीविरुध्द युध्दात उतरल्यास जर्मनी, मेक्सिको आणि जपान यांच्यात लष्कारी करार होईल. तसेच मेक्सिकोला त्यांचे टेक्सास, ॲरिझोना आणि नवीन मेक्सिको हे गमावलेले प्रदेश पुन्हा बहाल केले जातील. त्यानंतर रशियामध्ये क्रांती होऊन त्झारची सत्ता नष्ट झाली व त्याच्या जागी रशियन रिपब्लिक स्थापन झाले. त्यामुळे अमेरिकेचा असा ग्रह झाला की, सर्व दोस्त राष्ट्रे संविधानात्मक लोकशाहीसाठीच युध्द करीत आहेत. परंतु नोव्हेंबर १९१७ पर्यंत अमेरिकेचा हा ग्रह दूर झाला. कारण बोल्शेविकांनी पुन्हा रशियात सत्ता हस्तगत केली.

२ एप्रिल १९१७ रोजी विल्सनने युध्दाच्या घोषणेला मान्यता देण्यासाठी काँग्रेसला आवाहन केले. खूप वादंग माजला कारण सिनेटर रॉबर्ड फॉलीट व्हिस्कान्सिन यांनी विरोधी भाषण दिले.सिनेटमध्ये ८२ विरुध्द ६ मते तर हाऊसमध्ये ३७३ विरुध्द ५० अशी मते पडली. त्याच्यामध्ये अमेरिकेस युध्दात उतरण्यासाठी प्रमुख्याने तीन घटक कारणीभूत झाले - १. अमेरिकन जहाजांवर जर्मनीचे हल्ले; २. दोस्त राष्ट्रांना मदतीच्या स्वरुपात अमेरिकेने केलेली गुंतवणूक आणि ३. अमेरिकेचे दोस्त राष्ट्रांबरोबर असलेले सांस्कृतिक संबंध विशेषतः इंग्लंडबरोबरचे.

### १३.६.१ अमेरिकेत युध्दभरती तर फ्रांसच्या भूमीवर लढाई -

इतर युरोपियन राष्ट्रांपेक्षा अमेरिका हया युध्दाशी थोडी कमीच संबंधित होती. कारण इतर देश गेल्या चार वर्षापासून (१९१४) युध्द लढत होते आणि अमेरिका केवळ ९ महिन्यांपासून त्यांच्या लष्कराचे ७०% नुकसान झाले होते तर अमेरिकेचे केवळ ८ % फ्रांसला तर त्याचा जबर फटका बसला होता परंतु अमेरिकेला अजून स्पर्शही झाला नव्हता. एवढे जरी असले तरी अमेरिकन इतिहासात हे युध्द एक कलाटणी देणारे ठरले. त्याने लाखो अमेरिकन सैन्याचे जीवन बदलले व दूरगामी बदल झाले. अमेरिकन सैन्य पश्चिम सीमेवर लढत असताना धारातीर्थी पडत होते तर इकडे प्रशासन व अर्थव्यवस्था आमूलाग्र बदलातून जात होते.

### १३.६.२ लष्कर उभारणी :

युध्दाची घोषणा अमेरिकेने एप्रिल १९१७ मध्ये केली. तेव्हा अमेरिकन सैन्य तयार नव्हते. सैन्यामध्ये १,२०,००० पुरुष, त्यातील फार थोडयांना युध्दाचा अनुभव होता. तसेच ८०००० तरुणांचा नुकताच नव्याने भरणा झाला होता. केवळ दोन दिवस पुरेल एवढाच दारुगोळा अमेरिकेकडे होता. तर युध्द खाते हे तर आपसात लढणारे नोकरशहांचे वारुळ होते. लष्कर उभारणे आणि युध्दाचा आदेश लागू करणे हे युध्द खात्यास फार मोठे आव्हान होते. चाणाक्ष लष्कर प्रमुख पीटन मार्श यांनी युध्दाचा आदेश लागू करण्याची आणि विल्सन यांचे युध्द सचिव यांनी लष्करी भरतीची जबाबदारी स्विकारली. क्लिव्हलँडचा महापौर बेकर हा कुशल प्रशासक नव्हता परंतु त्यांचे सार्वजनिक संबंध फार जवळचे होते. त्यातच १८ मे १९१७ रोजीला सिलेक्टीव्ह सर्व्हिस ॲक्ट अन्वये २१-३० वयोगटातील (पुढे त्याचा विस्तार १८-४५ असा केला) तरुणांनी लष्करात ताबडतोब भरती होण्यास अनिवार्य केले गेले.

नोव्हेंबर १९१८ पर्यंत २४ दशलक्षांपेक्षा अधिक अमेरिकन तरुणांनी लष्करासाठी नोंदणी केली. त्यापैकी ३ दशलक्ष केवळ स्वयंसेवक होते तर नॅशनल गार्डमध्ये ४.३ दशलक्ष झाले. अमेरिकेचे नौदल सचिव जोसेफस डॅनियल्स यांनी नौदलातर्फे पहिल्या महायुध्दात ११००० स्त्री नौदल अधिकाऱ्यांना लढविले आणि हजारोंना पाणबुडयांसाठी उपयोगात आणले. त्या स्त्रियांनी नर्स, कारकून आणि टेलिफोन ऑपरेटर म्हणून काम केले. युध्द खात्याच्या मूळ योजनेमध्ये अनेक महिने लष्करी प्रशिक्षणाची गरज होती परंतु अशा परिस्थितीत केवळ काही हप्त्यांच्या प्रशिक्षणानंतर लगेचच फ्रांसच्या भूमीवर त्या तरुणांना लढाईस पाठविले गेले.

### १३.६.३ युध्दासाठी आर्थिक तरतूदी :

युध्दाच्या तयारीसाठी केवळ लष्कर भरती व तयारी केली नाही तर त्यासाठी आर्थिक संघटनसुध्दा केले. युध्दाअगोदर सुधारक वर्ग अर्थव्यवस्थेवर सरकारच्या यंत्रणासाठी भांडत होते परंतु युध्दासाठी तयारी करायची असल्याने त्यांनी तो नाद आता सोडला. इ.स. १९१६ मध्ये कॉंग्रेसने राष्ट्रीय सुरक्षा परिषद म्हणून सल्लागार समिती सरकारची युध्दतयारी पाहण्यासाठी नेमली होती. इ.स. १९१७ मध्ये या परिषदेने युध्दउदयोग संघ स्थापन केला आणि त्यांच्याकडे लष्करी साधने, शस्त्रास्त्रे, दारुगोळा पुरेशा प्रमाणात तयार

आहे किंवा नाही पाहण्याची जबाबदारी सोपविली. मार्च १९१८ पर्यंत हा युध्दउदयोग संघ काहिसा कमकुवत झाला होता म्हणून विल्सन यांनी त्याचे पुनर्संघटन केले आणि त्याचा प्रमुख म्हणून बर्नार्ड बरुच यांना नेमले.

बरुच यांच्या देखरेखीखाली काही महिने युध्द उदयोग क्षेत्रावर विलक्षण नियंत्रण ठेवले. कच्चा माल पुरविण्याबरोबरच संघाने उत्पादनास प्रधान्य दिले आणि सर्व काही कार्यक्षमरीत्या पार पाडले. ज्या कंपन्या पोलाद, रब्बर आणि इतर दुर्मिळ वस्तूंच्या काटकसरी वापरासाठी प्रक्रीया प्रमाणित व समन्वयित करीत असताना बाजारात स्पर्धा करीत होते त्यांना युध्दउदयोग संघाने उत्पादनासाठी प्रेत्साहन दिले.

दुसरी युध्दकालीन योजना म्हणून मार्च १९१८ रोजी केंद्रीय कायदा म्हणून सूर्यप्रकाशाचा (दिवसाचा) जास्त उपयोग करुन काम करण्याचे ठरले. बरुच यांच्याप्रमाणेच कृषी संघाचे प्रमुख हर्बर्ट हुवर हे होते. ते खाण अभियंता म्हणून आशियामध्ये नावारुपाला आले होते. जेव्हा विल्सन यांनी त्यांना पुन्हा वा@शिंग्टनला आणले तेव्हा ते बेल्जियम येथे खादयान्न समस्या सोडवित होते. ऑगस्ट १९१७ मध्ये निर्माण केलेल्या खादयान्न प्रशासन विभागाने धान्यांचे वाटप उदा. गहू, मांस, आणि साखर योग्य होते किंवा नाही यावर बारीक लक्ष ठेवले. कारण ते जादा किंवा त्यांचा तुटवडा होऊ नये ही भूमिका त्यामागे होती.

युध्दकालीन उदयोग मंडळ आणि खादयान्न प्रशासनाने केवळ नमुना म्हणून ते सादर केलेले होते. युध्दकाळात जवळजवळ ५००० सरकारी संस्थांनी गृहोदयोगाबाबत पर्यवेक्षण केले. मे १९१८ च्या ओवरमॅन ॲक्टमुळे अध्यक्ष विल्सन यांना केंद्रिय संस्थांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार मिळाले. त्यामध्ये इंधन मंडळ, राष्ट्रीय युध्दश्रमिक मंडळ इ. चा समावेश होता. इ.स. १९१७-१८ च्या बर्फाळ हंगामामध्ये युरोपात रेल्वेद्वारे मदत पाठविण्यामध्ये अडचणी आल्या तेव्हा सरकारने स्वतःच ते ताब्यात घेतले. त्यानंतर काही महिन्यातच विल्यम जी. मॅकअडू यांच्या नियंत्रणाखाली रेल्वेमार्ग प्रशासनाने ४ लाख मैलांच्या मार्गावर मालकी असलेल्या तीन हजार कंपन्यांचे रुपांतर कार्यक्षम अशा राष्ट्रीय परिवहन पध्दतीमध्ये केले.

प्रगतीवादी सुधारकांच्या टीकेचे लक्ष्य झालेल्या अमेरिकन आयोगाने आपली प्रतिमा सुधारण्यासाठी युध्दकालीन परिस्थितीचा उपयोग करण्याचे ठरविले. खाजगी उदयोजक वॉशिंग्टनमध्ये सल्लागार म्हणून मोठया प्रमाणात स्थायिक झाले. मालकांनी आपल्या कामगारांना युध्दपूर्व परिस्थितीची जाणीव करुन दिली. कामगार संघटनांनी राष्ट्रीय उत्पन्न युध्दकाळात वाढण्यासाठी कामगारांचे केंद्रीकरण केले. औदयोगिक सहकार्याला प्रेत्साहन दिले गेले. जवळ जवळ २०० खाजगी उदयोगांनी आपले विलिनीकरण करुन सरकारला मदत करण्याचे ठरविले. हा प्रयोग युध्द समाप्तीनंतर लगेच फसल्यासारखा वाटला. परंतु त्यांचा प्रभाव अजूनही दिसून येत होता. खाजगी उदयोगांचे विलीनीकरण आणि युध्दकालीन समन्वय यामुळे अमेरिकन उदयोगाच्या भविष्यावर चांगलेच परिणाम झाले. जेव्हा इ.स. १९३० च्या दशकात जेव्हा देशाला महामंदीसारख्या समस्यांना सामोरे जावे लागले त्याचे मूळ पहिल्या महायुध्दकालीन परिस्थितीमधून दिसून आले.

### १३.६.४ युध्दप्रयत्नांचा प्रचार :

अध्यक्ष विल्सन यांना अमेरिकन युध्द हे फ्रांसच्या युध्दाएवढेच महत्वाचे वाटत होते. त्यांना माहित होते की अनेक अमेरिकन लोक युध्दाच्या बाजूने नाहीत. त्या लोकांनी युध्दाबाबत अनेक विरोधाभासी मते नोंदविली असली तरी नवव्यवस्था जगात प्रस्थापित करण्यासाठी विल्सन यांच्या प्रयत्नांना त्यांचा सामुदायिक पाठिंबा असल्याचे दिसून येत होते. या अंतर्गत विरोधकांचा समाचार घेण्यासाठी जनतेपर्यंत युध्दप्रयत्नांचे न्यायिक समर्थन प्रभाविपणे करण्यासाठी विल्सन यांनी जनसंपर्क व जाहिरात क्षेत्रात तज्ञ असणाऱ्या व्यक्तिचा प्रचारासाठी वापर केला. त्यामध्ये कोष सचिव विल्यम गिब्स मॅकअडू यांचा समावेश होता. युध्दासाठी कोणत्याही प्रकारे अर्थपुरवठा कमी पडता कामा नये हयासाठी विल्यम गिब्स यांनी प्रयन्त केले. आपल्या अस्तित्वात आल्याच्या पहिल्या शतकामध्ये अमेरिकेने जेवढा पैसा खर्च केला नसेल त्याच्यापेक्षा जास्त खर्च पहिले महायुध्द आणि दोस्त राष्ट्रांना कर्ज यासाठी अमेरिकेस करावा लागला होता व त्याचा आकडा ३५.५ अब्ज डॉलर्सवर गेला होता. त्यातील २/३ रक्कम ही सरकारी रोखे (लिबर्टी कर्ज) यांद्वारे गिब्स यांनी उभारली होती. त्यामुळे राष्ट्रीय कर्ज इ.स. १९१४ च्या १ अब्ज डॉलर्सवरुन जवळजवळ इ.स. १९१९ मध्ये २७ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहचले होते. उरलेला १/३ युध्दखर्च हा उच्च कर उत्पन्नामुळे अमेरिकेन जनतेच्या खिशातून केलेला होता. काँग्रेसला युध्दकालीन उच्चकर लादण्याचा अधिकार मिळाल्यामुळे तिने उच्च उत्पन्न गटांवर जवळजवळ ६३% पर्यंत उत्पन्न कर लावला. त्यामध्ये युध्द नफा कर, जकात कर आणि मालमत्ता कर यांचाही उपयोग उत्पन्न वाढण्यामध्ये झाला.

प्रगतीशील सुधारक आिाण् पत्रकार जॉर्ज क्रील 'सार्वजनिक माहिती समिती' या युध्दकालीन परिणामकारक प्रचार संस्थेचे प्रमुख होते. तिची स्थापना एप्रिल १९१७ मध्ये झाली होती आणि तिने प्रचार समिती म्हणूनच युध्दकाळात काम पाहिल्याचे दिसून आले.

### १३.६.५ बुध्दिवंत, संस्कृतीक रक्षक आणि सुधारक यांचा युध्दप्रयत्नांस पाठिंबा :

देशातील शिक्षक, लेखक, धार्मिक नेते आणि वृत्तसंपादक या सर्वांनी अमेरिकेच्या युध्द प्रयत्नांना भरघोस पाठिंबा दिला. या संस्कृती-रक्षकांच्या मते मूल्ये व प्रमाण यांचे धोक्यापासून संरक्षण करण्यासाठी युध्दामध्ये अमेरिकेने जिंकणे आवश्यक होते. इतिहासाकारांनी जर्मनीची लष्करी प्रतिमा मलिन होईल आणि दोस्त राष्ट्रांची ध्येये-उदिद्ष्टये सफल होऊन त्यांना विजय मिळेल याबाबत वृत्तपत्रांत व नियतकालिकांत निबंध व लेख लिहिले. ज्या प्रगतीशील सुधारकांनी विल्सन यांच्या अंतर्गत सुधारणांची वाहवा केली होती ते आता मात्र युध्दप्रयत्नांना सुध्दा पाठिंबा देऊ लागले. त्यांचा विरोध मावळला व युध्दासाठी सरकारचे सक्रीय प्रयन्त आणि त्यातून निर्माण होणारे सार्वत्रिक कल्याण यामुळे पुढे अधिक सुधारणांना चालना मिळेल असे त्यांचे मत तयार झाले.

### १३.६.६ युध्दकालीन असहिष्णुता आणि उन्माद :

युध्दकालीन प्रचारामुळे अनेक अमेरिकन लोक जर्मन विरोधी बनले. एवढेच नव्हे तर जे जे काही जर्मन राष्ट्राशी संबंधित असेल त्याचा द्वेष करुन ते नष्ट करु लागले आणि आपल्या प्रखर देशभक्तीचे प्रदर्शन करु लागले. जर्मनीच्या घातापाती कारवाया न्यू जर्सी येथील शस्त्रगारात विस्फोट यांसारख्या कृत्यांनी तर जर्मन द्वेषांची अमेरिकन जनतेमध्ये परिसीमा गाठली.

**१३.६.७ युध्दप्रयत्न विरोधक :**

एवढे ज्वलंत युध्द प्रयत्न व प्रचार सुरु असला तरी अमेरिकेमधील काही जनतेने युध्दप्रयत्नास पाठींबा देण्यास नकार दिला. त्यातील काही जण जर्मन-अमेरिकन होते व अजूनही आपल्या आठवणी त्यांच्याजवळ होत्या. दुसरे काही जण धार्मिकदृष्टया शांतीवादी होते. उदा. क्वेकर्स, मेन्नोनीटस् आणि ऐतिहासिकदृष्टया शांतीवाद चर्चचे सदस्य इ.

समाजवादी पक्षाचे नेते उदा. युजीन वी.डेब्स आणि व्हिक्टर बर्गर यांनी राजकीय पार्श्वभूमीवर युध्दप्रयत्नांस नकार दिला. त्यांनी या युध्दाची संभावना भांडवलदारांमधील स्पर्धा अशी केली. ज्यामध्ये दोन्ही पक्षांकडील सैन्य जागतिक बाजारपेठांवर कब्जा करण्यासाठी लढत आहेत. तसेच त्यांच्या मते, इंग्लंड आणि फ्रांसला वॉल स्ट्रीटने दिलेल्या कर्जाची वसुली भविष्यात व्हावी म्हणून केलेले प्रयत्न होते.

**१३.६.७ कायदयाने अंतर्गत अशांतता नष्ट :**

युध्दकालीन जर्मनविरोधी असहिष्णुता व तिरस्कार सुरु झाल्यामुळे अमेरिकन सरकारने त्यांचे दमन करण्यासाठी केंद्रीय कायदे पारित केले आणि अधिकाऱ्यांना त्यांची कठोर अंमलबजावणी करण्यास सांगितले. जून १९१७ च्या गुप्तचर कायदयाद्वारे युध्दविरोधी कृती करणाऱ्यांना सापडल्यास १०००० डॉलर्सपर्यंतचा दंड आणि २० वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा करण्याची तरतूद केली गेली. त्यानंतर मे १९१८ मध्ये त्यात सुधारणा करुन देशद्रोहाचा खटला भरण्याची तरतूद केली. उदा. संविधान, राष्ट्रध्वज किंवा लष्कर यांच्या विरोधात बोलल्यास ती तरतूद होती.

विल्सन यांचे ॲटर्नी जनरल थॉमस ग्रेगरी यांनी अंतर्गत असंतोष दाबण्यासाठी त्याचा उपयोग केला. त्या अंतर्गत १५०० शांतीवादी, समाजवादी,आणि असे लोक ज्यांचा गुन्हा केवळ युध्दविरोधी बोलणे किंवा लिहिणे एवढाच होता त्यांना अटक करण्यात आली. युजिन डेब्स यांना क्लिव्हलँड येथे अटक करुन युध्दाची आर्थिक कारणे भाषणांमधून चर्चिल्यावरुन १० वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठवण्यात आली. गुप्तचर कायदयाने संशयास्पद कागदपत्रे व पत्रे यांची छाननी करण्याचे अधिकार पोस्ट मास्तर जनरल आल्बर्ट बर्लसन यांना देण्यात आले.

काही नागरीकांनी या कारवायांना विरोध केला. पण विल्सन यांनी ना आपल्या पोस्ट मास्तरला बंधन घातले, ना आपल्या ॲटर्नी जनरलला रोखले किंवा ना सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप केला. इ.स. १९१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने कायदयातील तरतूदींना वैध ठरविले. युध्दकालीन परिस्थितीत एक उच्च ध्येय, निश्चयीवृत्तीला वाट दिली. तसेच भीतीदायक संशय, संकुचित आदर्शवादी अनुकरण व विरोधकांचा छळ यांना सुध्दा जागा मिळाली.

## १३.७ पॅरिस शांतता परिषद

पहिल्या महायुध्दाच्या सुरुवातीला अमेरिका अलिप्त राहील असा एक आडाखा बांधलेला होता. परंतु बहुसंख्य अमेरिकन जनतेने ताबडतोब ब्रिटन आणि फ्रांस यांच्या मदतीस प्रतिसाद दिला. कारण वांशिक व सांस्कृतिक दृष्टया त्यांच्यामध्ये नाळ जोडली होतीच परंतु राष्ट्रीय हिताच्यादृष्टीनेसुध्दा ते आवश्यक होते. दुसर्या बाजूला जर्मनीचे वसाहतवादी व साम्राज्यवादी आक्रमक धोरणांमुळे अमेरिकेलासुध्दा जर्मनीच्या भावी आक्रमणाची भीती वाटू लागली. त्यामुळे बहुसंख्य अमेरिकन जनतेला असे वाटले की, जर्मनीचा विजय झाल्यास अमेरिकन हितसंबंध, संस्था आणि आदर्शांना बाधा निर्माण होईल. त्यामुळेच विल्सन यांनी परराष्ट्र धोरण आपल्या अधिकाराखाली घेतले. व्यक्तिगतरित्या विल्सन यांना दोस्त राष्ट्रांविषयी प्रचंड सहानुभूती होती व जर्मनीच खर्या अर्थाने दोषी असल्याचे त्यांचे मत होते. इ.स. १९१४ च्या सुरुवातीला खाजगीमध्ये विल्सन यांनी असे म्हंटले होते की, इंग्लंड ही अमेरिकन युध्दच लढत आहे. जर्मनीचा विजय झाल्यास अमेरिकेस आपले आदर्श सोडून दयावे लागतील आपली सर्व शक्ती स्वंय रक्षणार्थ वापरावी लागेल. तसे करणे म्हणजे अमेरिकेची सध्याची शासनपध्दती सोडून देणे होय. अशाप्रकारे विल्सन यांनी युध्दात सामील होण्यामागचा हेतू स्पष्ट केला. जेव्हा ते इ.स. १९१६ मध्ये पुन्हा अध्यक्षपदी निवडून आले तेव्हा ज्या मुददयांवर जर्मनी व दोस्त राष्ट्रे युध्द करीत आहेत त्या मुददयांवर चर्चा घडवून तोडगा काढण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली, मात्र कोणतीही बाजू संपूर्ण विजयाव्यतिरिक्त चर्चेद्वारे शांतीपूर्ण युध्द समाप्त करू इच्छित नाही असे उत्तर त्यांना मिळाले. त्यानंतर त्यांनी स्वतःची 'समाधानकारक शांतता' नावाची योजना तयार केली. ही त्यांची मध्यस्त म्हणून युध्द समेटाची शेवटची योजना होती. जानेवारी १९१७ मध्ये जर्मन सरकारने इंग्लड व फ्रान्सच्या समुद्रात अनिर्बंध पाणबुडीयुध्दाची आणि त्यामुळे अलिप्त आणि युध्दखोर राष्ट्रांची जहाजे बुडली जातील अशी घोषणा केली. १२ मार्च १९१७ रोजी पहिले अमेरिकन जहाज बुडवले आणि पुढील तीन आठवडयात अजून पाच जहाजे बुडविली गेली. ६ एप्रिल १९१७ रोजी अमेरिकेने जर्मनीविरुध्द युध्द पुकारले.

१८ जानेवारी १९१८ रोजी विल्सन यांनी आपले चौदा मुदद् मांडले. त्यातील खुल्या करारनाम्यानुसार काही महत्त्वाच्या मुदद्यांचा विल्सन यांच्या चौदा कलमांत समावेश होता. त्यापैकी काही कलमे अशी : १. सागरी स्वातंत्र्य, २. आर्थिक नियंत्रणे हटविणे, ३.शस्त्रास्त्रनिर्मिती कमी करणे, ४. वसाहती अधिकारांची निःपक्षपाती वाटणी आणि ५. राष्ट्रांची सार्वजनिक संघटना. ११ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीने युध्दबंदी स्विकारली आणि करारावर स्वाक्षरी केली.

जानेवारी १९१९ रोजी पॅरिस येथे शांतता परिषद भरली. अमेरिकन शिष्टमंडळाचे नेतृत्व विल्सन यांनी केले. त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या कोणत्याही प्रवक्त्याला किंवा नेत्याला आपल्यासोबत येण्याचे आमंत्रण दिले नाही. आपल्या उदात्त आदर्शांविषयी त्यांना पूर्णपणे खात्री होती. त्यांची प्रमुख मागणी म्हणजे राष्ट्रसंघाची स्थापना होय. पॅरिस शांतता करार जून १९१९ मध्ये करण्यात आला व जुलै मध्ये अमेरिकन सिनेटमध्ये तो सादर करण्यात आला. शेवटी संपूर्ण करार ज्याचा 'राष्ट्रसंघ' एक भाग होते. तो अयशस्वी झाला. कारण अमेरिकेने 'राष्ट्र संघाचे' सदस्यत्व स्विकारल्यामुळेसुध्दा काही फारसा फरक पडला नाही. खरा प्रश्न असा होता की, यापुढे अमेरिका ब्रिटन व फ्रांसच्या सोबतीने कराराचे रक्षण

munotes.in

करण्यात सहभागी होईल किंवा नाही कारण हे युध्द जिंकण्यामध्ये अमेरिकन सैन्याचासुध्दा मोलाचा सहभाग होता. परंतु अमेरिकेने आपला सहभाग देण्याचे टाळले आणि एक सार्वत्रिक अस्थिरता निर्माण होऊन पुन्हा जग दोन शत्रू गटांमध्ये विभागले गेले.

**आपली प्रगती तपासा :**

१. लष्करी उभारणीसाठी अमेरिकेने कोणते प्रयत्न केले?

२. अंतर्गत विरोधास अमेरिकन सरकारने कशाप्रकारे दडपून टाकले?

३. मेक्सिकन राज्यक्रांतीवर भाष्य करा.

४. लुसिटानिया दुर्घटना काय होती?

## १३.८ समारोप

१९ व्या शतकाच्या शेवटी अनेक प्रगत पाश्चिमात्य देशांना कच्चा माल आयात करण्यासाठी आणि आपला तयार झालेला पक्का माल विकण्यासाठी बाजारपेठांची आवश्यकता होती आणि म्हणून त्या देशांनी वसाहतवादी व विस्तारवादी धोरणांचा अवलंब केला. अमेरिका एक प्रगत राष्ट्र असल्यामुळे तिलाही या धोरणाचा वापर करावा लागला. थिओडोर रुझवेल्ट इ.स. १९०१ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून त्यांनी सैन्यबळाचा वापर करण्यास सुरुवात केली. आशिया आणि आफ्रिका खंडामध्ये वसाहती स्थापन करण्यात सदर प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये स्पर्धा निर्माण झाली. त्याचा परिणाम असा झाला की, आक्रमक साम्राज्यवाद आणि विस्तारवाद निर्माण होऊन त्याची परिणती पहिल्या महायुध्दामध्ये झाली. सुरुवातीला अमेरिका युध्दामध्ये अजिबात सहभागी होऊ इच्छित नव्हती. परंतु परिस्थिती अशी निर्माण झाली की तिला सहभागी होऊन दोस्त राष्ट्रांचा विजय झाला आणि युध्दोत्तर प@रिस शांतता परिषदेमध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजावावी लागली.

## १३.९ प्रश्न

१. अमेरिकन विस्तारवाद व साम्राज्यवाद यावर चर्चा करा.

२. थिओडोर रुझविल्ट यांची युध्दिवषयक भूमिका स्पष्ट करा.

३. अमेरिकेच्या पहिल्या महायुध्दातील प्रवेशापासून ते प@रिस शांतता परिषद, १९१९ पर्यंतच्या घटनांचा मागोवा घ्या.

❖❖❖❖

# १४

# अमेरिकेचे परराष्ट्र धोरण : दूसरे महायुद्ध

**घटक रचना :**

१४.० उद्दिष्ट्ये

१४.१ प्रस्तावना

१४.२ व्हर्साय शांतता परिषद

१४.३ अमेरिका आणि अती-पूर्वेकडील देश

१४.४ वॉशिंग्टन परिषद

१४.५ जपानी स्थलांतर

१४.६ नौदल मर्यादांचे अपयश

१४.७ अमेरिका आणि युरोप

१४.८ अमेरिका आणि लॅटीन अमेरिकी देश

१४.९ चांगल्या शेजाऱ्याचे धोरण

१४.१० पुन: शस्त्रीकरण

१४.११ म्युनिक करार

१४.१२ समारोप

१४.१३ प्रश्न

## १४.० उद्दिष्ट्ये

- व्हर्साय शांतता परिषदेमधील अमेरिकेच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
- युरोपमधील अमेरिकन धोरण समजून घेणे.
- लॅटीन अमेरिकी देशातील अमेरिकन धोरणाचे परीक्षण करणे.
- 'चांगल्या शेजार्याचे संबंध' या अमेरिकन धोरणाचे विश्लेषण करणे.

munotes.in

## १४.१ प्रस्तावना

इ. स. १९२०-४० या काळामध्ये बहुसंख्य अमेरिकन जनता आक्रमक राष्ट्रांविरुध्द अमेरिकेने कडक पावले उचलून युध्द करण्याच्या विरुध्द होती. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, आंतरराष्ट्रीय करार करण्यापासून तिने अलिप्त राहावे. वास्तविक पाहता हार्डींज, कुलीज आणि हुवर यांच्या सरकारनी निशस्त्रीकरण, आंतरराष्ट्रीय वादविवाद शांतता पूर्ण मार्गांनी सोडविणे आणि आर्थिक स्थैर्य याबाबतीत जागतिक नेतृत्व करण्याचे प्रयत्न केले. यामध्ये राष्ट्रसंघाशी सहकार्याचाही समावेश होता. राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्विकारण्यास अमेरिकेने जरी नकार दिलेला असला तरी इ. स. १९२४-१९३० या दरम्यान तिने राष्ट्रसंघाच्या चाळीस परिषदांना आपली शिष्टमंडळे पाठविली होती. तिचा उद्देश केवळ आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य हाच नव्हता तर आपल्या परराष्ट्र व्यापाराचा जलद विस्तार व भांडवल गुंतवणुक हा सुध्दा होता. परंतु १९२० च्या दशकात आंतरराष्ट्रीय सौहार्द व शांतता निर्माण करण्याचे केलेले प्रयत्न हे तात्पुरत्या स्वरूपाचे होते.

## १४.२ व्हर्साय शांतता परिषद

विल्सन यांचा स्वयं-निर्णय आणि लोकशाहीवरील आदर्शवादी भर यांचा व्हर्सायच्या तहातील काही तरतूदींवर प्रभाव पडला होता. पूर्वीच्या जर्मन व तुर्की वसाहती या 'मॅन्डेट' किंवा 'विश्वस्त मंडळ' या नावाखाली दोस्त राष्ट्रांमध्ये वाटून दिल्या गेल्या आणि सैदधांतिकदृष्ट्या तरी ह्या स्वतंत्र झाल्याचे भासले. व्हर्साय तहाने पोलडंला स्वातंत्र्य मिळाले. इस्टोनिया, लाटेव्हिया, आणि लिथुआनिया ही बाल्टिक राष्ट्रे जी जर्मनीने इ. स. १९१८ रोजी बोल्शेविक रशिया बरोबर कठोर शांतता तहाद्वारे ताब्यात घेतली होती व ऑस्ट्रीया हंगेरी आणि ऑटोमन साम्राज्य यांच्या जोखडातून नवीन दोन राष्ट्रे झेकोस्लोव्हाकीया आणि युगोस्लाव्हिया निर्माण करण्यात आली.

परंतु सत्तासंतुलनाच्या बाबतीत व्हर्सायचा तह चांगला नव्हता. त्यातील जाचक अटीनी जर्मनीने तिखट प्रतिक्रीया नोंदविली तर क्रांतीकारी रशियाबरोबर संवाद साधण्याचे प्रयत्नसुध्दा या तहाच्या कर्त्यानी केले नाहीत. एवढेच नव्हे तर या तहाची बोलणी चालू असतानाच्या वेळीच दोस्त राष्ट्रांनी रशियातील बोल्शेविक क्रांती दडपण्याची मोहिम हाती घेतली होती. ऑगस्ट १९१८ मध्ये १४ दोस्त राष्ट्रांच्या फौजांनी बाल्टिक समुद्रातील रशियन बंदरांवर आगमन केले व ब्लाडीवोस्तिक येथे आपले युध्दोत्तर साम्रागी आणि जर्मन बंदरे ताब्यात घेण्याचे प्रयत्न केले. परंतु त्याऐवजी या फौजांनी रशियन क्रांतीकारी सैन्याशी लढाई सुरु केली व क्रांतीविरोधी रशियन फौजेला मदत दिली. लेनिन यांना गादीवरुन हटविण्याची त्झार आणि उदारमतवादी, लोकशाहीवादी यांना आपला पाठींबा दिला.

विल्सन यांच्या परगानगीने अमेरिकी फौजासुद्धा त्यात सामील झाल्या. इ. स. १९१८ च्या शेवटी सैबेरियामध्ये जवळजवळ ७००० अमेरिकन लढाईसाठी धाडले गेले व एप्रिल १९२० पर्यंत ते तिथेच होते. आपल्या समकालिन नेत्याप्रमाणेच वुड्रो विल्सन हे सुध्दा बोल्शेविक विरोधी होते. मार्च १९१७ च्या रशियन उदार राज्यक्रांतीचे विल्सन यांनी स्वागत केले होते. परंतु ऑक्टोबर १९१७ मध्ये लेनिनने केलेले आकस्मिक बंड व

सत्तांतर, त्यानंतर रशियाची युध्दातील माघार या गोष्टींनी दोस्त राष्ट्रांच्या नियमावलीचा केलेला विश्वासघात होता. कारण रशियाचे भविष्य विल्सन यांना अंधारात दिसत होते.

त्यामुळे याबाबतचे शत्रुत्व त्यांच्या व्हर्सायच्या तहात प्रतिबिंबित झाले. पूर्व युरोपमध्ये त्यांची प्रादेशिक योजना ही रशियाला शक्य तेवढे कमजोर करण्याची होती. त्यामुळे व्हर्साय सोडताना विल्सन व इतर दोस्त राष्ट्रांच्या नेत्यांनी रशियन लष्करी नेते ॲडमिल आलेक्झांडर कोलचाक जे बोल्शेविकांविरुध्द अयशस्वी लष्करी मोहिम चालवित होते त्यांना पाठींबा देण्यास सहमती दर्शविली. विल्सन यांनी मेक्सिकोमधील ह्युएर्टा यांच्या 'खाटीक' सरकारला (Butchers – शिरकाव करुन सत्तेवर आलेले) मान्यता देण्यास नकार दिला होता, आता त्यांनी रशियाच्या लेनिन सरकारलाही मान्यता दिली नाही. (शेवटी फक्त १९३३ मध्येच रशियन सरकारला अमेरिकेने मान्यता दिली.)

## १४.३ अमेरिका आणि अतीपूर्वेकडील धोरण

जपानवरील विश्वासाने एक वेगळीच दिशा घेतली. जपानने विनंती केलेले वांशिक समानतेचे तत्व राष्ट्रसंघाच्या घटनेंतील कलमांमध्ये समाविष्ट करण्यास विल्सन यांनी नकार दिला. कारण त्यांच्या मते, असे करणे देशांच्या संघटनेला अयोग्य होते. या उलट जपानच्या मते, वांशिक – जाणिवेतूनच राष्ट्रवादाची भावना बाळगली जाते आणि याबद्दल त्यांना राग आला होता. अमेरिकेने इ.स. १९२० मध्ये सैबेरियामधून आपल्या फौजा मागे घेतल्यानंतरही जपान मात्र तिथे हस्तक्षेप करीत होती यामुळे अमेरिका अस्वस्थ झाली होती. बर्याच सैध्दांतिक विलगतावादी गटांनी जपानच्या या साम्राज्यवादाला रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली. तसेच दोन्ही देशांतील युध्दांची शक्यता ते वारंवार व्यक्त करीत होते. राष्ट्रसंघाच्या मँडेटमुळे जर्मनबेटे जपानच्या अख्यात्यारीत गेल्यामुळे फिलीपाइन्सपासून अमेरिकेच्या संपर्क तुटल्यागत झाला. केबल स्टेशन म्हणून वापर करता यावा म्हणून याप बेट वाचविण्याचे प्रयत्न विल्सन यांनी केले होते आणि राज्यविभागाने जपानला वेळोवेळी त्याची कल्पना दिलेली होती. जपानच्या चीनमधील प्रभाव कमी करण्यासाठी अमेरिकेने युध्दात उडी घेतल्यानंतर विल्सन यांनी स्वत: 'डॉलरनीतीचे' पुनरुज्जीवन केले. त्यांनी चीनमध्ये गुंतवणूक करण्यास मागेपुढे पाहणार्या अर्थपुरवठादारांना जपानला चीनच्या आर्थिक विकासातील नेतृत्व करण्यास रोखण्यासाठी चार राष्ट्रांच्या संघटनेत सामील होऊन गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले आणि १५ ऑक्टोबर १९२० रोजी तसा करार केला. परंतु लाँसिंग – इशली करार आणि शांटूंग मिळवण्यातील जपानचे यश यामुळे संत्तासंतुलन जपानच्या बाजुने झुकले.

नाविक दल उभारणीच्या स्पर्धेमध्ये अमेरिका – जपान संघर्षाची शक्यता नेहमीच व्यक्त केली गेली. या धोकेदायक स्पर्धेमध्ये इंग्लडंसुध्दा सामील झाली. युध्दनौकाना किनार्याला लागण्यासाठी वर्षे लागतात आणि जेव्हा करार स्वाक्षरीत झाला तेव्हा या तिन्ही सत्तापैकी (अमेरिका,इंग्लड व जपान) कोणीही सदरचे बांधकाम थांबवण्यास तयार नव्हते. नवीन अमेरिकन आणि ब्रिटीश नाविक तळ हे जपानविरुध्द वापरले जातील याची तिला खात्री होती तर अँग्लो जपानी कराराने इंग्लडचे नौदल अमेरिकेविरुध्द युध्दात एकत्र येतील अशी खात्री अमेरिकन देशभक्तांना वाटत होती. ब्रिटनच्या मते, त्याचे पारंपारिकदृष्ट्या

सागरीमार्गाबर वर्चस्व होते आणि त्यांच्या पसरलेल्या विशाल सामर्थ्यानुसार नाविक वर्चस्व आवश्यकही होते. या ठिकाणी हेतू हा होता की, राष्ट्र संघाने ही समस्या सोडवावी.

सिनेटर बोरा यांच्या नेतृत्वाखाली काही अमेरिकन विलगतावादी नेत्यांनी अमेरिकेने राष्ट्रसंघाच्या कक्षेबाहेर जाऊन काही करण्याचे ठरविले. त्यांच्या नि:शस्त्रीकरण परिषदेच्या प्रस्तावामुळे त्यांना जनमताचा भरघोस पाठींबा मिळाला आणि काँग्रेसनेही पूर्ण मतदान त्यांच्या बाजुने दिले. यावर इंग्लडने घाईघाईने कृती करण्याचा प्रयत्न केला. परंतु अमेरिकन राज्यसचिव ह्युजेस यांनी तिला ८ जुलै १९२१ चे आमंत्रण दिले. त्यामध्ये त्यांनी फ्रान्स, इटली, बेल्जियम,चीन,नेदरलँड्स आणि पोर्तुगाल यांचा समावेश केला आणि संपूर्ण पॅसिफीक व आशिया संघर्षावर चर्चा घडवण्याचा प्रस्ताव ठेवला. मोठ्या निषेधाने व संकोचानेच जपानने वॉशिंग्टनचे आमंत्रण स्विकारले परंतु इतरांना मोठी उत्सुकता लागली होती. विल्सन यांनी व्हाईट हाऊस सोडल्यानंतर (अध्यक्षपदावरुन गेल्यानंतर) वर्षाच्या आतच अमेरिकेमध्ये अत्यंत महत्वाची आंतरराष्ट्रीय परिषद सुरु झाली.

## १४.४ वाशिंग्टन परिषद

अमेरिकेतील आत्यंतिक देशप्रेमी वर्तमानपत्रे ज्यांचे नेतृत्व हर्स्ट गट आणि काही विलगतावादी (सिनेटर बोरासह) यांनी वॉशिंग्टन परिषदेचा निषेध केला. इ. स. १९२२ च्या सुरुवातीला सिनेटने मोठ्या बहुमताने पंचमहासत्ता नाविक करार, चतु:सत्ता सल्लागार करार आणि नऊसत्ता मुक्तद्वार करार, याशिवाय इतर अनेक छोटे करार पारित केले. राज्यसचिव ह्युजेस ह्यांना चांगले यश लाभले आणि बहुतेक परिषदेच्या निरीक्षकांना असा विश्वास वाटला की, या परिषदेने अतीपूर्वमध्ये युध्द पेटण्याऐवजी शांतीचे वारे वाहू लागले आहेत. त्यानतंरच्या परिदृश्यातून त्याचे महत्व लिखित केले गेले. या काळाने असे सिध्द केले की, चीनच्या आर्थिक शोषणावर कोणताही परिणाम झाला नाही. चीनला एकतर्फी पाठींबा देण्याच्या बाबतीत अमेरिकेने टाळाटाळ केली आणि मुक्तद्वार धोरण्याच्या बाबतीत नियमांचे उल्लंघन करण्यास इतर राष्ट्रे इच्छुक नव्हती. आपल्या ताब्यातील बेटांभोवती तटबंदी करण्याच्या अधिकारासाठी अमेरिकेने जपानकडून तशी आश्वासने प्राप्त केली होती व ती विश्वासार्ह नव्हती. सगळ्यात फसवा म्हणजे नाविक मर्यादा करार होता. कारण हलक्या टेहळणी युध्दनौका, विनाशिका,आणि पाणबुड्यांवर त्यांचा परिणाम होणार नव्हता आणि नाविक शर्यत सरळ सरळ या शस्त्रास्त्रांवर केंद्रीत केली गेली. जेव्हा वॉशिग्टन करार आजमावण्याची वेळ जवळ आली तेव्हा जपानी साम्राज्यविस्तारास कोणताही अडथळा नव्हता. दरम्यान त्यांनी जागतिक समुदायाला खोट्या सुरक्षेचे कारण दिले.

इ. स. १९२१ च्या परिस्थितीमध्ये ह्युजेस यांनी काय केले असते हे सांगणे अधिक कठीण आहे. खरे म्हटल्यास सर्व करारांचे पालन करण्यासाठी त्यावर सह्या करणार्यामध्ये चांगला विश्वास असणे गरजेचे आहे. वॉशिग्टन करारच केवळ अयशस्वी झाला हे काही नवीन नाही कारण लोक आणि सरकारे सुध्दा आपण दिलेली आश्वासने पाळू शकले नाहीत किंवा उल्लघंन करणार्यांविरुध्द कारवाई करु शकले नाहीत. वॉशिग्टन परिषदेने निर्माण केलेली करार रचना पॅसिफिक महासागर आणि अतीपूर्वेकडील देशांच्या बाबतीत प्रादेशिक सुरक्षा पध्दती होती तसेच राष्ट्रसंघाच्या घटनेतील निशस्त्रीकरण कार्यक्रम तडीस नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी होती. तसेच सुरक्षेच्या तरतूदीनुसार कोणतीही तीन नाविक

सामर्थ्यशाली राष्ट्रे दुसऱ्यांविरोधी आक्रमक कृती करु शकत नव्हती. वेळेच्या मर्यादेनुसार राज्यसचिव ह्युजेस यांनी जागतिक शांततेसाठी आपले योगदान दिले आणि वॉशिंग्टन परिषदेत त्यांना प्रतिस्पर्धीच नव्हता. हार्डींग यांच्या कुशल प्रशासनाचे ते यश होते.

इ. स. १९२० ते १९२५ च्या दरम्यान वॉशिंग्टन कराराचे फलित म्हणजे जपानने लष्करवाद आणि साम्राज्यवादाकडून लोकशाहीकडे वाटचाल करुन देशांतर्गत राजकारणाला एक नवा आयाम दिला. त्यामुळे जपानमध्ये पहिल्यांदाच लष्करी पार्श्वभूमी नसलेला नागरिक पंतप्रधान झाला. मतदान प्रकीया सार्वत्रिक केली गेली, कामगार संघटना बळकट झाल्या. लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली व जपानच्या अतिरिक्त मालास स्वदेशी बाजारपेठा उपलब्ध करण्याचे ठरले. कारण साम्राज्यवादी याच कारणाखाली विस्तारवाद करत होते. परंतु याच दरम्यान अमेरिकेच्या दुसऱ्या एक कृतीने साम्राज्यवादी मनोबल वाढले. जपानी लोक जे वांशिक दृष्ट्या अतिशय संवेदनशील होते, पुन्हा त्यादृष्टीने प्रयत्न करु लागले.

## १४.५ जपानी स्थलांतर

इ. स.१९०८ च्या जेन्टलमेन्स ॲग्रीमेंटबाबत काही कॅलिफोर्नियाचे रहिवासी आणि इतर संतुष्ट नव्हते. त्यांनी अशी तक्रार केली की, जपानी वंशाचे अमेरिकन नागरिक बहुपत्नी आहेत व त्यांना फारच जास्त मुले आहेत. ज्यावेळी इ. स. १९२४ चा स्थलांतर कायदा काँग्रेसमध्ये चर्चेसाठी ठेवला,तेव्हा जपानी स्थलांतरीतांच्या आगमनास विरोध करण्यार्यांचा राखीव जागांवर विश्वास नव्हता. कारण इ. स. १८९० मध्ये अमेरिकन निवासी असणार्या परकीय जनतेला वार्षिक २... प्रमाणे प्रवेश मिळण्याची तरतूद केली गेली होती. त्यामुखे जपानला फक्त दरसाल २५० जणांच्या आगमनास परवानगी मिळाली. काँग्रेसने यावर संपूर्ण व विशेष कायदेशीर बंदी घालण्याचा आग्रह धरला. त्यानुसार कायद्यामध्ये एक कलम घातले गेले ज्याद्वारे नागरिकत्वासाठी कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. म्हणजेच जपानी नागरींकानाच. कारण इतर कायद्याद्वारे सर्वच आशियाई नागरिंकाच्या स्थलांतरावर बंदीबाबत काही लवचिक अटी होत्या. जेन्टलमेन्स ॲग्रीमेंट रद्द करुन नवा कायदा अमलात आणावा लागणार होता. ही बाब जपानच्या स्वाभिमानास धक्का देणारी असल्यामुळे 'राज्यसचिव' ह्युजेस यांनी जपानी राजदूतास आपले म्हणणे काँग्रेससमोर मांडण्यासाठी पाचारण केले. परंतु कायदा पारित झाल्यास गंभीर परिणाम होतील अशी धमकी जपानी राजदूताने व्यक्त केली. त्यामुळे अमेरिकन जनतेच्या भावना भडकल्या. काँग्रेसने बहुमताने सदस्य कायदा पारित केला व राष्ट्राध्यक्ष कुलिज यांनी त्यावर स्वाक्षरी केली. त्याच्या परिणाम स्वरुप जपानी विरोधाचा उद्रेक झाला. त्यामुळे जपानने किती संख्येने स्थलांतरित जातील वगैरे गोष्टींकडे जास्त लक्ष न देता हा कायदा जपानला केलेली जखम असून जपानी वंशाचा अपमान असल्याची भावना त्यांनी बनवली. त्यामुळे जपानी साम्राज्यवादी आणि लष्करवादी यांनी सत्तेवर येण्यासाठी अमेरिकेबद्दलचा तिरस्कार या मुद्द्याचा वापर करुन जनमत ढवळून काढले.

munotes.in

## १४.६ नौदल मर्यादांचे अपयश

राष्ट्राध्यक्ष कुलीज यांनी इ. स. १९२७ मध्ये इ. स. १९२२ च्या निशस्त्रीकरण तत्वानुसार हलक्या युध्दनौका, विनाशिका आणि पाणबुड्या यांचा विस्तार करण्याच्या प्रयत्न केला. याबाबतीत अमेरिका आपल्या इतर सहकारी देशांबरोबर हलक्या युध्दनौका आणि अवजड युध्दनौका याबाबतीत बरीच पुढे गेली होती अध्यक्षांचा मुख्य हेतू अर्थव्यवस्थेकडे लक्ष देणे हा होता. परंतु त्यांचे राज्यसचिव केलॉग हे ह्युजेस प्रमाणे नव्हते आणि परिषदेच्या तयारीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे अध्यक्षांनी जिनिव्हा येथे घाईने बोलावलेल्या बैठकीस फ्रान्स आणि इटली यांनी हजर राहण्यास नकार दिला. प्रतिनिधीमंडळीतील नौदल समर्थक हे निशस्त्रीकरण्याच्या बाजुने नव्हते. मुख्य सहमती एका गोष्टीवर होत नव्हती ती म्हणजे अवजड युध्दनौका या आक्रमक तर हलक्या युध्दनौका या बचावात्मक दृष्टीने होत्या. परंतु ५-५-३ या प्रमाणावर सहमती होऊ शकली नाही. त्यामुळे ही बैठक पूर्णपणे आलेले अपयश होते.

मूळचा वॉशिंग्टन करार पुनरुज्जिवित करण्याचा प्रश्न आता राष्ट्राध्यक्ष हर्बट हुवर यांच्याकडे आला. त्यांनीसुध्दा नौदलावर खर्च करण्यास विरोध केला व शांतीवादाकडे आपले धोरण राबविले. प्राथमिक स्तरावरील चर्चेनुसार अमेरिका व इंग्लड यांच्या युध्दनौकांमध्ये कोणताही फरक असू नये असे ठरले गेले. ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड हे अगदीच युध्दविरोधी होते. वॉशिंग्टनमध्ये हुवर यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर त्यांनी नौदल सुसज्ज राष्ट्रांना सार्वत्रिक नि:शस्त्रीकरण परिषदेसाठी लंडन येथे पाचारण केले. जानेवारी १९३० मध्ये राज्यसचिव हेन्री स्टिमसन च्या नेतृत्वाखाली द्विपक्षीय अमेरिकन शिष्टमंडळ बैठकीस गेले. फ्रान्सने नाविक कराराच्या बदल्यात लष्करी हल्ल्याबाबत हमी देण्याची मागणी केली परंतु हुवर यांनी ती फेटाळली. इटली जी मसोलीनीच्या नेतृत्वाखाली आक्रमक बनत होती तिने थोड्याफार अटींव्यतिरिक्त सर्व धुडकावून लावले. मात्र अमेरिका आणि इंग्लंड बहुतांशी अटींवर सहमत झाले. जपान ५-५-३ प्रमाण पाणबुड्या सोडल्यास पुनरज्जिवीत करण्यास तयार झाला. या करारामध्ये मिळालेले यश 'एस्कलेटर' या कलमाने नष्ट केले. ज्याअन्वये जेव्हा एखादे रशिया किंवा जर्मनीसारखे राष्ट्र या करारास बांधिल नसेल व त्या पासून धोका निर्माण होण्याची शक्यता असेल अशा वेळी नौदल विस्तार मर्यादा सोडून करण्याची परवानगी देण्यात आली होती. ह्या कराराची मुदत इ. स. १९३६ पर्यंत संपुष्टात येणार होती.

या निराशाजनक स्थितीमध्ये लंडन नौदल करारास अमेरिका, ब्रिटन आणि जपान यांनी मंजुरी दिली आणि १९२२ च्या कराराच्या थोड्याफार प्रभावाने नवीन करारामध्ये राष्ट्रसंघाच्या तरतुदीमध्ये नि:शस्त्रीकरणाची थोडीफार आशा वाटू लागली. परंतु युध्दाच्या नवीन भीतीचा उदय सुध्दा होऊ लागला. कारण पुढच्याच वर्षी जपानने मांचुरियावर आक्रमण केले.

या लंडन नौदल कराराचे अजुन एक अपयश म्हणजे जमीनीवरील शस्त्रांस्त्राच्या बाबतीत नि:शस्त्रीकरणातील अडचण होय. याकाळी फ्रान्सला जर्मनीपासून वाढणारा धोका महत्वाचा होता. राष्ट्रसंघाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात आलेले अपयश हे ॲडॉल्फ हिटलर आणि इतर जर्मन राष्ट्रवाद्यांना व्हर्सायचा तह झुगारुन देण्यास निमित्त

munotes.in

मिळाले होते. शेवटी इ. स. १९३२ मध्ये जिनिव्हा येथे जागतिक नि:शस्त्रीकरण परिषद भरली. युध्दानंतर अमेरिकेने आपले भूदल कमी केले असले तरी नि:शस्त्रीकरण मग ते भूशस्त्रे किंवा नाविक अस्त्रे याबाबतीत असेल तेव्हा ते नेहमीच चर्चेमध्ये भाग घेण्यास तयार असत. ज्याठिकाणी देशाचे नाविक प्रभाव क्षेत्र असेल तेथे त्यांनी सुसज्ज लष्करी तयारी ठेवली, त्यावर नेतृत्व केले आणि एक उत्तम उदाहरण घालून दिले आणि इतिहासामध्ये इतर कोणीही प्रयत्न केले नसतील तेवढे प्रयत्न प्रत्यक्ष शस्त्रीकरण कमी करण्यात घेतले. थोडक्यात, राष्ट्रसंघाच्या कोणत्याही सदस्य राष्ट्रापेक्षा त्यांच्या नि:शस्त्रीकरण तत्वासाठी अमेरिकेने सर्वात जास्त प्रयत्न केले. अंतर्गत वादविवादमध्ये वाशिंग्टन परिषदेने पुढाकार घेऊन एक उदाहरण दाखविले की, विलगतावादी विरोधाने निशस्त्रीकरणाची कृती आंतरराष्ट्रीय कराराने शिथील केली.

## १४.७ अमेरिका आणि युरोप

### १४.७.१ नुकसान भरपाई आणि युध्दकालीन कर्ज :

१९२३ मध्ये जर्मनी युध्दातील नुकसान भरपाईचा वार्षिक हप्ता भरु न शकल्याने फ्रान्सने जर्मनीचा र्‍हुर खोऱ्यातील औद्योगिक प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणला. अशी नुकसान भरपाई देण्याचे जर्मनीने शांततेच्या तहानुसार मान्य केले होते. त्यानंतर चार्लस डॉव्ज या शिकागोमधील एक बँकरच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नियुक्ती झाली. आयोगाने जर्मनीच्या आर्थिक कुवतीच्या प्रमाणात नुकसान भरपाईचे वार्षिक हप्ते निश्चित केले. नंतर १९२५ मध्ये जर्मनी, फ्रान्स आणि ब्रिटन यांनी लोकार्नो करार करुन एकमेकांमध्ये शांतता राखण्याचे आश्वासन दिले. १९२८ मध्ये यंग आयोगाने नुकसान भरपाईच्या वार्षिक हप्तामध्ये परत एकदा फेरफार केला, त्याप्रमाणे हे हप्ते १९८८ पर्यंत द्यावयाचे होते.

### १४.७.२ युध्द कालीन कर्ज:

पहिल्या महायुध्दाच्या काळात अमेरिकेने युरोपियन देशांना १,१०० कोटी डॉलरचे कर्ज ५ टक्के व्याजाने दिले होते. अनेकांनी हे कर्ज म्हणजे अमेरिकेचे युध्द प्रयत्नातील योगदान असल्याचे मानले होते कारण १९१८ पर्यंत अमेरिकेने प्रत्यक्ष युध्दात फारच थोडा भाग घेतला होता. माथ युध्दानंतर अमेरिकेचा कल अलगतेकडे झुकु लागल्याने दिलेले कर्ज परत करावे अशी मागणी अमेरिकेने केल्याने १९२३ ते १९३० या काळात सोव्हिएट रशिया वगळता कर्ज घेतलेल्या अन्य देशांशी करार केले. या करारानुसार व्याजाचा दर कमी करण्यात आला आणि कर्ज फेडण्याची मुदत ६० वर्षे करण्यात आली. अनेक अमेरिकन लोकांना करारातील तरतुदी उदार वाटल्या तर युरोपियनांना त्या कठोर वाटल्या,हे कर्ज माफ kहावे अशी त्यांची इच्छा होती. अमेरिकेचा उल्लेख ते आता अंकल शायलॉक असा करु लागले.

### १४.७.३ शांततेचा शोध :

लोकार्नोच्या तहाने युरोपमध्ये शांततेची पहाट झाल्याचा भास झाला. १९२८ मध्ये या तहानंतर पॅरिस करार करण्यात आला, तो केलाग – ब्रियां पॅक्ट या नावानेही ओळखला जातो. या करारानुसार राष्ट्रीय धोरणाचे साधन म्हणून युध्दाचा त्याग करण्याचे ५९ देशांनी

आश्वासन दिले. परंतु या आश्वासनाचे पालन न करणार्या देशाला शासन करण्याची कोणतीही व्यवस्था करारामध्ये सुचवण्यात आली नव्हती तसेच करारामध्ये संरक्षक युध्दाविषयी काहीच तरतुद नसल्याने हा करार कुचकामी ठरला. १९३० मध्ये अमेरिका, ब्रिटन आणि जपान या देशांची लंडन येथे परिषद झाली, या परिषदेमध्ये त्यांनी छोट्या आरमारी जहाजांच्या बांधणीचे प्रमाण ठरवले असले तरी तिन्ही देशांना जादा छोटी जहाजे बांधण्याची परवानगी दिली गेली.

## १४.८ अमेरिका आणि लॅटिन अमेरिकी देश

जर्मनीचा पराभव झाल्यानंतर अमेरिकेला कॅरिबियन प्रदेशावरील आपली देखरेख थोडी कमी करणे शक्य झाले. ह्यु, स्टिम्सन आणि केलॉग या परराष्ट्र मंत्र्यांनी लॅटिन अमेरिकन देशांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. क्युबा, हैती, डोमिनिकन प्रजासत्ताक आणि निकारगुआ या लॅटिन अमेरिकेतील देशातून अमेरिकन सैन्य काढून घेण्यात आले. १९३० मध्ये अमेरिकेने मन्रो सिध्दांताचा रुझवेल्ट उप-सिध्दांत रद्द केला असला तरी या देशात आपल्या नागरिकांचा रक्षणासाठी हस्तक्षेप करण्याचा आपला हक्क मात्र अमेरिकेने सोडून दिला नाही. तथापि या देशावर देखरेख करण्याचे पोलीसाचे काम करण्याचे तिने थांबविले होते. नतंर काही काळाने तिने कोणत्याही कारणास्तव हस्तक्षेप करणार नसल्याचे आश्वासन देऊन हस्तक्षेपाचा अधिकाराचा निर्णायक त्याग केला.

१९३० च्या दशकाच्या सुरुवातीला जर्मनीमध्ये उदय झाल्याने युरोपातील स्थैर्याची आणि पूर्व आशियात युध्द न होण्याची आशा कायमची मावळली. पॅरिस शांततेचा तह मोडकळीला आला होता. आंतरराष्ट्रीय संघर्षाचा एक नवा कालखंड जगामध्ये सुरु झाला. अमेरिकन लोकांमध्ये या विषयी गंभीर मतभेद होते आणि काही काळ अलगतावादी भावना बळावली.

## १४.९ चांगल्या शेजाऱ्याचे धोरण

आपल्या कारकिर्दीच्या उद्घाटनपर भाषणात राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी आपल्या परराष्ट्र धोरणाचे सूतोवाच केले. त्यामध्ये त्यांनी अमेरिकेच्या हक्कांच्या प्रतिपादनाबरोबर इतर प्रत्येक देशालासुध्दा अधिकार असून त्यांचा आदर केला पाहिजे व त्यासाठी 'चांगले शेजारी धोरण' राबविणे गरजेचे आहे असे म्हटले. या परराष्ट्रनीतीमुळे आपल्या बारा वर्षाच्या कारकीर्दीत रुझवेल्ट यांनी अंतर्गत गोंधळापेक्षा परराष्ट्रधोरणावरच अधिक लक्ष केंद्रीत केले. खरे पाहिल्यास त्यांची 'चांगले शेजारी धोरण' ही नीती जागतिक पातळीवर नव्हती तर ती केवळ लॅटीन अमेरिकन देशांपुरती मर्यादित राहील्याचे दिसते.

### १४.९.१ साम्राज्यवादाच्या धोरणावर उदक :

रुझवेल्ट यांच्या या धोरणाची पहिली परीक्षा क्यूबा प्रश्नाबाबत झाली. इ. स. १९३३ मध्ये क्यूबा येथे गृहयुध्द चालू झाले. त्यामुळे अमेरिकेने अगोदरच इ. स. १९०३ मध्ये तेथील उठाव लष्करी प्रयोगाने दडपून टाकण्यासाठीची प्लॅट संशोधन कराराद्वारे तरतूद केलेली होती. परंतू रुझवेल्ट यांनी त्यात हस्तक्षेप केला नाही. अमेरिकेने इतर लॅटीन अमेरिकन राष्ट्राच्या सल्ल्याने क्यूबातील नवीन शासनाला मान्यता देण्यास सहमती दर्शविली. इ. स. १९३४ च्या व्यापारी करारानुसार अमेरिकेने क्यूबामधील अतिरिक्त साखरेचा साठा आयात

केला. त्याचवेळेला अमेरिकेने प्लॅट संशोधन कराराचे नवीन करारान्वये उल्लंघन केले. इ. स. १९३३ मध्ये रुझवेल्ट यांनी लेखी निवेदन करुन त्यांच्या धोरणाची पूर्तता केली व असे जाहिर केले की, आतापासून अमेरिकेची नीती ही सशस्त्र हस्तक्षेपास विरोध ही असेल. त्यानंतर रुझवेल्ट प्रशासनाने हैती व पनामा येथील आपली अर्ध संरक्षक दले सुध्दा तेथून हलविली आणि त्यांना आर्थिक स्वातंत्र्य देऊन नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क चे वर्चस्व काढून टाकले. नवीन करारानुसार अमेरिकन हस्तक्षेप करण्याचा अधिकार काढून टाकला. इ. स. १९४९ च्या करारानुसार अमेरिकेचे डॉमिनिकन प्रजासत्ताकावरील आर्थिक नियंत्रणही संपुष्टात आले.

इ.स. १९३४ च्या टायडींग मॅकडफी कायद्यामध्ये फिलीपाईन्सच्या स्वातंत्र्याची योजना समाविष्ट करण्यात आली. ४ जुलै १९४६ मध्ये संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत १० वर्षाच्या कालावधीसाठी शासन चालविण्यासाठी इ. स. १९३५ मध्ये राष्ट्रकुल परिषद आयोजित करण्यात आली. फिलीपाईन राष्ट्रकुलाचा अध्यक्ष म्हणून मॅन्यूअल क्वेझॉन यांची निवड झाली. रुझवेल्ट प्रशासनाने या समूह बेटाच्या आर्थिक मदतीच्या विनंतीकडे फारसे लक्ष दिले नाही. न्यू डील कार्यक्रमानुसार या नवनिर्मित व आर्थिकदृष्ट्या कमजोर बेटाने अमेरिकेकडून काही आर्थिक मदतीची अपेक्षा केली. इ.स. १९३६ च्या सेंद्रीय कायद्याने थोडीफार सुधारित राजकीय स्थिती फिलिपाईन्समध्ये निर्माण झाली व त्यानुसार तेथील कायदेमंडळ स्थापन झाले. एक छोटीशी परंतु धर्मवेडी राष्ट्रीय चळवळ प्युर्टो रिको येथे सुरु होऊन त्यांनी स्वातंत्र्याची मागणी केली. त्यातील बहुसंख्येने 'राष्ट्राचा दर्जा' मिळण्याचा आशेत होते किंवा निदान लोकनिर्वाचित सरकार तरी असावे या विचारांचे हाते. इ. स. १९४१ ते १९४६ या दरम्यान रेक्सफोर्ड टगवेल हे गर्वनर असताना त्यांनी प्युर्टो रिको जनतेमध्ये सुधारवादी विचार रुजवले. त्यामुळे त्यांना आपला राज्यपाल निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आणि इ.स. १९४८ मध्ये लुई मुनोझ मरीन राज्यपालपदी आल्यावर सामाजिक व आर्थिक विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. इ.स.१९५२ मध्ये प्युर्टो रिको राष्ट्रकुल संघ बनले. इ.स. १९३७ मध्ये हवाई बेटाला 'राष्ट्रदर्जा' देण्याविषयीचे विधेयक फेटाळले गेले. कारण काँग्रेसच्या (अमेरिकन) सदस्यांनी हवाई येथील जपानी लोकसंख्येपासून अमेरिकेच्या पर्ल हार्बर नाविक तळास धोका असल्याचा कारणावरुन ते फेटाळले.

अमेरिकेच्या साम्राज्यवादी धोरण सोडल्याच्या निर्णयास अमेरिकेच्या सामरिक-बचावात्मक नौदल धोरणाने जीवदान दिले. कारण इ.स . १९३४ च्या नवीन करारानुसार क्यूबाने ग्वाँटॅनामे येथील अमेरिकन नाविक तळ सुरु ठेवण्यास परवानगी दिली व फिलिपाईन्समध्येसुध्दा तशीच व्यवस्था करण्यात आली. एवढे असले तरी अमेरिकेने महासत्तांचे नेतृत्व केले व वसाहतांचे विस्तारीकरण सुध्दा वेगळ्यापध्दतीने केले. फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्याचा कार्यक्रम जो दुसऱ्या महायुध्दानंतरच खर्या अर्थाने फळास आला तो गोर्या वंशाच्या नसलेल्या वसाहती जनतेचा पहिलाच असा कार्यक्रम होता. यान्की पुतळ्या बाबत झालेला अविश्वास शमवणे ही लॅटीन अमेरिकेतील समस्या होती व त्यासाठी हस्तक्षेप दूर करणे व त्याचवेळी परस्पर सुरक्षा निर्माण होऊन इतर राष्ट्रांचा हस्तक्षेप टाळणे आवश्यक होते. नाझी आणि साम्यवादी चळवळींनी बऱ्याच लोकशाही राष्ट्रांमध्ये राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी सुरु केलेल्या इ.स. १९३६ च्या ब्युनोस आयर्स परिषदेनुसार सल्लागारात्मक करार करण्याची पध्दती सुरु झाली. इ.स. १९३८ मध्ये फिलिपाईन्स

प्रजासत्ताकाने लीमा जाहिरनामा स्विकारला आणि कोणत्याही अमेरिकन प्रजासत्ताकाची शांतता, सुरक्षा किंवा प्रादेशिक एकत्मता यांना धोका पोचवणार्या गोष्टींना विरोध करण्याचे आश्वासन दिले. अशाप्रकारे मन्रो सिध्दांताची अंमलबजावणी करण्यासाठीचा पाया घातला गेला व त्यासाठी अनेक अंगी प्रकीया राबविल्या जेणेकरुन लॅटीन अमेरिकेबाबत अमेरिकेचा प्रत्यक्ष डावपेच व त्यावरील संशय दूर होईल.

### १४.९.२ मेक्सिकोची उपाययोजना:

अमेरिकेच्या चांगले शेजारी धोरणांची परीक्षा आता मेक्सिकोबाबतच्या भूमिकेने ठरणार होती. मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष लाझारो कार्डीनास यांच्या तेथील परकीय देशांच्या संसाधनाचे मालकी हक्क काढून टाकण्याच्या कट्टर राष्ट्रवादी प्रशासनाने मोहिम राबविली. त्यामध्ये अमेरिकन व इंग्लड यांच्या तेल कंपन्याचा दीड अब्ज डॉर्लस मालमत्तेच्या समावेश होता. १८ मार्च तारीख मेक्सिकोची राष्ट्रीय सुटी होती. या मेक्सिकन सरकारच्या मालकी हक्क करण्याच्या मोहिमेला कायदेशीर आधार हा स्पेनच्या सिध्दांताचा होता. त्यानुसार मेक्सिकन कामगांरानी या परकीय तेल कंपन्याकडे केलेल्या मागण्या मान्य करणे आवश्यक होते. अमेरिकेमध्ये मालमत्ता अधिकार समर्थकांनी अमेरिकेमध्ये जबरदस्ती हस्तक्षेप करण्याची चळवळ सुरु केली व त्यांना रोमन कॅथॉलिकंचाही पाठींबा मिळाला. कारण कार्डीनास प्रशासन त्यांच्याही विरोधात होते. मेक्सिकन जहाल नेत्यांचा संघर्ष जो चांगले शेजारी संबंधातील राष्ट्रांच्या विरोधात होता सर्व लॅटीन अमेरिकेला मुकाट्याने पाहावा लागत होता.

अमेरिकन राज्यसचिव हल यांनी या संघर्षातून काळजीपूर्वक तोडगा काढण्याचे ठरविले. त्यांनी मेक्सिकोचा परकीय कंपन्याना मालकी हक्कापासून बेदखल करण्याचा हक्क मान्य केला व त्याचवेळी तेलकपंन्याना नुकसानभरपाई देण्याचा आग्रह धरला व अमेरिकन पैशातून मेक्सिकन चांदी खरेदी रद्द केली. तेल कपंन्याना देय नुकसान भरपाईसाठी एक संयुक्त आयोग नेमला. परंतु मेक्सिको सरकारने मूळ भांडवलाव्यतिरिक्त (जे कमी हिस्सा होते) नुकसानभरपाई देण्यास नकार दिला. नोव्हेबंर १९३८ मधील लीमा परिषदेमध्ये हल यांनी मेक्सिकोची योजना स्विकारली व तेलकंपन्यांच्या सर्व मागण्यांना अमेरिकेचा पाठींबा नाही हे सिध्द केले. पुढच्या तीन वर्षांच्या कालावधीत मेक्सिको सरकारने अमेरिकन मालाच्या आयातीवर जकात दर वाढविला आणि जर्मनीस तेल निर्यातीचे अनुकूल करार केले. इ.स. १९४१ च्या नोव्हेबंर मध्ये पर्ल हार्बर हल्ल्याच्या काही आठवडे अगोदर तेल कंपन्याना सहमतीशिवाय मेक्सिकन सरकारच्या ३५ दशलक्ष डॉर्लसचा आर्थिक परतावा स्विकारला. सूडवादी भूमिका दोन्ही देशांच्या सरकारांनी सोडून दिली आणि दुसऱ्या महायुध्दामध्ये मेक्सिको अमेरिकेच्या बाजुने सामील झाले.

कोणत्याही महासत्ताक देशाच्या शेजारील छोट्या राष्ट्राने मेक्सिकोच्या तुलनेत विजय मिळविला नव्हता. त्यामुळे आर्थिक साम्राज्यवादाच्या मार्क्सवादी व लेनिनवादी समजुतीच्या पूर्णत: विरोधी मेक्सिकोची भूमिका राहीली. त्यामुळे लॅटीन-अमेरिकन देशांना याची पुन्हा खात्री झाली की, 'चांगले शेजारी' धोरणाने आर्थिक शोषण आणि राजकिय व लष्करी हस्तक्षेपसुध्दा बंद होईल. त्यानंतर अमेरिकेने इ. स. १९३९ मध्ये ब्रझिलबरोबर करार केला आणि लॅटिन अमेरिकेमध्ये औद्योगिक विकासासाठी कर्ज दिले. त्यामुळे

अमेरिकन प्रभावक्षेत्राबाहेर प्रथमच ब्रझिल येथे पहिला पोलादी कारखाना सुरु झाला. कदाचित मेक्सिकोच्या परदेशी कंपन्याच्या मालकी हक्क बेदखल करण्याच्या मोहिमेचा मजेदार परिणाम असा झाला अमेरिकेच्या धोरणामध्ये आमूलाग्र बदल झाल्याचे दिसते. त्यांनी लॅटीन अमेरिकन देशांमध्ये आपल्या कंपन्यासाठी तेथील स्थानिक कुशल कामगार, सामाजिक कायदे स्विकारले तसेच आपल्या कर्मचार्यासांठी विकासात्मक कार्यक्रम सुरु केले. परिणामी मेक्सिकोचा दाखला इतर देशांनी स्विकारला नाही. शिवाय अध्यक्ष अविला कॅमाचो यांच्या कारकीर्दीत मेक्सिकोने अमेरिकेबरोबर सहकार्याची भूमिका घेतली.

### १४.९.३ अर्धगोलार्ध एकता :

परराष्ट्र नीतीबाबत 'चांगले शेजारी धोरण' हे रुझवेल्ट प्रशासनाचे भक्कम यश होते. इटलीच्या सिझम आणि जर्मनीच्या नाझीवादाच्या प्रभावाखाली आणि अमेरिकेला अर्धगोलार्धातून नेस्तनाबूत करण्याच्या महत्वाकांक्षेपोटी केवळ अर्जेटींनानेच अर्धगोलार्ध एकतेच्या विकासाला विरोध केला. कॅनडाला अमेरिकेने पुरविलेली नवीन सुरक्षा व्यवस्थेचे स्वागत केले. कारण रुझवेल्ट यांनी १८ ऑगस्ट १९३८रोजी अमेरिकेच्या जनतेसच आश्वासन दिले होते की, 'जर कॅनडाच्या प्रभुत्वाला धोका निर्माण झाल्यास अमेरिकन जनता निष्क्रीय बसणार नाही". जेव्हा जर्मनीकडून फ्रान्सचा पराभव झाला (१९४०) त्यावेळी अमेरिकन सुरक्षा यंत्रणा हवाना येथे कारवाईत गुंतली होती. त्याअंतर्गत २१ प्रजासत्ताकांनी कोणत्याही अमेरिकन वसाहतीच्या सरकारवर आक्रमण होऊ नये म्हणून आपली एकत्रित समिती स्थापन केली. अशा आणिबाणीच्या वेळी कोणतेही एक किंवा अधिक प्रजासत्ताक राष्ट्रे कारवाई करु शकत होती. इ.स. १९४१ मध्ये अमेरिका आणी ब्रझिल यांनी संयुक्तपणे डच गियाना यांस जेव्हा जर्मनीने कब्जा करण्याची धमकी दिली तेव्हा संरक्षण दिले.

हवानाची ही कृती आणि त्यानंतरची अर्धगोलार्ध एकता यांच्या वाढीने असे दाखवून दिले की 'चांगले शेजारी धोरणाने' विस्तारीत अर्थ म्हणजे आक्रमणाविरुध्द संयुक्त सुरक्षा होय. नेहमीप्रमाणेच अमेरिकेने आपली परराष्ट्र नीती प्रथम लॅटीन अमेरिकेबाबत ठरविली. त्यानुसार काँग्रेस अंतर्गत व बाह्य विलगतावादी यांच्या मते, अमेरिकन बंधनापासून ते ते प्रदेश मुक्त केले जातील.

### १४.९.४ जागतिक नि:शस्त्रीकरण परिषद १९३३:

आपल्या उद्घाटनपर परदेश नीतीबाबत रुझवेल्ट हे हिटलरला थोपविण्यासाठी जागतिक दृष्टीने सुरक्षा व ताबडतोब शांतीवादी राष्ट्रांबरोबर संघ स्थापन करण्याच्या विचारात होते. त्यानुसारच जिनीव्हा येथील नि:शस्त्रीकरण परिषदेत त्यांची भूमिका होती. परंतु लॅटीन-अमेरिका धोरणासाठी त्यांच्या करारांना सूट दिलेली होती. जून १९३२ मध्ये राष्ट्राध्यक्ष हुवर यांनी सर्व राष्ट्रांनी निशस्त्रीकरण करुन आपला साठा १/३ पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव ठेवला. त्यानंतर आलेल्या राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी हा प्रस्ताव जाहिररित्या स्विकारला आणि प्रतिनिधीत्व म्हणून नॉर्मन डेव्हिस यांना परिषदेसाठी पाठविले.

जानेवारी १९३३ मध्ये जर्मनीमध्ये हिटलर सत्तेवर आला व त्याला जर्मनीला लष्करीसज्ज करण्यापासून रोखण्यासाठी निश:स्त्रीकरण परिषदेत लवकरात लवकर निर्णय घेणे



munotes.in

आवश्यक बनले. परंतु फ्रान्सने शंका व्यक्त केली की, आपणावर आक्रमण झाल्यास त्याचे उत्तर देण्याची मुभा भविष्यात मिळावी व त्यासाठी अमेरिकेने तसा बदल करुन पुढाकार घ्यावा, त्यानुसार रुझवेल्ट यांनी बदल करुन घेतला.

दुसऱ्या महायुध्दात हिटलरमार्फत सुरुवात होण्याअगोदर त्यास रोखण्याचे अमेरिकेने प्रयत्न केले. जेव्हा हिटलरने परिषदेमधून माघार घेण्याची धमकी दिली तेव्हा रुझवेल्ट यांनी एक जागतिक आवाहन केले (१६ मे १९३३) व त्यामध्ये सार्वत्रिकरित्या विध्वंसक शस्त्राचा वापर न करण्याचे आवाहन केले व असा इशाराही दिला की, सदर परिषदेच्या अपयशाची जबाबदारी कोणत्याही राष्ट्राने घेऊ नये. त्यामुळे हिटलर थोडासा सामोपचाराने घेऊ लागला. परंतु मे २७, १९३३ रोजी परकीय संबंधाबाबतच्या सिनेट कमिटीने अशी सुधारणा सुचविली की आक्रमक राष्ट्र व त्यास बळी पडलेले राष्ट्र यांमध्ये अमेरिकेने मध्यस्थी करावी. खरे पाहिल्यास अलिप्तवादी गटाने अमेरिकेमध्ये शांतता राखण्यासाठी सुचविलेली नवी नीती होती.

सिनेटला सामोरे जाण्याऐवजी रुझवेल्ट यांनी हा मुद्दाच बाजूला ठेवला. कारण नसत्या वादविवादात पडण्यापेक्षा त्यांनी अंतर्गत कारभारावर लक्ष केंद्रीत केले. परंतु फ्रान्सने निशस्त्रीकरणास विरोध दर्शविला. शेवटी ऑक्टोबर १९३३ मध्ये हिटलरने निशस्त्रीकरण परिषदेमधून माघार घेतली व त्यातील हवाच काढून टाकली.

शस्त्रास्त्र कंपन्यांनीच केवळ अमेरिकेस युध्दात सहभागी होण्यास प्रवृत्त केले व त्यामुळे त्यांच्या चौकशीसाठी सिनेटने अत्यंत अलिप्ततावादी नेते (रिपब्लिकन) गेराल्ड ने यांची नियुक्ती केली. या कंपन्यांनी जनमत व सरकारी धोरणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला आणि म्हणून आंतरराष्ट्रीय शस्त्रास्त्र निर्मितीवर देखरेख ठेवण्यासाठी एखादी आंतरराष्ट्रीय समिती निर्माण होईल या दृष्टीने रुझवेल्ट प्रशासनाने गेराल्ड ने यांना सहकार्य देण्याचे ठरविले. परंतु गेराल्ड यांनी आपल्या अधिकारांचा वापर करुन अशी शहनिशा केली की, अर्थपुरवठाद्वार आणि शस्त्रास्त्र कारखानदार यांनी आपल्या व्यक्तिगत नफ्यासाठीच अमेरिकेस युध्दात ढकलले आहे.

### १४.९.५ तटस्थता कायदा, १९३५:

मुसोलिनीने इ.स. १९३५ मध्ये इथियोपियावर आक्रमण केले तेव्हा अमेरिकेस वाटले की, राष्ट्रसंघाने इथियोपियाला पाठींबा देऊन इटलीवर बंधने लादावीत. त्यासाठी अमेरिका राष्ट्रसंघास पूर्ण पाठींबा देईल व त्यासाठी हल यांनी शस्त्रीकरणाच्या मुद्यांना सोडून यासाठीचे एक विधेयक अलिप्ततावाद्यांच्या पाठींब्याने तयार केले. त्यामध्ये शस्त्रीकरणवाद्यांना त्यांचा पुरवठा अमेरिकन जहाजांद्वारे करण्यास बंदी घालण्याचा अधिकार अमेरिकन अध्यक्षांना मिळावा अशी तरतूद होती. तसेच अमेरिकन प्रवासी जे अशा जहाजातून प्रवास करतात त्यांनाही पाठींबा न देण्याची तरतूद होती. परंतु अशी परिस्थिती उद्भवल्यास समेट घडवून आणण्यासाठी कोणाची नेमणूक करावयाची याचेही अधिकार अध्यक्षांना मिळाले. त्यामुळे राष्ट्रसंघाच्या हवाल्याने अमेरिका इथियोपियास आपल्याकडील शस्त्रास्त्रे खरेदी करण्याची परवानगी देऊ शकत होती. मुसोलीनीने जेव्हा असे जाहीर केले की, त्याची सेना इथियोपियावर आक्रमण करण्यास सज्ज आहे, तेव्हा राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी १८ ऑगस्ट १९३५ रोजी एक खाजगी पत्र लिहीले व त्यास

युध्दापासून अलिप्त राहण्याची विनवणी केली. परंतु त्या हुकुमशहाने जेव्हा असे म्हटले की आता खूप उशीर झाला आहे व सेना अगोदरच युध्दभूमीकडे रवाना झाली आहे, तशातच त्यांने असेही म्हटले की, अमेरिकेचा याबाबतचा हस्तक्षेप युध्दाचे क्षेत्र वाढवू शकतो तेव्हा तर अलिप्ततावाद्यांना अतिशय भिती वाटू लागली.

### १४.९.६ तटस्थता कायदा, १९३६ : -

ब्रिटीश पंतप्रधान स्टॅनले बाल्डविन यांचे परराष्ट्र मंत्री सर सॅम्युएल होअर आणि फ्रान्सचे पंतप्रधान पियर लावल यांनी इथियोपियावरील मुसोलिनीच्या नियंत्रणासाठीचा करार केलेला होता. परंतु एकाएकी ब्रिटनच्या या धोरणामुळे होअर यांना पायउतार व्हावे लागले. २२ डिसेंबर १९३५ रोजी ॲन्थोनी इडन त्यांच्या जागी आले. रुसवेल्ट व हल यांनी पुढच्या काँग्रेसच्या अधिवेशनात पुढे येण्यासाठी त्यांना पाठींबा दिला व त्यासाठी आक्रमकांविरुध्द एकत्र येण्याचे धोरण ठरविण्याबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला. परंतु तरीही त्यांनी या मुद्द्यास अंतर्गत सुरक्षा व्यवस्था या सबबीखाली सोयीस्करपणे बगल दिली.

त्याऐवजी अस्तित्वात असलेलाच तटस्थता कायदा पुढे १ मे १९३७ पर्यंत वाढविण्यात आला. तशातच इतर एखाद्या राष्ट्राचा समावेश करण्यासाठी शस्त्रकरारामध्ये सुधारणा करण्याची योजना करण्यात आली. परंतु त्यामध्ये दुसरी एक तरतूद बाजुला सारली गेली की, जेव्हा युध्दजन्य परिस्थिती किंवा आक्रमक राष्ट्राविरुध्द कृती करण्याचे व आपली सत्ता वापरण्याचे अधिकार राष्ट्रध्यक्षास दिले गेले नव्हते.

अशा स्थितीत राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी २९ फेब्रूवारी १९३६रोजी तटस्थता कायद्यावर स्वाक्षरी केली आणि मुसोलिनीने यशस्वीरित्या इथियोपियावर ताबा मिळविला.

**आपली प्रगती तपासा**

१) टायडींग मॅकडफी कायद्यात (१९३४) कोणती योजना होती?

२) अर्धगोलार्ध एकता यावर टीप लिहा.

## १४.१० पुन:शस्त्रीकरण

ब्रिटिश सरकारमधून सामुदायिक सुरक्षेचा आधारस्तंभ गेल्यामुळे तसेच १२ मार्च १९३८ रोजी हिटलरने ऑस्ट्रिया आपल्या साम्राज्यात विलीन करुनही ब्रिटन व फ्रान्स यांनी कोणताही विरोध केलेला नव्हता. त्यामुळे रुझवेल्ट एकदम हलबल झाले. सदरच्या आक्रमणांविरुध्द त्रिवेणी (अमेरिका, इंग्लडं, व फ्रान्स) विरोध करण्याची त्यांना आशा उरली नसल्यामुळे अमेरिकन सुरक्षा वाढविण्यासाठी रुझवेल्ट शेवटी पुन: शस्त्रीकरणाकडे वळले. २८ जानेवारी १९३८ रोजी काँग्रेसला विशेष संबोधित करताना अवजड नौदल सज्जता कार्यक्रम व पॅसिफीक व अटलांटिक महारागरामध्ये नौदल कवायती करण्यासाठी विचारणा केली. त्यांच्या निवेदनात त्यांनी याचे कारण देताना म्हटले की, इतर राष्ट्रे भूभागावर व समुद्रसत्तेवर अगोदरच आक्रमण करीत असल्यामुळे जागतिक सुरक्षा व शांततेला धोका निर्माण झाला आहे व त्यासाठी आपला सहभाग आवश्यक आहे. इ. स. १९३४ मध्ये जपानने वाशिंग्टन नाविक करारातून माघार घेतली होती आणी इ. स. १९३५ साली जर्मन

नौदल पुन: शस्त्रीकरणास व अमर्याद पाणबुड्या बांधणी कार्यक्रमास इंग्लडंने सहमती दर्शविली होती. मग रुझवेल्ट यांनी इंग्लड व फ्रान्स यांच्यातील खाजगी चर्चांमध्ये त्यांना आपल्या नाविक कार्यक्रमाप्रमाणेच नौदल पुन:शस्त्रीकरण करण्यासाठी दबाव टाकला. काही अलिप्ततावादी गटांनी अध्यक्षांचा आंतरराष्ट्रीय हेतू उघड केला आणि द्विमहासागरी नाविक विधेयकास आक्रमणासाठी सदर नाविक दलाचा वापर न करण्याबाबत सुधारणा करुनही विरोध केला व त्यासाठी सामुदायिक सुरक्षेचे कारण दिले. दुसऱ्या अन्वयार्थाने रुझवेल्ट यांनी ही सुधारणा स्विकारली आणि १७ मे १९३८ रोजी कायद्यावर स्वाक्षरी केली. त्यानुसार २४ नवीन युध्दनौका आणि तेवढ्याच निम्न युध्दनौकांसह लष्करात आणि वायुसेनेमध्ये संख्यात्मक वाढीस मान्यता देण्यात आली. अशी तरतूद केली नसती तर अमेरिका समुद्री युध्दात अजिबात टिकू शकली नसती कारण जपानने पर्लहार्बरवर हल्ला केल्यानंतर बहुतेक सर्व जुन्या युध्दनौका नष्ट झाल्या.

## १४.११ म्युनिक करार

इ. स. १९३८ च्या उन्हाळ्यामध्ये हिटलरने मुसोलिनीच्या मदतीने झेकोस्लोव्हाकीया प्रजासत्ताकावर आक्रमण केले व त्याचा वणवा सर्व युरोपभर पसरला. चेंबरलेन यांनी हिटलर व मुसोलिनी यांना सामोपचाराने घेण्यासाठी बोलणी करण्यात पुढाकार घेतला. हिटलरने अगोदर झेकोस्लोव्हाकीयाचा सुडेटन हा जर्मनभाषिक प्रांत घेण्याचा जर्मनीस अधिकार आहे असा आदेश काढलेला होता व त्यामुळे जर्मनीस एक महत्वाची पर्वतीय सुरक्षा मिळणार होती. २२ सप्टेंबर १९३८ रोजी चेंबरलेन जर्मनीस हिटलरने सुडेटन शांतीपूर्वक ताब्यात घेण्यासाठी विनंती करण्यास गेले.

त्यामुळे हिटलरने ताबडतोब आपल्या मागण्या पुढे केल्या. चेंबरलेन यांना त्याच्या मागण्यांना होकार देणे कठीण होते. त्यामुळे हवाई हल्ल्यांनी प्रत्युत्तरासाठी सज्ज राहणे व नौदलास सुसज्ज राहण्याचे आदेश दिले आणि ब्रिटन फ्रान्स व रशियाच्याच बाजुने राहील असा इशारा हिटलरला दिला व फ्रान्स – इंग्लड, फ्रान्स-रशिया आणि रशिया-झेकोस्लोव्हाकीया अशी करारांची मालिका सुरु होईल असेही म्हटले. खरे पाहता आपला या तीन देशांना नैतिक पाठींबा देण्यासाठी एक आयतीच संधी चालून आली होती. २६ सप्टेंबर रोजी रुझवेल्ट यांनी युरोपियन नेत्यांना शांतीपूर्वक उपायांसाठी संदेश पाठविले. पण जेव्हा ब्रिटिश पंतप्रधान एयुआर्दो डेलडिए, मुसोलिनी आणि हिटलर २९ सप्टेंबर रोजी म्युनिक येथे भेटले, त्यावेळी फ्रेंच आणि ब्रिटिश नेते हिटलरच्या जुन्या मागण्यांशिवाय इतरही मागण्या मान्य करण्यास तयार झाले. ३० सप्टेंबर रोजीच्या म्युनिक कराराने झेकोस्लोव्हाकीयाचे सदस्यत्व रद्द केले गेले आणि त्या बदल्यात हिटलरने आपल्या मोहिमा शांतीपूर्ण मार्गानी चालविण्याचे आश्वासन दिले व झेकोस्लोव्हाकीयाचा असुरक्षित भाग विलीन न करण्याचे सांगितले.

चेंबरलेन यांच्या या म्युनिक कराराने जागतिक शांतीसाठी केलेल्या या प्रयत्नांचा मोठा प्रचार झाला. परंतु रुझवेल्ट यांच्या मतानुसार म्युनिक करारामध्ये झालेल्या विश्वासघाताने युध्दास अधिक गती प्राप्त झाली आहे आणि हुकुमशहांची भूक भागवणे कठीण असल्याची खात्रीसुध्दा पटली. म्युनिक करारानंतरच्या काही महिन्यांतच रुझवेल्ट यांनी डेमोक्रेटीक पक्षाची एकी वाढविण्याचे नेटाने प्रयत्न सुरु केले कारण तिला भगदाडच पडले होते.

म्हणूनच शस्त्रास्त्र करारातील मध्यस्थी करण्याच्या दृष्टीने त्यांनी सध्या अंतर्गत सुधारणांना थोडेसे बाजुला ठेवण्याचे ठरविले. त्यांनी संरक्षण खर्च वाढविला आणि लढाऊ विमानांचे उत्पादन वाढविले. नोव्हेंबरमध्ये हिटलरने आपल्या पाठीराख्यांना ज्यू लोकांवर दिवसाढवळ्या व रस्त्यारस्त्यावर अत्याचार करण्यास मुभा दिली. हिटलरचे प्रचारमंत्री जोसेफ गोबेल्स यांनी या कृतीस जर्मन जनतेची उत्स्फूर्त प्रतिक्रिया असे म्हटले. रुझवेल्ट यांनी असे जाहीर केले, 'माझा असा विश्वासच बसत नाही की, २० व्या शतकात अशा वंशवादाच्या घटना घडू शकतात" आणि त्यांनी जर्मना दूतावासातून अमेरिकन राजदूतास परत बोलाविले. अमेरिकन जनता आता जर्मन नाझी राजवटीस शिव्या शाप देऊ लागली कारण त्यांना अशा घटना कधीच माहिती नव्हत्या.

म्युनिक करारानंतर जपानचीही हिंमत वाढली. ३ नोव्हेबंर रोजी जपानने चीनचे विलीनीकरण करण्यासाठी 'पूर्व आशियातील नव कारकीर्द' असे जाहीर केले. रुझवेल्ट प्रशासनाने बोलणी करण्याचा प्रस्ताव नाकारला व त्या ऐवजी चीनला युध्दसामग्री खरेदी करता यावी म्हणून खाजगी आर्थिक मदत आणि २५ दशलक्ष डॉलर्सचे कर्ज देण्याचे ठरविले. १७ नोव्हेबंर रोजी ब्रिटन आणि कॅनडा यांच्यामध्ये घाईघाईने परस्पर व्यापारी करार झाले. डिसेंबरमध्ये लिमा येथील जाहिरनाम्याद्वारे हल यांनी अर्धगोलार्ध सुरक्षा मजबूत केली.

पुढे अमेरिकेने आपले अलिप्तता धोरण त्यागुन जपानने पर्लहार्बरवर हल्ला केल्यानंतर दुसऱ्या महायुध्दात उडी घेतली हे आपणास ठावूकच आहे व त्यानुसार जपानने शरणागती पत्करली, हिटलरला आत्महत्या करावी लागली. अमेरिका व दोस्त राष्ट्रांचा दुसऱ्या महायुध्दात विजय झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) पुन: शस्त्रीकरण यावर थोडक्यात प्रकाश टाका.

२) म्युनिक समस्येने जर्मनीस कोणता फायदा झाला?

३) मँडेट पध्दती म्हणजे काय?

४) जपानी स्थलांतरावर टीप लिहा.

## १४.१२ समारोप

आक्रमक राष्ट्रांच्या कारवाया तीव्र झाल्यामुळे सुरुवातीला अमेरिकेने बचावात्मक परराष्ट्र धोरण राबविले. परंतु पुढे दुसऱ्या महायुध्दातील घडामोडींनी अमेरिकन जनतेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला व रुझवेल्ट प्रशासनाने नि:शस्त्रीकरणाकडून पुन: शस्त्रीकरणाकडे वाटचाल सुरु केली. युध्दजन्य राष्ट्रांना कर्ज देऊन नफा कमावण्याचाही प्रयत्न केला. परंतु युध्द जेव्हा अमेरिकेच्या दारात आले तेव्हा अमेरिकेस युध्दात प्रत्यक्ष उडी घ्यावी लागली. जर्मनी व जपानने आपली सर्व आश्वासने धुडकावून लावून आक्रमणे करण्यास सुरवात केली. अमेरिकेस प्रत्यक्ष युध्दात सहभागी होण्यास तसेच कारण घडले. ७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बर येथील नाविक

तळावर हल्ला करुन तेथील सर्व आरमारी जहाजे बुडविली. त्यामुळे संतप्त झालेल्या अमेरिकेने युध्दात उडी घेतली. मे १९४५ मध्ये जर्मनीने शरणागती पत्करली. जपानला धडा शिकविण्यासाठी अमेरिकेने दि. ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अनुक्रमे जपानच्या हिरोशिमा व नागासाकी शहरांवर अणुबॉम्व टाकले आणि जपानचा विध्वंस केला. शेवटी जपानही शरण आला व दुसरे महायुध्द समाप्त झाले.

## १४.१३ प्रश्न

१) युरोपच्या संदर्भात अमेरिकन परराष्ट्र धोरण स्पष्ट करा.

२) अमेरिकेच्या 'चांगले शेजारी' धोरणाचे मूल्यमापन करा.

३) टीपा लिहा.

   अ) संयुक्त संस्थाने व लॅटीन अमेरिका

   ब) नि: शस्त्रीकरण

   क) मेक्सिकोची उपाययोजना

   ड) पुन: शस्त्रीकरण

   इ) म्युनिक करार

❖❖❖❖

munotes.in

# १५

# शीतयुध्द आणि परिणाम

**घटक रचना:**


१५.० उद्दिष्ट्ये

१५.१ प्रस्तावना

१५.२ युरोप आणि समावेशीकरणाचे धोरण

१५.३ युनोची निर्मिती प्रकीया

१५.४ सोव्हिएत साम्रज्यवादाचे स्वरुप

१५.५ ट्रुमन सिध्दांत

१५.६ आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धा

१५.७ मार्शल योजना

१५.८ बर्लिनची नाकेबंदी आणि 'नाटो'

१५.९ चीनचा पाडाव

१५.१० अमेरिकी वसाहतवादविरोध आणि चतु:सूत्री

१५.११ लॅटीन अमेरिका

१५.१५. कोरियन युध्द

१५.१३ युनो अंतर्गत अमेरिकन हस्तक्षेप

१५.१४ अमेरिकेअंतर्गत प्रतिक्रिया आणि मॅकआर्थर यांनी परत बोलावणे

१५.१५ पॅसिफीक महासागरात सत्ता बळकट करणे

१५.१६ व्हिएतनाम युध्द

१५.१७ क्यूबामधील पेचप्रसंग, १९६३

१५.१८ समारोप

१५.१९ प्रश्न


## १५.० उद्दिष्ट्ये

- शीतयुध्द कालीन अमेरिकेचे सर्वसामावेशीकरणाचे धोरण समजावून घेणे.
- ट्रुमन सिध्दांताचा अभ्यास करणे.
- अमेरिकेच्या मार्शल योजनेचे मूल्यमापन करणे.
- अमेरिकेच्या वसाहतवाद विरोधी धोरणाचे परीक्षण करणे.
- अमेरिकेच्या पॅसिफीक, व्हिएतनाम आणि क्यूबातील धोरणाचे विश्लेषण करणे.

munotes.in

## १५.१ प्रस्तावना

युध्द संपल्यावर ब्रिटन, अमेरिका आणि सोव्हिएट रशियातील युध्दकालीन सहकार्य फार दिवस टिकले नाही. गरजेपोटी हे सहकार्य करण्यात आले होते आणि एकदा गरज संपल्यावर त्यांच्यातील मतभेद स्पष्ट झाले. स्टॅलीनने साम्यवादाच्या विस्ताराची आपली योजना रेटण्यास सुरुवात केली. रशियन सैन्याने पोलंड आणि बाल्कन प्रदेश काबीज करुन तेथे आपल्या सोयीची सरकारे एकतर्फी स्थापन केली. जर्मनी कायम कमजोर रहावा अशी स्टॅलिनची इच्छा होती. कारण कमजोर जर्मनीपासून सोव्हिएट रशियाला कसलाही धोका संभवला नसता. दुसरीकडे जर्मनी सशक्त आणि स्थिर रहावा आणि तिला जगातील राष्ट्रांमध्ये तिचे योग्य स्थान मिळावे अशी अमेरिका आणि ब्रिटनची इच्छा होती. अशा रीतीने जागतिक राजकारणात दोन प्रतिस्पर्धी गट तयार झाले. एक गट सोव्हिएट रशियाचा आणि दुसरा अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांचा होता. त्यांना साधारणपणे साम्यवादी आणि भांडवलशाही गट असे संबोधण्यात येत असे. दोन गटांतील संबंध तणावपूर्ण असत, प्रत्येक गट दुसर्या गटाला शह देण्याचा प्रयत्न करत असे. दोन्ही गटांनी नव्याने आपली शस्त्रास्त्रे वाढवण्यास सुरुवात केली. अशा परिस्थितीमध्ये संकटांची आणि पेचप्रसंगांची एक मालिका कोसळल्याने उभयतांमधील संबंध अधिक तणावपूर्ण झाले. यांपैकी एकाही संकटाचे पर्यवसान महायुध्दात होण्याची शक्यता होती. दोन गटांतील या तणावपूर्ण वातावरणाला 'शीत युध्द' असे नाव दिले जाते.

## १५.२ युरोप आणि समावेशीकरणाचे धोरण

युध्द संपल्यानंतर लगेच स्टॅलिनने पोलंड, रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया आणि अल्बानिया या देशातील सरकारे आपल्या नियंत्रणाखाली आणली. हंगेरी आणि झेकोस्लोव्हाकिया मध्ये असेच करण्याचा त्याचा विचार होता. त्याने ग्रीस मधील राजेशाही समर्थक सरकारच्या विरोधात क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि तुर्कस्तानच्या काही प्रदेशावर आपला हक्क असल्याचा दावा केला. अर्थातच, बहुतेक सर्व युरोपभर स्टॅलिन आणि साम्यवाद्यांचे नियंत्रण येणे अमेरिकेला चालण्यासारखे नव्हते. मार्च, १९४७ मध्ये राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी कॉंग्रेसला ग्रीस आणि तुर्कस्तानला आर्थिक आणि सैनिकी मदत करण्यासाठी ४० कोटी डॉलरची मागणी केली. नंतरच्या थोपवण्याच्या धोरणातील हे पहिले पाऊल होते. ज्या देशातील सामान्य जनता देशातील सशस्त्र अल्पसंख्य गट किंवा बाह्य दडपण्याचा मुकाबला करत आहे तिला मदत करण्याचे अमेरिकेचे धोरण असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यांचे हे निवेदन ट्रुमन सिध्दांत या नावाने ओळखले जाते. ग्रीसमधील साम्यवादी उठावाचे दमन करण्यात आले आणि तुर्कस्तान सोव्हिएट नियंत्रणाखाली आले नाही.

ही तर नुसती सुरुवात होती. नोव्हेंबर, १९४७ मध्ये ट्रुमन यांनी कॉंग्रेसला मार्शल योजनेच्या अमंलबजावणीसाठी पुरेशी तरतुद करण्यास सांगितले. या योजनेचे औपचारिक नाव युरोपियन रिकव्हरी प्रोग्राम असे होते. १९४८ ते १९५२ या काळात या योजनेच्या अमंलबजावणीवर १,४०० कोटी डॉलर खर्च झाले. युरोपियन कोऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन मंडळ या योजनेवर देखरेख करत असे. आर्थिक सहकार्या नंतरचे तर्कशुध्द पाऊल सैनिकी कराराचे होते. एप्रिल, १९४९ मध्ये नॉर्थ अटलांटिक ट्रिटी

ऑर्गनायझेशन (नाटो) या संघटनेची स्थापना झाली. संघटनेच्या कोणत्याही सभासदावर झालेला सशस्त्र हल्ला सर्व सभासदांवरील हल्ला मानला जाईल असे स्पष्ट करण्यात आले होते.

डिसेंबर, १९५० मध्ये पश्चिम युरोपच्या रक्षणासाठी संघटनेचे संयुक्त सैन्य संघटीत करण्याच्या निर्णय घेण्यात आला. युरोपातील संघटनेच्या संयुक्त सैन्याचे पहिले सर-सेनापती जनरल आयसेन हॉवर होते. मार्शल योजना आणि नंतरच्या सैनिकी उपाययोजनांमुळे निदान तात्पुरते तरी युरोपातील साम्यवादाची मुंसडी थोपविण्यात आली होती. पश्चिम युरोपच्या आर्थिक परिस्थितीमध्ये लक्षणीय सुधारणा झाली होती.

## १५. ३ युनोची निर्मिती प्रकीया

अक्षराष्ट्रांविरुध्द लढणाऱ्या सर्व देशांच्या सरकारांची एक परिषद भरवून त्यामध्ये रुझवेल्ट यांच्या स्वप्नातील युनोची सनद लिहिण्याचे काम अध्यक्ष टु्मन यांनी ताबडतोब हाती घेतले. याल्टा परिषदेनंतर स्टॅलिनने सॅनफ्रान्सिस्को परिषदेसाठी तेवढासा रस दाखवला नाही आणि मोटोलोव्ह या परराष्ट्र मंत्र्याऐवजी प्रतिनीधी म्हणून निम्न दर्जाच्या रशियन अधिकाऱ्यास पाठविण्याचा प्रस्ताव ठेवला. अध्यक्ष रुझवेल्ट यांनी हा प्रस्ताव अगोदरच फेटाळला होता व नवीन अध्यक्ष टु्मन यांनी मोटोलोव्ह यांनीच येण्याचा आग्रह धरला. २५ एप्रिल १९४५ रोजी परिषद सुरु झाली व रशियन प्रतिनिधींनी सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्य देशांना नकाराधिकाबरोबरच आक्रमकांविरुध्द लष्करी बळाचा वापर करण्याचा अधिकार मिळावा असा युक्तिवाद केला. त्यातच अमेरिकन प्रतिनिधी हॅरी हॉपकीन्स मार्फत टु्मन यांनी स्टॅलीनशी संपर्क साधून आपल्या भूमिकेस त्याची सहमती मिळविली व पुढे परिषदेच्या यशाची खात्री पटली.

२६ जून रोजी युनोची सनद ५० राष्ट्रांना विचारविनिमयासाठी दिली गेली. शिवाय सुरक्षा परिषदेच्या पाच कायम सदस्यासह (अमेरिका, इंग्लड, रशिया, फ्रान्स आणि चीन) इतर सहा निर्वाचित सदस्य निवडण्यात आले. सनदेमध्ये महासभेचे सदस्य सर्व देश व त्यांना प्रत्येकास मतदानाचा अधिकार बहाल करण्यात आला व तेथील चर्चा झालेले विषय अंतिम निर्णयासाठी सुरक्षा परिषदेत पाठवण्यात येईल ही संयुक्त राष्ट्रांची (ळर्ध्) घटक अंगे पुढील प्रमाणे.

१) महासभा
२) सुरक्षा परिषद
३) सचिवालय
४) आंतरराष्ट्रीय न्यायालय
५) आर्थिक आणि सामाजिक परिषद
६) विश्वस्त परिषद
७) युनेस्को
८) आंतरराष्ट्रीय मजूर संघटना
९) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी
१०) जागतिक बँक (IBRD) इत्यादी

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेमध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य निर्माण करुन तंटे व वादविवाद सामंजस्याने सोडविण्याची योजना तयार केली. शेवटी २४ ऑक्टोबर, १९४५ रोजी ही सनद अंमलात आली व त्यानुसार कार्यवाही सुरु झाली. त्यामुळे युनोच्या निर्मिती प्रकीयेत अमेरिकेचा सिंहाचा वाटा होता हे आपणास विसरता येणार नाही.

## १५.४ सोव्हिएट साम्राज्यवादाचे स्वरुप

स्टॅलीनने अमेरिकेकडून जी अपेक्षा व्यक्त केली होती ती काही पूर्ण झाली नाही. रशियास युनो (UNRRA) अंतर्गत व खाजगी संस्थांकडून भरमसाठ आर्थिक मदत मिळाली. एवढेच नव्हे तर तिने आपले उधार-उसनवार खातेही तपासण्यास नकार तिला व त्याऐवजी व्यापारी जहाजे व युध्दापेक्षाही शांतीकाळात अधिक उपयोगी पडतील असे कारखानेही मिळाले. तिने आशियातील व पुर्व युरोपातील उद्योगावर कब्जा केला व लाल सैन्याच्या बळावर जर्मनीकडून भरमसाठ नुकसान भरपाई वसूल केली. याबरोबरच स्टॅलिनच्या मते, युध्दामधून रशियास एक बलाढ्य व सुरक्षित राष्ट्र म्हणून खरोखर बाहेर आणण्यासाठी आणि अमेरिकेच्या सद्हेतूची परीक्षा म्हणून अमेरिकन सरकारचे १० अब्ज डॉर्लसचे कर्ज रशियाच्या पुनर्रचनेसाठी आवश्यक आहे. परंतु स्वत:चे सद्हेतु स्टॅलिनने पाळले नाहीत. कारण आपल्या साम्रज्यवादास त्याने सुरक्षेचे कारण दिले. त्यांनी पूर्व युरोप आणि आशियास दिलेले वचन मोडले व इराणमधून वेळेच्या आत आपली लाल सेना हलवण्याच्या कराराचेही उल्लंघन केले.

अमेरिकेची पोलंडच्या प्रश्नावर स्टॅलिन बरोबर बोलणी चालू होती. परंतु स्टॅलिनने या देशांनी मैत्रीपूर्ण राहावे व रशियावर आक्रमण न करण्याची मागणी केली. खरे पाहता, स्टॅलिनची मैत्रीपूर्ण राहण्याची मागणी म्हणजे साम्यवादी वर्चस्व त्यांनी मान्य करावे अशी होती. परंतु तेथील साम्यवादी पक्षाच्या निवडणूकीत समान अधिकार नाकारले गेले व त्यांचा संपूर्ण पराभव झाला. त्यानंतर स्टॅलिनच्या मागणीनुसार तेथील निवडणुका रशियन धर्तीवर होऊ लागल्या.

फिनलँडने स्टॅलिनबरोबर करार करुन निवडणुकांचे नियंत्रण त्यांच्याकडेच दिले. युगोस्लाव्हीयामध्ये जोसेफ मार्शल टिटो हे साम्यवादी नेते स्थानिक व नाझी राजकीय पक्षाविरुध्द प्रचंड मतांनी विजयी झाले. पुढे त्यांनी साम्यवादी दहशतवाद मास्कोच्या सल्ल्याने राबविला. झेकोस्लोव्हाकिया सरकारनेही काही स्टॅलिनचे नियंत्रण मानले. पोलंड, हंगेरी, रुमानिया, अल्बानिया आणी बल्गेरिया येथे रशियन साम्यवादी सरकारे लादली गेली व त्यांच्या संरक्षणासाठी रशियन लाल सेना तैनात करण्यात आली. पुढे मग राज्यसचिव बायर्नस् यांनी डिसेंबर १९४६ रोजी रशियासह हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया आणि इटली यांच्याबरोबर शांती करारावर स्वाक्षरी केली.

जर्मनीचे लष्करी बळ हे जर्मनीस निष्क्रीय बनविण्यास कारणीभूत झाले होते. त्यामुळेच अगोदर जर्मनीचे निर्लष्करीकरण, त्यानंतर नाझी-मुक्त जर्मनी आणि शेवटी विजयी फौजांच्या माघारीनंतर जर्मनीस तटस्थ ठेवण्याच्या योजना आखल्या गेल्या. म्हणून बायर्नस यांच्यानंतर आलेले अमेरिकन राज्यसचिव जॉर्ज मार्शल यांनी जर्मनीची तटस्थता राखण्यासाठी रशियाबरोबर २५ वर्षाचा करार करण्याचा प्रस्ताव ठेवला. परंतु स्टॅलिनने

त्यास नकार दिला. म्हणूनच बर्लिन येथील दोस्त राष्ट्रांच्या नियंत्रण परिषदेने प्रस्तावित केलेल्या सार्वत्रिक धोरणास रशियन सदस्याने पाठींबा दिला नाही.

या चार महासत्तांनी (इंग्लड, फ्रान्स, अमेरिका व रशिया) केवळ नाझी नेत्यांना शिक्षा देण्यासाठी सहकार्य केले. त्यामुळे न्यूरेम्बर्ग येथे हिटलरच्या दहा जवळच्या सहकाऱ्यांना देहांत शासन, इतर सात जणांना तुरुंगवास व इतर तिघांना सोडून देण्यात आले. तसेच नाझी कार्यकर्त्यांना राजकारणातून पुरते हद्दपार करण्यात आले. चार विभागामध्ये (पूर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण) विभाजित करण्यात आलेल्या रशियन वर्चस्वाखालील भागाचे परस्पर पर्यवेक्षण करण्यास रशियाने नकार दिला व त्याचा सभोवताली 'पोलादी पडदा' निर्माण केला. एप्रिल १९४६ रोजी जर्मनीच्या मोठ्या राजकीय पक्षास जर्मन साम्यवादी पक्षात विलीन होण्यास भाग पाडले. त्यानुसार तेथील स्थानिक सरकारे अस्तित्वात येऊन पूर्व जर्मनीवर लाल सैन्याच्या संरक्षणाखाली रशियाने नियंत्रण मिळविले.

पश्चिम जर्मनीकडील दोस्त राष्ट्रांनी मोठ्या कारखान्यांचे विभाजन केले आणि छोट्या व्यापार-व्यवसायांना उत्तेजन दिले. परंतु रशियन अधिकाऱ्यांनी औद्योगिक उत्पादनांच्या बदल्यात आपल्याकडील खाद्यान्न पश्चिम विभागास देण्यास नकार दिला. त्यावेळी पश्चिमी विभागाने औद्योगिक वस्तूंचे उत्पादन वाढवून ते निर्यात करुन आलेल्या रकमेमध्ये खाद्यान्नाच्या गरजा भागविण्याचे ठरविले. याचा विपरीत परिणाम दोस्त राष्ट्रांच्या नियंत्रण परिषदेवर झाला व जर्मन जनतेला या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. परंतु रशियाला अशी भीती वाटत होती की, कदाचित लोकशाही व एकत्रित जर्मनी पश्चिमी विभागास जाऊन मिळते की काय, येथूनच रशियन गट (साम्यवादी) आणि अमेरिकन गट (लोकशाही-भांडवलशाही) यांच्यामध्ये 'शीतयुध्दास प्रारंभ' झाला.

## १५.५ ट्रुमन सिध्दांत

विन्स्टन चर्चिल यांच्याशी स्टॅलीन यांच्या झालेल्या समझोत्याच्या उलट साम्यवादी आता ग्रीसवर नियंत्रण मिळवण्यासाठी धावले. ग्रीकमधील साम्यवादी हे केवळ थोडेसे होते व त्यांनी राजेशाहीविरोधी गटाशी संधान बांधून इ.स. १९४६ च्या निवडणूकांमध्ये सहभागी होण्यास नकार दिला होता. त्यांनी युगोस्लाव्हिया आणि अल्बानिया येथील साम्यवादी सरकारांकडून आर्थिक व लष्करी मदत मिळविली. ब्रिटीश पाठींबा असलेल्या राजघराण्याविरुध्द यादवी युध्दाची योजना तयार केली. भरीस भर म्हणजे रशियाने तुर्कस्थान सरकारकडे कार्स आणि अर्दाहान प्रांताची मागणी व दार्दनेल्स सामुद्रधूनीमध्ये महत्वाचे स्थान या मागण्या केल्या होत्या. त्या विरोधात ब्रिटन तुर्कस्थानला पाठींबा देत होती. इंग्लंडच्या मजुर पक्षाचे पंतप्रधान ॲटली यांनी यापुढे इंग्लडवरील आर्थिक जबाबदारी कमी करण्याचे ठरविले. त्यांनी अमेरिकन सरकारला ३१ मार्च १९४७ रोजी इंग्लड ग्रीसची, तुर्कस्थानची आर्थिक मदत बंद करील असे कळविले. त्यामुळे यासाठीची पर्यायीव्यवस्था करण्याची जबाबदारी ट्रुमन यांनी घेण्याचे ठरविले. १५. मार्च १९४७ रोजी त्यांनी कॉंग्रेससमोर असे सांगितले की, बाहेरील घुसखोरीमुळे युनोच्या सदस्यांमध्ये आणि सरकारच्या सदस्यामध्ये अमेरिका बदल करण्यास परवानगी देऊ शकणार नाही. त्यांनी असा प्रस्ताव ठेवला की, बाह्य आक्रमणापासून किंवा गुलामगिरीच्या जोखडातून सशस्त्र उठाव करुन अथवा स्वातंत्र्यवादी चळवळी करुन मुक्त होऊ इच्छितात त्यांना पाठींबा दिला

जावा. म्हणून त्यांनी ग्रीस आणि तुर्कस्तानला ४०० दशलक्ष डॉर्लसची आर्थिक मदत आणि अमेरिकन लष्करी सहाय्याबरोबर तेथील नवसरकारांना प्रशासनात सल्ला देण्यासाठी अमेरिकन सल्लागार व तज्ञसुध्दा पाठविले जावेत हा प्रस्ताव काँग्रेसने मोठ्या बहुमताने मंजूर केला. या भक्कम अमेरिकन पाठींब्याने तुर्कस्थान रशियाच्या अवास्तव मागण्यांच्या विरोधात निर्भिड उभा राहिला आणि ग्रीस सरकारने साम्यवादी बंडखोरी मोडून काढली.

ट्रुमन सिध्दांताचे महत्व बहुआयामी होते. याने असे सिध्द झाले की, संयुक्त राष्ट्रांच्या पलीकडे राहून अमेरिका रशियाच्या साम्राज्यवादी प्रवृतीला आळा घालू इच्छिते. यावर टीकाही सर्वत्र झाली, परंतु संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यांना मिळालेला नकाराधिकार यामुळे एकतर्फी निर्णय घेणे कठीण होत होते आणि त्या पाचही सदस्यांना स्व-संरक्षणासाठी या अधिकारांचा वापर बहाल केला होता. हे नवीन धोरण म्हणजे ‘मन्रो सिदधांताचेच’ जुन्या जगासाठी विस्तारीकरण होते आणि पुढे त्यामध्ये अधिकाधिक देशांचा समावेश होणार होता. या सिध्दांताने हे सिध्द केले की, अमेरिका जागतिक (युरोपच्या) राजकारणातून जाणार नाही व रशियाने युध्दानंतर अमेरिका आपले अलिप्तता धोरण पुन्हा स्विकारील हा बांधलेला अंदाजही फोल ठरला. सर्वात महत्वाचे म्हणजे या धोरणास मिळालेल्या यशावरुन रशियाच्या साम्यवादी विस्तार तोडीस तोड देऊन अमेरिका थोपवू शकते आणि म्हणून सर्व समावेशीकरणाचे धोरण हे रशियाला कोंडीत पकडण्यासाठी राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली. अध्यक्षांनी असे दाखविले की, अंतर्गत सुधारणांमध्ये जरी आपणांस तितकेसे यश मिळाले नसले तरी परराष्ट्र धोरणामध्ये आपल्याकडे मोठे कौशल्य आणि धाडस आहे. अंतिमत: अमेरिकन जनतेने असे सिध्द केले की, ब्रिटीश साम्रज्याचा अंत झाला असला तरी आजही सदर देशांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे महत्वाचे आहे.

## १५.६ आण्विक शस्त्रास्त्र स्पर्धा

संयुक्त राष्ट्र संघ आंतरराष्ट्रीय स्तरावर काही परिणामकारक भूमिका निभावेल ही अमेरिकेची अपेक्षा फोल ठरली. कारण आण्विक शक्तीच्या आंतरराष्ट्रीय नियंत्रणासाठी सोव्हिएत रशियाने सरळसरळ नकार दिला. दुसर्या महायुध्दाच्या शेवटी शस्त्रास्त्र उत्पादन आणि आण्विक संशोधन याबाबतीत अमेरिका जगातील सर्व देशांपेक्षा प्रगत होती. अमेरिकेने जगाला एक उदार प्रस्ताव सादर केला ज्याद्वारे प्रत्येक देश आपली गुप्त संरक्षण प्रगती परस्परांना कळण्यासाठी शांतीपूर्व सहकार्याची खात्री देण्यात येणार होती.

१४ जून १९४६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या अणुउर्जा आयोगाचे प्रतिनिधी बर्नार्ड बरुच यांनी आंतरराष्ट्रीय अणु उर्जा आयोग आणि आंतरराष्ट्रीय अणु विकास प्राधिकरणाचा प्रस्ताव ठेवला ज्याद्वारे कोणत्याही सरकारच्या नकाराधिकाराच्या पलिकडे तपासणी नियंत्रण ठेवल्यास संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांच्या हितासाठी अमेरिका आपली संरक्षण गुपिते स्वाधीन करेल असे प्रस्तावित केले. त्याद्वारे अमेरिका आपला स्वत:चा अणु साठा स्वत: नष्ट करील आणि इतर कोणत्याही देशाला अणुबाम्ब तयार करण्यावर बंदी घालील. याद्वारे मानवमुक्तीसाठी एक नवा मार्ग सापडला आणि सर्व जगात अणु ऊर्जेचा वापर कल्याणकारी कामांसाठी करण्याचे ठरले. साम्यवादी देशांव्यतिरिक्त इतर सर्व देशांनी या प्रस्तावाचे

स्वागत केले. संयुक्त राष्ट्रांच्या रशियन प्रतिनिधीने बरुच प्रस्ताव नाकारला आणि आंतरराष्ट्रीय तपासणी व नियंत्रणाशिवायच आण्विक शस्त्रांस्त्रावर बंदी घालावी असा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावाचे वैशिष्ट्य म्हणजे साम्यवादी देशांमध्ये तेथील नागरिक व परदेशी यांच्यावर नियंत्रण केवळ साम्यवादी रशियास ठेवावयाचे होते. अनेक महिने चर्चा होऊनही रशियन सरकारने हा बरुच प्रस्ताव मान्य केला नाही.

फूच गुप्तहेर प्रकरणाने रशियाने अमेरिकेची संरक्षण गुपिते चोरल्याचे उघड झाले व रशियाला आण्विक स्पर्धा हवी असल्याचे सिध्द झाले. हिटलरच्या प्रचार खात्याप्रमाणे रशियानेसुध्दा आपणच खरे शांततावादी असून अमेरिकाच खरा युध्द पिपासू असल्याचा प्रचार सुरु केला. प्रगत देशांना ते खरे वाटले नाही. परंतु साम्यवादी पोलादी पडद्याआडच्या देशांना व गरीब – अशिक्षित जनतेस ते खरे वाटले. शास्त्रज्ञांच्या मते रशिया येत्या दशकात अणुबॉम्ब तयार करु शकेल असे वाटले होते परंतु २४ सप्टेंबर १९४९ रोजी हे स्पष्ट झाले की रशियाने अगोदरच यशस्वी अणुचाचणी केलेली होती. त्यामुळे जानेवारी १९५० रोजी ट्रुमन यांनी असे जाहिर केले की, अमेरिका यापुढे अधिक विनाशकारी हायड्रोजन बॉम्ब तयार करील व नोव्हेंबर १९५२ रोजी त्याचे यशस्वी परिक्षण केले.

## १५.७ मार्शल योजना

ट्रुमन प्रशासन रशियाच्या विस्ताराला आळा घालण्यासाठी ग्रीस व तुर्कस्थानची मदत होईल असे वाटले होते. इटली व फ्रान्समध्ये साम्यवादी पक्ष बळकट असल्याने त्यांच्या पुढील प्रसारास आळा घालण्यासाठी एखाद्या योजनेची आवश्यकता होती. एवढेच नव्हे तर ब्रिटनमध्ये सुध्दा लोकांची निराशाच झाली होती. त्यामुळे अमेरिकन सरकारने आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी एक योजना तयार केली. त्यामध्ये ११ अब्ज डॉलर्सची तरतुद करुन पश्चिम व दक्षिण युरोपच्या जनतेस दैनंदिन गरजेपोटी मदत देण्याचे ठरले. त्यामध्ये स्वतंत्र देशांच्या मूलभूत विकासासाठी तरतूद नव्हती. मुख्य प्रश्न असा होता की, भांडवलशाही, लोकशाही समाजवाद व त्यांचा मजूर पक्ष हे आर्थिक योजनांमार्फत खरोखर साम्यवादाच्या विस्तारास आळा घालू शकतील काय?

अमेरिका अत्यंत प्रगत होती व भांडवलशाहीशी अधिक एकनिष्ठ होती. आपणास राजकीय व लष्करी आवश्यकतेतून मजबूत दोस्त असावा, आपली अमेरिकन बाजारपेठ विकसित राहावी व लोकशाही वरील निष्ठा यासाठी अमेरिकेस रशियाला तोंड देण्यासाठी आवश्यक परकीय धोरण आखणे गरजेचे होते. जेव्हा स्टॅलिनने ९ फेब्रुवारी १९४६ रोजी असे जाहिर केले की, जोपर्यत जगात भांडवलशाही आहे तोपर्यंत शांती राहाणे अशक्य आहे, त्यावेळेस मास्को येथील अमेरिकन राजदूत जॉर्ज केन्नान यांनी रशियाचे आव्हान अधोरेखित केले. त्यामुळे धोरणात्मक नियोजन कर्मचाऱ्यांनी यांवर एक उत्तम उपाययोजना तयार केली आणि ५ जुन १९४७ रोजी राज्यसचिव मार्शल यांनी हार्वर्ड विद्यापीठातील भाषणातून ती जगासमोर मांडली.

ही मार्शल योजना आपली अर्थव्यवस्था बांधण्याची धडपड करणाऱ्या कोणत्याही देशासाठी एक तांत्रिक व आर्थिक संधी होती. ती योजना मागणाऱ्या देशासाठी अमेरिकेची एक पुनर्रचना योजना होती. मार्क्सवाद्यांनी अमेरिकेविरुध्द प्रचार केल्यानुसार भांडवलशाही ही

शोषणयुक्त, साम्रज्यवादी आणि युध्दपिपासू व्यवस्था आहे व त्याच्या नेमकी उलट ही मार्शल योजना होती.

मार्शल योजनेला प्रत्युतर म्हणून स्टॅलिनने ताबडतोब आपले परराष्ट्रमंत्री मोलोटोव्ह यांना ब्रिटन व फ्रान्सच्या परराष्ट्रमंत्र्यांना जून महिन्यात भेटीसाठी पाठविले. जेव्हा असे कळले की, मार्शल योजना त्यांच्या साम्रज्यवादी महत्वाकांक्षा पूर्ण करु शकणार नाही आणि पॅरिस परिषदेत अडथळा आणणे यात रशियन नेत्यांना अपयश आल्यामुळे मोलोटोव्ह परिषदेतून निघून गेले. त्यानंतर मार्शलच्या योजनेला पर्यायी योजना स्टॅलिनने तयार करण्याचे ठरविले. जुलै १९४७ मध्ये युरोपियन आर्थिक सहकार्य समिती स्थापन झाली. सप्टेंबर पर्यत त्यांनी २२ अब्ज डॉलर्स कर्ज व भेट यांबाबत आर्थिक पुनर्रचना योजना तयार केली.

मार्शल योजना काँग्रेसच्या मान्यतेसाठी सादर केली. त्यास नव-अलिप्ततावादी गटाने विरोध केला परंतु त्यांची ताकद तेवढी जास्त नव्हती. त्या योजनेला प्रत्यतर म्हणून स्टॅलिनने आंतरराष्ट्रीय साम्यवादी संघटना 'कोमीन्टर्न' (Communist Internation) ऑक्टोबर १९४७ मध्ये स्थापन केली. फेब्रुवारी १९४८ मध्ये झेकोस्लोव्हाकीयाचे युती सरकार साम्यवाद्यांमार्फत उलथवून टाकले आणि त्यावर साम्यवादी गटांचे वर्चस्व स्थापन केले. १ मार्च १९४८ रोजी सिनेटर वँडेनबर्ग यांनी रशियन साम्यवादाला रोखण्यासाठी मार्शल योजना आवश्यक असल्याचे समर्थनीय भाषण केले. १३ मार्च रोजी सिनेटने 'आर्थिक सहकार्य विधेयक' (मार्शल योजना) पारित केले आणि ३१ मार्च रोजी त्याला कायद्याचे स्वरुप दिले. त्याच वेळी सोव्हिएत रशियाने बर्लिनची नाकेबंदी केली होती आणि इटलीमध्ये साम्यवादी पक्षाचा निसटता पराभव झाला होता.

मार्शल योजनेने उभारलेल्या १५. अब्ज डॉलर्सचा चांगलाच परिणाम झाला. त्यामुळे तुर्कस्थान, ग्रीस व ब्रिटन आणि स्कँडीनेव्हिया यांसारख्या देशात औद्योगिक आणि कृषी पुनर्रचना झाली. त्यामुळे दक्षिण, पश्चिम व उत्तर युरोपमध्ये साम्यवादी प्रचार-प्रसारास आळा बसला व इटली व फ्रान्समध्ये साम्यवादी चळवळीस शह बसला. पुढे तर या योजनेचा वापर लष्करी संरक्षणासाठी (स्वातंत्र्य रक्षणासाठी) करण्यात आला.

## १५.८ बर्लिनची नाकेबंदी आणि नाटो (NATO)

स्टॅलिनने जर्मनीमध्ये आपला साम्यवादी जम बसविण्याचे ठरविले. त्यानुसार जर्मनी आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमात (मार्शल योजना) सहभागी होणार नसल्याचे इ.स. १९४७ रोजी जाहीर केले. पुढे असे स्पष्ट झाले की जर्मनीचे विभाजन किंवा संयुक्त जर्मनीवर रशियाचेच वर्चस्व हे वास्तव पश्चिमी सत्तांना स्विकारण्यावाचून पर्याय नव्हता. जून १९४८ मध्ये तर रशिया युध्दांच्या उंबरठ्यावर तयार होती. विभागीय कराराच्या विरोधात जाऊन रशियाने जर्मनीची नाकेबंदी केली. त्यामुळे पश्चिम जर्मनीच्या भागातून पूर्व जर्मनीस खाद्यान्न कोळसा आणि इतर जीवनावश्यक वस्तू आयात होत्या त्या बंद करण्यात आल्या. तो भाग (पू. जर्मनी) अमेरिका, इंग्लडं आणि फ्रान्स यांच्या देखरेखीखाली होता. अमेरिकेने पूर्व जर्मनीच्या २५ लाख लोकांसाठी हवाईमार्गे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा जवळजवळ एक वर्ष केला. त्यामुळे मे १९४९ मध्ये रशियास जर्मनीची नाकेबंदी उठवावी लागली.

परंतु अमेरिकेने आपल्या निश्चयाचा पुरावा या ठिकाणी दिला व पश्चिमी राष्ट्रे काय करु शकतात हे दाखवून दिले.

पुढे जाऊन अमेरिकेने स्वतंत्र देशांना अमेरिकेच्या गटात सामील होण्यास सांगितले व तसा संरक्षण करार करण्याचे सुचविले. कारण रशियाच्या दृष्टिकोनाने केव्हाही युध्द होऊ शकते अशी परिस्थिती होती व अमेरिका, इंग्लडं व फ्रान्स यांच्या ताब्यातील जर्मनीच्या भागास स्वातंत्र्य देण्याचेही ठरविले ज्यामुळे रशियन ताब्यातील प.जर्मनीच्या भागासही स्वातंत्र्याची प्रेरणा मिळेल अशी योजना होती. मार्च १९४७ रोजीच इंग्लड आणि फ्रान्स यांनी लष्करी करार केलेला होता व एका वर्षानंतर बेल्जियम, नेदरलँडस आणि लक्झेम्बर्गसुध्दा त्यांच्यात सामील झाला. याच देशांनी पुढे ४ एप्रिल १९४९ रोजी अमेरिका, इटली, पोर्तुगाल, डेन्मार्क, नॉर्वे, आइसलँड आणि कॅनडा यांच्याबरोबर वॉशिंग्टन येथे नाटो (NATO-North Atlantic Treaty Organisation) करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या कराराचा मुख्य गाभा असा होता की, या बारा राष्ट्रांपैकी कोणत्याही एका राष्ट्रावर जरी हल्ला झाला तर तो सर्वं राष्ट्रांवरील आक्रमण समजले जाईल यावर सर्वसंमती तयार झाली. या लष्करी कराराची मुख्य जबाबदारी जनरल ड्वाईट आयसेनहावर यांच्यावर डिसेंबर १९५० रोजी सोपविण्यात आली. फ्रान्सला अनेक शंका असल्यामुळे फ्रान्स, इंग्लड व अमेरिका यांच्या वर्चस्वाखालील पश्चिम जर्मनी फेडरल रिपब्लिकची स्थापना करण्यात आली. ऑगस्ट १९४९ च्या मुक्त निवडणुकांमध्ये जर्मनीमध्ये सरकार स्थापन करण्यात आले आणि कोनार्ड ॲडेनॉर हे चॉन्सलर बनले. नोव्हेंबर १९४९ मध्ये फ्रान्स इंग्लड आणि अमेरिका यांच्या जर्मनीतील आयुक्तांनी तेथील फेडरल सरकारशी पिर्ट्सबर्ग करारावर स्वाक्षरी केल्या आणि अंतर्गत कारभारासाठी संपूर्ण स्वातंत्र्य बहाल केले. जर्मनीतील रशियन प्रभावक्षेत्राचे (पूर्व जर्मनी) निवडणूका न घेताच रशियन साम्यवादी प्रभावशाली 'पूर्व जर्मन डेमोक्रॅटीक रिपब्लिक' स्थापन केले गेले. इ.स. १९५५ मध्ये पश्चिम जर्मनी डेमोक्रॅटीक रिपब्लिक स्थापन केले आणि मर्यादित अधिकार देऊन त्याला नाटोमध्ये स्वसंरक्षणाच्या दृष्टीने सामील करण्यात आले.

अशा प्रकारे इ.स. १९५० पर्यंत रशियन प्रभावक्षेत्राखालील राष्ट्रे आणि इतर युरोपियन राष्ट्रे यांच्यामध्ये एक सरहद्द रेषा तयार झाली परंतु त्यासाठी रशियाने नेहमीच सार्वत्रिक युध्दजन्य परिस्थिती तयार केली. त्यामुळे साम्यवादी रशियन गट आणि लोकशाही-भांडवलशाही युरोपियन राष्ट्रे यांच्यामध्ये शीतयुध्द सुरु झाले व शस्त्रास्त्र स्पर्धेला पेव फुटले. त्यातच स्वातंत्र्याच्या प्रेरणा घेऊन युगोस्लाव्हियाने मार्शल टिटो यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी रशियाचे वर्चस्व झुगारुन इ.स. १९४८ रोजी स्वातंत्र्य घोषित केले. इ.स. १९५१ मध्ये अमेरिकेने युगोस्लाव्हियास मदत पुरविली. त्यानंतर तीन वर्षांनी टिटो यांनी ग्रीस व तुर्कस्थान या पश्चिमधार्जिण्या देशांशी स्वसंरक्षणात्मक करार केला. ५ जुलै १९४८ रोजी अमेरिकन सिनेटने नाटो करारास मान्यता दिलेली होती व त्यामुळे त्याच्या सदस्य राष्ट्रांना लष्करी मदतही सुरु झालेली होती. १९५० पर्यंत अमेरिकेने रशियन साम्यवादी प्रभाव कमी करण्याचे प्रयत्न जोरदार सुरु केले होते.

## १५.९ चीनचा पाडाव

इ.स. १९५० मध्ये स्टॅलिनने आपले लक्ष युरोपमधून अतिपूर्वेकडे वळविले. कारण चीनमध्ये चँग कै शेक राष्ट्रीय सरकारचे साम्यवाद्यांना नेस्तनाबूत करण्याचे प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळे त्यांनी आपले प्रभावक्षेत्र वाढविण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यातच जपान व इतर साम्रज्यवादी राष्ट्रांचा मुकाबला करण्यात चीनच्या राष्ट्रीय सरकारपेक्षा साम्यवादीच अग्रेसर होते. त्यातच चँग कै शेकला बळकट करण्याचे अमेरिकेचे सर्व प्रयत्न फोल ठरले होते. परंतु जपानला चीनमध्ये शरणागती पत्करावी लागली होती. स्टॅलिनने चीनच्या राष्ट्रीय सरकारबरोबर (चँग कै शेक) करार करताना आपणास चीनमध्ये कोणताही रस नसल्याचे भासविले. परंतु गुप्तपणे जपानचा तेथील शस्त्रसाठा चीनी साम्यवाद्यांना पोचविण्याची व्यवस्था केली. इ.स. १९४५ मध्ये ट्रुमन प्रशासनाने जनरल मार्शल यांना चीनमध्ये साम्यवादी व राष्ट्रीय सरकार यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी पाठविले. परंतु एक वर्ष प्रयत्न करुनही त्यांना यश मिळत नव्हते. तरीही त्यांनी राष्ट्रीय सरकारला २ अब्ज डॉलर्सची पैसा व वस्तू स्वरुपात मदत पुरविली.

इ.स. १९४७ च्या सुरुवातीला चीनमध्ये गृहयुध्दास सुरुवात झाली. शेवटी ट्रुमन प्रशासनाने जनरल आल्बर्ट विडीमेयर यांना समझोत्यासाठी चीनमध्ये पाठविले. परंतु त्यांच्या अहवालात असे कळले की राष्ट्रीय सरकार विश्वासार्हता गमावून बसले आहे तेव्हा साम्यवाद्यांचा विजय होऊ नये व रशियन वर्चस्व निर्माण होऊ नये म्हणून मांचुरिया ताब्यात घेऊन चीनला आर्थिक मदत देण्यास सांगण्यात आले. परंतु मार्शल या अमेरिकन राज्य सचिवांनी ती मदत देण्यास संकोच केला व ५०० दशलक्ष डॉलर्श मदतीपैकी ४०० दशलक्ष रोखण्यात आले. काँग्रेसनेही असे मत व्यक्त केले की, ही सर्व मदत वाया जाणारी आहे व चीन सरकार त्यास लायक नाही.

त्याचा परिणाम असा झाला की जमीनदारांवर मात करुन साम्यवाद्यांनी पूर्व चीनमध्ये आपले वर्चस्व निर्माण केले. त्यांनी एप्रिल १९४९ मध्ये राष्ट्रीय सरकारची राजधानी नानकींग ताब्यात घेतली व पुढील ऑक्टोबरमध्ये चीनचे प्रजासत्ताक घोषित केले. त्याचे अध्यक्ष म्हणून माओ-त्से-तुंग आणि पंतप्रधान म्हणून चौ-एन-लाय यांची निवड झाली. चँग कै शेकला फॉर्मोसा बेटावर पळून जावे लागले व तेथेच (तैवान) आपले राष्ट्रीय सरकार त्यांनी चालविले. नवीन चीनी साम्यवादी राज्यास स्टॅलिननी ताबडतोब मान्यता दिली व त्यात इतर राष्ट्रांबरोबर इंग्लडनेही होकार दिला परंतु अमेरिकेने होकार दिला नाही. पुढे फेब्रुवारी १९५० रोजी माओ यांनी रशियाबरोबर परस्पर सहकार्याचा करार केला.

## १५.१० अमेरिकी वसाहतवाद विरोध आणि चतु:सूत्री

जगातील काही राष्ट्रांनी उदा. उत्तर आफ्रिका, इस्त्रायल, भारत, ब्रम्हदेश, श्रीलंका आणि कोरीया यांनी जेव्हा वसाहतवादी देशांचे वर्चस्व झुगारुन स्वातंत्र्य मिळविले तेव्हा त्या देशांना अमेरिकेने आपल्या वसाहतवादी मित्रराष्ट्रांच्या विरोधात जाऊन पाठींबा दिला. फ्रेंचांपेक्षा ब्रिटीश हे आपल्या वसाहतीतून निघून जाऊन त्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्यात अग्रेसर होते.

अमेरिकन अध्यक्ष ट्रुमन यांनी जगातील स्वातंत्र्यवादी देशांना नैतिक पाठींब्यापेक्षा आर्थिक पाठींबासुध्दा दिला व आपली चतु:सूत्री घोषित केली. चीनमध्ये साम्यवाद्यांचा विजय झाल्यामुळे रशियन साम्यवाद्यांच्या भांडवलशाही-लोकशाही राष्ट्रांच्या विरोधी प्रचाराला तोंड देण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. त्यांच्या मते, साम्यवाद हा व्यक्तिस अत्यंत हतबल समजतो आणि त्यामुळे साम्यवादी समाजरचना त्यास आवश्यक वाटते. याउलट लोकशाही व्यक्तिच्या बौध्दिक कुवतीचा, त्याच्या मानवी हक्कांचा व तारतम्य बुध्दिचा आदर करुन व्यक्तिच्या हातातच लोकशाहीद्वारे सत्ता देण्याची संकल्पना बाळगते. साम्यवाद काही कायदेशीर पध्दतीशिवायच व्यक्तिला शिक्षा देते आणि राज्याचा नोकर समजून कामाला जबरदस्ती जुंपते. साम्यवादच असे ठरवतो की, उत्पादन जोपासावे, कोणत्या नेत्याचे अनुकरण करावे किंवा कोणता विचार करावा याउलट लोकशाही ही व्यक्तिच्या भल्यासाठी तिचे हक्क अबाधित ठेवणे व त्यांचे रक्षण करण्यासाठी आणि तिचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी काम करते. त्यांच्या चौथ्या मुद्यामध्ये त्यांनी अमेरिकेच्या परराष्ट्रनितीमध्ये महत्वाच्या बाबींचा समावेश केलेला आहे. ट्रुमन यांनी अमेरिकेची वैज्ञानिक व औद्योगिक प्रगती करण्यासाठी एक आदर्शवादी व वास्तववादी कार्यक्रम घोषित केला. त्याद्वारे संयुक्त राष्ट्रांची मदत घेऊन मार्शल योजेनेपेक्षाही मोठा आर्थिक सहकार्य कार्यक्रम आखला. त्यामध्ये अशी तरतूद होती की, अमेरिकन खाजगी भांडवल हे सुरक्षित ठेवून मागासलेल्या किंवा अविकसित देशांची प्रगती करण्यासाठी गुंतविण्यात येईल.

त्यानुसार संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेची ४ मार्च १९४९ रोजी स्थापना करण्यात आली. तेव्हा पुन्हा सोव्हिएत पोलादी पडद्या मागील राष्ट्रांनी सहकार्य करण्यास नकार दिला. ५ जून १९५० रोजी अमेरिकन अध्यक्षांनी आंतरराष्ट्रीय विकासासाठी कायद्यावर सह्या केल्या. त्यानुसार तंत्रज्ञांनाची गटागटाने लॅटीन अमेरिकेकडून आफ्रिका, मध्य-पूर्व व अती पूर्वेकडे रवानगी करण्यात आली. चार कलमी कार्यक्रमाने जवळजवळ ३४ देशांमध्ये विकासाला चालना दिली. तेथील आरोग्य सुविधा, खाद्यान्न पुरवठा, वीज, औद्योगिक व सामाजिक सेवा – सुविधा यांवर भर देण्यात आला. सदर कार्यक्रमाची परिणामकारकता आणि लोकप्रियता वाढतच गेली. तसेच सोव्हिएत रशियाचा अमेरिकन 'आर्थिक साम्रज्यवादाचा' आरोप काहीसा धूसर पडू लागला व लोकांचा तो संशय दूर होत गेला. त्यामुळे चार कलमी कार्यक्रम हा ट्रुमन प्रशासनाच्या परराष्ट्रीय धोरणाचा अत्यंत विधायक असा कार्यक्रम होता. त्यादृष्टीने त्याचे महत्वपूर्ण स्थान आहे.

## १५.११ लॅटीन अमेरिका

संयुक्त संस्थानानी (अमेरिका) लॅटीन अमेरिकेतील एकी टिकविण्याच्या दृष्टीने चांगले शेजारी धोरणांतर्गत सतत प्रयत्न केले. पर्ल हार्बर दुर्घटनेनंतर लॅटीन अमेरिकेतील बारा प्रजासत्ताकांनी जपानविरुध्द ताबडतोब युध्द घोषित केले व त्यात ब्रझिलने महत्वाची भूमिका बजावली. तिने जर्मन पाणबुड्यांविरोधात अमेरिकेस आपल्या सागरी क्षेत्रात नाविक तळ उभारण्यास सहाय्य करुन सैन्यमदतही केली. दरम्यान अर्जेंटीनामध्ये लोकशाही विरोधी लष्करी सरकार आले त्यामुळे अमेरिकेने सुरुवातीस त्यास मान्यता दिली नाही. परंतु फेब्रुवारी १९४५ रोजी मेक्सिको शहरातील भरलेल्या अमेरिकन राष्ट्रांच्या परिषदेमध्ये अक्षराष्ट्रांविरुध्द युध्दात सामील होण्यासाठी अर्जेंटीनाला पाचारण करण्यात आले. त्यानुसार मार्च २७, १९४५ मध्ये तिने जपान – जर्मनी विरुध्द युध्द पुकारले.

त्याचा परिणाम असा झाला की, अर्जेंटीनाच्या संयुक्त राष्ट्रांतील प्रवेशास रशियाचा विरोध डावलून अमेरिकेने पाठींबा दिला.

अर्जेंटीनातील लष्करी सरकार दूर करण्याचे प्रयत्न केले गेले. त्यामुळे अति राष्ट्रवादी आणि अमेरिका विरोधी नेत्यांना तेथील जनतेचा पाठींबा मिळू लागला. कर्नल ज्युआन पर्सन यांना अमेरिकेचा विरोध असताना अर्जेंटीनीयन जनतेच्या पाठींब्यावर ते राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले व त्यामुळे अमेरिकन राजदूतास परत बोलावले गेले.

पुढे अर्जेंटीनास १५ ऑगस्ट १९४७ रोजी रिओ डी जानेरो येथे परिषदेमध्ये कायम सुरक्षा यंत्रणा उभारण्यासाठी बोलावण्यात आले व त्यानुसार करारही स्वाक्षरीत केला गेला. त्यानुसार कोणत्याही सदस्य राष्ट्रांवर आक्रमण झाल्यास त्याविरुध्द लष्करी कारवाई करण्याचे ठरले गेले. पुढे एकशाही अंमलाखाली दबलेल्या अर्जेंटीनियन जनतेने ज्युआन पर्सन यांचे लष्करी प्रशासन इ.स. १९५५ मध्ये उधळून लावले. त्याबरोबरच फॅसिवाद व नाझीवाद लॅटीन अमेरिकेमधून नष्ट झाला. परंतु ग्वाटेमालामध्ये साम्यवाद्यांच्या गुप्त सत्तांतर कटास हाणून पाडल्यामुळे अमेरिकेने तेथील साम्यवादविरोधी गटास आपला पाठींबा दिला.

शीतयुध्दकालीन अमेरिकन परराष्ट्रीय धोरणाच्या वेळी लॅटीन-अमेरिकन देशाच्या प्रमुख समस्या या बहुधा आर्थिक आणि मानसिक स्वरुपाच्या होत्या. कॅनडाच्या सोबत बऱ्याच लॅटीन अमेरिकन देशांनी आपणास अमेरिकन प्रशासनाने प्रमाणाबाहेर गृहीत धरलेले आहे अशी तक्रार केली. त्यातच अमेरिका लॅटीन-अमेरिकेतील आयात हव्या त्या प्रमाणात करण्यात यशस्वी झाली नाही. त्यामुळे तेथील उत्पादकांचे आर्थिक नुकसान झाले. अमेरिकन खाजगी गुंतवणुकदारांनी कॅनडामध्ये औद्योगिक विकासास चालना दिली व तेथील अमेरिकन चलनातील फरक भरुन काढला. परंतु इतर लॅटीन अमेरिकन राष्ट्रे कॅनडाशी बरोबरी करु शकत नव्हती. तसेच लॅटीन अमेरिकन जनतेच्या राष्ट्रवादी भावनांचा उद्रेक रोखून धरण्यासाठी अमेरिका कोणती पावले उचलील याविषयी नक्की निर्णय होऊ शकत नव्हता. तरीदेखील अमेरिकेने आपली चांगले शेजारी धोरण राबवुन वसाहतवादविरोधी धोरण राबविल्याचे दिसते.

**आपली प्रगती तपासा:**

१) मार्शल योजनेवर भाष्य करा.

२) अमेरिकेची 'चतु:सूत्री' धोरण काय होते?

## १५.१५ कोरियन युध्द

कोरियन युध्दाने (जुलै १९५० ते जुलै १९५३) मात्र अमेरिकेच्या सहनशक्तीचा अंत झाला. कारण अमेरिका दुसर्या महायुध्दानंतर युध्द टाळण्यासाठी प्रयत्न करीत होती. परंतु अशी परिस्थिती निर्माण झाली की, अमेरिका युध्दाच्या मानसिकतेकडे ओढली गेली, त्यामुळे ट्रुमन प्रशासनविषयी असंतोष फैलावून इ.स. १९५२ मध्ये आयसेन हावर अध्यक्षपदी विराजमान झाले. या युध्दातील अमेरिकी पोलीसी कारवाईत जवळजवळ १,४०,००० अमेरिकन जखमी झाले. तसेच जागतिक सुरक्षा संघटना म्हणून संयुक्त राष्ट्र संघाची सुध्दा परीक्षा झाली.



munotes.in

कोरीयन प्रश्नामध्ये १९५० पूर्वीच शीत युध्दाची कारणे आढळतात. जपानच्या पराभवानंतर कोरीयास स्वातंत्र्य मिळावे याबाबत तीन बलाढ्य राष्ट्रांच्या नेत्यांचे एकमत होते. त्यानंतर रशियन लाल सेनेने उत्तर कोरीयावर नियंत्रण मिळविले व दक्षिण कोरीयामध्ये अमेरिकन प्रभावाखालील शासन होते. या दोन्ही गटांनी तेथे आपआपले वर्चस्व लादण्याचे प्रयत्न केले. संयुक्त राष्ट्रांमध्ये हा प्रश्न गेल्यावर त्यांनी मुक्त वातावरणात निवडणुका घेण्यासाठी आयोग नेमला. रशियाने उत्तर कोरीयात प्रवेश करण्यास आयोगाला नकार दिला. परंतु दक्षिण कोरियामध्ये निवडणुका होऊन अमेरिकन धार्जिणे ही निवडुन आले व त्यानी उदार प्रजासत्ताक घटना स्विकारली. उत्तर कोरियात साम्यवाद्यांनी एकपक्षीय निवडणुकीद्वारे 'पिपल्स डेमोक्रॅटीक रिपब्लिक' स्थापन केले. डिसेंबर १९४८ मध्ये रशियन लाल सेना तेथून मागे घेण्यात आली आणि जून १९४९ मध्ये अमेरिकन लष्करही माघारी बोलावण्यात आले. तरीदेखील नंतरच्या काळात संयुक्त राष्ट्रांच्या आयोगाने उत्तर आणि दक्षिण कोरियात समेट घडविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

दक्षिण अमेरिकेच्या लष्करी कारवाईच्या मागणीस अमेरिकेने नकार दिला. त्यामुळे काही अमेरिकन संसद सदस्यांनी रशियाच्या पुढे नांगी टाकल्याची ट्रुमन प्रशासनावर टिका केली. तशातच कोरियातील दोन्ही गटांना परस्परविरुध्द आक्रमणाची भिती वाटत होती. परंतु अमेरिकेने आपली कोणताही हस्तक्षेप न करण्याविषयी घोषणी इ.स. १९५० रोजी केली. त्या घोषणेने फार्मोसा-चीन, ॲल्युशियन बेटे व जपान आणि फिलीपाइन्स आणि कोरिया यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

परंतु अमेरिकेच्या या हस्तक्षेप न करण्याच्या घोषणेने रशियाच्या दक्षिण कोरीयावरील आक्रमण करण्यास खतपाणी मिळेल अशी टीका करण्यात आली. परंतु आपल्या संरक्षक भिंतीच्या पलीकडची सुरक्षेची जबाबदारी संयुक्त राष्ट्रांनी घ्यावी असेही राज्यसंचिवानी स्पष्ट केले होते. याचाच अर्थ असा की संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने मात्र अमेरिका हस्तक्षेप करु शकत होती. त्यामुळे रशियाने या भाषणाचा अर्थ सोयीस्करपणे काढला होता.

## १५.१३ युनो अंतर्गत अमेरिकन हस्तक्षेप

२४ जून १९५० रोजी उत्तर कोरियाचा दक्षिण कोरीयावरील हल्ला झाल्याची बातमी ट्रुमन यांना समजली. ताबडतोब संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची बैठक बोलावण्याची व्यवस्था केली गेली. त्यानुसार रशियन नेतृत्वाखाली उत्तर कोरीयन फौजांनी जैसे थे परिस्थितीमध्ये ताबडतोब आक्रमण थांबवण्याचा सुरक्षा परिषदेने आदेश देण्याची अपेक्षा केली गेली. त्यामुळे तसा आदेशही देण्यात आला. त्याचवेळी ट्रुमन यांनी अमेरिकन जनरल मॅक आर्थर यांना दक्षिण कोरीयास हवाई दल बचावासाठी ताबडतोब लष्कर पाठविण्यास सांगितले. अमेरिकेचे सातवे आरमार चीनी राष्ट्रवादी आणि साम्यवादी घुसखोरी रोखण्यासाठी फार्मोसा सामुद्रधूनीकडे रवाना केले. ज्यावेळी दक्षिण कोरीयाची संरक्षण यंत्रणा कोलमडल्याची बातमी आली तेव्हा जनरल मॅकआर्थर यांना ताबडतोब सुरक्षेसाठी योग्य पावले उचलण्याचे आदेश देण्यात आले. शेवटी २७ जून १९५० रोजी रशियन प्रतिनिधीच्या गैरहजेरीमध्ये युनोच्या सुरक्षा समितीने दक्षिण कोरीयास सर्व तर्हेने पाठींबा देण्याचा ठराव एकमताने पारित केला. ३० जून रोजी राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी



munotes.in

अमेरिकन पायदळास दोन तुकड्या दक्षिण कोरीयास पाठविण्याची मॅकआर्थर यांची विनंती मान्य केली.

जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच सार्वभिक सुरक्षेच्या बाबतीत एखाद्या देशावर झालेले आक्रमण ताबडतोब परतवुन लावण्याची कारवाई युनोतर्फे करण्यात आली होती. त्याचवेळी ट्रुमन यांनी हे युध्द दक्षिण कोरीयापुरतेच मर्यादित ठेवण्याचे प्रयत्न केले आणि चँक कै शेकने (चीन) देऊ केलेली लष्करी मदत नाकारली आणि रशियावर प्रत्यक्ष आक्रमण केल्याचे आरोप करण्याचेही नाकारले. इंडोचायना मधील फ्रेंच आणि फिलिपाईन्स यांना त्यांनी लष्करी मदतही वाढविली. परंतु रशियाचा प्रत्यक्ष युध्दामध्ये सहभाग टाळण्यासाठी अमेरिकन हवाई दलास रशियन बंदरावरील हालचाली टिपण्यास मनाई केली. ट्रुमन यांच्या कोरीयन युध्दातील राजकीय मर्यादाना जनरल मॅकआर्थर कंटाळले होते. परतु वॉशिंग्टनच्या लष्करी सल्लागांरानी त्यांच्या या धोरणाला पाठींबा दिला होता. सुरक्षा परिषदेच्या विनंतीवरुन युनोच्या कोरीयातील सर्व फौजांचे नेतृत्व जनरल मॅक आर्थर यांच्याकडे देण्यात आले. त्यासाठी इंग्लड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, टर्की, फिलिपाईन्स आणि थायलंड या देशानी आपली सैन्य दले पाठविली तर इतर देशांनी वैद्यकीय मदतीसोबत लागणारी इतर मदत पाठविली. फौजांमध्ये अमेरिकन आणि द. कोरियन फौजांचा प्रमुख समावेश होता. या सर्व मदतीच्या जोरावर मॅकआर्थर यांनी उत्तर कोरियाचे आक्रमण परतवून लावण्याचा निश्चय केला. दोनच आठवड्याच्या कालावधीत म्हणजे १ ऑक्टोबर १९५० पर्यत युनोच्या फौजांनी अर्ध्यापेक्षा अधिक लाल सैन्य नष्ट केले व स्वतंत्र जगात युध्दविषयक वादविवाद रंगल्यामुळे युध्द काही काळ थांबविले गेले.

ऑगस्ट १९५० मध्ये काँग्रेसने अध्यक्षांना युध्दाच्या परिस्थितीत संपूर्ण अधिकार वापरण्याची मंजूरी दिली. त्यामध्ये किंमती नियंत्रण व कर्ज पुरवठा यांचाही समावेश होता. त्यामुळे १५.६ अब्ज युध्द खर्च, दुप्पट लष्करभरती (५ दशलक्ष), ४.५ अब्जापर्यंत करवाढ आणि अमेरिकेच्या दोस्त राष्ट्रांना ५ अब्ज डॉलर्सची लष्करी मदत इत्यादींसाठी तरतूद करण्यात आली. परंतु एवढे जरी असले तरी अध्यक्षांना हे युध्द लवकर संपुष्टात यावे असे वाटत होते. परंतु त्याचवेळी महगाई दर वाढू लागला. म्हणून रशियन आक्रमणाचा धोका वाटू लागल्यामुळे पश्चिम युरोप आणि नाटो सदस्य राष्ट्रांची सुरक्षा जनरल आयसेन हावर यांच्या नेतृत्वाखालीदेण्याचे घाईघाईने प्रयत्न करण्यात आले. परंतु हा जागतिक युध्दाचा धोका जवळजवळ तीन वर्षे चालू होता.

७ ऑक्टोबर १९५० रोजी युनोने 'एकीकृत स्वतंत्र कोरिया' बाबतचा ठराव पारित केला आणि मॅकआर्थर यांना त्याबाबत पावले उचलण्यास सांगितले. या ठरावास रशियाने विरोध केला तर भारत, युगोस्लाव्हिया आणि इतर पाच अरब राष्ट्रे तटस्थ राहीली. परंतु काही साम्यवादी राष्ट्रांनी दक्षिण कोरीयासच आक्रमक ठरविण्याचा प्रचार सुरु केला. अमरिकेवर चिथावणीचा आरोप केला. चीननेसुध्दा उत्तर कोरीयावरील आक्रमणाबाबत इशारा दिला. म्हणून ट्रुमन यांनी मॅकआर्थर यांची भेट घेऊन त्याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यास सांगितले. पुढे मग युनोच्या फौजांनी उत्तर कोरीयन फौजांना यालू नदीपर्यंत मागे ढकलेले व मांचुरियापासून वेगळे केले. त्या ठिकाणी त्यांना चीनी फौजांचा सामना करावा लागला. त्यावेळी ब्रिटन, भारत आणि इतर देशांनी चीनी साम्यवादी सरकारला प्रतिकार न करण्याचा व ३८ व्या समांतर रेषेपासून दूर राहण्याचा सल्ला दिला. परंतु त्यांनी तो

धुडकावून लावत संपूर्ण उपखंडच जिंकण्याचा मानस रचला. युनोच्या फौजांनी मोठ्या शिताफीने चीनी फौजांचे आक्रमण रोखले. काही प्रदेशही काबीज केला. ३८ व्या समांतर रेषेजवळ जानेवारी १९५१ मध्ये एक स्थिर रेषा आखली. पुढे मग अडीच वर्षे पर्यंत या फौजांनी समोरासमोर तळ ठोकला आणि अमेरिकन गटांमध्ये, अमेरिका व तिची दोस्त राष्ट्रे यांच्यामध्ये आणि युनोचे समर्थक व साम्यवादी सरकारे यांच्यामध्ये सतत संघर्ष चालू राहीला.

## १५.१४ अमेरिकाअंतर्गत प्रतिक्रिया आणि मॅकआर्थर यांना परत बोलावणे

चीनने कोरीयन युध्दात हस्तक्षेप केल्याने अमेरिकन जनमत ट्रुमन यांच्या विरोधात गेले आणि माजी राष्ट्राध्यक्ष हुवर आणि राजदूत जोसेफ केनेडी यांनी अमेरिकेने फक्त प. गोलार्धाच्या सुरक्षेवरच लक्ष देण्याची मागणी केली. काहींनी तर साम्यवादी चीनवर अमेरिकेने प्रत्यक्ष हल्ला करण्याची व त्यासाठी अणुबॉम्बचाही वापर करण्याची सूचना केली. त्यामुळे ब्रिटीश पंतप्रधान क्लेमेंट ॲटली ताबडतोब वॉशिंग्टनला आले व त्यांनी दोस्त राष्ट्रांच्या संमतीशिवाय अमेरिकेने अणुबॉम्बचा वापर न करण्याचा सल्ला दिला. सोव्हिएत रशियाने आपल्या नकाराधिकाराचा वापर केला असला तरी युनोच्या महासभेने फेब्रुवारी १९५१ मध्ये चीनला आक्रमक राष्ट्र ठरविले. त्यामुळे जागतिक युध्दाचे ढग जमा होण्याची चिन्हे निर्माण झाली. त्यामुळे ट्रुमन यांनी अमेरिकेत आणीबाणी लागू केली. आर्थिक नियंत्रण वाढविले आणि नाटोचे बळसुध्दा वाढवले. त्यातच जनरल मॅकआर्थरने अमेरिकन प्रशासनाच्या मर्यादीत उद्दिष्टांविषयी भाष्य केले व त्यास दोष देण्यास सुरुवात केली. त्यांच्या मते, चीनला युनोच्या सैन्याने यालू नदीच्या पलीकडे ढकलले नाही. फार्मोसा येथील राष्ट्रीय चीनी सैन्याला चीनच्या मुख्य भूमीवर हल्ला करण्यापासून रोखले आणि त्यामुळे युनोच्या सैन्याला कोरीयामध्ये अजूनही विजय संपादन करता आला नाही. तशातच मॅकआर्थर यांनी काँग्रेसमधील विरोधी पक्षांशी हातमिळवणी केली. तसेच परराष्ट्र मंत्रालयाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणताही परराष्ट्र निधी जाहीर करु नये या अध्यक्षांच्या आदेशाचेही उल्लंघन त्यांनी केले. त्यानंतर अध्यक्ष आणि संयुक्त स्टाफ प्रमुख यांनी मॅकआर्थर यांना दक्षिण कोरीयाचे स्वातंत्र्य व ते राखण्यासाठी बचावात्मक धोरण हीच खरी अमेरिकन नीती असल्याची ताकीद दिली. परंतु त्यानंतरही मॅकआर्थर त्या विरोधात रिपब्लिकन नेते मार्टीयन यांना जाऊन मिळाले. हे सरळसरळ वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन होते. त्यामुळे त्यांच्या नेणूक प्रमुखाने त्यांना १ एप्रिल १९५१ रोजी जपान आणी कोरीया येथील प्रमुख पदावरुन दूर केले आणि मॅकआर्थर यांच्या जागी मॅथ्यू रिजवे यांना नेमले. या वादावरुन अमेरिकन सिनेटमध्ये भयंकर गोंधळ माजला. परंतु ट्रुमन यांच्या धोरणावर सर्वानुमते शिक्कामोर्तब करण्यात आले.

जनरल मॅथ्यू रिजवे यांनी एप्रिल व मे मध्ये चीनचे प्रमुख दोन हल्ले परतवून लावले. त्यामुळे स्टॅलिन आणि माओ यांची खात्री झाली की अमेरिका युध्दक्षेत्र वाढविण्याच्या बेतात नाही व चीनलाही पटले की कोरियामध्ये आपले मनसुबे राबविता येणार नाहीत. २३ जून १९५१ रोजी रशियन प्रतिनिधीने युनोमध्ये कोरीयन युध्द बोलणी करुन संपविण्याचा प्रस्ताव ठेवला. त्यानुसार जनरल रिजवे यांना तशा सूचना देण्यात आल्या. परंतु ही शांततेची बोलणी म्हणजे अत्यंत अफवा आणि गोंधळाची स्थिती होती. शेवटी इ.स. १९५२ मध्ये कोरियन युध्दाचा प्रश्न निकाली निघाला.

## १५.१५ पॅसिफीक महासागरात सत्ता बळकट करणे

कोरीयन युध्दादरम्यान अमेरिकेने नाटो सदस्य राष्ट्ेर आणि आपली इतर मित्र राष्ट्रे यांना वेगवेगळ्या करारान्वये बळकट करण्याचे प्रयत्न केलेले होते. तसेच अति पूर्वेकडील इ.स. १९५० मधील २ दशलक्ष डॉलर्सची मदत इ.स. १९५२ मध्ये २३७ दशलक्ष पर्यंत वाढविण्यात आली. दुसरे म्हणजे इ.स. १९५३ मध्ये पिकांची नुकसानी झाल्यामुळे भारतालाही १९० दशलक्ष डॉलर्सचे कर्ज मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे अमेरिकन कॉंग्रेस फॉर्मोसा येथील चीनी राष्ट्रीय सरकार, फिलीपाईन्स आणि जपान यांना मदत करण्यास अत्यंत उत्सुक होती.

जपान-अमेरिका संबंधामध्ये क्रांतीपूर्वक बदल झाले. ८ सप्टेंबर १९५१ मध्ये ७८ सरकारांनी जपानबरोबर शांतता करारावर स्वाक्षर्या केल्या आणि केवळ अमेरिकेबरोबर वेगळा करार होऊन पूर्वीचे शत्रू राष्ट्र जपान अमेरिकेचे मित्र राष्ट्र बनले. एवढेच नव्हे तर हा जपान बरोबरचा करार एवढा उदार होता की, जपानच्या वर्चस्वातून निघालेल्या अनेक देशांनी त्याबाबत अमेरिकेकडे तक्रारी केल्या. परंतु त्या देशांना नंतरचे तह-करार करुन शांत करण्याचे प्रयत्न केले गेले. जपानने अमेरिकन वर्चस्वाला काही प्रमाणात मान्यताही दिली. जपानवर कोणत्याही आर्थिक, लष्करी किंवा राजकीय स्वातंत्र्याबाबत बंधने लादली नाही. तर जपानने अमेरिकन फौजा आंतरराष्ट्रीय शांततेच्या दृष्टीने जपानमध्ये तैनात करण्यासही परवानगी दिली. एवढेच नव्हे, जर साम्यवादाने प्रेरित होऊन जपानमध्ये काही अंतर्गत बंडाळी निर्माण झाल्यासही सदर फौजेचा वापर करता येऊ शकत होता. या अगोदर जर्मनीमध्ये सुध्दा अमेरिकेने हाच प्रयोग केलेला होता. लोकांमध्ये जागृती आल्यामुळे अमेरिकेस उदार धोरण राबविणे, शत्रू राष्ट्रास मित्र बनवणे, लष्करी राजवटीचे लोकशाहीमध्ये परिवर्तन करणे आणि त्याचमुळे अतिपूर्वेकडे साम्यवादाच्या विरोधात तेथील देशांना बळकट करणे गरजेचे होते. उत्तरेकडे जपानला मजबूत बनवून अमेरिकेने चीनच्या साम्यवादी परीघाभोवती तटबंदी उभारली व अनेक देशांशी मैत्रीचे व सुरक्षेचे करार केले. दक्षिणेकडे ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड तर मध्यभागाकडे फिलीपाईन्स प्रजासत्ताकाला बांधून घेतले आणि त्यांच्याशी अनुक्रमे १ सप्टेंबर आणि ३० ऑगस्ट १९५१ रोजी परस्पर सहकार्याने करार केले. ह्या दाखल्यावरुन ब्रिटीश कॉमनवेल्थने भारत, पाकीस्तान, मलाया, सिंगापूर, उत्तर बोर्निओ आणि सारावाक या देशांना 'कोलंबो प्लॅन' नुसार मजबूत करण्याचे प्रयत्न सुरु केले आणि ५.२ अब्ज डॉलर्सची तरतूद तांत्रिक व भांडवल गुंतवणूकीसाठी केली. त्यामुळे अमेरिकन पॉईन्ट फोर चतु:सूत्री कार्यक्रमानुसारच साम्यवादाला रोखण्यासाठीचे हे प्रयत्न सुरु झालेले होते.

## १५.१६ व्हिएतनाम युध्द

दरम्यानच्या काळात फ्रान्सच्या व्हिएतनाम या इंडोचायना वसाहतीमध्ये सुध्दा युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली. व्हिएतनामी साम्यवादी गटाने उत्तर व्हिएतनामवर वर्चस्व स्थापन केले. जुलै १९५४ मध्ये फ्रेंच फौजांचा दिएन बिएन फू येथे पराभव झाला आणि जिनिव्हा करारानुसार वेगळे दोन व्हिएतनाम निर्माण झाले व इ.स. १९५६ रोजी मुक्त निवडणुका घेण्याचे ठरले. परंतु अमेरिकन दबावामुळे व्हिएतनामच्या अध्यक्षांनी

निवडणुकांचे आश्वासन पाळले नाही कारण साम्यवादी उत्तर व्हिएतनामी नेते हो-चि-मिन्ह यांच्या निवडून येण्याची शक्यता अधिक होती.

आयसेन हावर प्रशासनाने अमेरिका राष्ट्रीय चीनच्या चँक कै शेक सरकारला चीनच्या मुख्य भूमीवरुन आक्रमण करण्यास रोखणार नसल्याचे जाहीर केले. त्यातच फॉर्मोसा वर सुध्दा साम्यवादी चीनच्या आक्रमणाची सततची टांगती तलवार होती. परंतु फॉर्मोसाचे रक्षण करण्याचे अधिकार आयसेन हावर यांना काँग्रेसने दिलेले होते. दरम्यान साम्यवादी चीनला मान्यता देण्याचे व युनोचे सदस्यत्व देण्यास अमेरिका नेहमीच नकार देत होती. त्याचप्रमाणे दक्षिण आशियामध्ये कोणत्याही प्रकारचे साम्यवादी आक्रमण रोखण्यासाठी नाटोप्रमाणेच सप्टेंबर १९५४ रोजी सिटो (SEATO-South East Asian Treaty Organisation) नावाची लष्करी संघ स्थापन केला. त्याचे तुर्की, इराक, इराण आणि पाकिस्तान सदस्य बनले. त्यानंतर मार्च १९५७ मध्ये आयसेन हावर यांच्या विनंतीवरुन मध्य पूर्वेचे अमेरिका रक्षण करण्यास कटीबध्द असल्याचे अमेरिकन काँग्रेसला जाहीर करावे लागले. तसेच २०० दशलक्ष डॉलर्सची लष्करी व आर्थिक मदतही पाठविली. या अमेरिकन धोरणाला पुढे 'आयसेन हावर सिध्दांत' म्हटले जाऊ लागले. जुलै १९५८ मध्ये अमेरिका आणि इंग्लड यांच्या सेना लेबनॉन आणि जॉर्डन या दोस्त राष्ट्रांना पाठींबा देण्यासाठी रवाना करण्यात आल्या.

## १५.१७ क्यूबामधील पेचप्रसंग, १९६३

जुलै १९६३ मध्ये अमेरिकन सरकारला अशी माहिती मिळाली की सोव्हिएत रशियाने आपली क्षेपणास्त्रे क्यूबा येथे पाठवून अशा ठिकाणी ठेवली आहेत की ज्यामुळे अमेरिकेवर हल्ला करता येईल. असे झाल्यास साम्यवादाचा विजय होऊन सत्तासंतुलन बिघडेल व रशियाचा लॅटीन अमेरिकेतील हस्तक्षेप वाढेल. यापूर्वी अमेरिका व रशिया दोघेही आपल्या प्रभावक्षेत्रावर सारखेच नियंत्रण ठेवून होते. त्यानंतर अध्यक्ष केनेडी यांनी कडक पवित्रा घेतला आणि रशियाने आपली क्यूबातील क्षेपणास्त्रे ताबडतोब परत न्यावित अन्यथा अणुयुध्द होईल असा आग्रह धरला. त्यामुळे रशियाने आपल्या क्षेपणास्त्रे परत नेण्यास सहमती दर्शविली. त्याबदल्यात अमेरिकेनेही तुर्कीमधील आपली क्षेपणास्त्रे काढून घ्यावीत आणि क्यूबावर कधीही आक्रमण करु नये असे आश्वासन मिळवले.

पुढे भविष्यात हळू हळू अमेरिका – रशिया संबंधात सुधारणा होऊ लागल्या. त्यांना परस्पर जाणीवही झाली की कोणीही राष्ट्र एकमेकास उध्वंस करण्याची योजना तयार करीत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) कोरियन युध्दावर भाष्य करा.

२) क्यूबा संघर्ष काय होता?

३) सोव्हिएत साम्रज्यवादाचे स्वरुप काय होते ?

४) ट्रुमन सिध्दांतावर भाष्य करा.

## १५.१८ समारोप

या पाठातील घटनांचा आढावा घेतल्यास आपणास अमेरिकेचे शीतयुध्दकालीन परराष्ट्रीय धोरण समजून येते. या काळात बरीच वर्षे साम्यवादी सोव्हिएत रशिया आणि त्यांच्या गटातील राष्ट्रे एका बाजुला आणि लोकशाही-भांडवलशाही अमेरिका व तिच्या गटातील राष्ट्रे यांच्यामध्ये सतत संघर्षपूर्ण तणाव राहीला. जगातील शांतता अथवा संघर्षया या दोन गटांतील हालचालीवर अवलंबून राहिला. जेव्हा अनेक राष्ट्रे या गटांच्या वर्चस्वाला कंटाळून स्वतंत्र होऊ लागली त्यानंतर मात्र हे शीत युध्द संपुष्टात आले.

## १५.१९ प्रश्न

१) दुसऱ्या महायुध्दानंतरचे अमेरिकेचे समावेशीकरणाचे धोरण कसे होते? चर्चा करा.

२) अमेरिकेच्या वसाहतविरोधी धोरणाचे मुल्यमापन करा.

३) अमेरिकेच्या लॅटीन अमेरिकेतील धोरणाचे परिक्षण करा.

४) शीत युध्द म्हणजे काय? शीत युध्दकालीन घडलेल्या घटनांचा आढावा घ्या.

❖❖❖❖

munotes.in